TIGHT BINDING BOOK

UNIVERSAL LIBRARY
OU_196180
UNIVERSAL LIBRARY

OUP—2273—19-11-79—10,000 Copies.

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. M294.592 Y54R Accession No. PG M5689

Author योगी मनोहर.

Title रामायण रहस्य. n.d.

This book should be returned on or before the date last marked below.

# रामायण रहस्य

## रामायण इतिहासांतील क्रान्ति दर्शन

लेखक :

वाल्मिकि योगी मनोहर

वैदिक विश्व प्रकाशन

तुळसीबाग मार्ग, नागपूर–२

प्रकाशक :

त्र्यंबक हरकरे
तुळसीबाग मार्ग, नागपूर–२

प्रथमावृत्ती शके १८९९

मूल्य १५ रु.

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

मुद्रक :

भा. वै. वराडपांडे
तरुण भारत प्रेस,
रामदासपेठ, नागपूर–१०

# प्रकाशकाचे प्रकाशन

सदरहू पुस्तक 'रामायण रहस्य' वैदिक विश्व प्रकाशनाचे पांचवे पुष्प होय. पैशाचा आधार नसतांना सुद्धां एवढ्या थोड्या अवधींत इतकी पुस्तकें भराभर प्रकाशित व्हावी याचा अर्थ असा कि योगी मनोहर यांचे वैदिक परम्परेला धरून असलेले शास्त्रशुद्ध आणि वैज्ञानिक स्पष्टीकरणांचे विचार जनसामान्यांत अतीशय प्रिय होत आहेत. वालिमकींनी रामायण ग्रंथ लिहल्यानंतर त्याचे खरें रहस्य सांगणारे महान पुरुष योगी मनोहरच आहेत याबद्दल आमची खात्री आहे. असला प्रयत्न कोणी केल्याचे आढळत नाही; असल्यासच तो एक तर्कविलास होता, प्रत्यक्ष योगानुभवांची बैठक त्याला नव्हती. योगी मनोहर स्वतः उच्च कोटीचे योगी असल्यामुळे स्वतःच्या योगानुभवांना धरूनच त्यांना रामायणांतील असल्या दुर्लभ योगरहस्यांचे आकलन झाले आणि त्यामुळें ते रामायणावर अगदी नव्यानेंच प्रकाश टाकूं शकले.

योगी मनोहरांनी स्वतःला वालिमकि म्हणवून घेतलें आहे हे त्यांच्या विनम्रतेचे आणि त्याचबरोबर अधिकाराचे द्योतक आहे, असें आम्हाला वाटते. रामायण ग्रंथ कथाइतिहास नसून प्रत्येकाने आपल्या जीवनांत आचरण्याचा तो एक आध्यात्मिक आदर्शवाद आहे हा योगीजींचा आग्रह सार्थ वाटतो. त्यामुळें केवळ भारतांतीलच नव्हे तर सर्व विश्वांतील मानव समाज आदर्श जीवनाची प्रत्यक्ष वाटचाल करून, खऱ्या अर्थानें ज्ञानमय म्हणजे वैदिक बनेल हा योगीजींचा आशावादही आम्हाला यथार्थ वाटतो.

योगी मनोहरांचे हें पुस्तक सुद्धां जगांतील सर्व भाषांतून अनुवादित होऊन सर्वजनसुलभ होण्याइतके महत्वाचे आहे हें आमच्याप्रमाणें इतरांनाही पटल. यानन्तर अशाच धर्तीवर योगी मनोहरजी लघु महाभारत मराठी आणि हिन्दींत लिहणार आहेत असें कळते. प्रस्तुक पुस्तकाचा थोड्या विस्ताराने हिन्दी अनुवाद ते लवकरच करणार आहेत असेही कळतें. तसे झाल्यास हिन्दी जगतावर त्यांचे बरेंच उपकार होतील.

याशिवाय बृहत् रामायण, बृहत् महाभारत आणि उपनिषदरहस्य ग्रन्थ योगी मनोहरजी लवकरच लिहायला घेणार आहेत. त्याकरता बराच खर्च येणार आहे. तरी वैदिक जीवनावर प्रेम करणाऱ्यांना ही आग्रहाची सूचना की त्यांनी या महान् कार्याला सढळ हाताने सहाय्य करावे. प्रसिद्धि-पूर्व रामायण रहस्य ग्रंथाचे मूल्य रुपये १२५ योगीजींच्या पत्त्यावर पाठविल्यास अशांना रामायण ग्रंथ बिनामूल्य मिळेल. या सत्कार्याला धनिकांनी अधिक सहाय्य करावे अशी योगी मनोहरांची इच्छा आहे. त्यांचा पत्ता योगी मनोहर हरकरे, तुलसिबाग मार्ग, नागपुर–२ असा आहे.

सदरहू पुस्तकांतील सर्व चित्रें आणि दोन्ही ब्लॉक योगीजींनी स्वतःच काढले आहेत. ते उत्तम चित्रकार, गायक आणि वक्तेही आहेत पण निरहंकारी! त्यांची लेखनशैली किती मार्मिक आणि रसपूर्ण आहे हे प्रस्तुत पुस्तकावरून पाहण्यासारखे आहे. रामायण महाभारतावरील त्यांचे संशोधन तर मोठमोठ्या विद्वानांनाही चकित करणारे आहे. पण आपल्या महान बुद्धिमत्तेचे सर्व श्रेय ते ज्ञानेश्वर माऊलीला देतात. मनाचा केवढा मोठेपणा आहे योगी मनोहरांमधे !

# आवश्यक संकेत

'रामायण रहस्य' ग्रंथ कांही समतोल बुद्धीच्या विचारवंतांना दाखविल्यावर त्यांनी असा अभिप्राय व्यक्त केला कि रामायणांतील गुह्य आणि समाजोन्मुख रहस्यें उद्‌घाटित करण्याचा लेखकाचा प्रयत्न स्तुत्य आहे एवढेंच नव्हे तर तो आजच्या बदलत्या समाजरचनेच्या दृष्टीने आणि संपूर्ण क्रान्तीचे दृष्टीने अतीशय आवश्यक आहे, परन्तु पुस्तक वाचल्यावर त्यांतील कांही स्थलांतील भाषा कडक वाटते आणि आपल्यालाच सर्वकाही समजते, इतर मूर्ख आहेत अशा वृत्तीचा दर्प लेखकाद्वारे येऊ पाहतो हे योग्य वाटत नाही. यापूर्वी लिहलेल्या त्यांच्या ग्रन्थांत यासारखी कडक भाषा नव्हती.

वरील विचारवंतांचे म्हणणे बरोबर आहे, परन्तु जेथे मूळ रामायणांतील कथा आध्यात्मिक साधकाकरता एवं समाजस्वास्थ्याकरता शर्करावगुंठित गोळ्या असल्यामुळे वरून वाटणाऱ्या त्या गोड गोळ्यांत रोगपरिहारक कडू क्विनाइन आहे हे स्पष्टपणे सांगीतल्यास सांगणाऱ्यावर दोष कसा येईल ? रामायणांतील शालजोडीतल्या वाटणाऱ्या कथा स्पष्ट केल्यास तितक्याच कडक भाषेंत प्रकट होतील. हे आवश्यक कार्य लेखक करीत आहे.

तरीपण ज्या ठिकाणी वरीलप्रमाणे लेखकावर आक्षेप येऊ शकेल ती वाक्यें गाळण्यास लेखकाची मुभा आहे; परन्तु तसे करतांना रामायण-काराच्या मूळ उद्देशाचेच हनन होऊ नये ही विनंति.

लेखक

# शुद्धिपत्र

| पृष्ठ क्र. | पंक्ति | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ५ | खालून ४ थी | इतिहासकार | कांही इतिहासकार |
| ८ | खालून ८ वी | बुद्धि, | बुद्धि |
| १३ | वरुन १२ वी | नऊ दहा वर्षापर्यन्त | नऊ दहा हजार वर्षापर्यन्त |
| १४ | वरुन ४ थी | प ीने | परीने |
| ३६ | वरुन १५ वी | होत. अनार्य | होत. आर्य अनार्य |
| ६० | वरुन १३ वी | सारस्थ | सारथ्य |
| ८३ | वरुन ५ वी | प्रेमलाप | प्रेमालाप |
| ८७ | खालून २ री | लक्ष्मणाही | लक्ष्मणालाही |
| ९३ | वरुन २ री | घसला | घुसला |
| ११० | वरुन २ री | नाशह ेत असतो | नाश होत असतो |
| ११० | वरुन ६ वी | दुन्दुभिला | दुन्दुभीला |
| १२७ | खालून ११ वी | होत्साने | होत्साते |
| १२८ | वरुन ३ री | गंफण | गुंफण |
| १३७ | वरुन ३ री | अक्ष्मण | लक्ष्मण |
| १३७ | खालून २ री | शर | शूर |
| १४७ | वरुन १४ वी | ब्राहृयण | ब्राह्मण |
| १५१ | वरुन १ ली | थिल्लर पाणि | थिल्लर पाणी |
| १५१ | वरुन ११ वी | शब्दपासून | शब्दापासून |
| १५२ | वरुन ११ वी | गोबवे | गोडवे |
| १५५ | वरुन ५ वी | द्यायची. | द्यायची ? |
| १५९ | खालून ३ री | करते कि | करते झाले कि |
| १६१ | वरुन ९ वी | कुलस्त्री. | कुलस्त्री ! |
| १६२ | खालून ८ वी | मन:शान्तित | मन:शान्तीत |
| १६४ | वरुन ८ वी | पाहुंच | पाहूंच |



# योगेश्वर श्री ज्ञानेश्वर महाराज

जन्मकाल संवत १३३२ : संजीवन समाधि संवत १३५३

# रामपत्र

प्रस्तुत प्रबन्ध पुस्तिका रुपांत प्रसिद्ध होण्याचाच रामयोग दिसतो. चैत्रमासांतील नवमीला रामरायांची जन्मतिथी. सारे विश्व रामजन्मानें पुनीत होणार! परंतु त्या खऱ्या आत्मारामाला जाणता यावे म्हणून प्रस्तुत प्रयत्न आहे. लेखक स्वतःला विद्वान समजत नाही. सर्व जीवन धकाधकीत गेल्यामुळे लेखकाला शास्त्रांचे आलोडन करता आले नाही कि काव्याचा कीस काढता आला नाही. एवढे मात्र खरें कि ज्ञानेश्वर माऊलीची कृपा पूर्णपणे लेखकावर आहे असे लेखक मानतो. त्यांचीच ही बुद्धि पुस्तक रुपानें बाहेर येत आहे.

शास्त्राचे अस्त्र जेथें चालत नाही, तर्कविलास जेथें पांगुळतो अशा परा अवस्थेंपासून अध्यात्माची खरी सुरवात असल्यामुळे रामायण महाभारत विषयावर अभिनिवेशी शास्त्रीपंडिताशी वाद घालण्यात कांहीच लभ्यांश निघणार नाही याची लेखकाला खात्री आहे. परंतु ज्या शास्त्रीपंडिताला अध्यात्मशास्त्रांतील योगमार्गाची प्रत्यक्ष अनुभूति असेल अशा श्रेष्ठ साधकांशी याबाबत बोलण्याची लेखकाची तयारी आहे. स्वतःला कथित इतिहासकार मानून भारतीय समाजांत भ्रमाची आणि फुटीरतेची बीजें पेरणाऱ्या समाजघातकी विद्वानांशी रामायण महाभारत विषयावर बोलण्याची लेखकाची सदैव तयारी आहे; परंतु अनुभवाविना व्यर्थ वादविवाद माजवून स्वतःच्या अहंकाराला खत पाणी घालण्यांत कांही निष्पन्न होणार नाही असें त्यांनाही प्रेमानें सुचवावेसे वाटते. रामायण महाभारत एक आदर्श जीवन आहे न कि असम्भव इतिहास!

त्यांचा सत्यार्थ समजून तो आदर्श आमच्या प्रत्यक्ष जीवनांत आणणे आज आवश्यक होऊन बसले आहे. इतिहासकार विद्वान वा शास्त्री पंडित प्रवचनकारांनी आमच्या या आदर्श ग्रंथांना आपल्या पांडित्याचे प्रदर्शन करण्याचे आणि स्वतःचे पोट जाळण्याचे एक साधन करून सोडले आहे ही दुर्दैवाची गोष्ट आहे. ही परिस्थिति आतां बदलणे आवश्यक झाले आहे.

साधारण जनतेच्या धार्मिक कल्पनांचा उठसूठ कैवार घेणाऱ्या कथित कैवाऱ्यांना असें सांगावेसे वाटते कि त्यांनी जनतेच्या धार्मिक वा आध्यात्मिक कल्पनांचाच केवळ कैवार न घेता त्यांच्या आर्थिक, सामाजिक आणि एकूण दु:खमय जीवनाचाच त्यांच्यात समरस होऊन कैवार घ्यावा; असे न झाल्यास समाजाला ते अज्ञानात ठेऊन स्वत:चा स्वार्थ साधण्याचा प्रयत्न करतात असें दु:खानें म्हणावे लागेल.

## बिहारमधील अनुभव

लेखक कांही वर्षे बिहार प्रान्तात राहिला होता. तेथील एका श्रेष्ठ योग्याशी त्याचे नेहमी दर्शन घडत असे. एकदां त्या योग्याकडे लेखक गेला असतां योग्याने लेखकाला सहज प्रश्न केला, 'भैय्या, भगवान राम ने शिवधनुष्य के कितने टुकडे बनाये?' लेखक जरा घुटमळला कारण एवढा साधा प्रश्न एक श्रेष्ठ योगी कसा काय विचारणार? लेखकाच्या तर्काला अधिक वेळ न देता योगी म्हणाले, 'अच्छा, मेरे पीछे आ जाइये और मेरुदण्डपर उपर से नीचे तक अपनी उंगलिया घुसेडने की चेष्टा कीजिये.' मेरुपृष्ठ (Spinal cord) मजबूत हाडांचा, त्यांत आपलीं बोटें कशी काय जाणार? पण आश्चर्य हें कि लेखकाच्या हाताची बोटें त्या दुर्गांत दोन स्थानी आरपार गेली. हा भ्रम नव्हता तर प्रत्यक्ष अनुभूति! 'भैय्या कितने टुकडे हुवे?' दोन स्थानीं बोटें गेल्याने मेरुपृष्ठाचे तीन तुकडे होणारच. लेखक उद्गारला, 'तीन?' 'बस, इतनेही टुकडे भगवान राम ने शिववधनुष्य के बनाये थे' योगी ज्ञान देते झाले.

परंतु त्या कालांत लेखकाची योगमार्गांत आवश्यक तेवढी प्रगति न झाल्याने योग्याच्या त्या रामायण रहस्याचा उलगडा लेखकाला बरेंच वर्षे झाला नाही. आतां योगसाधनेतील गतिमुळें आणि ज्ञानेश्वर माऊलींचे कृपेमुळे लेखक त्याच शिवधनुष्याचे नव्हे तर संपूर्ण रामायण आणि महाभारत ग्रंथांचे रहस्य समजूं लागला आहे. ती योग रहस्यें यच्चयावत् मानवांना समजल्यास सर्व मानव जातीचे जीवन उच्च आदर्श बनण्यास बरीच मदत होईल अशी लेखकाची धारणा आहे. म्हणूनच हा प्रयास आहे एका मोठ्या कार्याची ही अल्पशी सुरवात आहे.

संपूर्ण रामायण आणि महाभारतांतील कथांचे योगरहस्य जनतेसमोर मांडावे अशी लेखकाची इच्छा आहे. हें काम सोपें नाही याची लेखकाला कल्पना आहे. रामायण महाभारत मानलेले इतिहास नसून त्यांत योग-रहस्याशिवाय अन्य काहीच नाही याबद्दल अनेक चिन्तनमन्थनानन्तर लेखकाची खात्री झाली आहे. परंतु या कार्याला कांही अन्य योगी विद्वानांचे साहाय्य आणि एकूण व्ययाला कांही लाख रुपये लागणार आहेत. कालावधीसुद्धा कांही वर्षांचा लागणार आहे. शासनाचे असल्या गोष्टीकडे लक्ष नाही. जे लोक शासनासबंधीत व्यक्तिशी संबंध ठेवून लांगूल चालन करतात त्यांना शासन सहाय्य करते असा अनुभव आहे. साधना जीवनाचे संस्कार असल्यामुळे लेखकाला असले लांगूल चालन करणे जमणार नाही. आता जनतेतील प्रयत्नशील आणि धनी व्यक्तींनी या महान कार्याकरता समोर यावे आणि हें आवश्यक कार्य लेखकाकरवी करवून घ्यावे ही इच्छा.

## श्रेष्ठ साधकांची मतें

एकटा लेखकच रामायण महाभारताबद्दल असले मत ठेवतो असें नसून महात्मा गांधी आणि मागील पिढींतील श्रेष्ठ योगी वासुदेवानन्द सरस्वति यांचे महाभारत रामायणाबद्दल काय मत आहे ते उद्धृत केल्यास वाचकांच्या गैरसमजांतून उत्पन्न होणाऱ्या क्रोधाचा पारा बराच कमी होईल अशी आशा आहे. स्वतःचे अनुभवजन्य मत निश्चित झाल्यावर लेखकाने आपल्या मताला पुष्टी देणारे आधार धुंडाळले आणि समाधान एवम् आश्चर्याची गोष्ट ही कि योगी वासुदेवानन्द सरस्वती आणि महात्मा गांधी यांची मतें तशीच आढळली. ती प्रस्तुत करण्यांत येत आहेत.

योगी वासुदेवानन्द सरस्वति एक निष्ठावान कर्मकांडी वैदिक विद्वान ब्राह्मण होते. संपूर्ण वेद उपनिषदे आणि तत्सम वैदिक ग्रंथाचा त्यांच्या अभ्यास आणि अनुभव दांडगा होता. ते कट्टर सनातनी वृत्तीचे होते. त्यांचे रामायणाबद्दलचे मत पहा

दशेन्द्रियरथो देही राजा दशरथः स्मृतः ।
कौसल्या तत्प्रिया बुद्धिः रामस्तत्रोह्यतः परः ॥१॥

वृत्वां सीतां स्वानुभूतिं सुखमास्तेऽथ दैवतः ॥
संसार विपिनं प्रापाहंकारो रावणाभिधः ॥२॥

राजसः स्वानुभूतिं तां सीतां यत्नाज्जहार ह ।
रामः परात्मापि ततः स्वानुभूतिं वियोगतः ॥३॥

प्राप्तो दीनदशां दुःखि सुशोच विरहातुरः ।
परिभ्रमन् हनुमतां विवेकेन च संगतः ॥४॥

तेन सीता स्वानुभूति स्थितिवार्ता प्रकाशिता ।
ततो वानरसह वृत्तिसैन्येन च हनुमता ॥५॥

सेतुं बध्वा सजलधौ साधनाश्मभित्कटैः ।
ततो भवाब्धिमुल्लंघ्य दीप्तज्ञानाग्निना भृशम् ॥६॥

सूक्ष्मे देहाख्य लंकांच दग्ध्वोपनिषदस्त्रतः ।
कामक्रोधादि रक्षांसि हत्वा बुद्धे सहस्त्रतः ॥७॥

सात्विकाहंकारं विभीषण सहाय्यतस्ततः ।
कुम्भकर्णं तामसाहंकारं राजसमप्यथ ॥८॥

निहत्य रावणं स्वानुभूतिं सीतां प्रगृह्यच ।
रामः स्वरूप साम्राज्येऽभिषिक्तोऽरीर मत्तया ॥९॥

वरील श्लोकांचा आशय असा आहे–

१) दशेन्द्रिययुक्त शरीररुप रथाचा स्वामी राजा दशरथ आहे. त्याची बुद्धि. त्याची प्रिय पत्नि कौसल्या आहे परन्तु राम त्याहून भिन्न असा जीवात्मा आहे.

२) जीवात्माची राजस अनुभूति हीच सीता आहे. असल्या सीतेसह राम सुखाने राहतात. हा संसार एक विपिन म्हणजे अरण्य आहे. त्या संसाररूप अरण्यांत अहंकाररुप रावण प्रवेश करता झाला.

३) राजसवृत्तिद्वारा प्राप्त स्वानुभूति म्हणजे सीता होय. असल्या सीतेचे रावणाने हरण केले. राम परमात्मस्वरुप असूनही राजसवृत्ति सीतेचे हरण झाल्यावर त्यांना वियोगामुळें अति दुःख झाले.

४) विरहातुर होऊन भ्रमण करणाऱ्या रामाशी विवेकरूप हनुमानाची भेट झाली आणि रामाने सीता कोठे आहे म्हणून हनुमन्ताला प्रश्न केला.

५) साधकांतील अनेक वृत्ति हेंच वानर होत. अशा वानरांना घेऊन हनुमन्ताने सीतेचा शोध केला.

६) प्रपंचरूप सागरावर साधनारुप दगड टाकून हनुमानानें सेतु तयार केला आणि या सेतूद्वारें भवसागर पार केला.

७) सूक्ष्म देहेच्छारुप लंकेचे उपनिषदरुप अग्निने दहन करून कामक्रोधरुप राक्षसांचा नाश केला

८) सात्विक अहंकाररुप विभीषणाचे सहाय्याने रामानें तामस अहंकाररुप कुंभकर्ण आणि रावणाचा नाश केला.

९) अशा प्रकारे रावणाचे तावडीतून स्वानुभूति सीतेला सोडवून स्वरुपसाम्राज्यरुप सिंहासनावर राम अभिषिक्त होतात.

बारा नोव्हेम्बर १९२५ च्या यंग इंडिया मधें महात्मा गांधी महाभारताबद्दल म्हणतात–

'Gita stands for non-violence and not for violence. The poet when writes is not conscious of all the interpretations his compositions is capable of. The beaty of poetry is that it transcends the poet. The truth is that he reaches the highest flights of his fancy is often not to be met with in his life. And who are Dhritrastra and Yudhisthira and Arjun? Who is Krishna? Were they all historical characters? And does the Gita describe them as such? I regard Duryodhan and his party as the baser impulses in man and Arjun and his party as the higher impulses. The field of battle is our own body. An eternal battle is going on between the two camps. The poet has vividly described it. Krishna is the Dweller within ever whispering in a pure heart. Like the watch the heart needs the winding of purity or the Dweller cease to speak.'

आशय असा –

'गीता हिंसेकरता नसून अहिंसेकरता आहे. आपल्या काव्याचा काय अर्थ काढल्या जाईल याची पूर्ण कल्पना कवीला आपले काव्य लिहितांना होती असे वाटत नाही. काव्याचे सौंदर्य यांत आहे कि कविच्या प्रतिभेलाही ते पार करून जाते. काव्य लिहतांना कवि आपल्या प्रतिभेच्या इतक्या उच्च अवस्थेला जातो कि त्याचा प्रत्यय त्याच्या प्रत्यक्ष जीवनांत त्याला येत नाही. धृतराष्ट्र, युधिस्थिर आणि अर्जुन कोण आहे ? कृष्ण कोण आहे ? काय ते सर्वजण ऐतिहासिक पुरुष होते ? गीता त्या सर्वांचे तसें वर्णन करते काय ? दुर्योधन आणि त्याचा पक्ष माणसांतील नीच वृत्ती अतएव अर्जुन आणि त्याचा पांडवपक्ष मानवांतील उच्च वृत्ति आहेत असें मी मानतो. महाभारताची युद्धभूमी म्हणजे आमचे शरीरच होय. या दोन वृत्तींत सदा संघर्ष चालला आहे. कवीनें याचे रोचक आणि स्पष्ट वर्णन केले आहे. निर्मल अन्त:करणाला सदा प्रेरणा देणाऱ्या आणि शरीराचे अंतर्गत असणाऱ्या परम अस्तित्वालाच श्रीकृष्ण म्हणतात. घड्याळाला किल्ली देतात तद्वत अन्त:करणाला सदाचरणाच्या प्रेरणेची आवश्यकता असते अन्यथा अन्तर्यामी परमात्म्याचे अस्तित्वच नष्ट होईल.'

**योगीराज वासुदेवानन्द सरस्वति आणि महात्मा गांधी रामायण महाभारताला इतिहास न मानता जीवनाचे आदर्श मानीत होते आणि म्हणूनच ते आपापल्या क्षेत्रांत सर्वोत्तम बनलेत. आदर्शाचे आपल्या जीवनात अवतरण झाले पाहिजे अन्यथा ते आदर्श अर्थहीन राहून मानव जीवन कधीच उन्नत बनणार नाही, आणि असल्या दिखावू जीवनांतून ढोंग उत्पन्न होऊन समाज अध:पतित झाल्याविना राहणार नाही. आज नेमके हेंच होत आहे.** रामायण महाभारतातील आदर्श पांडित्याचा आणि धनलाभाचा विषय बनले आहेत परंतु स्वत: त्यावर प्रवचने झोडणारे

प्रवचन कीर्तनकार त्यांच्या जीवनात ते उच्च आदर्श आणण्याचा कधींच प्रयत्न करीत नाहीत; नव्हे त्यांचे प्रत्यक्ष जीवन तद्विपरीत असतांना दिसून येते. काय व्यास वाल्मिकींना हेंच अभिप्रेत होते? असल्या पाखंडी जीवनाकरता काय त्यांनी आपले उभे आयुष्य पेटवून असले अद्वितीय ग्रंथ लिहले?

वेदांच्या बाबतीत सुद्धा असेंच झाले. वेद म्हणजे वास्तवीक दिव्य अतीन्द्रिय ज्ञानाचा कोष आहे. पण वेदांतील ज्ञानाचा अनुभव घेणारे खरे ब्राह्मण हळू हळू कमी होत गेले आणि आपले अज्ञान लपविण्याकरतां त्या काळच्या ब्राह्मणांनी वेदांना केवळ मंत्रमयता प्रदान करून वेदमंत्राच्या विनियोगाचे एक शास्त्र बनवून त्या भरंवशावर सामान्य जनाकडून दक्षिणा उकळणे सुरू केले. आज वेदांतील मंत्रमयता सुद्धां नष्ट होऊन केवळ गायन हेंच एक निरर्थक अस्तित्व वेदांचे बनले आहे.

रामायण आणि महाभारत वेदांतील गहन ज्ञानयोगरहस्यें कथारुपानें सर्वसाधारण लोकांना सांगण्याचा एक काव्यात्मक आणि रुपकात्मक विलोभनीय प्रयत्न आहे हे आमच्या विद्वान इतिहासकारांच्या आणि शास्त्री पंडितांच्या लक्षातच येत नाही. प्रत्यक्ष रामायणांतच स्पष्ट सांगितले आहे, 'रामायण महाकाव्यं सर्व वेदार्थ संमतम्।' असें असतां रामायणाला इतिहासकथा मानून त्यांचा आदर्श आपल्या जीवनांत न उतरविण्याचा प्रयत्न करणे म्हणजे रामायणकारांच्या हेतूलाच तिलांजली देण्यासारखे आहे. वेदांत इतिहास नसून आदर्श जीवन जगण्याचे शास्त्र आहे तद्वत् रामायणामधील कथांत आदर्श जीवनाचे कथारूप वर्णन आहे. तें लक्षांत आल्यास रामायण कथा ऐकणे किंवा ऐकविणे एक करमणुकीचा आणि खोट्याच विद्वत्तेचा प्रश्न न बनून आदर्श जीवनाची क्रियाशील वाटचाल राहील.

मध्यंतरीच्या कालांत भारतावर परक्यांचे राज्य सतत सातशे वर्षे राहिल्यामुळें लोकांना आध्यात्माचा फुकटचा कीस काढण्याशिवाय उद्योग नव्हता. देशाचा राज्यकारभार परक्यांनी सांभाळायचा आणि देशावर परचक्र आले तरी त्याचे निवारण त्या परक्यांनीच करायचे, आम्हाला त्याचे काय होय? आम्ही केवळ भगवंताचे गुणवर्णन करीत स्वस्थपणे कालक्रमणा करायची असली परकेपणाची बेजबाबदार वृत्ती मध्यकालांत

आमच्या समाजांत वाढली. 'कोऊ नृप बनें हमे का हानी' असल्या वृत्तींतून रामायण महाभारत कथा वाचून वा ऐकून केवळ मनोरंजन करण्याची वृत्ती जनसामान्यांत पसरली आणि असल्या पौरुषहीन अध्यात्महीन कथांना खत पाणी घालण्याचे कार्य आमच्यांतील कथाकार प्रवचनकारांनी केले. कांही कथाकार आणि प्रवचनकारांनी समाजांत जनजागृती निर्माण करण्याचे कार्य अवश्य केले, पण असे फारच अल्प प्रमाणांत होते. इतर सर्वजण धन आणि कीर्तिच्याच मागे लागणारे होते. भारतीय समाज त्यामुळे पुरुषार्थहीन आणि पराक्रमहीन बनला.

## रामायणांतील रामचंद्र आणि वाल्मिकि वन्दन—

इतर ग्रंथांत करतात तसें ग्रंथ सुरु करतांना वाल्मिकी रामायणांत गणेश वन्दन नाही तर श्री रामचन्द्राय नमः असे रामचन्द्रालाच वन्दन करून मग रामायण लेखनाला सुरवात केली आहे. त्यानन्तरचा पहिलाच श्लोक वाल्मिकी स्तवनाचा आहे. श्लोक असा,

तपः स्वाध्यायनिरतं तपस्वी वाग्विदां वरम् ।
नारदं परिपप्रच्छ वाल्मिकिः मुनिपुंगवम् ।।१।। बालकाण्ड सर्ग १

यांतून दोन अनुमाने निघतात एक तर रामायणकाळांत महाभारत कालाप्रमाणें गणेशवन्दन करण्याचा परिपाठ सुरू झाला नसावा म्हणजे त्या कालांत नन्तरच्या कालाप्रमाणे गणेश देवतेला प्राधान्य आले नसावे. महाभारतकारांनी गणेश देवतेला प्रथम नमन करण्याचें कारणही होते. व्यासांनी महाभारत लेखन प्रथम गणेशाकरवींच करवून घेतले असल्यानें गणेश लेखकाला प्रसन्न करण्याकरता व्यासांना त्यांचा महाभारत ग्रंथ लिहण्याचे सुरवातीलाच लेखक गणेशाला वन्दन करणे आवश्यक वाटले असावे. आतां गणेश देवता प्रत्यक्ष ग्रंथ लेखन करूं शकते की काय याचा बुद्धिनिष्ठ विचार सध्यां बाजूला ठेवला तरी महाभारतांत ग्रंथारंभी गणेश वन्दन आहे ही गोष्ट महाभारत कालाचे द्योतक मानावे लागेल. नन्तरच्या कालांत लिहलेल्या सर्व ग्रंथांत प्रथम गणेशवन्दन केलेलेच आढळून येईल. म्हणजे महाभारताच्या गणेश वन्दनाचा खोलवर परिणाम नन्तरच्या कालांतील सर्व ग्रंथलेखकांवर झालेला दिसून येईल.

परन्तु ग्रन्थारंभीच्या गणेश वन्दन प्रकाराला रामायण ग्रंथांत स्थान नाही. याचा अर्थ असा कि रामायण कालांत गणेश देवतेचे प्रस्थ इतके माजले नसावे. रामायण ग्रंथलेखन काल महाभारत ग्रंथलेखन कालाचे अगोदरचा असला पाहिजे. कांही विद्वान रामायण कालाला महाभारत कालान्तर आणू पाहतात तें यावरून बरोबर नसावे असें दिसून येते. सर्वसाधारण लोकांची अशीच समज आहे कि रामायणकाल प्रथमचा आणि महाभारत काल नन्तरचा असावा आणि ही समज योग्य असावी असें या ग्रंथारंभीच्या गणेशवन्दन आणि रामवन्दन प्रकारावरून वाटू लागते.

**कालगणना –**

रामायण महाभारतांतील कांही ज्योतिष उल्लेखावरुन आणि वर्णन केलेल्या वंशावळींच्या सहाय्याने कांही विद्वान रामायण काल ख्रिस्तपूर्व दीड हजार वर्षापासून तो नऊ दहा वर्षापर्यन्त मागे रेटायला पाहतात; आणि महाभारतकाल ख्रिस्तपूर्व दीड ते पांच हजार वर्षापर्यंत असला पाहिजे असा तर्क करतात. परन्तु हे सर्व निष्कर्ष त्या त्या ग्रंथांतील उताऱ्यावरुनच लावलेले असल्याने त्या ग्रंथांतील मूळ लिखाणच जर योग साधना आणि तदन्तर्गत विचार प्रणालीला धरून असल्यास रामायण महाभारतांतील कालगणनेबद्दलचे उतारे कुचकामाचे ठरतात असें म्हणावे लागेल. म्हणजे रामायणकाल आणि महाभारतकाल असा कालभेदाचा म्हणजेच मानल्या गेलेल्या युगयोजनेची कालगणना वा कल्पना यावरुन खरी मानता येत नाही. रामायण महाभारत ग्रंथच जर आध्यात्मिक रुपकात्मक कथा आहेत तर त्यांतील कालगणनेच्या कथा कालगणनेला उपयुक्त कशा ठरणार ?

**लेखकाचे मते रामायण लेखक आणि महाभारत लेखक एकाच कालांत झाले असले पाहिजे. पण प्रथम रामायण लिहल्या गेले असावे आणि नन्तर महाभारत. रामायणासारखा आध्यात्मिक काव्यकल्पनेचा शोकरसपूर्ण ग्रंथ पाहुन महाभारतकाराला तो ग्रंथ वाचून आपला तितकाच लोकप्रिय बनलेला महाभारत ग्रंथ लिहण्याची स्फूर्ति झाली असली पाहिजे.** रामायणापेक्षां महा-

भारतांत मानवी जीवनाच्या विपुल आणि विविध छटा रंगविल्या आहेत. यावरून रामायणकाराचा ग्रंथोल्लास पाहून महाभारतकारांनी त्यापेक्षाही उत्तम ग्रंथ लिहिण्याचा यशस्वी प्रयत्न केला असला पाहिजे असें दिसतें. दोन्ही ग्रंथ आपापल्या प ीने अतीशय लोकप्रिय आणि अप्रतिम ठरले यांत शंका नाही. परन्तु महाभारतकाराचे लेखन स्फूर्तिस्थान रामायणच असावे असें अनुमान काढण्यास भरपूर जागा आहे. म्हणजे रामायण ग्रंथ अगोदरचा आणि महाभारत ग्रंथ नन्तरचा असा क्रम यावरून निघतो.

पण महाभारतकारांना रामायण ग्रंथावरुन आपलाही एक तसाच आध्यात्मिक रुपकांवर आधारलेला ग्रंथ लिहण्याकरता रामायण ग्रंथांत लिहलेल्या कथांत इतिहास नसून आध्यात्मिक रुपके आहेत हे माहीत असले पाहिजे. म्हणजे महाभारतकार कालापर्यन्त तरी रामायण ग्रंथ जड इतिहास नसून आध्यात्मिक रुपकांचा सुंदर विलास आहे हें सर्व लोकांना माहीत असले पाहिजे. म्हणजे महाभारतकाराचा काल रामायण कालानंतर लगेच नंतरचा असला पाहिजे हें उघड आहे. लेखकाचे मते रामायणकार आणि महाभारतकार यांचे ग्रंथ लिखाणांत फार फार तर पन्नास ते शंभर वर्षांचे अन्तर असावे. **योगमार्गांतील स्फूर्तिला धरून लेखकाला असे वाटते की रामायण आणि महाभारत काल ठोकळ मानाने आजपासून अठ्ठावीसशे तें एकोणतीसशे वर्षांपूर्वीचा असावा.** याचा अधिक व्यासंगपूर्ण विचार आणि सिद्धता लेखक ज्यावेळेस बृहत् रामायण आणि बृहत महाभारत ग्रंथाचे रहस्य लिहील त्यावेळेस करता येईल. तोपर्यंत पूर्वकल्पनांचा मनावर कोणताही परिणाम न होऊं देणाऱ्या खऱ्या व्यासंगी विद्वानांनी लेखकाच्या स्फूर्ति कल्पनेची सत्यासत्यता पारखून पाहण्यास प्रत्यवाय नसावा.

## द्वितीय निष्कर्ष

यावरुन रामायणकाराला महाभारतकाराप्रमाणें गणेशकल्पना वन्दन महत्वाचे न वाटता त्यांचे रामचन्द्र कल्पना वन्दन महत्वाचे वाटत असावे. रामायण लिहण्यापुर्वी रामायणकार नारदाला प्रश्न करतात की त्यांनी

वर्णन केलेला महामानव राम जगांत कोठें आहे काय? तेव्हा नारद सांगतात कि असा महामानव सध्या अयोध्येंत राज्य करतो आहे. म्हणजे प्रथम रामायण लिहले गेले आणि नंतर कल्पित राम जीवन घडले असावे. यावरून रामायण प्रत्यक्ष इतिहास नसून एक आदर्श आध्यात्मिक काव्य आहे हे सिद्ध होते. रामजीवन प्रत्यक्ष इतिहास मानल्यास रामासमोर रामायणातील प्रत्यक्ष इतिहास नसलेले एक आदर्श जीवन असावे. रामायणांतील योगकथा असें दाखवितात की रामजीवनाचा इतिहास एकदाच घडला नसून त्या आदर्शानुसार वागण्याचा प्रयत्न करणाऱ्या प्रत्येक राममय साधकाचे जीवनांतून नन्तरच्या कालांत घडला असला पाहिजे. राम एकच नव्हे तर कालाचे ओघांत अनेक झाले असावे.

रामायणकाराचे नांव वाल्मिकि आहे मग त्या कथित वाल्मिकींनी स्वतःच्या ग्रंथांत स्वतःलाच वन्दन करून 'तपस्वाध्याय निरतं' म्हणजे तपाने परिपूर्ण झालेला आणि स्वाध्यायांत पूर्ण निरत असलेला, तपस्वी, वाग्विदां वरम्' म्हणजे सर्व तपस्व्यांत आणि वाग्विदांत श्रेष्ठ असलेला अशी आपल्याच ग्रंथांत आपल्याच हाताने अगदीं पहिल्याच श्लोकांत वारेमाप स्तुति करावी काय ? एखाद्या लेखकाने आज असें केल्यास त्याला लोक काय म्हणतील ? अहंकारी, पाखंडी, मस्तवाल इत्यादि ! परंतु तो काळ आजच्या सारख्या ढोंगी आणि अंगीं अधिकार नसतांना स्वतःचेच गुणवर्णन करणाऱ्या पाखंड्यांचा नव्हता. त्या कालांत लेखक स्वतःला इतराप्रमाणे त्रयस्थ समजून स्वतःची पारख करून मूल्यांकन करीत असे. रामायणासारखा अद्वितीय ग्रंथ लिहणारी व्यक्ति (आत्म्याचे शरीररुप उपकरण) तितकीच उच्च धारणाशक्तिची असली पाहिजे हे दाखविण्या-करता रामायणकार स्वतःला वाल्मिकि म्हणवून घेतात आणि इतकी बिरुदें स्वतःला निःसंकोचपणें लावतात.

आपला रामायण ग्रंथ अतीशय लोकप्रिय आणि जगतविख्यात होईल याची कल्पना रामायणकाराला होती असें दिसते कारण तसें त्यांनी आपल्या ग्रंथांत लिहून ठेवले आहे. बालकाण्ड सर्ग २ मधील ३७ वे श्लोकांत वाल्मिकि म्हणतात,

यावत्स्थास्यन्ति गिरयः सरितस्य महीतले ।
तावद्रामायण कथा लोकेषु प्रचरिष्यति ॥

३६, गालकाण्ड, सर्ग २

असा अद्वितीय ग्रंथ लिहणारी व्यक्ति वाल्मिकी नको काय, आणि वाल्मिकी म्हणजे तरी कोण? वाल्मिक म्हणजे वारुळ किंवा वाढलेले गवत. जो श्रेष्ठ साधक आत्म्याचे रामस्वरुप कळण्याकरता खडतर तपस्या करेल आणि ज्याला त्यामुळें आपल्या देहाचे भान राहणार नाही, अशा 'तपस्वाध्याय निरतं' मुनिपुंगवांचे शरीरावर वारुळें वाढून त्याचे सभोंवताल उंच गवत वाढणार नाही काय ? या श्रेष्ठ साधकावस्थेलाच रामायणकार वाल्मिकि म्हणतात. ज्या महापुरुषाने रामायण ग्रंथ लिहला त्याचे खरें जडदेहीं नाम जगाला माहीत नाही. नांवाकरता आणि कीर्तिकरता मरण्याचा तो काळ नव्हता. रामायण लिहण्याकरता लेखकाला ज्या गुणांची आवश्यकता असते त्या गुणांचे साकारीकरण म्हणजे वाल्मिकि नाम होय. आणि आणि म्हणूनच स्वतःला अगदी त्रयस्थ मानून रामायणकारांनी स्वतःलाच वाल्मिकि म्हणवून घेतले आहे.

आता रामायण जड इतिहास मानला तर साध्या इतिहास लेखनाकरता लेखकाला रामायणांत लिहण्याप्रमाणे स्वतःला

तपः स्वाध्यायनिरतं तपस्वी वाग्विदांवरम् ।
नारदं परिपप्रच्छ वाल्मिकिः मुनिपुंगवम ॥

म्हणवून घेण्याची काय आवश्यकता आहे. आजपर्यंत कोणकोणत्या इतिहासकारांनी स्वतःला वरील बिरुदें लावलीत ? फार तर असल्या इतिहासकारांना इतिहासाचार्य म्हणून म्हणता येईल पण वरील श्लोकांत लिहल्याप्रमाणें इतके तपः स्वाध्याय, वाग्विद, मुनीपुंगव बनायची काय आवश्यकता? याचा अर्थ असा कि वाल्मिकींनी लिहलेले रामायण साधा इतिहास नसून त्यापेक्षांही विभिन्न आणि दिव्य असा आत्मानुभवाचा साधना इतिहास असला पाहिजे. म्हणजेच रामायण साधा इतिहास नसून दिव्य आध्यात्मिक मार्गांतील अनुभव संहिता आहे हे यावरून स्पष्ट होते.

रामायण शब्दाचा विग्रह सुद्धां तेंच सांगतो राम म्हणजे आत्मा, आत्मानन्द आणि अयन म्हणजे मार्ग! म्हणजे आत्म्याचा अनुभव घेण्याकरता जो मार्ग चोखाळावा लागतो त्यालाच रामायण असें म्हणतात. म्हणून रामायण आध्यात्मिक अनुभवांचा सनातन मार्ग आहे, जड इतिहास नव्हे! वाल्मिकींच्या पावलावर पाऊल टाकूनच लेखकाने रामायणाचा खरा अर्थ सांगण्याचा प्रयत्न केला आहे. ज्ञानेश्वर माऊलीचे योगकृपेनेच लेखक रामायण रहस्य लिहू शकला अशी लेखकाची धारणा आहे. ज्ञानेश्वर माऊली म्हणतातच, 'भाष्यकारातें वाट पुसितु'! त्याच अर्थाने रामायण रहस्याचे उद्घाटनाचा प्रस्तुत प्रयत्न आहे. एखादा वाल्मिकीच रामायणाचा सत्यार्थ सांगू शकेल. योगमार्गातील खडतर तपस्या हें त्या सत्यार्थ सांगण्याच्या क्षमतेचे द्योतक असते. माऊलींनी कृपा केल्यावर बालकाला अहंकार वा खोटीच लज्जा कशाला?

लेखक

# रामायण रहस्य

# प्रथम अध्याय

सध्यां रामायण आणि महाभारतावर जोरदार वाद चालू आहे. स्वतःला बुद्धिप्रामाण्यवादी आणि सत्यान्वेषी मानणारे इतिहासकार आणि विद्वान रामायण महाभारत सत्य इतिहास नसून त्या कवींच्या कल्पनांचा काव्यमय विलास होय असे प्रतिपादन करतात. आपल्या कल्पनेकरता ते रामायण महाभारतांतील ऐतिहासिक दृष्टचा आणि समाजनीतिदृष्टचा संगत न लागणारी दोषस्थळें दाखवून आपल्या गृहित कल्पनेला पुष्टी आणण्याचा प्रयत्न करतात. इतिहासकारांची एक गंमत होताना दिसून येते आणि ती ही कि रामायण महाभारतांतील इतिहासदृष्टचा असंभाव्य वाटणाऱ्या स्थलांचे वैयर्थ दाखविण्याकरता त्यांना परत रामायण महाभारतातील किंवा त्यावर आधारलेल्या अन्य ग्रंथांतील संदर्भ देऊनच पुरावा द्यावा लागतो. त्यांच्या असल्या प्रयत्नामुळे त्यांच्या बऱ्याचशा विधानांत स्वविरोध उत्पन्न होऊन त्यांची बाजू लंगडो पडल्यासारखी वाटते.

वरील प्रकारच्या बुद्धिप्रामाण्यवादी इतिहासकार आणि विद्वानांच्या आक्षेप आणि विधानांची चीड येऊन रामायण महाभारत ग्रंथ हे भारताचे प्रत्यक्ष प्राचीन इतिहासच आहेत अशा पोटतिडकेने वरील बुद्धिप्रामाण्यवादी लोकांचा समाचार घेण्यास समोर येणारे आस्तिपक्षी विद्वानही बरेच आहेत. आपल्या राष्ट्रीय आणि आध्यात्मिक जीवनाचे ते एक महत्वाचे दर्शन आहे असें मनोमय मानून वरील बुद्धिप्रामाण्यवादी लोकांचा कंबरा कसून पूर्ण समाचार घेण्यांत ते धन्यता मानतात. आणि असे करतांना ते स्वतःला मात्र तितकेच बुद्धिप्रामाण्यवादी आणि सत्यान्वेषी मानतात.

एकादा किल्ला संपूर्ण उध्वस्त करतांना त्या किल्ल्याचा पाया जशाचा तसाच कायम ठेऊन, नव्हे त्या किल्ल्यांतील रचनेचे कौतुक करीत करीत, तो किल्ला भुईसपाट करण्याचा उद्योग नास्तिपक्षाचा आहें; तर जो किल्ला त्यांचे कोणत्याही प्रकारें रक्षण करूं शकत नाहीं अशा काल्पनिक किल्ल्याचे मनोभावे प्राणपणानें रक्षण करण्याचा दुसऱ्या आस्तिपक्षाचा

उद्योग म्हणावा लागेल. वरील दोन्ही प्रकारच्या विद्वानांच्या कल्पनांना यथोचित उत्तर देण्याकरता रामायण महाभारतापेक्षाही मोठ्या आकाराचे ग्रंथ लिहावे लागतील. तसा प्रयत्न चालू आहे. परन्तु तोपर्यन्त केवळ रामायणांतील विवाद्य स्थळांचाच विचार करून त्यांत खरें रहस्य काय आहे हें सप्रमाण दाखविण्याचा प्रयत्न आहे.

वरील दोन्ही पक्ष कांही तरी गृहित धरून मग आपल्या गृहिताला सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात. लेखकाचा प्रयत्न वरील दोन्ही प्रकारापेक्षा वेगळा आहे. प्रथम हें सांगणे आवश्यक वाटते कि लहानपणापासून रामायण महाभारताबद्दलचे विशिष्ठ संस्कार लेखकावर असल्यानें बरेच वर्षेपर्यन्त स्वत: लेखक रामायणमहाभारतांना भारतीय लौकिक इतिहासाचे प्रमाणभूत आधारग्रंथ मानीत असे. परन्तु योगमार्गातील अधिकारी व्यक्तिची प्रत्यक्ष भेट झाल्यामुळे आणि स्वत: लेखकाने योगमार्गात बरेच महत्वाचे अनुभव घेतल्यामुळे आज लेखक वरील ग्रंथांना केवळ लौकिक इतिहासांचे प्रमाणभूत ग्रंथ न मानता वैदिक परम्परेचा पाया आणि प्राण जे अध्यात्म आणि योगशास्त्र यांच्या संगतवार अनुभवांचे अलौकिक इतिहास मानतो. लेखकाचे मानणे अनुभवरहित कल्पनांना धरून नसून प्रत्यक्ष तसल्या अलौकिक अनुभवांना धरुन आहे एवढे सांगितल्यास प्रामाणिक विद्वान वा आस्तिकांना त्यातील रहस्य कळून ते स्वत: त्या दिव्य मार्गाला लागतील याबद्दल लेखकाला खात्री आहे.

## आवश्यकताच कां ?

रामायण महाभारताला भारताचा प्राचीन इतिहास न मानणाऱ्यात मॅक्समुल्लरादि पाश्चिमात्य पद्धतीच्या विचाराचे प्राबल्य असलेले लोक बरेच आहेत. लहानपणापासून विशिष्ठ संस्कारांत वाढलेले परम्परावादी कोणतेच आध्यात्मिक अनुभव न घेता रामायण महाभारताला प्रत्यक्ष लौकिक इतिहास मानतात तद्वत स्वत:च्या बुद्धिवर अन्य प्रचाराचा संस्कार होऊ देणारे लोक सुद्धा कोणताच अनुभव न घेता वरील ग्रंथांना कविकल्पनांचा फाफटपसारा मानून मोकळे होतात. दुसऱ्या प्रकारच्या लोकांना अनुभवांची आश्यकताच नसते कारण त्यांचा सर्व जोर आपल्या

मेंदूच्या तर्कवितर्कांनाच संगतवार बुद्धि मानून आणि त्याचा अभिनिवेश लोकांना दाखवून त्यांत धन्यता मानण्याचा असतो. शिवाय अतीन्द्रिय अलौकिक अनुभव त्यांचे दृष्टीने एक मानसिक विकृतिच असते. मग असले विकृत विचार वा खुळचट अनुभव घेण्यांत आपल्या अमोल जीवनाचे क्षण वाया घालण्यास त्यांनी कां तयार व्हावे ? असे लोक समाजांत सर्व काली राहतातच. असल्या बुद्धिहीन घमेंडखोर लोकांचे नादीं लागून व्यर्थ कालक्षेप करण्यांत कांहीच साध्य होणार नाही. पण असले वाचीवीर कर्ण खऱ्या बुद्धिवादाच्या निकषावर सत्यान्वेषी वाद करायला तयार असतील तर त्यांचेशी बोलण्याची लेखकाची तयारी आहे.

असल्या वितंडवादी वावदुकांना रामायणमहाभारतांतील खरे रहस्य समजावून सांगण्याचा साम्प्रत लेख एक प्रयत्न आहे. जे लोक भारतीय वा वैदिक जीवन परम्परेला प्रामाणिकपणें मानतात अशांना अधिक आपुलकीने सांगायचे आहे कि वैदिक परम्परा एक महान शास्त्रीय प्राचीन परम्परा असून केवळ खुळचट अभिनिवेश किंवा कर्णाप्रमाणें केवळ वितंड-वादांतील मर्दुमकी गाजविण्याची ती एक निरर्थक युद्धभूमि नाही. वैदिक जीवन एक ज्ञानमय जीवन असल्यामुळें ज्ञानप्राप्तीचे महत्वाचे साधन जी योगसाधना त्याकडे त्यांनी वळावे आणि त्या अलौकिक जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव घेऊन मग रामायण महाभारत हे जड लौकिक इतिहास आहेत कि अलौकिक आध्यात्मिक अनुभवांचा तो इतिहास आहे हे ठरवावे. वादाला प्रतिवाद केल्याने सत्य वा अनुभव गंवसत नसतात. अनुभवाकरता प्रत्यक्ष साधनाच आवश्यक असतात. आपण ज्या कथांना प्रत्यक्ष इतिहास मानतो तो तसा प्रत्यक्ष जड इतिहास नसून वैदिक परम्परेंतील गाभा जे अतीन्द्रिय योगानुभव तेंच त्यांत सुन्दर कथारुपाने ग्रथित केले आहेत असे त्यांना कळल्यास खुळचट वादविवाद करून अभिनिवेशाच्या कोरड्या गंगेत गटांगळ्या न खाता ते प्रत्यक्ष ज्ञानगंगेच्या पावन जीवनाचे पान करतील.

वैदिक परम्परेंत कोरड्या अभिनिवेशाला स्थान नसून प्रत्यक्ष अनुभवांना प्राधान्य आहे. अनुभव हेंच जीवन आणि अनुभव हेंच सत्य ! जे विद्वान वरील नास्तिपक्षी कथित विद्वानांचा आपल्या बुद्धिचे जोरावर

बरा करून समाचार घेण्यास सरसावतात त्यांना अशी नम्र सूचना कि ांनी त्यांच्या बुद्धीचे आणि अभिनिवेषाचे मूळ जी ईश्वरकृपा ती प्रथम ाप्त करावी. खरी बुद्धि केवळ तर्कटांनी प्राप्त होत नसून भगवत्कृपेनेच ाप्त होते. भगवंत गीतेंत सांगतात 'तेषां सततयुक्तानां भजतां प्रीतिपूर्वकम् । ाामि बुद्धियोगं तं येन मामुपयान्ति ते'. तेव्हा अशी खरी बुद्धि प्राप्त रण्याकरता त्यांनी भगवंताची कृपा प्रथम प्राप्त करावी आणि नन्तरच द्धिच्या प्रान्तांत अवगाहन करावे. साधना केल्याविना भगवंताची कृपा ाप्त होत नाही, तेव्हा रामायण महाभारतांतील साधना इतिहास लक्षांत ऊन त्या साधनांचा प्रथम अंगिकार करून त्याद्वारें प्राप्त होणाऱ्या नुभवांचे रामायण महाभारत प्रत्यक्ष अनुभूत करावे अशी कळकळीची च्छा आहे. या शुद्ध हेतुनेच रामायणांतील योगरहस्यें दाखविण्याचा पक्रम करीत आहे.

जीवनाला आध्यात्मिक महत्व आणि प्रतिष्ठान आहे हे कथित द्धिवाद्यांना मान्यच नसते. हे जडशरीरच सर्वस्व आहे असें मानीत ते ीवन यापन करतात आणि एकाद्या दिवशी न कळतांच मरतात. 'Many people die without knowing why ?' अशी त्यांची अवस्था असते. रंतु स्वतःला आस्तिकवादी मानणारे लोक सुद्धा सर्व जीवनभर केवळ स्तकी पांडित्यावरच जोर देऊन त्याकरता आपले जीवन खर्ची घालतात ाणि वरील भोगवाद्यांप्रमाणें तेही जीवनाचे रहस्य न कळतांच पोकळ ाभिनिवेशांत मरतात. शेवटी फलनिष्पत्ति एकच ! ज्या महाभागांना दिक म्हणजेच ज्ञानमय जीवनांतील रहस्य जाणायचे असेल त्यांनी इतःपर ामायण महाभारताला इतिहास मानून सिद्ध करण्याचा निरर्थक वाद न ालतां त्यांतील आध्यात्मिक रहस्य जाणून त्या अलौकिक दिव्य मार्गाला ागावे हे योग्य होईल.

## न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्म संगिनाम्

कांही लोक गीतेच्या वरील श्लोकपादाचा आधार घेऊन असें ाळसूदपणें सांगण्याचा प्रयत्न करतात कि 'तुम्ही म्हणता त्याप्रमाणें ामायण महाभारतांतील योगरहस्य सांगण्याची आवश्यकताच काय ?

रामायण महाभारतांतील पात्रांना जिवंत पात्रें मानून त्यांच्या आदर्शानुसार आपलें जीवन घडविण्याचा प्रयत्न करणाऱ्या साधारण जनतेला आतां ही रहस्यें सांगून त्यांच्या आदर्शापासून वंचित करण्याचा प्रयत्न अयोग्य नव्हे काय ?' आक्षेप बिनतोड वाटला तरी फसवा आहे. म्हणजे वरील तर्कवादांत लोकांसमोर जे आदर्श आहेत त्यांना धक्का लावूं नये असा त्यांचा आग्रह दिसतो. आग्रह योग्य आहे. प्रश्न असा आहे कि आग्रह आदर्शाबाबत असावा कि कल्पनेबाबत ? आदर्शाबद्दल आग्रह असल्यास तो आदर्श प्रत्यक्ष इतिहासच असला पाहिजे असा निरर्थक आग्रह कां ? रामायणाबद्दल बोलायचे झाल्यास प्रथम रामायण लिहल्या गेले आणि त्या कल्पनादर्शानुसारच रामजीवन घडले असे मानण्यांत येते. रामासमोरील आदर्श ऐतिहासिक नव्हते तर उच्च भावनात्मक ! मग भावनादर्शावर जोर द्यायचा कि कथित इतिहासावर ?

पुन्हा यावर असा आक्षेप येऊं शकतो कि राम श्रेष्ठ पुरुष असल्यामुळे त्यांना तसें करणें शक्य झालें परंतु साधारणजनांना त्यांचे समोर एखादा जिवंत आदर्श ठेवल्यास त्यानुरुप आपले जीवन घडविणे सोपे जाते. असें समजणें म्हणजे जनसाधारणांतील दुर्दम्य आशावाद आणि जीवनांतील चीवट-पणा यावर अविश्वास दाखविण्यासारखे आहे. विपरीत परिस्थिती दिसत असतांना सुद्धां आपल्या सेनापतीच्या आज्ञेनुसार मृत्यूला कवटाळणाऱ्या सैनिकांसमोर कोणते आदर्श असते ? एकच; आणि ते म्हणजे त्यांच्या नेत्याचा शब्द ! अत्यंत विपरीत हवामान आणि पर्जन्य समोर असतांना येणाऱ्या नुकसानीवर मात करून पुढील वर्षी आपण आणखी मेहनत करून त्यापेक्षाही चांगले उत्पन्न मिळवू असा पराक्रमी आदर्श समोर ठेवणारा कास्तकार कशावर जगतो ? आपल्यांतील दुर्दम्य उत्साह आशावादावर ना ? जनसाधारणांचा कैवार घेणारे जनसाधारणांचे प्रत्यक्ष जीवनापासून बरेंच दूर असतात असे म्हणणें भाग आहे.

एकदां लेखकाची एका पॉश (चैनी) वस्तींत राहणाऱ्या आणि पॉश जीवन जगणाऱ्या गृहस्थाची भेट झाली. लेखकाचा रामायणमहाभारतावरील दृष्टिकोण ऐकून तो गृहस्थ बराच नाराज झाला आणि उद्गारला, 'तुम्ही

असल्या प्रकारामुळे बिचाऱ्या साधारण जनतेची दिशाभूल करता आहांत. त्यांच्या समोरील जुनें आदर्श नष्ट करून त्यांच्यासमोर तुम्ही कोणते नवीन आदर्श ठेवणार आहांत ? बिचारे, दिवसभर काबाडकष्ट करतात आणि रात्रीं घरीं गेल्यावर मोठ्या भक्तिभावाने रामकृष्णाला वन्दन करून आपला दिवस संपवितात. त्यांचे समोरील रामकृष्णांचे जीवन काढून तुम्ही काय साधणार आहात ? मानू द्या त्यांना रामायणमहाभारत एक इतिहास म्हणून ! जगू द्या बिचाऱ्यांना त्यांचे गरीबीतले कष्टमय जीवन ! असें करण्यात तुम्ही पाप करता आहांत !'

त्या उच्चभ्रू गृहस्थाचा गरीबांचा कोरडा कळवळा पाहून मी थक्क झालो. एक चैनी जीवन जगणाऱ्या स्वनामधन्य गृहस्थाने गरीब लोकांच्या गरीबी जीवनाबद्दल कणभर सुद्धां प्रयत्न न करतां त्यांच्या आध्यात्मिक जीवनाबद्दलच एवढा कोरडा पुळका दाखवावा यापेक्षां आध्यात्माची क्रूर थट्टा ती कोणती ? गरिबांना खायला ल्यायला काय मिळते याबद्दल स्वतः कोणताच प्रयत्न न करता त्यांच्या धार्मिक अज्ञानांतच त्यांना ठेवण्याचा त्या गृहस्थाचा आध्यात्मिक अभिनिवेश किती खोटा आणि क्रूर समजावा ? गरिबीबद्दल केवळ कोरडे उद्‌गार काढायचे परंतु स्वतःचे जीवन मात्र त्या गरीबांचे दूर उच्चभ्रू वस्तींत घालविणाऱ्यांना गरिबांचे आध्यात्मिक जीवनाबद्दल खोटाच कळवळा दाखविण्याचा काय अधिकार आहे ?

मी त्यांना उत्तर दिले 'गरीबांचे जीवन आम्ही तुमचेपेक्षां अधिक जाणतो कारण आम्ही त्यांचेच जीवन जगतो. त्यांच्या अडचणी म्हणजे आमच्याच अडचणी आहेत. गरीबांचा खोटा कैवार दाखवून तुम्ही आतां त्यांना किती दिवस अज्ञानांत ठेवणार आहांत ? भट्टाभिक्षुकांनी वेदाबद्दल असाच दांभिकप्रचार केला. वेद मंत्र नसून ज्ञानकोष आहेत. त्यांतील ज्ञान जनसामान्यांना कळूं नये म्हणून ब्राह्मणांनी वेदांना मंत्रमयतेचे आवरण घातले. त्याचे खरें कारण म्हणजे ब्राह्मणांनासुद्धां वेदज्ञान कळेनासे झाले होते. स्वतःच्या अधम अवस्थेवर पांघरूण घालण्याकरता ब्राह्मणांनी वेदावर मंत्रमयतेचा आरोप करून वेदांतील मंत्रावर अनेक विधाने बसविलीत आणि अमाप दक्षिणा मिळविली. आज वेदांतील मंत्रमयतासुद्धां लोप

पावली आहे कारण मंत्रांचे सामर्थ्य दाखविणारे ब्राह्मण आज दिसत नाहीत, दिसते फक्त मंत्राची चर्पटपंजरी करून दक्षिणा उकळणे ! असल्या स्वार्थी लोकांनी वेदपठणाचा अधिकार इतरांना न दिल्यास आश्चर्य काय ? रामायणमहाभारतांतील आध्यात्मिक रहस्य जनसाधारणांना न कळू देण्यांत हाच दुष्ट हेतू तुमच्यासारख्या लोकांचा आहे. जनसाधारणांना रामायण रहस्य कळल्यास त्यांच्या अज्ञानावर बांधलेले तुमचे बंगले कोसळतील, तुमच्या मोटारी बंद पडतील आणि तुमची बासुंदी मलाई बन्द होईल. आतां तुम्ही हे ढोंग सोडा. लोकांना खरे रामायण आणि महाभारत जाणायचे आहे. आणि तद्वत् जीवन जगायचे आहे. त्यांना खरें रामायण रहस्य कळविणें आजचे खरे धार्मिक कर्तव्य आहे. प्रथम गरीबी जीवन जगा आणि मगच गरीबांचा पुळका आणा !'

रामायण महाभारतांतील योगरहस्य सांगत लेखक सर्व भारतभर सारखा फिरतो आहे. प्रत्येक स्थानीं लेखकाला उत्तम प्रतिसाद मिळतो. अगदी गरीब आणि कथित अडाणी लोक सुद्धा म्हणतात, 'बाबाजी तुम्ही जे सांगता तेंच बरोबर आहे. इतके दिवस आमच्यापासून हे ज्ञान शास्त्री-पंडितांनी आणि प्रवचनकार किर्तनकारांनी लपवून ठेवले. आम्हाला खरे ज्ञान सांगा. आम्ही तसें वागू !' रामायण महाभारतातील खरें रहस्य जनसामान्यांना कळल्यास रामायण महाभारतांतील कथांचा शाब्दिक पसारा मांडून जनतेकडून मानधन आणि दक्षिणा उकळणाऱ्या शास्त्री-पंडितांचे आणि प्रवचन कीर्तनकारांचे उखळ कसे पांढरे होणार ? जन-साधारणांना अज्ञानांत ठेवण्यांत असल्या पाखंड्याचा स्वार्थ असतो आणि आपला स्वार्थ लपवून ठेवण्याकरता ते जनसाधारणांचा पुळका दाखवितात. आतां ही फसवेगिरी बद झालीच पाहिजे.

## आदर्श तेच !

रामायण महाभारतांतील रहस्य सांगण्यामुळें जनसाधारणांसमोर रामकृष्णाचे आदर्श राहणार नाहीत असा खोटाच कांगावा असले लब्ध प्रतिष्ठित करीत असतात. वास्तविक रामकृष्णांच्या आदर्श जीवनाला असल्या लोकांनीच काळोखी फांसली असते. रामाने राज्याचा त्याग

केला असें पाल्हाळपणें आवर्जून सांगणारे शास्त्री पंडित आणि प्रवचन कीर्तनकार त्यांना बिदागी किती जास्त मिळेल यावरच लक्ष ठेवतात. रामराज्यत्यागाचे कथेने भारून जाऊन श्रोत्यांनी त्यांना त्यागरूपाने धन द्यावे असा त्यांचा प्रयत्न असतो. धनलोभाचा राज्यत्याग ते स्वत: करीत नसतात. हें कोणते रामायण आणि कोणता रामजीवनाचा आदर्श? आम्हाला रामजीवनाचा खरा आदर्श पुन: एकवार जनतेपुढें उभा करायचा आहे. त्याकरता राम ऐतिहासिक पुरुष मानण्याचीच आवश्यकता नाही. राम हे जीवन आहे. रामजीवन भूतकाळांत होते, आजही आदर्श रुपानें आहे आणि भविष्यांत सुद्धां राहील!

रामाला ऐतिहासिक पुरुष मानल्याने रामजीवन केवळ भारतापुरतेंच मर्यादित राहिले. रामजीवन आदर्श जीवन मानल्यास रामाचा आदर्श देशकालांच्या मर्यादा उल्लंघून सर्व विश्वाचे आदर्शजीवन बनेल यांत शंका नाही. रामायण महाभारत जगाचे आदर्श ग्रंथ आहेत. ते इतिहास न मानल्यास ते आदर्श प्राचीन कालांत होते, आज आहेत आणि पुढेंही राहतील. रामजीवन इतिहास नसून आदर्श जीवन आहे. असले आदर्श जीवन रंगविण्याकरता रामायण लेखक वाल्मिकीला सुद्धा 'तप:स्वाध्याय निरतं' व्हावे लागते हेंच त्यांतील रहस्य आहे. अन्य कोणत्याही इतिहास लेखकाला वाल्मिकीप्रमाणें 'तप:स्वाध्याय निरतं वाल्मिकि: मुनिपुंगवम्' असे स्वत:ला म्हणवून तद्वत व्हायची आवश्यकता नसते. आदर्श जीवनाचा लेखकसुद्धां आदर्श जीवन जगणाराच असावा लागतो. विश्वाला आदर्श जीवन देणारा वाल्मिकि म्हणूनच 'तप:स्वाध्याय निरतं' असावा लागतो. वाल्मिकींनी हें स्वत:लाच उद्देशून म्हटले आहे असें लिहतांना त्यांत अहंकार मुळींच नव्हता. वाल्मिक म्हणजे वारूळ! जो जो तपस्वी तप केल्यामुळे आपल्या सभोंवतीं वारूळें वाढू देतो तो वाल्मिकीच होय. असाच वाल्मिकी रामायण रहस्य सांगू शकेल.

## श्रवणकुमार वध आणि रामजन्म

सर्वाठायी परमेश्वर तत्व आहे असें सांगणारी वैदिक परम्परा कांही बाबतींत मूर्खपणाचा व्यवहार करतांना कां दिसते असा प्रश्न करतांना

कांही विचारवान दिसतात; आणि त्यांचे म्हणणे खरें आहे. यज्ञांत पशूंचे बलि देऊन म्हणजे हिंसा करून स्वर्ग गांठण्याची इच्छा करणें ही प्रथा तर अवैदिक म्हणजे अज्ञानाचा कळस म्हणावा लागेल. सत्य असें आहे कि वेदांत पशूंना बलि देण्याचे वचन एकही नाही. जें आहे त्याचा अर्थ वेगळाच आहे. यज्ञ म्हणजे साधना आणि त्या साधनारुप यज्ञांत साधकांतील पशूभावाचा बली देण्याचे दृष्टीने वेदांत वचने आली आहेत. ती रुपकात्मक आहेत एवढेंच ! गंमत अशी कि त्या वेदवचनांचा चुकीचा अर्थ लावून आमच्या शास्त्रीपंडितांनी यज्ञाचे मिषाने देवाला पशुबलि देण्याचे क्रूर कार्य सुरू केले.

जसे वेदांतील एक वचन पहा.

अजामेकां लोहित शुक्ल कृष्णां ब्रह्मीः प्रजाः प्रसवित्रीं स्वरुपाः ।
अजाह्ये को जुषमाणोऽनुशेने जहात्येनां भुक्तभोगाम्य जोन्यः ।।

याचा अर्थ असा आहे, 'या लोहित शुक्लकृष्ण आकाशाखालीं एक अजा म्हणजे बकरा यज्ञांत बलि देण्याकरता बांधला असून त्याच्या भोंवती एक लांडगा त्याला खाण्याकरता सारखा घुटमळत आहे, आणि आपल्या ब्रह्मस्वरूपाला म्हणजे अजाला बलि देऊन ब्रह्मस्वरूपाने आपल्यातून प्रजा उत्पन्न केली आहे.' मूर्ख पंडितांनी या वेदवचनाचा चुकीचा अर्थ लावून बकरे मारून म्हणजे अजाबलियज्ञ करून मांस भक्षण करता करता स्वर्ग गांठण्याचा अश्लाघ्य प्रयत्न गेले अनेक शतकें केला. वैदिक परम्परेवर असल्या मूर्ख पाखंडी शास्त्रीपंडितांनी आपल्या स्वार्थाकरता बळेंच लादलेला कलंक म्हणजे पशूबली यज्ञ होय !

वरील वेदवचनाचा खरा अर्थ अगदी भिन्न आहे. सृष्टीचा कर्ता जो परमात्मा तो जन्म घेत नसतो, तो सर्वांत असून सर्वांचेवर आहे. म्हणजेच तो अजन्मा आहे, अजा आहे. परन्तु असल्या अजा अवस्थेनें समाज उत्पन्न होत नसतो. असल्या अजा अवस्थेला सर्व जीवमात्रांत सम केल्याविना समाज उत्पन्न होत नाही. सम + अजः समाजः म्हणजेच मराठींत समाज आहे. परमात्मस्वरुप उच्च अजा अवस्थेला नष्ट केल्याशिवाय म्हणजे बलि दिल्याशिवाय प्रजारूप समाज उत्पन्न व्हायचा नाही. परंतु हा खरा अर्थ

लक्षांत न आणून शास्त्री पंडितांनी बिचाऱ्या अजा म्हणजे बकऱ्याला यज्ञांत बलि देऊन आणि त्यांचे मांस भक्षण करून आपल्या कथित अध्यायाचे ढोल पिटले. वेदांचे चुकीचे अर्थ काढून वेदांचे नावावर केलेला काय हा अन्याय आणि पाप !

## शब्दांचे खरे अर्थ :

रामायणांतील पुत्रप्राप्तीकरतां दशरथाने केलेला श्रवणकुमाराचा वध या अति हृदयद्रावक कथेंत असाच रहस्यमय वैदिक अर्थ भरला आहे. दशरथ या शब्दाचा अर्थ उपनिषदे सांगतात, 'आत्मानं रथिनं विद्धि शरीरं रथमेव तु । बुद्धि तु सारथिं विद्धि मनः प्रग्रहमेव च ॥' शरीराचा चालक आत्मा हा रथी असून शरीर रथ आहे आणि त्या रथाचा चालक बुद्धि असून घोड्याचे लगाम मन आहेत. आपल्या शरीरांत पंच कर्मेन्द्रिये आणि पंच ज्ञानेन्द्रियें मिळून एकूण दहा इन्द्रियें असतात. एका इन्द्रियावर संयम ठेवणारा तो एकरथी आणि दशेन्द्रियावर संयम ठेवणारा तो दशरथी. हाच तो रामाचा पिता दशरथ आहे. साधना करण्याकरता आपल्या इन्द्रियांवर संयम ठेवणे आवश्यक असते म्हणजेच साधना करणारा प्रत्येक साधक दशरथ असावा लागतो.

दशरथाची पत्नि कौसल्या ! योगी आपली साधना आणि कर्म कुशलतेने करीत असतो. साधकाची असली कुशल बुद्धी म्हणजेच दशरथाची पट्टराणी कौसल्या होय. परंतु दशरथाला पुत्र नव्हते. साधना केल्यानंतर साधनेंत जर प्रगति झाली नाही तर साधकाला अति क्लेश होतात. साधनेतील प्रगति म्हणजेच पुत्रोत्पत्ति होय. साधनेचे पहिले अपत्य म्हणजे स्वानंद होय. राम या शब्दाचा अर्थ हाच आहे. 'रमन्ते योगिनः यस्मिन रामः' किंवा 'रमयति इति रामः' म्हणजे योग्याचे चित्तांत जो आनन्दरूपाने रममाण होतो तो राम होय. म्हणून राम आदि पुत्र प्राप्तीकरता दशरथाने पुत्रकामेष्ठि यज्ञ म्हणजे साधना करू नये काय ?

आता पुत्रकामेष्ठि यज्ञ करायचा म्हणजे कथेनुसार यज्ञांत पशुबलि देणें आवश्यकच होते. आणि पशूचा बलि देण्याकरता दशरथाला वनांत जाऊन पशूची शिकार करणें क्रमप्राप्तच होतें. हा पशू बाहेरचा नसून

साधकरूप दशरथातील पशुभावच होते. आपल्यातील पशुभावांचा साधना रुप यज्ञांत बलि दिल्याशिवाय रामासारखा (आत्मानन्द) पुत्र कसा प्राप्त होणार ? यज्ञांत पशूबलि द्यायचा हे वेदवचनही आहे पण कोणचा पशु बलि द्यायचा याचा विचार आणि रहस्य आमच्या शास्त्री पंडितांनी आणि आध्यात्म जाणण्याची इच्छा करणाऱ्यांनी कधीच जाणले नाही. पशूबलि म्हणजे ते बाहेरचाच पशु समजले आणि तसे करायला लागले. वेदवचन पहा– 'सप्तास्यासन्परिधयस्त्रि: सप्त समिधं कृता: । देवा यद्यज्ञं तन्वाना अवघ्नः पुरुषं पशुम् ।। १५, पुरुषसूक्त ।। वेद सांगतात हा पशू बाहेरचा नसून साधकाचे चित्तांतील पशुभाव होय. असलाच पशुबलि दशरथाला द्यायचा होता. शिकार करण्याकरता दशरथ एका ओढ्याचे काठी झाडावर रात्रभर बसून होता. सारी रात्र शिकारीची वाट पाहिली पण शिकार नाही. शेवटी ओढ्यावर बुडबुड आवाज ऐकू आला. दशरथाला वाटले कि एखादा पशु पाणी पिण्यास आला असावा. दशरथ शब्दवेधी होता. त्याने बाण सोडला. बाणाने आपले काम केले.

'हाय राम? असा मानवी शब्द ऐकू आला. काय बाणाने एका मानवाचा बळी घेतला ? 'शिव शिव' दशरथ खाली उतरला तो पाहतो तर एक कुमार छातीत बाण लागून पडला आहे. त्याचे नाव श्रवणकुमार. त्याच्या वृद्ध आईबापाला कावडीवर घेऊन तो तीर्थयात्रा करायला निघाला. वाटेंत त्याच्या वृद्ध मातापित्याला तहान लागली म्हणून पाणी घेण्याकरतां तो त्या ओढ्यावर आला होता. पाणी घेणार इतक्यांत बाण सूं सूं करीत आला आणि त्याच्या छातींत रूतून बसला राजाला परमदुःख झाले. श्रवण-कुमार म्हणाला राजा जे झालें ते झाले. 'दैवजात दुःखे ज्यांची दोष ना कुणाचा' आतां तूं एक काम कर. पाणी घेऊन जा आणि माझ्या तहानेल्या मातापित्यांना पाणी पाज. पण राजा बोलू नकोस. कारण तुला ओळखून ते पाणी पिणार नाहीत. राजा श्रवणकुमाराच्या वृद्ध मातापित्याजवळ गेला पण मुग्धच राहिला आणि हुंकार देऊन त्यांना पाणी पिण्यास सांगायला लागला.

'बाळा आमचेशी कां रे बोलत नाहीस ? श्रवणकुमारा एवढ्या घोर रात्रीं आम्ही तुला त्रास दिला म्हणून राग तर आला नाही ना ? बाळा,

बोल आमचेशी, अन्यथा आम्ही पाणीच पिणार नाही.' राजाला सत स्थिति सांगावी लागली. दु:खातिशयानें वृद्धांनी राजाला शाप दिला कि हे राजा तूं सुद्धा असाच पुत्रशोकानें मरशील !' शाप देऊन वृद्ध मात पित्यांनी प्राण सोडले. पशुला मारण्याऐवजी श्रवणकुमार आणि त्याच्य मातापित्याचे वध करण्याचे महापातक राजावर बसले. 'देवा, काय म पाप केले पूर्वजन्मी ?' खिन्न चित्ताने राजा राजधानीला परतला पण त्या ते रहस्य कोणालाच सांगितले नाहीं. शेंवटी राम वनवासांत जाण्या वेळीं राजा दशरथ मरणोन्मुख झाला त्यावेळीं त्याने हें रहस्य लोकांन सांगितले.

कथा इतकी सुरस आणि जिवंत वठली आहे कि त्यांत साधनें सुन्दर रहस्य असून तींत इतिहास नाही हें पटवून दिले तरी पटविण्याच इच्छा राहणार नाही. साधना रहस्य असें. उपनिषदांनीच हे रहस सांगितले आहे आणि ते उपनिषदांतील रहस्य वाल्मिकींनी रामायणांत ह्य सुन्दर कथेद्वारे सांगितले आहे एवढेंच. उपनिषदे म्हणतात, 'नायमात्म प्रवचनेंन लभ्य: न मेघया न बहुता श्रुतेन । यमेवैष वृणुते तेन लभ्य: तस्यै आत्मा विवृणुते तनँ स्वाम्' आशय असा कि केवल प्रवचनें देऊन व श्रवण करून आत्मज्ञान प्राप्त होणार नाही तर त्याकरता प्रत्यक्ष साधन करूनच आत्म्याला जाणावे लागेल. म्हणजे आत्मज्ञान प्राप्त करण्याकरत केवल श्रवणवृत्तीचा त्याग करावा लागेल. काही लोक आपण खूप श्रव केले कि आत्मज्ञान प्राप्त झाले अशा खोट्याच कल्पनेत असतात आणि आत्मज्ञानाला वंचित होतात. परंतु असली श्रवणकुमार वृत्ती सोडल्य शिवाय म्हणजेच श्रवणकुमाराचा वध केल्याविना साधनारुप यज्ञ सफल होणार नाही आणि त्यांतून आनन्दरुप राम पुत्रप्राप्ति होणार नाही.

राजा दशरथाला म्हणूनच न कळत कां असेना श्रवणकुमाराचा वध करावा लागला. श्रवणकुमार आपल्या वृद्ध मातापित्यांना घेऊन स तीर्थयात्रा करीत होता. तीर्थयात्रा केल्याने आत्मशुद्धि होऊन आत्मज्ञा प्राप्त होईल असे कांही लोक मानत असतात. पण तीर्थयात्रा करू चित्तशुद्धि होईलच असें नाही. उलट, आम्ही तीथयात्रा केली आहे अस

अहंकार साधकाचे चित्तांत उत्पन्न होऊन साधक आत्मज्ञानापासून अधिक दूर जाण्याचाच संभव अधिक असू शकतो. तेव्हा आपल्या चित्तांतील एक शवटची तीर्थाटनाची वृद्ध इच्छा साधकाने नष्ट केली पाहिजे. म्हणजेच श्रवणकुमाराचे वृद्ध मातापिता तीर्थ म्हणजे जल ग्रहण न करता तडफडून मेले पाहिजे. एक कवि गायन करतो.

तीरथ को सब फिरे देवपूजा करे ।
वासना ना मरे कैसेनि भव तरे ॥१॥
काया धुवे पाक मनही नहीं पाक ।
सुख दुख की आस लीजे चरणतले ॥२॥

असल्या तीर्थयात्रेच्या जीर्ण म्हणजे वृद्ध इच्छेने आत्मज्ञान प्राप्त होत नसते. म्हणून तीर्थाटन करणाऱ्या साधकरुप श्रवणकुमाराच्या वृद्ध मातापित्यांचा तडफडून पाण्याविना मृत्यु होणे साधनादृष्टीनें आवश्यक आहे. मग कथेंतील काव्य आम्हाला त्या कथा वाचून कितीही रडवोत. वृद्ध मातापित्यांची तृषा म्हणजे तहान आत्मज्ञानाची होय. पण केवळ श्रवणाद्वारें प्राप्त होणारें खोटें ज्ञान म्हणजे पाणी त्याची खरी तहान कसें भागविणार ? म्हणून पाणी न पिताच वृद्ध माता पिता मरण पावले.

एवंच रामायणांतील श्रवणकुमार कथा साधनेंतील एक महत्वाचा यमनियम आहे. तें यमनियमाचे पथ्य वाल्मिकींनी इतक्या सुरेख आणि रोचक पद्धतीने रंगविलें आहे, कि तो प्रसंग जणुं कांही प्रत्यक्ष इतिहासच वाटावा. न दशरथाने पुत्रकामेष्टि यज्ञ केला न श्रवणकुमाराला मारले, न त्याचे वृद्ध मातापिता पाण्याविना तरफडून मरण पावले आणि न त्या शापामुळें दशरथाला पुत्रशोकाने मृत्यु आला.

## दशरथ पत्नि आणि पुत्र

दशरथाला तीन बायका होत्या. त्यापैकी ज्येष्ट राणी कौसल्या कोण होती हें आपण पाहिलेच आहे. त्यानन्तरची कैकेयी ही कोण्या कैकेय देशाच्या म्हणजे तिकडील बलुचिस्थान किंवा अफगाणिस्थानच्या राजाची कन्या होती असें इतिहासकार सांगतात. पण कैकेयीला पाहण्याकरता आपल्याला इतके दूर जाण्याची आवश्यकता नाही. ती कैकेयी आपल्या

महाराष्ट्रांतील तुकाराम महाराजासारख्या वैराग्यशील सन्तातच आढळेल. कै + काया म्हणजे कैकेयी होय. कैलास, कैवल्य या शब्दांत असलाच कै आहे. कै म्हणजे वैराग्य आणि काया म्हणजे शरीर. ज्या श्रेष्ठ साधकाचा देहभाव हरपला आहे असल्या श्रेष्ठ वृत्तीलाच रामायणकार कैकेयी असें म्हणतात. तुकाराम म्हणतात, 'देहभाव हारपला तुज पाहता विठ्ठला' देहभावाबद्दल वैराग्य म्हणजेच कैकेयी होय ! या कैकेयीला भरत नांवाचा पुत्र झाला. भा म्हणजे प्रकाश वा ज्ञान आणि असल्या ज्ञानांत जो रत होईल अशी साधकवृत्ति म्हणजे भारत किंवा भरत होय. म्हणूनच सिंहासनावर बसूनही तें राज्य रामाचे समजून भरत एकाद्या वैराग्यशील साधुसारखाच राहिला.

तिसरी पत्नि सुमित्रा ! प्रकाशाचे सहाय्याने म्हणजे भरताचे ज्येष्ट पणानें आपल्यांतील दुष्ट वृत्तींचे हनन केल्यावर म्हणजे शत्रुघ्न बनल्यावर आतां साधकांत उरलेल्या वृत्ती त्याला पोषक म्हणजे सुमित्राच राहणार ! हीच ती दशरथाची तिसरी पत्नि होय. लक्ष्मणासारख्या विवेक वैराग्यशील पुत्राला तिनें जन्म दिला. लक्षम् + अन म्हणजे लक्ष्मण होय. आपल्या ध्येयावर 'लक्षं' दृष्टी ठेवून त्याकरता जो 'अन्' म्हणजे सतत प्रयत्नशील असतो तोच लक्ष्मण होय ! म्हणूनच वनवासांतील चौदा वर्षे लक्ष्मण सतत झोपला नाही. जो सतत जागृत असेल तोच लक्ष्मण होय ! गीता लक्ष्मणाचें वर्णन करते, 'या निशा सर्व भूतांना तस्यां जार्गात संयमि ।' तिला आणखी एक शत्रूघ्न नांवाचा मुलगा झाला. आपल्यांतील शत्रू वृत्तींचे घ्न म्हणजे हनन करणारा तोच शत्रूघ्न होय. साधकाला आपल्यांतील वाईट वृत्तींचा नाश करावाच लागतो. साधकांतील असल्या सूज्ञ अवस्थेला शत्रूघ्न असें म्हणतात.

# द्वितीय अध्याय

## आर्तजीवन काव्य

संपूर्ण रामजीवन एक आर्त जीवन काव्य आहे. बालपणी रामाचे जे काय कोडकौतुक झाले असतील तेवढेंच खरे. किशोर वयापासूनच रामाचे मागे कष्ट आणि तपस्या लागली आहे. रामलक्ष्मण वयांत येतात न येतात तोच विश्वामित्र ऋषि येऊन यज्ञांना राक्षस कसें विरोध करतात आणि ऋषि मुनींना छळून मारून यज्ञ कसे विध्वंस करतात याचे वर्णन करतात. ऐषआरामांत राहण्यास लालचावलेल्या दश इन्द्रियांचा स्वामि दशरथ त्या वर्णनाने मुळीच डगमगला नाही. तपस्या म्हणजेच यज्ञ हें जीवनाचे समीकरण तो ऐषआरामामुळे पूर्णपणे विसरला होता. राम म्हणजे आनन्द ! शास्त्रांनी राम शब्दाची व्याख्या केली आहे. 'रमन्ते योगिनः यस्मिन रामः' किंवा 'रमयति इति रामः' म्हणजे योगी वा साधकाचे चित्तांत रमणारा तो राम जीवात्मा होय. मानवी जीवनांतील खरा आनन्द ऐषआरामांत राहून आणि दशेन्द्रियांना भौतिक सुखसाधनांत ठेवून प्राप्त होणार नसून जनसाधारणां-करतां कष्ट घेण्यांत आणि आध्यात्मिक अनुभव घेण्याकरता तपस्या करण्यांत आहे हे विश्वाचा मित्र असलेल्या विश्वामित्राला आपल्यातील दशरथाला सांगायचे होते. पण इन्द्रिय सुखाला चटावलेले मन आता तपस्येच्या कष्टाला कसे तयार होणार ? शेवटी निरूपाय होऊन विश्वामित्र ऋषि राक्षसांचे पारिपत्य करण्याकरतां रामलक्ष्मणाला मागतात.

राम म्हणजे जीवात्मा व आनन्द 'रमन्ते योगिनः यास्मिन रामः' तर लक्ष्मण म्हणजे वैराग्यशील विवेक ! लक्षम् + अन् म्हणजे लक्ष्मण. लक्षम् म्हणजे जीवनातील ध्येय आणि अन् म्हणजे त्याकरता स्पन्दन करणे, प्रयत्न करणे. जीवनांतील आनन्द प्राप्त करण्याकरतां आणि जो सदा

आपल्या ध्येयाकरता इतर गोष्टींत कडकडीत वैराग्य ठेवील अशा वैराग्य संपन्न विवेकालाच वाल्मिकी लक्ष्मण म्हणतात. मग रामासह लक्ष्मणाचे राहणें आवश्यक नाही काय ? म्हणूनच विश्वामित्र ऋषि रामलक्ष्मणांना मागतात. रामलक्ष्मण किशोर वयाचे. ते कसे काय विशालकाय आणि क्रूरवृत्तीच्या राक्षसांना मारणार? पण विश्वामित्राला हे माहित होते कि ते राक्षस अन्य बाहेरचे कोणीच नसून साधकाचे अन्तःकरणांत उत्पन्न होणारे काम क्रोध मद मोह इत्यादि षड्रिपूच आहेत. त्यांना मारणे रामलक्ष्मणाचेच कार्य होते. राजा दशरथ स्वतः चतुरंग सेना घेऊन त्या राक्षसांचा निःपात करण्याकरता विश्वामित्रासह जायला तयार होता. पण ऐष आरामांत वाढलेली दशेन्द्रियाराम दशरथवृत्ति काय षड्रिपु राक्षसांचे दमन करेल याची कल्पना विश्वाच्या मित्राला म्हणजेच विश्वामित्राला होती. रामलक्ष्मणांनाच आपल्यासह नेण्याचा आग्रह विश्वामित्रांनी धरला.

## इक्ष्वाकु काकुत्स्थ कुलोत्पन्न राम

विश्वमित्राचा तो हट्ट ! प्रति विश्व ज्याने उत्पन्न केले तो विश्वमित्र ! ! भांडखोर क्षत्रिय वृत्तीपासून स्वतःच्या ब्रह्मकर्माने ब्राह्मण बनलेला तो विश्वमित्र ! ! ! वसिष्ठाच्या शंभर पुत्रांना ठार मारणारा तो विश्वमित्र ! ! ! ! अरे बाप रे विश्वमित्राला कोण विरोध करणार ? शेवटीं वसिष्ठ ऋषींना मध्ये पडावे लागले आणि दशरथाला समजवावे लागले. इक्ष्वाकु कुलाचे पुरोहित म्हणजेच वसिष्ठ ! काकुत्स्थ कुलाचे पुरोहित म्हणजे वसिष्ठ ! ! इक्ष्वाकु कुल म्हणजे काय ? इक्षु म्हणजे गोड रस देणारा उस आणि वाक म्हणजे वाणी. ज्याची वाणी सद्विचाराने उसाप्रमाणे गोड झाली आहे असल्या सन्तांचे कुल इक्ष्वाकु नाही तर कोणते असणार ? म्हणूनच चित्ताला आनन्द देणाऱ्या रामाचे कुल इक्ष्वाकु होते. राम हा काकुस्थ कुळांतीलही होता. काकु म्हणजे स्वर. कोणते स्वर? तर स्वरोदयशास्त्रातील ईडा, पिंगला आणि सुषुम्नादि स्वर ! या स्वरांवर तपस्या करून जो योगी नियन्त्रण ठेवतो तो शिवस्वरुपी स्वरोदयी राम काकुत्स्थ कुलाचा नाही तर काय ? इष्टवृत्तींत वसणारा तो वसिष्ठ होय. मग आनन्दांत रमणाऱ्या रामकुलाचे पुरोहित पूर्वापार पद्धतीने वसिष्ठ नाही तर कोण असणार ?

तपस्येकरता ज्या इष्टवृत्ती लागतात त्या वसिष्ठ ऋषींनी दशेन्द्रिया-राम दशरथाला समजाविले आणि रामलक्ष्मणाला विश्वमित्रासह पाठविण्यास सांगितले. दशरथ राजा तयार झाला आणि रामलक्ष्मण विश्वमित्रासह राक्षसांचा नाश करण्यास निघून गेले. मायेत सांपडलेला दशरथ शोक करतो, हे राम, हे लक्ष्मण!

## सरयू उत्तरतट

रामलक्ष्मणांना घेऊन विश्वमित्र सरयूतटाच्या उत्तर दिशेला गेले. कोणती सरयू नदी? सर म्हणजे सरकणे, बाहेर पडणें. याच सरयूमध्ये रामाने स्वतःचे विसर्जन केले होते. गीता या सरयूचे वर्णन करते, 'अव्यक्तादीनी भूतानी व्यक्त मध्यानि भारत' ज्या अव्यक्तांतून सर्व भूतें बाहेर सरतात आणि व्यक्त बनतात त्याच अव्यक्तांत, हे ज्ञानांत रत होणाऱ्या भारत, सर्व भूतें विर्सजित होतात. या अव्यक्त ब्रह्म नदीच्या म्हणजे सरयूच्या उत्तर तटावरील यज्ञभूमीवर रामलक्ष्मण विश्वमित्रासह प्रवेश करते झाले. आपले जीवनाचे उत्तरदायित्व पूर्ण करण्यास साधकरुप रामाने आपला भ्राता विवेकरुप लक्ष्मणासह सरयूच्या उत्तरतटावर जाणे आवश्यक होते. उत्तर तीरावर ऋषि यज्ञ करीत होते. नेहमीप्रमाणें राक्षस यज्ञाचा नाश करण्यास आले. त्यांची नांवेही साधनेला विरोध करणाऱ्या वृत्तीचीच आहेत. खर आणि दूषण! वृत्तींचा क्षर आणि दूषण रूपि राक्षसांचा रामाने वध केला. परन्तु त्या राक्षसांची स्वामिनि होती एक राक्षसी, ताटका! आपल्या सेवकांचा संहार झालेला पाहून ती राक्षसी रामाचे अंगावर धांवून आली. ताटकेच्या राज्याचे नांव होते मन्नियोग मन + नियोग म्हणजेच मन्नियोग होय.

## ताटका वध

रामजीवनातील विवाद्य स्थलांची सुरवात ताटका वधापासून होते. मोठमोठ्या विद्वान पंडितांना सुद्धा रामाच्या या कृत्याचे समर्थन करता येत नाही. आतां कांहीतरी तर बोललेंच पाहिजे. मग लोकांना मूर्ख समजून बनवा त्यांना आणि फेंका एकादे वचन त्यांचे तोंडावर, 'आततायिनमायान्त हन्या देवाविचारयन्'! काय बसतील ना आता लोक चूप? कारण ते

बिचारे शास्त्रवचन मानतात म्हणून !! आणि ते मानीत नसतील तर ? म्हणा त्यांना पाखंडी, अधर्मी, अधम इत्यादि !! पण ही ताटका कोण याचा मात्र आमचे पंडित, शास्त्री आणि कथित इतिहासकार शोध घेत नाहीत. ती ताटका आमच्या अन्तःकरणांतील वृत्तींत आहे.

इतिहासकार सांगतात कि त्या काळांत आर्य अनार्य वाद बराच होता. हिन्दुस्थानाचे बाहेरुन आलेले आर्य म्हणे आपल्या राज्याचा विस्तार करण्याकरता अनार्यांचे भूमीवर जाऊन यज्ञ करीत असत. अर्थातच आपल्या भूमीचे हरण करण्याकरता आलेल्या आततायी आर्यांचा विरोध बिचारे राक्षस करणारच ! आपल्या भूमीचे रक्षण करणारे देशभक्त म्हणे राक्षस असतात आणि आततायी असणारे आर्य म्हणे सुसंस्कृत असतात. आपल्या भूमीचे रक्षण करणारी शूर अबला आततायी रामाने आततायी ठरवून तिचा आक्रमक रामाने वध केला. आततायी म्हणायचेच असल्यास रामालाच म्हणावे लागेल कारण ताटका राज्यावरच राम आक्रमण करीत होता. परंतु आमचे इतिहासकार आततायी ठरवितात त्या शूर महिलेला ताटकेला, रामाला नव्हे.

आपल्या राज्याचे रक्षण करणारी शूर महिला म्हणून आम्ही झांशीच्या राणीचा उल्लेख करतो. इतिहासांत झांशीच्या लक्ष्मीचे नांव अमर झाले. पण बिचारी ताटका ! आपल्या राज्यावर आक्रमण करणाऱ्या आततायी रामाच्या दुष्कृत्याला विरोध करण्याबद्दल आमचे इतिहासकार आणि पापभिरु शास्त्रीपंडितसुद्धां तिलाच आततायी ठरवितात आणि रामाने ताटकेचा वध करण्यांत एक अलौकिक आध्यात्मिक महत्कार्य केले असे ठासून सांगतात. बिचारी ताटका !

## आर्य अनार्यवाद

मग आमच्या पूर्वजांच्या पराक्रमाचा हा सर्व इतिहास खोटा काय ? होय अगदी खोटा ! मग आम्हाला इतिहासच नाही काय ? आहे, पण असला आततायी आणि पाखंडी नाही. इतिहास आहे आध्यात्मिक आणि धार्मिक. पण तो खरा इतिहास वाचण्याची आज आमची क्षमता नष्ट पावल्यासारखी झाली आहे. पाश्चात्यांचे मूर्ख आणि मतलबी प्रचार

तंत्रामुळे आम्हीही आर्य अनार्यवाद उराशी बाळगून आहोत. वास्तवीक कोणीच अनार्य नाही. आपल्या जीवनांतील रहस्य जाणण्याकरता जो 'अर्' म्हणजे पुढें सरकतो तो आर्य अशी आर्य शब्दाची व्याप्ति असता पाश्चात्यांचे मूर्ख प्रचारावरून आम्ही स्वतःला आर्य अनार्य समजायला लागलो. साऱ्या जगाला वैदिक परम्परेंतील दिव्य ज्ञान देणारे ते द्रुविदच खरे आर्य होत.

## द्रुविद हेंच आर्य

'द्रु' म्हणजे अन्तर्बाह्य लवकर प्रगति करणारे आणि 'विद्' म्हणजे ज्ञान. म्हणजे जे श्रेष्ठलोक आपली अन्तर्बाह्य प्रगति अति शीघ्र करतात त्यांना वैदिक परम्परेत द्रविद असें म्हणतात. या अर्थाने सारे ऋषिमुनि द्रुविद होत. या महान द्रुविद जीवनाचा सर्व विश्वाला महामंत्र देणारे तेच द्रुविद होत. या द्रुविदांनाच इंग्रजांनी अपउच्चारणाने द्राविड म्हटले आणि त्या द्राविडांना अनार्य मानून आम्ही मात्र केव्हांच अनार्य बनलो याची आम्हाला खंत सुद्धा नाही. जे जे वैदिक परम्परेचे असतील ते सर्व द्रुविद म्हणजेच आर्य होत. अनार्य वंशवाचक शब्द नाहीत तर ज्ञान अज्ञान वाचक ! कथित आर्यवंशाचा माणूस सुद्धां अनार्य राहू शकतो तर कथित अनार्य वंशाचा एखादा निग्रो पूर्ण वैदिक म्हणजे ज्ञानमय जीवन जगत असल्यास पूर्ण आर्य असू शकतो.

आर्य अनार्यवाद पाश्चात्य आणि पाश्चात्यांचे बुद्धिवर नाचणाऱ्या अनार्य वृत्तीच्या मूर्खांचे नन्दनवन होय असें मोठ्या खेदाने म्हणावे लागते. रामायणांत असला अनाध्यात्मिक आर्यअनार्य वाद किंवा राक्षस मानववाद मुळींच नाही. रामायणांतील इतिहास आध्यात्मिक अनुभवांचा आहे. साधना करतांना साधकाला स्वतःतील कोणकोणत्या वाईट वृत्तीशी झगडावे लागते आणि प्रसंगी त्या राक्षसी वृत्तींचा नाश करावा लागतो याचा दिव्य इतिहास म्हणजे रामायण होय.

वरील खऱ्या अर्थाने अन्वेषण करू गेल्यास रामाला ताटकेचा वध करणें या विवाद्य स्थलाचा निराळाच दिव्य अर्थ निघतो, आणि रामाने एका अबलेला मारले या कल्पित कथेच्या दोषांतून रामासारखा दिव्य

आदर्श पुरुष मुक्त होतो. ताटका या शब्दाचा खरा वाल्मिकी अर्थ भिन्न आहे. तो आम्ही समजणें आवश्यक आहे. राम या शब्दाचा अर्थ आम्हाला माहित झाला आहे. राम ही ऐतिहासिक व्यक्ति नसून ती एक आध्यात्मिक अभिव्यक्ति आहे. सरयूचे उत्तर तटाला राम लक्ष्मण यज्ञ रक्षण करण्यास गेले असता त्या तटावर आपली मालकी गाजविणारी ताटका आपल्या मायभूमीचे रक्षण करण्यास येणारच! तटाचे मायारक्षण करणारी ती ताटका होय !

साधनेंत जी जी अवस्था प्राप्त होते ती ती अवस्था पार करून म्हणजे मारून पलिकडील दिव्य अवस्थांत जाण्याची साधारण साधकाची इच्छाच होत नाही. परंतु ज्याला आर्य व्हायचे आहे, ज्याला द्रविड बनायचे आहे, त्याला निम्न स्तरावरील तटांना पार करून पलीकडील उच्च अवस्थांना प्राप्त करावेच लागेल. आणि त्या निम्न स्तरावरील आध्यात्मिक अवस्था एकाद्या राक्षसाप्रमाणें त्या त्या अवस्थांना चिकटून बसतात. जो रक्षण करतो तो राक्षस. आपल्या निम्न वृत्तींचे जो साधक रक्षण करेल तो राक्षस नाही तर काय? वृत्ति शब्द स्त्रिलिंगी असल्यामुळें असल्या वृत्तीला वाल्मिकि ऋषी राक्षसी म्हणतात. ताटका म्हणजे साधनेंत प्राप्त होणाऱ्या अनुभवांना न सोडण्याची राक्षसी वृत्ति !

या ताटकेचे योग्य वर्णन करण्याकरता आपल्याला साधनाकालांतील अनुभवांचा इतिहास पहावा लागेल. साधना करतांना सर्व साधारण अनुभव म्हणजे निरनिराळे वर्णवर्तुळ दिसणें होय. परंतु वर्णवर्तुळ दिसण्यापलिकडे आणखी उच्च अवस्था असतात जसे ज्योतिदर्शन आणि आत्मदर्शन. ध्यान केल्याबरोबर ज्या साधकाला वर्णवर्तुळें दिसूं लागतात त्याला एखादे दिवशी तींच वर्णवर्तुळे न दिसल्यास त्या अनुभवांना सरावलेला साधक घाबरतो आणि आपले अधःपतन झाले कि काय असें मानून खंत करतो. असल्या निम्न अनुभवांना सोडण्यास साधक तयार नसतो. तेच ते अनुभव त्याला हवे असतात. पण असला मायेंत सांपडणारा साधक पलीकडील उच्च प्रगति करूं शकणार नाही. एका पावलाचा त्याग केल्याविना दुसरें पाऊल समोर जाऊं शकत नाही, तद्वत् निम्नस्तरावरील अनुभव कितीही विलोभनीय

वाटले तरी त्यांचा त्याग केल्याविना साधक पलीकडील दिव्य अनुभव घेऊं शकणार नाही. साधकाचे जीवनांतील असल्या मोहवश निम्न अनुभवांचा त्याग म्हणजेच रामाचे ताटका राक्षसीला मारणें होय.

या ताटकेबद्दल योगीसन्त कबीर फार सुन्दर वर्णन करतात. ते म्हणतात,

जिन खोजा तिन पाईयाँ गहरे पानी पैठ ।
मैं बौरी ढूंढन गयी रही किनारे बैठ ।।

किनारा म्हणजे तट. असल्या तटवृत्तीला मारणें म्हणजेच ताटका वध होय. ज्याला आध्यात्मिक आनन्द प्राप्त करून राम बनायचे असेल त्यानें आपल्यांतील ताटकेचा वध केलाच पाहिजे. मग ताटकेचा वध रामजीवनांतील दोष कि गौरव ?

## ताटकेचे राज्य मन्नियोग

ताटकेला राक्षसी मानले आहे; आणि राक्षसवंश म्हणजे लांब दातांचे सुळके, जाड ओठ आणि विचित्र नाक असणारी रानटी जमात असें मानल्या जाते. एखाद्याचे दांत बरेंच पुढें आले असल्यास, ओठ जाड असल्यास आणि नाक चपटें किंवा विकृत असल्यास त्याला शुद्ध उच्चार करता येत नसतात असा आपल्या सर्वांचा अनुभव आहे. राम ताटकेच्या राज्यांत आक्रमक म्हणून गेले होते म्हणजे राम ताटकेच्या मन्नियोग राज्यांत जाण्यापूर्वीपासूनच ताटकेच्या राज्याचे नांव मन्नियोग असले पाहिजे. मन्नियोग या शुद्ध संस्कृत शब्दाचा उच्चार आमचेतील अनेकांना करता येत नाही तर भसाडया विकृत राक्षसांना असल्या शुद्ध संस्कृत शब्दाचा कसा उच्चार करता येणे शक्य आहे ? पण रामायणकार लिहतात कि ताटकेच्या राज्याचे नांव 'मन्नियोग' होते म्हणजे ते राक्षस नसून उत्तम वाणी बोलणारे आर्यच असले पाहिजेत हे यावरून सिद्ध होते.

बरें अयोध्येला अगदी लागूनच सरयू नदी आज दाखविली आहे. या सरयू नदीच्या तीरावर ताटकेचे राज्य होते. म्हणजे दशरथ आणि राम यांना आर्य मानल्यास याच आर्यांच्या अयोध्येला लागूनच हे अनार्यांचे

ाक्षस राज्य होते, असें मानावे लागेल. मग राक्षसांच्या राज्यांतच शरथ आणि राम गुंडगिरी करून राहत असले पाहिजे किंवा राक्षसांना ार्यांनी पिटाळून लावल्यावर जे दण्डकारण्यांत पळून गेले ते दण्डकारण्यच ळी अयोध्येला अगदी लागून सरयू तीरावरच असले पाहिजे असा ाष्कर्ष निघतो. म्हणजे केवल खोटा इतिहास मानून तर्कालाच प्राधान्य ाल्यास या कथेंतील अर्थाचे बाबतींत गोंधळ उडतो.

यावरून मन्नियोग देश प्रत्यक्ष देश नसून वाल्मिकींना अभिप्रेत असा ाधना प्रदेश असावा हें स्पष्ट आहे. कोणता ? मनाचा नियोग करणारी ाधना वा तपस्या म्हणजे मन्नियोग होय कि ज्या अवस्थेमुळे मनाचा जड सारांशी नियोग (विरक्ति) होऊन साधकाचे मन उच्च पदावर आरूढ ात असले पाहिजे. असल्या मन्नियोग अवस्थेत जाण्यास मुक्ताबाई ज्ञाने- ारांना सांगते. ती म्हणते, 'मन मारूनि उन्मन करा। ताटी उघडा ानेश्वरा ।।" अशाच उन्मन देशात म्हणजे मन्नियोग देशांत जाऊन राम- ा जीवात्म्याने मुक्ताबाईनें सांगितल्याप्रमाणे ताटीला म्हणजे ताटकेला र करून (म्हणजे मारून) परमात्म स्वरूपाचे दर्शन घेण्याचा प्रयत्न केला सला पाहिजे ।

साधक आपल्या ताटक वृत्तीला मारणार नाही तर काय ? मग ाला ताटकेला मारण्यांत रामाने काय पाप केले ? रामायणकाराच्या ावलावर पाऊल टाकून आमचे शास्त्रकार आणि स्मृतिकार तर चक्क ांगतातच,

> गुरुं वा बालवृद्धौ वा ब्राह्मणं वा बहुश्रुतम् ।
> आततायिनमायान्तं हन्यादेवा विचारयन् ।। (मनुस्मृति)

कथा तर व्यवस्थित रंगविलीच पाहिजे आणि कथेसह नीतिशास्त्र- द्वां सांगितले पाहिजें. रामायणांतच बालकाण्ड सर्ग २५ मधील श्लोक ७ आणि १८ मधें लेखक स्पष्ट सांगतात. राम ताटकेला मारतांना दाचित् विचार करेल कि एका स्त्रीला कसे मारावे ? स्त्रीहत्येचे पाप ापल्यावर बसेल या कल्पनेने कदाचित राम ताटकेला मारणार नाही ्णून विश्वामित्राचे मुखाने वाल्मिकी उपदेश करतात, 'नहि ते स्त्रीवधकृते

घृणा कार्यानरोत्तम । चातुर्वर्ण्यं हितार्थं हि कर्तव्यं राजसूनुना ॥१७॥ नृशंसमनृशंसंच प्रजारक्षणकारणात् । पातकं वा सदोषं वा कर्तव्यं रक्षता सदा ॥१८॥ रामा स्त्रीवध करण्याच्या कर्माची घृणा करू नकोस कारण चातुर्वर्ण्य हितरक्षणाकरता तुला कर्तव्य म्हणून ताटकावध करणें आवश्यक आहे. प्रजारक्षणाकरता हिंसा अहिंसा याचा विचार न करता रामा तूं आपले कर्तव्य कर. व्यावहारिक दृष्टचा हे योग्य वाटले तरी आध्यात्मांत हे योग्य कसे मानावे ? वरील वचनांचा भलताच संदर्भ घेऊन मनूनें आपल्या स्मृतींत वरील श्लोक दिला आहे. ज्यांना ज्यांना म्हणून राम व्हायचे असेल त्यांना आपल्यातील ताटकावृत्तीला म्हणजेच ताटकेला मारलेच पाहिजे. ज्ञानाकरतां ताटी उघडलीच पाहिजे.

मन मारूनि उन्मन करा । ताटि उघडा ज्ञानेश्वरा ॥

# तृतीय अध्याय

## अहल्योद्धार : शिवधनुष्य भंग

ताटकेचा वध केल्यावर विश्वामित्र ऋषी राम लक्ष्मणाला घेऊन मिथिलेकडे जाण्यास निघाले. मध्यें त्यांना एक निबिड अरण्य लागले. तेथें आणखी कांही राक्षसांचा संहार केल्यावर विश्वामित्रांनी रामलक्ष्मणांना कांही अस्त्रविद्या शिकविली; जसे ब्रह्मास्त्र, ब्रह्मशिरास्त्र, पावकास्त्र, अग्निअस्त्र, वायवास्त्र, पर्जन्यास्त्र इत्यादि. आमचेकडील कांही विद्वान असे मानतात कि जसे आज अणुबॉम्ब आणि हायड्रोजन नायट्रोजन बॉम्ब आहेत तद्वत त्या प्राचीन कालांत सुद्धां आमच्या पराक्रमी पूर्वजांनी असलीच संहारक अस्त्रे शोधून काढली होती. हे जर खरे मानले तर मग ती विद्या आज लोप का पावली हा प्रश्न महत्वाचा आहे. यांवर काही लोक असा तर्क करतात कि त्याकाळी मन्त्रविद्या आणि अस्त्रविद्या फार प्रगत असल्याने त्या विद्येचा तेव्हा सर्रास उपयोग होत असे पण ती कर्तबगार पिढीच नष्ट झाली. आता आम्हाला त्यातील काहीच अवगत नाही. पण आमच्या विद्या आम्हाला कां पारखल्या याचे उत्तर देणे कठीण जाते. त्या काळांतील आपले पूर्वज आपल्या दृष्टीने सर्वच दृष्टीने मोठे असल्यामुळे त्यांच्यांत वरील प्रकारची विद्या होती. आतां त्यांचेसह त्या विद्याही लोप पावल्या.

याचा अर्थ असा कि त्याकाळचे लोक आपल्यापेक्षां अधिक पराक्रमी आणि शक्तिशाली होते. उत्क्रान्तवादांत हा तर्क सुसंगत बसतो काय असा प्रश्न उत्पन्न होतो. पण आमचे विद्वान आणि शास्त्रीपंडित याचा योग्य विचार करूं शकतील तेव्हांच ना असल्या प्रश्नाचे खरें उत्तर मिळेल ! विशेषत: भारतांतील वैदिक परम्परेंत वाढणाऱ्या हिंदूमध्ये आज विलक्षण आत्मविस्मृति दिसून येत आहे. त्याचे कारण वरील प्रकारची कल्पना करून स्वत:ला आपल्या पूर्वजांपेक्षा हिणकस मानण्याचे पराभूत मनोवृत्तींत आहे. असली पराभूतमनोवृत्ति सातशें वर्षाच्या गुलामीचा एक जबरदस्त परिणाम आहे. त्या काळचे आमचे पूर्वज जर एवढे मंत्रशास्त्रज्ञ, पराक्रमी

आणि बुद्धिमान होते तर त्यांचीच संतति असणाऱ्या आमच्यांत ते गुण कां येऊ नये ? आतां तर आम्ही स्वतंत्र झालो आहोत! मग आमच्या पराक्रमाला बुद्धिचातुर्याला आणि मंत्रसामर्थ्याला कोण रोकणार आहे ? मग आता आम्ही पूर्वजाप्रमाणे पराक्रमी कां निपजूं नये ?

जुनी पिढी रामायण महाभारत वाचून त्यावर फुलें वाहून स्वतःला धन्य मानण्यांत कृतार्थता दाखविते तर रामायण महाभारतांतील बऱ्याच असंभव आणि नीतिधर्माचे दृष्टीनें अभद्र कथा ऐकून नवी पिढी त्या ग्रंथांना कवीचा बाष्फळपणा मानणार ! या कोंडीतून मार्ग काढायचा झाल्यास रामायण महाभारतातील जो सत्यार्थ योगरहस्य तें जनता जनार्दनासमोर स्पष्टपणें मांडून सर्व मानवजातीलाच त्यांतील आध्यात्मिक आदर्श समजाऊन देणे अति आवश्यक झाले आहे. लेखकाचा तोच प्रयत्न आहे. यामुळे जुन्या पिढींतील अंधश्रद्धावान्, कथित विद्वान, इतिहासकार, स्वनामधन्य शास्त्री पंडित, प्रवचनकार आणि कीर्तनकार लेखकावर अतिशय तापतील याची लेंखकाला जाणीव आहे. परंतु नवपिढींतील तरुणतरुणींना रामायणाचा खरा अर्थ कळल्यास ते जुन्या पिढीपेक्षा अधिक आध्यात्मिक आणखी पराक्रमी बनतील याबद्दल लेखकाला खात्री आहे.

उगवत्या नवीन पिढीकडे लेखकाचे सर्व लक्ष केन्द्रित झाले असल्यामुळे जुन्या पिढींतील वावदुकांच्या तळफळाटाकडे लक्ष देण्यास लेखकाला फुरसत नाही.

## अहल्योद्धार

मिथिला वनांतून जातां जातां रामाचा पाय एका शीलेला लागला आणि शीला म्हणजे दगड हालूं लागला. हळूहळू ती शीला नाहिशी होऊन त्यांतून एक रमणीय स्त्री रामासमोर हात जोडून उभी राहिली. आं, हे काय ही भुताटकी तर नाही ? पण विश्वामित्रांनी रामाला धीर दिला. ती शीला रमणी बोलूं लागली,

रामा चरण तुझे लागले । आज मी शापमुक्त जाहले ।
तुझ्या कृपेची शिल्प सत्कृति । माझी मज ये पुन्हा आकृति ।
मुक्त जाहले श्वास चुंबिति । पावन ही पाऊले ।।१।।

पुन्हा लोचनां लाभे दृष्टी । दिसशी मज तूं तुझ्यांत सृष्टी ।
गोठ गोठले अश्रू तापून । गालावर वाहिले ॥२॥
श्रवणांना ये पुनरपि शक्ति । मनां उमगली अमोल उक्ति ।
'उठ अहल्ये' असे कुणीसे । करुणा वच बोलले ॥३॥
पुलकित झाले शरीर ओणवे । तुझ्या पदांचा स्पर्श जाणवे ।
चरणधुलीचे कुंकुम माझ्या । भालासी लागले ॥४॥
मौनालागी स्फुरले भाषण । श्रीरामा तूं पतीत पावन ।
तुझ्या दयेनें आज हलाहल । अमृतांत नाहले ॥५॥
पतीतपावना श्रीरघुराजा । काय बांधू मी तुमची पूजा ।
पुनर्जात हे जीवन अवघे । पायांवर वाहिले ॥६॥
रामा चरण तुझे लागले । आज मी शापमुक्त जाहले ॥

दिवोदासाची पुत्री अहल्या. अतीशय देखणी होती. तिच्या सौंदर्याची कीर्ति पृथ्वितलावरच काय पण स्वर्गात देखील गेली. आधींच इन्द्र भोगप्रवण, त्याने त्याची सुन्दर इन्द्राणी असूनही अहल्येला वरण्याचे ठरविले ? काय स्वर्गातले देव सुद्धां मर्त्यलोकींच्या जडशरीरीं मर्त्यावर भाळतात ? हो हो तर ! इन्द्राला योग्य अशी संधी प्राप्त झाली. अहल्या उपवर झाली आणि तिचे लग्न करण्याचे दिवोदासानें ठरविले. तिचे स्वयंवर करण्याचे ठरविले. स्वयंवर याचा अर्थ असा कि आपल्या मनानें वधुने आपला वर वरावा. पण त्या काळच्या स्वयंवरांत ज्या अटी लावण्यांत येत असत त्या ठरविण्याचे स्वातंत्र्य वधूला नसे. ठरलेल्या अटीप्रमाणें जो अट वा पण जिंकेल त्यालाच माला घालण्याचे कार्य ती स्वयंवरांत उभी असलेली वधू करीत असे. मग ती अट पूर्ण करणारा तिला पसंत असो वा नसो. मग हे कोणते स्वयंवर कि ज्यांत वधूच्या पसंतीला मुळींच स्वातंत्र्य नाही ? पण रामायणकार असल्या बांधिकलीलाच स्वयंवर म्हणतात. सीतेचे स्वयंवर असेच झाले.

अहल्येच्या स्वयंवराची अट मजेदार होती. जो उत्तम सारथी म्हणजे आजच्या भाषेंत ड्रायव्हर असेल त्यालाच अहल्येने माला घालायची असा प्रण होता तिच्या स्वयंवराचा ! काय एका ड्रायव्हरशी लग्न आणि

अहल्येसारख्या सुकुमार सुन्दर राजकन्येशी ? मग काय झाले, ड्रायव्हर काय कमी योग्यतेचे असतात असें वाटतें काय ? विमानचालक ड्रायव्हरच नसतो काय ? आणि अटहो तशीच विमान ड्रायव्हरला म्हणजेच एअर पायलॉटला साजेशीच होती. पण त्यांत आणखी एक मेख होती. जो विमानचालक स्वत: सर्वाअगोदर पृथ्विला प्रदक्षिणा घालून आपलें विमान स्वयंवर होता त्या स्थानीं आणेल त्याला अहिल्या द्यायची नाही, तर त्या विमानांत दुसऱ्याच्या मेहनत आणि कौशल्यावर आरामांत बसून फेरफटका करणारा जो विमानमालक त्याला ती अहल्या द्यायची असा प्रण होता.

अहल्या त्याला द्यायची कि जो आपल्या विमानांत बसून सर्वाअगोदर पृथ्विप्रदक्षिणा करून येईल त्या महाभागाला !

अहल्या सुन्दर असल्यामुळें देशविदेशांतील राजे महाराजे आपापली विमानें घऊन आले. कोणी जेट, कोणी नॅट, कोणी मिग तर कोणी कांकार्ड ! अरे बापरे, मग अहल्या विवाह मंडपासमोर एक प्रचंड विमानतळच असले पाहिजे नाही का ? तर काय गंमत समजता तुम्ही ? अहो आपले पूर्वज सर्व विद्यांत सम्पन्न होते, शस्त्रविद्या, अस्त्रविद्या, विमानविद्या......! आणि ......आणि ......बायका पळविण्याची विद्या सुद्धां ! ! पण एक घटना घडली आणि सर्व राजे महाराजांच्या तोंडचे पाणी पळाले. कोणाची कल्पना सुद्धा नव्हती कि स्वर्गांतील इन्द्र आपले अॅटामिक विमान घेऊन त्या स्वयंवराला येईल. अॅटामिक विमान तर ताशीं पंचेवीस हजार मैल वेगाने चालते ! निघाल्या स्थानापासून इन्द्र एका तासांत त्या स्थानीं अॅटामिक विमानाने परत येणार ! ! मग कोण्या विमान मालकाची छाती आहे इन्द्राला जिकण्याची ? इन्द्र आपले विमान घेऊन स्वयंवराला आला आणि आतां आपण जिकत नाही अशी भावना करून हिरमुसल्या तोंडाने सारे राजे महाराजे परत जाण्याचा विचार करतात तोंच ...... तोंच एक गोसावडा स्वयंवराच्या मंडपद्वाराशी उभा राहिला !

राजसेवक धांवत गेलेत आणि त्या गोसावड्याला सोटे मारण्याकरता हात उगारते झाले. पण तो गोसावडा बराच धीट होता. तो राजसेवकांना दरडावून म्हणाला 'खबरदार मला हात लावाल तर ! मी भीक मागणारा

नसून एक तपस्वी आहे. मला गौतम ऋषि म्हणतात.' 'मग महाराज आपले काय काम या स्वयंवराच्या लग्नघाईत?' राजसेवक पृच्छा करते झाले. 'तुम्हाला काय करायचे त्या गोष्टीशी. मला तुमच्या मालकाकडे म्हणजे दिवोदासाकडे घेऊन चला. त्यांना मी माझे काम सांगेन' गौतम गोसावडा म्हणाला. दिवोदासाची भेट झाल्यावर ऋषी गौतमाने चक्कच सांगितले कि 'राजा मला अहल्येशी स्वयंवराद्वारें विवाह करायचा आहे' दिवोदासाला मोठा प्रश्न पडला कारण अहल्या क्षत्रिय आणि किशोर वयीन सुकुमार कलिका तर ऋषी गौतम तिचे खापरपणजे शोभणारे आणि जरडभरड, अस्वच्छ, दाढी मिशांचे रान अंगावर वाढविलेले !

अहल्येच्या बापाचा चेहरा पाहून ऋषी संतापला 'राजा तुला काय करायचे माझ्या चेहऱ्या मोहऱ्याशी आणि इतर गोष्टींशी? तुझा प्रण मी पूर्ण केला कीं झाले? सर्वाअगोदर मी पृथ्विप्रदक्षिणा करून या स्थानी आलो कि झाले न?' दिवोदास काय बोलणार? पण बोलला, 'महाराज आपल्याजवळ विमानगिमान तर कांहीच नाहीं आणि...... ?' 'तुला काय त्याचे ? माझे विमान तुमच्या सारख्या पाप्यांना दिसायचे नाही. मी स्वयंवराला उभा राहणार. मला स्वयंवर मंडपांत घेऊन चल !' ऋषी बोलते झाले. एकच कल्लोळ झाला. 'एक गोसावडा स्वयंवराला उभा रहाणार आहे.' 'आणि विमान?' 'अदृश्य आहे? बिचारी अहल्या ! तिची सारी स्वप्नें धुळीला मिळाली. 'एका म्हाताऱ्या जरठ घाणेरड्या गोसावड्यानें पैंज जिंकली तर ?' तिचा सुकुमार देह शहारला, हादरला !

स्वयंवराची वेळ आली. इतर राजांची विमानें घरघर करूं लागली. इन्द्राच्या विमानांतील अणुइंधन विस्फोट करायला लागले. पैंजेची घंटा घणाणली आणि विमाने आकाशांत लहान लहान दिसू लागली. इन्द्राचे अणुविमान तर एका झटक्यांत क्षितिजापार निघून गेले. आणि हा गोसावडा काय करीत होता ? त्याने उभ्या उभ्याच आपल्या भोंवती गिरकी मारली नि मंत्र म्हटला, 'ॐ असावादित्यो ब्रह्म' आणि दिवोदासाला म्हणाला, 'राजा, मी सर्वाअगोदर पृथ्विप्रदक्षिणा केली आहे कारण 'जे पिंडी ते ब्रह्मांडी' या शास्त्रवचनाला धरून मी स्वतःभोवती प्रदक्षिणा

घातली म्हणजे त्यांत सर्व विश्वाला प्रदक्षिणा घालण्यासारखेंच आहे. मग पृथ्विचा काय पाड ? आण तुझी मुलगी आणि लाव माझेशी तिचे लग्न !'

दिवोदासाला तसे वागणे भाग पडले कारण शास्त्रवचनाला खोटे ोण म्हणणार? शिवाय एक ऋषी ते वचन सांगतो आहे. मग कोण त्यांना प्रश्न करणार ? अहल्येने गौतम ऋषीच्या गळ्यांत माळ घातली, आणि जवळून पाहिले आपल्या पतिराजाला, 'तो घाणेरडा म्हातारा चेहरा, काटेरी दाढी, मिशी आणि जटा, अंगावरील ते जळमट केंस आणि कुबट घामट अंगाचा वास ! 'शिव शिव, देवा कसला हा स्वयंवर !' इतक्यांत इन्द्राचे अणुविमान उतरलें आणि पाहतो तो ह्या थेरड्याशी अहल्येचे लग्न होऊन राहिले, जळफळला आणि प्रतिज्ञा करता झाला, कि 'मी अहल्येचा भोग घेईन तरच नांवाचा इन्द्र !' आणि तशी संधी इंद्राला लवकरच मिळाली.

आपल्या सुकुमार सुन्दर किशोरीला घेऊन ऋषी गौतम आपल्या आश्रमांत आले. 'दारास नाही दोऱ्या या झोंपडींत माझ्या' अशी ती चंद्रमौळी झोपडी ! आयुष्यांत संवय नाही ती कामें अहिल्येला करावी लागत, काड्या गोळा करणे, पाणी भरणे, धान्य गोळा करणे, धान्य दळणें, फाटकी वस्त्रें धुणें, स्वयंपाक रांधणे आणि, आणि, त्या म्हाताऱ्या नवऱ्याशी संसार थाटणें. रोज तिच्या कानावर लता मंगेशकरचे गाणे ऐकूं यायचे, 'क्या करू राम मुझे बुढ्ढा मिल गया' पण काय करणार?

एक दिवशीं नित्याप्रमाणें गौतम ऋषी गंगेवर स्नानसंध्या कर्म करायला गेले. आतां ते माध्याह्नापर्यंत परत येणार नाहीत असें समजून घरांत कांही धान्य घेऊन ती निवडायला बसली. तिला व्यंकटेश स्तोत्रांतील ओवी आठवली, 'उडदामाजीं काळें गोरे । काय निवडावे निवडणारे ॥' दार वाजलें आणि गौतम आंत येऊन सहेतुक दृष्टीने तिच्याकडे पहायला लागले. 'स्वामी आज लवकर कां परतलात आपण ? तिने प्रश्न केला. गौतम ऋषी उत्तरले, 'मला वेळ नाही प्रश्नोत्तरे करायला. प्रथम आंत चल आणि मला संभोग दे ! 'स्वामि या दिवसाढवळ्या असलें कर्म ?' 'तुला काय कळते धर्मशास्त्र ? मी सांगतो तसें वाग' असे म्हणून गौतम ऋषि अहल्येच्या जवळ येऊन तिला धरते झाले.

'आँ, हा तर इन्द्राच्या शरीराचा वास ? मग तू इन्द्र आहेस काय ?' अहल्या उद्गारली. 'होय प्रिये मी तुझ्याकरताच हें सोंग रचले मला भोग दे !' पण, पण इन्द्रा !.........'; 'पण बिण कांही नाही' इन्द्र उतावीळ झाला होता. आणि, आणि तो इन्द्र आहे हें माहीत असतांही एका पतिव्रतेने म्हणजे ऋषिपत्नि अहिल्येने इन्द्राला आपला शरीरभोग दिला. एक अनैच्छिक सुख ती भोगीत होती. आणि इतक्यांत दारावर थाप बसली, कारण आतां खरोखरीचे गौतम ऋषी माध्यान्ह समयीं ब्रह्मकर्म आटोपून परत आले होते.

'अरे बापरे ?' इन्द्र पळाला पण त्यानें पळतांना मांजराचे रुप घेतले. गौतम ऋषि त्रिकालदर्शी असल्यामुळें त्यांनी त्या मांजररुप इंद्राला ओळखले आणि शाप दिला, 'हे पातक्या इन्द्रा तुला एकच भोगेन्द्रिय असून सुद्धां तूं सहस्त्र भोगेन्द्रियासारखा भोग घेतोस. मग आता तूं जन्मभर भोगच घेत रहा. तूं सहस्त्रशिस्न हो !' इन्द्र क्षमा याचना करायला लागला, 'हे ऋषी मी चुकलो मला उःशाप द्या, क्षमा करा' दया आली ऋषिला आणि त्यांनी इन्द्राला उःशाप दिला, 'जा सहस्त्रशिस्नाऐवजीं तूं आतां सहस्त्राक्ष हो !' तेव्हापासून इन्द्राला सहस्त्रअक्ष म्हणजे सहस्त्र डोळे झालेत. म्हणजे तो आतां सहस्त्र चक्षूंनी पाहून त्याद्वारें सावध होऊन आपले उर्वरित जीवन स्वर्गातच घालवितो आहे. त्याला अहिल्येपासून अद्दल घडल्यामुळें तो आतां आपल्या मृत्यूलोकांत येत नाही. नाहीतर आजकालच्या चिडिमार प्रकरणें करणाऱ्या युवकांत गांवोगांवी इन्द्र दिसला असता.

आणि ती अहल्या ? ती आपल्या कपाळावर हात मारून एका कोपऱ्यांत तोंड लपवून बसली होती. गौतम आंत जाऊन तिच्यावर संतापले, 'हे कुलटे, नीचे, तू जाणून बुजून हें नीच कर्म केले आहे. तूं शीळा होऊन पड आणि मर !' अहल्या पाया पडली. आपल्या पश्चातापाश्रूंनी तिने नवऱ्याचे चरण धुतले. 'नाथा तुम्ही सर्व जाणताच. मी काय सांगणार ? परन्तु स्वामिन मला क्षमा करा, माझा उद्धार करा !' 'सटवे तुझा उद्धार मी करणार नाही. तुझा उद्धार करेल भगवान श्रीरामचन्द्र. सध्यांचे

सत्ययुग चालू आहे. सत्ययुग पूर्ण होऊन त्रेतायुगाचे शेवटी भगवान रामचन्द्र अवतार घेतील आणि त्यांचे चरणरजाने तूं पावन होशील!' असें म्हणून गौतम ऋषीं वनांत दीर्घ तपस्येकरतां निघून गेले.

तेव्हापासूनची अहल्या शिळा होऊन पडली ती आतां भगवान रामचन्द्राच्या पदस्पर्शाने पुनित झाली. बापरें, इतकी युगें ती शीळा होऊन पडली होती? हो, दगडाला कसला काळ आणि कसला वेळ?

'अहल्या शिळा राघवें मुक्त केलीं। पदीं लागतां दिव्य होऊन गेली.'

## कथारहस्य : अहल्या :

रामायणांत वापरलेल्या शब्दांतच कथेचे योग रहस्य आहे. अहल्या दोन उपशब्दापासून झालेले नाम आहे. 'अ' म्हणजे नाहीं आणि 'हल्या' म्हणजे नांगरलेली. हल म्हणजे नांगर. मग अहल्या काय शेत आहे नांगरायला? होय! गीतेंत या शेताचे वर्णन केले आहे. भगवंत म्हणतात,

इदं शरीरं कौन्तेय क्षेत्रमित्यभिधीयते।
एतद्यो वेत्ति तं प्राहु: क्षेत्रज्ञ इति तद्विद:॥ श्लोक० १, अ० १३॥

आशय असा कि हे शरीर एक क्षेत्र म्हणजे शेत आहे आणि त्या शेताला व्यवस्थित जाणणारा क्षेत्रज्ञ किंवा शेतकरी म्हणविल्या जातो. कोणतेही शेत न नांगरल्यास ते पडित राहून उत्पन्न देत नाही. शेतांतून चांगले उत्पन्न काढायचे झाल्यास त्या शेतांत हल म्हणजे नांगर चालविलाच पाहिजे. तद्वत् मानव शरीराचे आहे. मानवशरीररूपीं शेतांत साधना सत्कर्माचा नांगर न चालविल्यास तें शरीर असंस्कारित राहून त्या शरीरात राहणाऱ्या जीवात्म्यास आत्मप्राप्तीचे उत्पन्न मिळणार नाही. जो जडवादी देहालाच सर्वस्व मानून त्यांत साधना सत्कर्मरूप हल चालवून ते सुपीक करीत नाही अशा देहाला रामायणकार अहल्या म्हणतात. **असंस्कारित काया म्हणजे अहल्या होय.**

## गौतम आणि इन्द्र :

गौ म्हणजे केवळ गाय नसून आपली इन्द्रियें सुद्धां होत, अन्यथा गौचा अर्थ केवळ गाय धरल्यास गोस्वामी तुलसीदासांना बैल म्हणावे

लागेल कारण गौ म्हणजे गाईचा स्वामी बैलच राहील. परन्तु ज्यांची इन्द्रियें पूर्णपणें ताब्यांत असतात अशा श्रेष्ठ साधकाला गोस्वामी म्हणतात. त्याच अर्थाने ज्याचा इन्द्रियनिग्रह उच्च अवस्थेचा (तम) आहे अशा श्रेष्ठ इन्द्रियनिग्रही साधकाला गौतम असें रामायणकार म्हणतात. म्हणजे अहल्या काया वा वृत्ति तर त्या काया वा वृत्तिचा पति म्हणजे स्वामी जीवात्मा गौतम होय. मग इन्द्र कोण? तर भोगपरायण वृत्ति म्हणजे इन्द्र होय. म्हणूनच पुराणांत सर्वत्र इन्द्राला भोगप्रवण दाखविले आहे. वेदांत एकेकाळीं इन्द्राला अति उच्च साधकावस्था मानीत असत परंतु त्यांतही इन्द्र म्हणजे कोणी पारलौकिक किंवा स्वर्गातील देवता नसून साधकाच्या इन्द्रियांचा स्वामी किंवा भोगप्रवृत्ति यालाच इन्द्र म्हणत असत. वेदऋचा पहा,

ये अर्वाञ्चरताँ उ पराच आहुर्य  
पराञ्चस्ताँ उ अर्वाच आहुः ।  
इन्द्रश्च या चक्रथुः सोम तानि  
धुरा न युक्ता रजसो वहन्ति ।। (ऋग्वेद १।१६४।१९)

या शरीरावर जर गौतमाचा अधिकार चालत असेल तर त्याचे उत्तम उन्नत संस्कार घडून कायावृत्ति हल्या सुहल्या बनेल आणि ही हल्या जर इन्द्रवृत्तीला म्हणजे भोगवृत्तीला शरण जाऊन अहल्येप्रमाणें इन्द्राला भोग द्यायला लागली तर ती अहल्या नाही काय? भोग घ्यायला येणारा गौतम नसून इन्द्र होता हे अहल्येला माहीत असतांना सुद्धां तिने आपला भोग इन्द्राला घेऊं दिला यांतच अहल्या कथेचे आध्यात्मिक रहस्य आहे. कित्येकवेळा आपल्याला माहीत असते कि आपण आपल्या निम्नवृत्तीला बळी पडत आहोत पण हें जाणून सुद्धां आपण त्या मार्गाने जाऊन प्रमाद करतोच करतो. पलिकडे तर अशी संवय झाल्यास आपण आपले करणे उत्तम म्हणजे आध्यात्मिक आहे असें स्वतःलाच समजवायला लागतो. हेंच गौतमाचे रुपांत इन्द्राचे अहल्येच्या आश्रमांत येणें होय. सत्कार्याचे किंवा सत्प्रवृत्तीचे रुपांत आपण अनेक वेळ पापकर्म वा वाईट कर्म करीत असतो. वाईट कर्म करणारा आपल्या कर्मावर सत्कर्माची किंवा अध्यात्माची

झालर देण्याचा प्रयत्न करतो. पैसे खाणारा, अन्याय करणारा, हुकुमशाहीचा वरवंटा फिरविणारा, साधुत्वाचे नांवावर बुवाबाजी करणारा, आध्यात्माचे नांवावर चमत्कार दाखविणारा माणूस गौतमाचे रुपांत येणारा इन्द्रच होय ! आणि त्या इन्द्रवृत्तीला आपलें शरीर आणि मन साथ देते म्हणजे भोग देते.

साधनामार्गातील साधकाच्या अनुभवाला येणाऱ्या भल्याबुऱ्या वृत्तींचा प्रपंच अहल्योद्धाराचे कथेद्वारे वाल्मिकींनी किती बहारीने मांडला आहे पहा ! इन्द्राला भोग देणारी आपली कायावृत्ती मग दगडासमान नाही काय ? कबीर म्हणतात,

'कहत कबीर जा मुख राम नहीं । वो मुख धूलि भरी ॥'

असली धुलींत पडलेली अहल्याशीला रामवृत्ती स्पर्शाशिवाय कशी उद्धरणार ? राम त्रेतायुगांत झाले. त्रेता म्हणजे रक्षण करणारे, साधकाचे रक्षण कोणत्या वेळेस होईल ? त्यांत रामवृत्ती उत्पन्न होईल तेव्हांच ! मग सत्य युगांतील वाटणारी अहल्यावृत्ति तिच्यांतच त्रेतायुगांतील रामवृत्ति जागृत झाल्याशिवाय कशी उद्धरणार ?

## युगकल्पना

यावरून सत्य, त्रेता, द्वापर आणि कलियुग हे प्रत्यक्ष कालगणना वा युग नसून साधकाचे वृत्तींतील भाव जागरण होत. सत्य म्हणजे सत्याची आवड आणि आचार असलेली वृत्ति, त्रेता म्हणजे ज्या वृत्तीने साधकाचे रक्षण होईल ती वृत्ती, द्वापर म्हणजे मनाची द्विधावृत्ति आणि कलि म्हणजे साधकाचे चित्ताची अधम वृत्ती होय. सत्य, त्रेता, द्वापर आणि कलि ही युगें कधींच नव्हती आणि आजही नाही.

भ्रामक युगकल्पनेवर आधारलेले कथित विद्वान आणि इतिहासकारांचे आराखडे आणि कालगणना अशास्त्रीय अतएव व्यर्थ होय.

वरील आध्यात्मिक रुपकांचा उलगडा झाल्यास अहल्योद्धाराची कथा योग्य वाटते अन्यथा सत्ययुगासारखा पावन युगांत एका श्रेष्ठ ऋषीच्या

पत्निनें इन्द्रासारख्या एका परक्या माणसाशी जाणून बुजून संभोगासारखा दुर्व्यवहार करावा ही कथा बुद्धिवान आणि आध्यात्माची चाड असणाऱ्या माणसाला पटणार नाही. नवीन पिढीतर असल्या घाणेरड्या कथा ऐकायलाच तयार नाही. पण त्यांना या कथेतील योगरहस्य कळल्यास ते रोजच प्रात:स्मरणांतील पंचकन्येचे स्तोत्र गातील,

अहल्या द्रौपदी सीता तारा मन्दोदरी तथा ।
पंचकन्या स्मरेन् नित्यं महापातक नाशनम् ।।

यापैकी पहिलीच कन्या अहल्या हिचे चारित्र्य आपण पाहिले आहे. दुसरी द्रौपदी तर महाभारतातील असल्यामुळे महाभारतातील रहस्योद्धाटनांत तिचे चारित्र्य आणि पंचपतीचे पातिव्रत्य पाहूं. काय पांच पति असून सुद्धां पतिव्रता ? हो पांच पतींची पतिव्रता ! उर्वरित सीता पुढील प्रकरणांत जमिनींतून जन्म घेऊन रामाची पत्नि बनतेच आहे तिलाच आपण तिच्या चारित्र्याचे रहस्य विचारू या ! तारा आणि मन्दोदरीचे रहस्य भगवान रामासह आपण वानरराज्य राजधानी किष्किधेंत गेल्यावर आणि रावणराज्याची राजधानी लंकेत गेल्यावर पाहूं. सध्यां मिथिला वनांतील अहल्येचा उद्धार करून राम प्रत्यक्ष मिथिलेंत जात आहेत. तेथें गेल्यावर रामराय प्रथम शिवधनुष्याचा भंग करून त्या पणावर सीतेला जिंकतात आणि तिला आपल्या अयोध्येला घेऊन जातात.

भगवान रामाचे मागें आपणही चलू या मिथिला नगरींत !

## शिवधनुष्य भंग आणि सीता स्वयंवर

आपल्यांतील अहल्येचा उद्धार केल्यावर राम लक्ष्मण विश्वामित्रसह वर्तमान प्रत्यक्ष मिथिला नगरींत जायला निघाले. कां ? तर तेथें अहल्येसारखेच एक स्वयंवर होते आणि त्या स्वयंवराला उपस्थित राहून, स्वयंवराचा प्रण जिंकून रामाने मिथिला राजा जनकाच्या पुत्रीचे पाणीग्रहण करावे अशी विश्वामित्राची इच्छा होती. रामाचा काळ त्रेता युगाचा असल्यामुळे सत्ययुगांतील अहल्येच्या स्वयंवराला रामाला उपस्थित राहता आले नाही पण आता त्रेतायुगांतील सीता स्वयंवराला उपस्थित राहायला काय हरकत आहे ? पण राम थोडे घोटाळत होते, कारण राक्षसांचा वध

करण्याकरता राम विश्वामित्रासह अरण्यांत आले होते. आता रामाचे वय सोळा वर्षांचे होते. शिवाय राम सर्वांत मोठा मुलगा. आपल्या पित्याला आपल्या लग्नाचे कार्य न जमवूं देता रामाने पित्याला न विचारता आपणच परस्पर लग्न उरकवून घेतल्यास घरांत काय आदर्श राहील ? राम तर आदर्श पुरुष ! जग काय म्हणेल ? शिवाय अवघ्या सोळा वर्षांतील किशोर वयांत लग्नाकरता घाई कां करायची ? इत्यादि पारंपरिक विचार रामाचे मनांत येत असे.

परंतु विश्वामित्राला रामाकडून महत्कार्य घडवून आणायचे होते त्यामुळें रामाला समजावून देऊन घरच्या वडीलधाऱ्या माणसांचा मुळींच विचार न करता रामाला घेऊन विश्वामित्र ऋषी मिथिलेंत गेले. तेथे सीता स्वयंवर होते. स्वयंवराचा प्रण होता शिवधनुष्याला प्रत्यंचा चढविण्याचा ! 'एका तिरकमठ्याला फक्त दोरी लावल्याने काय सीतेसारखी कमनीय सुन्दर स्त्री मिळणार ?' 'अरे रामा थांब घाई करू नकोस. तो तीरकमठा कांही साधा नाही. भगवान शिवाने तें प्रचंड धनुष्य जनकाकडे पाठविले आणि त्यावर जो प्रत्यंचा चढवेल त्यालाच सीता द्यायची असा आदेश दिला. त्या प्रचंड शिवधनुष्याला मोठमोठ्या पहलवानांना सुद्धा उचलता येत नसे असें म्हणतात. मग काय सीतेसारखी सुकुमार सुसंस्कृत मुलगी शिवधनुष्य उचलून त्यावर प्रत्यंचा चढविणाऱ्या दांणगटाला द्यायची काय ? मग त्याचे संस्कार, जात, कुल आणि राहणी कांहीच पाहायची नाही काय ? हो शिवाची आज्ञाच तशी आहे !' 'मग ऋषी माझ्यासारख्या कोंवळ्या किशोराला तें प्रचंड धूड उचलल्या जाईल काय ?' 'रामा घाबरूं नकोस; तूं अहल्येचा उद्धार केल्यामुळें तुझ्यांत ते प्रचंड शिवधनुष्य लीलया उचलण्याची शक्ति आली आहे. इतर पैलवानांनी अहल्या उद्धार न केल्यामुळें ते बोका बलवान असले तरी त्यांना तें प्रचंड शिव धनुष्य उचलल्या जाणार नाही.' विश्वामित्रांनी रामला समजावले.

अशा तऱ्हेने रामपिता दशरथ आणि माता कौसल्या इत्यादि घरांतील थोरांना न विचारताच रामाला घेऊन विश्वामित्र मिथिलेला लगीन घाईनें निघाले ते थेट लग्नमंडपांतच. राजा दशरथाचा ज्येष्ठ पुत्र राम होता.

ररातील पहिलेच पुत्राचे लग्न. पितामातेला विचारून आणि त्या काळाला अनुसरून मातापित्यानें वधूला पाहून पसंत करून लग्न व्हायला हवे होते. पण विश्वामित्रासह राहून रामासारखा आदर्श पुरुषोत्तम सुद्धां बावचाळला असावा असें दिसते. आपल्या आईबापांची पूर्वसंमती न घेताच सीता-स्वयंवराकरता जाण्यास म्हणजे आपलें लग्न परस्पर उरकवून घेण्यास राम उतावीळ झाला होता असे कथेवरून दिसते. बरें इतके उतावीळ होण्याइतकें रामाचे वय तरी किति होते ? अवघे किशोरवय; सोळा वर्षांचे ! काय आदर्श पुत्राला हे शोभेल काय ? पण कथा तसें सांगते. त्याचे रहस्य पाहूं. तेथें ते प्रचंड शिवधनुष्य पडलेले होते. रामाने त्या शिवधनुष्याला हात घालण्यापूर्वी सीतेचा इतिहास पाहू.

## विदेही जनकाची पुत्री सीता

मिथिला नगरीचा राजा जनक. हा देहातीत अवस्थेंत राहात असल्यामुळे याला विदेही जनक असें म्हणत असत. याला औरस पुत्र वा पुत्री संतति नव्हती. एक दिवशी शेती नांगरीत असतांना याला भूमीतून एक मुलगी प्राप्त झाली. तिचे नांव त्याने सीता असे ठेवले. सीता मोठी सुलक्षणी होती. अशा सुलक्षणी मुलीचे लग्न तशाच सुलक्षणी युवराजाशी लागावे अशी विदेही जनकाची फार इच्छा होती. आणि तसें घडलेही. भगवान शिवाने आपले प्रचंड धनुष्य राजा जनकाकडे पाठवून दिले आणि त्या शिवधनुष्यावर जो बलवान पुरुष प्रत्यंचा चढवेल त्यालाच सीता स्वयंवराची अट घालावी असें भगवान शिवानें सांगीतले. सीता वयांत आल्यावर जनक राजानें तिचे स्वयंवर रचून तिच्या स्वयंवराचा वरील-प्रमाणें प्रमाणे प्रण ठेवला कि जो त्या शिवधनुष्याला प्रत्यंचा चढवेल त्यालाच सीता माळ घालेल. स्वयंवराचाच योग्य विचार केल्यास असे दिसून येईल की स्वयंवराची अट धातुक होती. प्रचंड शिवधनुष्यावर प्रत्यंचा चढविण्याचे काम प्रचंड शक्तिच्या दाण्डगटाचेच म्हणजे पैलवानाचेच होते. मग अशा अटीची पूर्तता एखादा पाशवी शक्तिचा आणि वृत्तीचा दणकट पैलवानच करू शकेल. मग अशाला आपली सुकुमार मुलगी द्यायची

काय ? कोणताही विचारीं बाप असल्या मूर्खपणाची अट ठेवणार नाही. पण जनक तर अति विचारी आणि आध्यात्मिक वृत्तीचा राजा होता. त्याला मूर्ख कसे म्हणायचे ?

या शिवधनुष्याचा आणि सीता स्वयंवराचा अर्थ आपण थोडे नंतर पाहू. सीतेंच्या जन्माचाच विचार केल्यास असें दिसून येईल कि सीता जन्माची कथा चमत्कारिक आणि वैज्ञानिक दृष्टया अयोग्य वाटते. उत्क्रांति-मधील टप्प्यांत मानवशरीर हे अति उच्च आणि संपूर्ण मानल्या गेले आहे. असल्या उच्च उत्क्रांत मानवशरीराचा जन्म प्रत्यक्ष मातेच्या उदरांतून होत असतांना सीतेचा जन्म एखाद्या झाडाप्रमाणें किंवा गांडुळाप्रमाणे जमिनींतून व्हावा हें विचारवान मनाला पटत नाही. कांही वावदूक यावर असा युक्तिवाद करायला पाहतात कि देवतांना काय असंभव आहे ? ते कसेही जन्म घेतील पण या कथित तर्कवाद्यांचा तर्कच मुळीं अशास्त्रीय आणि बिनबुडाचा आहे. समजा देवाचा जन्म कसाही आणि कोठूनही मानला तरी शास्त्रांनी हें स्पष्टच सांगीतले आहे कि देवतांना जन्म नसतो, त्या अजन्मा असतात. म्हणजे जमिनींतून जन्म घेणारी सीता देवता नाही तर मानव आहे. मग मानवाचा जन्म भूमींतून कसा ?

बरे देवता मानावे तर रामही देवता होते असे मानावे लागेल. मग रामाने स्वतः सरळ भूमींतून जन्म न घेता आपल्या कौसल्या मातेचे उदर फाडून आणि तिला त्रास देऊन जन्म कां घेतला ? येथे मात्र असे तर्कवादी गप बसतात. उगाच तर्कटे लढविण्या पलीकडे त्यांना बुद्धिच चालवायची नसते आणि खरे ज्ञान प्राप्त करायचे नसते. पण सीतेच्या भूमीतील जन्माचे अध्यात्म पाहल्यास तिचा भूमींतून होणारा जन्म पटू शकतो. तसेंच सीतेला मरणकालीं भूमीनेंच आपल्या पोटांत घेतले. सीतेच्या असल्या जन्म मरणाच्या गतीवरून हे स्पष्ट आहे कि आपण सर्व सीताच आहोत; कारण आपला देह भूमींतून म्हणजे पृथ्वितत्वांतूनच उत्पन्न होतो आणि मरणोत्तर तो पंचतत्वांतील पृथिवि तत्वांतच विलीन होतो. 'माती असती, मातींत मिळती, आत्म्याला हे लागू नसे । या आध्यात्मिक सीतेचा जन्म आणि मृत्यू भूमींत अवश्य झाला आहे.

शिवधनुष्याची कथा समजण्याकरता प्रस्तावनेंतील 'विहारचा अनुभव' ही घटना वाचावी. त्यांतील शिवधनुष्याचा उल्लेख म्हणजेच रामाने तोडलेले शिवधनुष्य होय. शिवधनुष्य म्हणजे मानव शरीरांतील पाठीचा कणा किंवा मेरुदण्ड होय. याच मेरुदण्डावर योगांतील सप्तयोगचक्रें असतात. त्या योगचक्रांची योग्य साधना करून कुंडलिनि जागृत करून ती ब्रह्मरन्ध्रांत स्थिर करणें या योगसाधनेलाच रामायणकार शिवधनुष्यावर प्रत्यंचा चढविणे म्हणतात. अशा शिवधनुष्यावर अशी योगशक्तिची प्रत्यंचा चढविण्याचे काम केवळ रामच करुं जाणें. दुसऱ्या दाणगट पैलवानाचे हे काम नाही. आणि या कल्पनेनेच भगवान शिवाने राजा दशरथाला सीतेच्या स्वयंवरांत शिवधनुष्यावर प्रत्यंचा लावण्याची अट ठेऊन सीता स्वयंवर करण्याचे ठरविले. वास्तविक ऐतिहासिक दृष्टद्या ज्या लग्नांत मुलीच्या मताला स्थान नाही त्या लग्नाला स्वयंवर कसें म्हणायचे? परंतु जो साधक आपल्या शरीरांतील मेरुदण्डरूप शिवधनुष्यावर प्रत्यंचा चढवितो म्हणजेच योग साधना करून संयमांत ठेवतो त्याला त्याची देहरुपी किंवा वृत्तिरुप सीता स्वत: होऊन कशी वरणार नाही? असल्या आध्यात्मिक लग्नालाच रामायणकार सीता स्वयंवर आणि शिवधनुष्यावर प्रत्यंचा चढविणें म्हणतात.

राम म्हणजे आनन्द देणारा आत्माराम हें आपण पाहिलेच. त्यामुळें कायारुप सीतेने मेरुदण्डावरील सप्तचक्रांचे साधन केल्यावर ब्रह्मरन्ध्रांत कुंडलिनि गेल्यावर तिला अतीशय आनन्द मिळणारच! मग मेरुदण्डरूप धनुष्यावर प्रत्यंचा चढविल्यानें अशा महान सीतेला रामासारखा वर मिळेलच ना? हेंच तें सीतेचें स्वयंवर आहे. सात्विक अनुभूति म्हणजे सीता होय. योगीराज वासुदेवानन्द सरस्वती आपल्या दशश्लोकी रामायणांत हेंच सांगतात, जीवात्मा राम तर सात्विक वृत्ती आणि अनुभव म्हणजे सीता होय! मग असल्या आध्यात्मिक अनुभवरुप स्वयंवराकरता आपल्या अयोध्या नगरींत असणाऱ्या पिता दशरथाला विचारण्याची रामाला आवश्यकता काय? आणि सीतेला तरी असल्या स्वयंवरांत स्वतंत्र मत असण्याचे कारणच काय? रामसीतेचे स्वयंवर असें आध्यात्मिक आहे.

अशा सात्विक अनुभवरुप सीतेला घेऊन राम लक्ष्मणासह अयोध्येला परत येतात. लक्ष्मणाला सुद्धां राजा जनकाची पुतणी उर्मिला देतात. या उर्मिलेचा योगार्थ काय आहे ? उरूमिला म्हणजेच उर्मिला होय. उरू म्हणजे भावना. ज्या साधकाच्या वृत्ति विवेकाशी म्हणजे लक्ष्मणाशी मिळाल्या आहेत त्या वृत्तींना उर्मिला नाहीं तर काय म्हणायचे ? म्हणून उर्मिला लक्ष्मणाची पत्नि बनते. अशा तऱ्हेनें राम लक्ष्मण अयोध्येला परत येतात. अयोध्या म्हणजे काय ? तर साधकाचे चित्तवृत्तींत जेथें द्वंद्व म्हणजे युद्ध नाही अशी शांत वृत्ती अवस्था म्हणजे अयोध्या होय. असल्या शान्त अद्वैत वृत्तीरुप अयोध्येंत भगवान राम राहणार नाही काय ? जेथें युद्ध नाही ती अयोध्या ! ज्या साधकाचे चित्तांत वृत्तींचे युद्ध नाही ती अयोध्या ! !

# चतुर्थ अध्याय

## रामाचा राज्यत्याग आणि वनवास गमन

राम लक्ष्मण आपापल्या पत्निसह वर्तमान अयोध्येला परत आले. बापाला आईला न विचारताच राम लक्ष्मणाने परस्पर लग्ने उरकविल्यामुळे अयोध्यानिवासींनी त्यांचे मोठ्या समारंभाने स्वागत केले. झाले गेले सर्व विसरून जाऊन उदार अन्तकरणाच्या दशरथाने त्या आनन्दोत्सवांत सह-पत्नि भाग घेतला; नव्हे एका अर्थाने त्यानेच तो आनन्दोत्सव साजरा करण्यास प्रजेला सांगीतले. आतां मुलं अशी शहाणी होत चाललेली पाहून राजा दशरथाने राज्यावर रामाला बसविण्याचा विचार गुरु आणि मंत्री जनांजवळ प्रकट केला. राम मोठा आणि सर्व जनांत लोकप्रिय असल्यामुळे सर्वांनी त्या कल्पनेला दुजोरा दिला. राम मोठा गोड बोलत असे. आपल्या कुलाचे नांव त्याने सार्थ केले होते. त्यांच्या कुलाचे नांव होते इक्ष्वाकु. इक्ष्वाकु कुलाचा पत्ता आमच्या विद्वानांना लागत नाही. त्याकरतां ते मनूकडे धांव घेतात. परंतु इक्ष्वाकु कुलाचे सत्य ज्ञान प्रत्यक्ष वाल्मिकीच त्यांच्या शब्दयोजनेद्वारेंच देत असल्याने आपल्याला इक्ष्वाकु कुलाच्या माहितीकरता मनूकडे धांव घेण्याची आवश्यकता नाही.

### इक्ष्वाकु वंश

इक्ष्वाकु शब्द दोन उपशब्दापासून झाला आहे एक 'इक्षु' अन् दुसरा 'वाक' ! इक्षु म्हणजे गोड रस देणारा उंस आणि वाक् म्हणजे वाणी. म्हणजे ज्याची वाणी उसाप्रमाणें गोड आणि प्रिय आहे अशा इक्ष्वाकु वंशाचा राम होता हें वाल्मिकींना या शब्दाद्वारें सुचवायचे आहे. म्हणजे जो जो माणूस सर्वांशी गोड आणि प्रिय भाषण करेल तो इक्ष्वाकु वंशाचाच म्हटला पाहिजे. आणि सर्वांशी प्रिय मिष्ठ भाषण कां करायचे याबद्दल रामभक्त कबीरजी सांगतात,

घूंघट का पट खोल तो को पिया मिलेंगे ।।  
घट घट में वह साई रमता । कटुक वचन मत बोल ।  
तो को राम मिलेंगे ।।

विश्वांतील यच्चयावत अस्तित्वांत आणि प्रत्येक मानवरुप घटांत तो परमेश्वर वसत असल्यामुळे कोणालाच कटु वचन बोलूं नकोस. सर्वांशी प्रीय बोल. तुला राम मिळतील, नव्हे तूंच राम होशील; परंतु त्याकरता आपल्या अज्ञानाचे घुंघट म्हणजे पडदा बाजूला कर ! **असे सर्व महान साधक इक्ष्वाकु वंशाचेच नाही काय ?**

आपणा सर्वांना तसें वागण्याकरता मिष्ठ आणि प्रिय भाषण केले पाहिजे म्हणजें आपल्याला इक्ष्वाकु वंशाचे बनले पाहिजे म्हणजे आपण सुद्धां राम होऊन जाऊ. **रामायण केवळ काव्य वा कोरडा इतिहास नसून आपल्या जीवनांत ते आदर्श उतरविण्याचा आध्यात्मिक मार्ग होय.**

## काकुत्स्थ वंश

रामाला काकुत्स्य वंशाचाही मानतात. काय एकच व्यक्ति अनेक वंश किंवा कुलाची राहूं शकते ? होय रामायणकाराचे दृष्टीने एकच व्यक्ति अनेक कुलाची राहूं शकते ! रामाचे कुलाचे आणखी एक नांव आहे, रघुकुल ! ! प्रथम काकुत्स्थ वंश काय तें पाहूं. काकुत्स्थ वंशाचे जरा विचित्र नांव पाहून कांही विद्वान युरोपमधील कॉकेशस पर्वताची आठवण काढून राम तिकडून आलेला भामटा होता असें प्रतिपादन करतात. पाश्चात्य पद्धतीने विचार करणाऱ्या विद्वानांची असल्या प्रकारची भामटेगिरी पाहून आमच्यातील सनातनी वृत्तीचे विद्वान सांगतात कि रामाच्या काकुत्स्थ वंशासारखे नांव कॉकेशसचे आहे काय ? मग भारतांतून बाहेर निघून राम आपल्या राज्याचा विस्तार करीत थेट कॉकेशस पर्यंत गेला असला पाहिजे. अश्वमेघ यज्ञाचे वेळीं रामाच्या अश्वाचा संचार तत्कालीन सर्व जगतांत झाला असला पाहिजे आणि त्या अश्वाचे रक्षण करता करता राम आजच्या कॉकेशस पर्यन्त जाऊन विजय संपादन करून आले असले पाहिजेत—..., इत्यादि इत्यादि !

असंख्य बिनबुडाच्या अशास्त्रीय अवास्तव गदारोळांत आपल्याला पडायचे नाही. आपला मार्ग आध्यात्मिक ! काकुत्स्थ शब्दाचा यौगिक

अर्थ काय आहे तें पाहू !! काकु म्हणजे स्वरज्ञान आणि काकुत्स्थ म्हणजे स्वरज्ञान असलेला. म्हणजे राम उत्तम गायक वा संगीत शास्त्रांतील महापंडित होते काय ? तसा उल्लेख तर रामायणांत कोठेच नाही. उलट राम गायनाचे बाबतींत पूर्ण निरस होते. मग रामाचे हें स्वरज्ञान कोणते असले पाहिजे ? हें स्वरज्ञान सारेगमपधनीसांचे नसून ईडा, पिंगला आणि मध्यगत सुषुम्ना नाडीचे आहे. इडा (डाव्या अंगाची योग नाडी) पिंगला (उजव्या अंगाची योग नाडी) आणि सुषुम्ना या नाड्यांतून जो श्वासस्पन्दन घडते त्याला योगशास्त्रांत शिवस्वरोदय असें म्हणतात. या योगस्वरांचे ज्या उच्च साधकाला प्रत्यक्ष ज्ञान म्हणजे अनुभव असतील त्याला रामायणकार स्वरोदयी किंवा काकुत्स्थ कुलाचा म्हणतात. म्हणून रामाचे कुल इक्ष्वाकु असतांना सुद्धां ते पुन्हा काकुत्स्थ कुलापासून झाले आहेत. पुन्हा त्यांचे कुल म्हणून रघुकुळाचे नांव वारंवार समोर येत असते. रघुकुलाचा आध्यात्मिक अर्थ पाहूं.

रघुकुलाची एक कीर्ति तुलसीदासजी सदा गात असतात आणि ती अशी कि 'रघुकुल रीत सदा चली आई । प्राण जाय परु वचन न जाई ।।' म्हणजे प्राण गेला तरी हरकत नाही पण रघुकुलांतील माणूस दिलेले वचन कधीही मोडणार नाही असा त्या दोह्याचा अर्थ आहे. म्हणजे जो वचनाचा पक्का असेल त्यालाच रघु असें म्हणतात. रघु या शब्दाचा आणखी एक अर्थ आहे. अघ म्हणजे पाप आणि रं म्हणजे अग्नि बीज; दोन्ही मिळून ज्याचे पाप जळून भस्म झाले आहे असा श्रेष्ठ साधक म्हणजें रघु होय. या अर्थाने निर्मल चित्ताच्या साधकालाच रघु म्हणतात. अशा अर्थाने जो शुद्ध चित्ताचा साधक वा योगी असेल त्याला रघु म्हणायला हरकत नसावी. आपल्याला सुद्धां रामाप्रमाणे शुद्धचित्त रघु होण्याचा प्रयत्न केला पाहिजे अन्यथा रामायण वाचून कांही उपयोग नाही. असें म्हणणे भाग आहे.

साधकांत जे जे आध्यात्मिक गुण असतील त्या गुणानुसार साधकाला कुलनाम बहाल करण्याचे रामायणकाराचे धोरण दिसते. म्हणून कोणतीही व्यक्ति एकाच कुलाची असूं शकते हें ऐतिहासिक सत्य माहीत असतांना सुद्धां रामायणकार एकाच साधक श्रेष्ठाला अधिकाधिक कुलें बहाल

करतांना दिसतात. विद्वानांनी या कुल रहस्याकडे अधिक लक्ष दिल्यास त्यांना रामायणाचे रहस्य कळण्यास सहाय्य होऊं शकेल. रामायण हा साधक जीवनांतील अनुभव इतिहास आहे न कि प्रत्यक्ष इतिहास !

## कैकेयीचा हट्ट

रघुकुलाच्या असल्या एकवचनी व्रताचाच लाभ घेऊन कैकेयीनें भरताला राज्यावर बसविण्याचे कारस्थान करून रामाला वनवासांत हांकलण्याचा अश्लाध्य पराक्रम केला. एकदां असें घडले. राजा दशरथ महान पराक्रमी होता. एकदां सुर आणि असुरांचे भयानक युद्ध झाले. त्या युद्धांत आपला विजय होत नाही असें पाहून स्वर्गाचा राजा इन्द्र याने मर्त्यलोकच्या दशरथ राजाला त्याला सहाय्य करण्याकरता स्वर्गांत पाचारण केले. दशरथाने इन्द्राला सहाय्य केले आणि मोठा पराक्रम गाजवून सुरांना जय मिळवून दिला. या दिव्य यद्धांत राजासह त्याची लाडकी राणी कैकेयी सुद्धां स्वर्गांत गेली होती आणि तिने राजाचे उत्तम तऱ्हेने सारस्थ करून राजाला जय मिळविण्यास सहाय्य केले. कैकेयीच्या या प्रसंगावधानी पराक्रमावर प्रसन्न होऊन राजा दशरथाने कैकेयीला दोन वर देऊं केले. राणी कैकेयीने ते दोन त्याच वेळेस न मागता जशी आवश्यकता वाटेल तसें मागण्याची मुभा मागून घेतली असल्या सवलतीच्या मुभा वराचा लाभ कैकेयीनें सवतीच्या मुलाला सर्वस्वाचा होम करायला लावण्यासाठी घेतला.

वरील कथेवरून असें दिसते कि त्या काळीं स्त्रियां सुद्धां युद्धांत जाऊन युद्ध करीत असत. म्हणजे स्त्रियांना पडदा तर नव्हताच पण त्या पुरुषासारख्या घरीं, दारीं, समाजांत आणि युद्धक्षेत्रांत सुद्धां पुरुषांबरोबर वावरत असत असें दिसून येते. मग असल्या शूर वीर आणि कर्तबगार स्त्रियांना स्वतःच्या लग्नाचे स्वातंत्र्य कां नसावे? स्वयंवर करण्याची मुभा देऊन स्वयंवरांतील अट मात्र वडीलधारी माणसें निश्चित करीत. हें काय स्त्री स्वातंत्र्य आहे ? शिवाय रामायणांतील पलीकडील अध्यायांत म्हणजे लंका विजय झाल्यावर अग्निपरिक्षा करण्याकरता सीतेला जेव्हां सर्व वानरासमोर आणण्यांत आले त्यावेळेस रामायणकार असें वर्णन करतात कि ज्या सीतेने कधी सूर्यदर्शन सुद्धां घेतले नाही अशा तिला

वानरासारख्यांच्या समोर सुद्धां पडद्याविना यावे लागले. या दोन्ही कथा परस्पर विरोधी दिसतात. एकीकडे आपल्या नवऱ्यासह युद्धासारख्या स्वैर क्षेत्रांत जाऊन मर्दुमकी गाजविणारी रामाची माता कैकेयी तर त्याच रामाची बायको सीता सूर्यदर्शन सुद्धां न घेणारी बुरखेवाली बिब्बि कोठे? असल्या परस्परविरोधी विधानांतून काय इतिहास बाहेर येणार ते आमचे कथित इतिहासकारच जाणोत!

म्हणून रामायण ग्रंथातून ऐतिहासिक सिद्धान्त काढूं लागल्यास परस्पर विरुद्ध आणि ऐतिहासिक दृष्टद्या असंभाव्य वाटणाऱ्या कथांचा ताळमेळ घालता घालता इतिहासकारांची पुरेवाट होते. म्हणून रामायण घटनांतून इतिहास शोधणें व्यर्थ अतएव चूक आहे. त्यांत आहेत केवळ आध्यात्मिक अवस्था रुपकें. ज्या आध्यात्मिक प्रसंगाला जे रुपक योग्य वाटलें त्याचा उपयोग करून रामायणकारानें आपले रुपककाव्य सजविले मग तसें ते सजवितांना आजचे इतिहासकार त्यांतून कोणकोणते अनर्थ काढतील याचा विचार करण्याचे रामायणकारांना कारणच नव्हते. त्याचे कालांतील लोकांना रामायण एक आध्यात्मिक रुपक काव्य आहे हें माहित असल्यामुळे रामायण काव्य इतिहास, कविकल्पना कि अध्यात्म असला आजच्यासारखा झगडा त्या काळीं नव्हता. काळाचा ओघ सरत गेला आणि रामायणांतील दिव्य आध्यात्मिक जीवनादर्शांतून आजचा इतिहास बनला किं ज्याचे अनुसरण कोणीच आपल्या जीवनांत करीत नाही.

विज्ञानांतील एक घटना येथें आठवते. रेडियम नांवाची एक दिव्य प्रकाशमय अशी धातू आहे. ती स्वत:तील तेजानेच तळपते. परन्तु अशा तऱ्हेने स्वत:तील प्रकाश किरणें बाहेर फेंकीत फेंकीत ती रेडियम धातू कान्लान्तराने प्रकाशहीन जड शीसे होऊन बसते. रामायणाचें बाबतींत आज असेंच झाले आहे. रामायणांतील दिव्य आध्यात्कि प्रकाश सतत बाहेर पडून आज रामायण केवळ एक जड इतिहास बनविल्या गेला आहे कि ज्याचे आदर्श आपल्या जीवनांत मुळींच अनुसरल्या जात

नाहीत. रामायण महाभारत ग्रंथ विद्वत्ता प्रदर्शित करण्याचे आणि लोकांना कथांच्या भूलथापा देऊन पैसे उकळण्याचे राजरोस साधन बनले आहे.

## मन्थरेचे मन्थन

रामाला राज्यावर बसविण्याची कल्पना सर्वांनाच पसंत होती; अगदी कैकेयीला सुद्धां ! कारण राम सर्वांनाच त्याच्या प्रिय भाषण आणि वागण्यामुळे प्रिय होता. कैकेयीचा तर तो लाडका होता. रामाला राज्याभिषेक करण्याचे वेळी कैकेयीपुत्र भरत आणि शत्रूघ्न आपल्या आजोळी गेले होते. कैकेयी महालांत एकटीच असे. राम राज्यावर बसतो ही गोष्ट मात्र कैकेयीची दासी मंथरा हिला मुळीच आवडली नाही. ती वेळ साधून एकटीच कैकेयीला भेटली आणि म्हणाली, 'राज्ञे, मी बोलूं नये, पण तुला कांही स्वतःचा विचार आहे कि नाही ?' 'कां ग ?' कैकेयी उद्गारली ! 'राज्ञे, राम राज्यावर बसल्यावर तुला कोण विचारणार ?' 'नाही ग, माझा राम तसा नाही, तो सर्वान्तरयामी परमात्मा आहे. त्याचे राज्यांत सर्वजण सुखी राहतील, मग माझा एकटीचा काय प्रश्न ?' कैकेयी उत्तरली. 'राज्ञे तूं वेळीच विचार कर. सध्यां तू अव्यावहारिक भावनेत दिसतेस. काळ सारखा राहात नाही. सत्ता आणि कीर्ति माणसाला पिसाट बनविते. तुला वाईट वागणूक मिळाल्यावर मग तू कोठे जाणार ? मग रामाचे राज्य राहील. तुझे लाड पाहून राम तुला कदाचित् घालवून सुद्धां देईल. मी सांगते बाई आपलं. माझं कर्तव्य आहे तुला जागं करणं ?'

इंग्रजी मधें एक म्हण आहे, 'Tell a lie for ten times, it becomes a truth,' मन्थरेच्या सततच्या विचार मन्थनामुळें कैकेयींतील आपपरभाव आणि सापत्नपणा जागृत झाला. मन्थरेने सुचविल्याप्रमाणें तिने खोटाच राग आणला आणि बसली रूसून क्रोधागारांत ! कैकेयी राजा दशरथाची अति प्रिय ! तो धांवतच गेला कैकेयीकडे. लडिवाळपणाची भाषा वापरली गेली. कैकेयी ऐकेना. तिने हट्ट धरला दोन वरांचा आणि एका वरानुसार राज्यावर बसवायचे भरताला आणि दुसऱ्या वरानुसार रामाला चौदा वर्षे दण्डकारण्यांत वनवासांत पाठवायचे असा तिनें हट्ट

धरला. राजानें तिला परोपरीने समजावले पण ती ऐकेना. शेवटी भरताला राज्यावर बसविण्यास दशरथ तयार झाला. 'भरत राज्यावर बसेल पण रामाला कां हांकलतेस त्या दण्डकारण्यासारख्या घोर वनांत ? रामाने तुझें काय केले ? राहील बिचारा राम चार माणसासारखा ! माझ्या रामाला मुळीच राज्यलोभ नाही.' 'मला अक्कल सांगू नका तुम्ही ! मी म्हणते तस्सेंच झाले पाहिजे ? कैकेयी फणकारली.

रामाला कैकेयीचा दुराग्रह कळला. रामच तो ! गेला कैकेयीचे महालांत ! 'आई तुझ्या म्हणण्याप्रमाणेंच मी वागेन' राम बोलले. दशरथ विनवू लागले 'रामा तू जाऊ नकोस वनांत, मी प्राण सोडेन तू वनांत गेल्यास.' राम शांतपणे उत्तरला, 'पिताजी मातेच्या इच्छेप्रमाणेच होईल मग तसें वागण्यात तुमचे काही झालें तरी चालेल. 'रघुकुल रीत सदा चली आई प्राण जाय परू वचन न जाई'. 'पण रामा मी नाही वाचूं शकत तूं गेल्यावर. रामा माझा विचार तुला कां येत नाही ?' पिता दशरथ काकुळतीने म्हणाले. पण असें एकूण वाटते कि रामाला आपल्या वृद्ध पित्यापेक्षा त्याच्या लाडक्या पत्निचीच जास्त चिन्ता होती. 'आई मी जातो वनांत चौदा वर्षाकरतां. तुझें कल्याण होवो !' सीतेला गोष्ट कळली. सीता धावत आली आणि पाठोपाठ लक्ष्मण भ्राता सुद्धां ! रामाविना सीता आणि लक्ष्मण कसें राहणार राजपाटावर लोळत ? रामासह दोघेही वनांत जाण्यास निघाले. 'रामा चाललास कारे तूं मला मरणोन्मुख अवस्थेंत सोडून ?' दशरथ आर्त स्वराने रडलें. पण रामाला पित्याची दया नाही. मातेच्या इच्छेचीच बूज रामाला राखायची होती.

जायला निघाले तिघे वनांत !

'पण थांबा', कैकेयी गरजते, 'वनांत जातांना हे राजवस्त्र घालून जाणार काय ? वनांत तापसी म्हणून राहायचे आणि हे टेरिलिन टेरि-कॉटचे सूट वापरायचे काय ? आणि काय ग सीते ? वनांत असल्या वूली वूली, नॉयलॉन आणि सिल्कच्या साड्या वापरायच्या काय ? अंगांत आलं आहे मेलीच्या ! काढ त्या साड्या अंगावरून आणि घाला ती वल्कलें आपल्या आंगड्यावर !!' बिचारी सीता, बिचारा लक्ष्मण आणि राम !

वल्कले घालतांना दशरथाचे डोळ्यांत पाणी आले. ते तळतळाटून उद्गारले; 'सटवे, माझ्या रामाला वल्कले नेसून पाठवणार कां तूं वनाला ? रामा काय हा दिवस तुझ्यावर !' 'रामा आपल्या चवचाल बापाला तूं समजव !' कैकेयी उद्गारली. रामाने उलट बापालाच समजाविले आणि राम सीता लक्ष्मण वनांत जायला निघाले. एका कवीने रामाच्या वनवासांत जाण्याच्या प्रसंगाचे सुन्दर वर्णन केले आहे.

सुजन हो परिसा राम कथा । जानकी जीवन विरह व्यथा ।।
चन्द्रास लागले खळें उजळले गगन ।
ती सुखद शरच्चन्द्रिका शोभवी भुवन ।
प्रिय तातवचन मानुनि
जासी काननी सुखें रघुराया ।
ये तुझ्या मागुनि तुझी जानकी छाया ।।

सारी अयोध्या हळहळली, पण कैकेयीच्या डोळ्याला एक टिपूस नाही. दशरथाचे डोळेच आटले होते रडून रडून ! आतां त्या डोळ्यांतून प्राण ओसंडत होते रामाला जातांना पाहून. आतां थोडाच काळ शिल्लक राहिला होता दशरथाचा. 'रामा !......रामा !......रा....म !'

किति करुणरसाने ओथंबलेली कथा हो ! काय उच्च आदर्श जीवनाचा ? केवळ रामाच्याच कि आपल्याही ?' आपल्या जीवनांत जर असला उच्च आदर्श आणायचा असेल तर रामाप्रमाणें प्रत्यक्ष वनांत जाण्याची आवश्यकता नाही आणि समर्थ रामदास स्वामीप्रमाणे मुद्दाम लग्न जुळवून ऐन लग्नाचे वेळीं लग्न मंडपातून पळून जाण्याची आवश्यकता नाही. आवश्यकता आहे त्या कथेंतील रामरहस्य जाणण्याची ! काय या नितान्त सुन्दर कथेंत आणखी कांही रामरहस्य आहे ? होय आहे, आणि तेच खरें रहस्य आणि आदर्श सर्व जगाला तारील आणि नराचा नारायण बनवील !

## कथारहस्य

कथा इतकी सुरेख वठली आहे कि त्यांतील योगरहस्य सांगून कथेंतील रसभंग करण्याची इच्छा होत नाही. पण रामच म्हणतात

लक्ष्मणाला, 'लक्ष्मणा, भावनेपेक्षां कर्तव्य श्रेष्ठ आहे; भावनेपेक्षां कर्तव्य श्रेष्ठ आहे.' तेव्हा रामाच्याच पावलावर पाऊल टाकून या अद्वितीय आणि रससागर कथेंतील रामरहस्य पाहणें क्रमप्राप्त आहे.

नेहमीप्रमाणें रामायणकारांनी कथेंत योजलेल्या शब्दांचे योगरहस्य पाहूं. राम या शब्दाचे योग रहस्य आम्हाला माहीत झाले आहे तद्वत सीता स्वयंवराचे वेळीं सीता म्हणजे साधकाची कायावृत्ति हें आम्ही पाहिलेच आहे. दशेन्द्रियाचा नियन्त्रक म्हणजे दशरथ हेंही आम्ही पाहिले आहे. आतां लक्ष्मण, कैकेयी आणि मन्थरा या शब्दांतील रहस्य जाणायचे आहे. 'लक्षं' म्हणजे ध्येय आणि 'अन्' म्हणजे स्पन्दन करणें, प्रयत्न करणें; एकूण ध्येयाकरता ध्येयानुरुप जीवनयापन करणें म्हणजेच लक्ष्मण होय. लक्ष्मण चौदा वर्षे मुळींच झोंपला नाही. विवेकाशिवाय असें जागृत जीवन असंभव आहे. साधकांचे जीवनांत विवेक झोंपला असल्यास सर्व वाया जाईल. रामाचे चौदा वर्षे वनांत जाणें म्हणजे साधकाने राजपाट आणि शहरी जीवनाचा त्याग करून वैराग्याने वानप्रस्थाश्रम करावा यासाठींच माता कैकेयी रामाला वनांत पाठविते. आणि वनांत शहरांसारखें भोगपूर्ण जीवन जगण्याने साधना साध्य होईल काय ? वनांत तपस्या करतांना वनाप्रमाणें तापसी जीवनच जगावे लागेल. म्हणूनच माता कैकेयी राम लक्ष्मण आणि सीतेचे राजवस्त्र हिरावून त्यांना तपस्याला शोभेशी वल्कलें घालायला लावते. मग रामाची खरी कनवाळू माता कैकेयी कि कौसल्या ?

तापसी राम वनांत तपस्या करण्याकरता जाताना त्याची कायावृत्ति सीता त्याजबरोबर असणें आवश्यक नाही काय ? म्हणून कायावृत्ति सीता रामासह वनात जाण्यास निघते. साधकाला संयम आणि विवेक नसल्यास साधना कशी फलद्रूप होणार ? म्हणून भ्राता लक्ष्मण म्हणजे विवेक रामासह वनांत जातो. तापसी राम, वृत्ती सीता आणि वैराग्य संयम म्हणजे लक्ष्मण वनांत जायला निघतात आणि कैकेयी कोण ? तर साधकांतील विदेही म्हणजे देहावरील आसक्ति नसलेली विरक्तवृत्ति ! कैकेयी शब्दच्च सांगतो ही विरक्ति ! कं म्हणजे अनासक्त आणि काया म्हणजे शरीर कै + काया मिळून स्त्रिलिंगी शब्द कैकेयी असा बनतो. ज्या साधकाची वृत्ति देहभावरहित असेल असाच साधक साधना करू शकेल.

आणि रामरुप आत्मानन्द भोगू शकेल तुकाराम महाराज असल्या कैकेयीचे वर्णन आपल्या अभंग वाणीने करतात, 'देहभाव हारपला । तुज पाहता विठ्ठला ॥' म्हणूनच कैकेयी रामासारख्या सात्विक सुखाला लालचावलेल्या अपूर्ण साधकाला राजसवृत्तीरुप राज्याचा त्याग करून अधिक तपस्या करण्याकरता वनांत पाठविते

आणि अयोध्येच्या राज्यावर आपला पुत्र भरत याला वरानुसार बसविते. कैकेयी म्हणजे देहभावातील वैराग्यशील वृत्ति. मग वैराग्यपूर्ण जीवन असल्यावर साधकाला खरें ज्ञान प्राप्त होणार कीं नाही? **भरत म्हणजे ज्ञान.** 'भा' म्हणजे प्रकाश आणि 'रत' म्हणजे त्या प्रकाशांत रत होणारी साधकवृत्ति होय. प्रकाशाला ज्ञानच म्हणतात म्हणून प्रकाशांत रत होणाऱ्या भारत वा भरताला ज्ञानवृत्ति म्हणायचे नाही काय? वैराग्याविना ज्ञान कसें प्राप्त होणार? म्हणून अशा वैराग्यपूर्ण भरताला कैकेयी अयोध्येच्या सिंहासनावर बसविते. भरताचे जीवन पूर्ण वैराग्यपूर्ण दाखविले आहे. तो राज्याचा पालक होता, राजा नव्हता. तो रामाच्या पादुका सिंहासनावर ठेवून वल्कले घालून एखाद्या तापस्याप्रमाणें वैराग्यपूर्ण जीवन जगला. जंगलांत गेल्यानेच वैराग्य प्राप्त होते असें नसून शहरांत राहून पण वैराग्यशील वृत्तीने राहिल्यास साधक वैराग्य आणि ज्ञान प्राप्त करूं शकतो हें दाखविण्याकरतांच रामायणकारानें भरताचे पात्र उत्पन्न केले आहे. राम वनवासांतून परत आल्यावर भरत एखाद्या विरक्त वैराग्याप्रमाणें रामाचे वृत्तिराज्य रामाला परत करतो यांतच भरताचे श्रेष्ठत्व आहे. **साधना दृष्टीनें भरतच रामापेक्षां श्रेष्ठ आहे!**

रामाची खरी कनवाळू माता कैकेयीच! कैकेयी नसती तर रामच उत्पन्न होऊ शकले नसते. कैकेयीला आम्ही विनाकारण शिव्या देतो. पण कैकेयीचे रामजीवनांतील कार्य सर्वांत महत्वाचे आहे. **न होती कैकेयी तर न होते राम!**

## गुह आणि गंगा

सुमन्त्रा ने राम सीता लक्ष्मणाला रथावर घालून दक्षिण दिशेला गंगेपर्यंत पोंचविले. सारी अयोध्या प्रजा रथामागें धांवली पण रामाने

सर्वांना समजवून परत पाठविले. अश्रुपूर्ण नयनाने सुमन्तूनें रामाचा निरोप घेतला आणि तो अयोध्येला परतला. परन्तु कथारहस्यानुसार सुमन्त्रानें रामाकरता रडायला नको होते कारण सु ज्याचा मन्त्र आहे असा जो तो सुमन्त्र होय. मग रामरुप साधकाला तपस्या करण्याकरता ज्ञान गंगेवर पोंचवितांना सुमन्त्राला रडायला नको होते. तपस्या करण्याकरता वनांत जायचे हें ठरल्यानन्तर मग वनांत जातांना आणि ज्ञानगंगा पार करतांना रडायचे कशाला ? म्हणून सुमन्त्राचे रडणें कथा प्रसंगाला जरी शोभेसे असले तरी तपस्वी जीवनाच्या सुमन्त्राला शोभेसे नव्हते. असा सुमन्त्र रामाला सीतेसह वर्तमान गंगेवर पोंचवितो आणि परत आपल्या वृत्तीरूप अयोध्येत येतो.

## रामायणकार महाराष्ट्रीय होते काय ?

एक आणखी कल्पना सुचते त्याचा विद्वानांनी विचार करावा. रामायणांतील बरेंच से शब्द उ कारान्त आहेत जसें, इक्ष्वाकु इत्यादि. प्राचीन मराठींत सुद्धां शब्द उकारान्त लिहिण्याची सवंय दिसते जसें विठ्ठलु, वाटु, कान्हु इत्यादि. अशी उकारान्त शब्दाची योजना उत्तर भारतात नाही. दक्षिणेंत अशी उकारान्त शब्दयोजना बरीच दिसते. रामायणांत दशरथ राजाच्या राज्यविस्तार आणि कार्यभाराचा उल्लेख करतांना रामायणकार चक्क महाराष्ट्र शब्दाचा उल्लेख करतात जसें, 'तां तु राजा दशरथो महाराष्ट्र विवर्धन: । पुरीमावासायामास दिवि देवपति-र्यथा ।। ९, बालकाण्ड, सर्ग ५ ।। महाराष्ट्र शब्द वेदांत कोठेंच नाही. त्यामुळें रामायणकाल वेदकालानन्तरचा असावा. नाही म्हणायला रामायण महाभारतांत विदर्भाचा उल्लेख आहे पण त्या विदर्भाचा योगार्थ भिन्न आहे दण्डकारण्यांतच विदर्भ असल्यामुळें असल्या दण्डकारण्यांत जाण्या-करतां रामानें कां भ्यावे हें ऐतिहासिकदृष्टया समजत नाही. नाही म्हणायला त्याच विदर्भात जाऊन विदर्भ राजकन्या लोपामुद्रेशी लग्न करून अगस्ति ऋषी मोठ्या धैर्याने दण्डकारण्याचे भागांत राहात असत. अनेक ऋषीमुनी सुद्धां त्या दण्डकारण्यांत तपस्येकरता राहत असत. मग अयोध्यावासियांनी आणि रामाने त्या दण्डकारण्यांला कां भ्यावे ? यावरून

दण्डकारण्याचा आणि तेथील राक्षसांचा अर्थ आपल्याला वाटतो त्यापेक्षा भिन्नच असला पाहिजे हें उघड आहे.

## गुह

गंगा म्हणजे ज्ञान गंगा हे आपण पाहिले. आतां हा गुह कोण ? संध्यावन्दन करतांना एक श्लोक आपण म्हणतो,

अन्तःश्चरति भूतेषु गुहायां विश्वतोमुखः ।
त्वं यज्ञं बषट्कारस्त्वं विष्णुः पुरुषः परः ॥

म्हणजे साधना क्षेत्रांतील पलीकडील विश्वाचे जे मुख असेल त्या मुखाचे द्वार वा गुहा म्हणजे रामाला गंगापार करणारा गुह होय. गुह म्हणजे खोल विवर. परा अवस्थेंतील खोल अवस्थेत जी अवस्था वृत्ती घेऊन साधक जातो त्यालाच रामायणकार गुह म्हणतात. हा गुह ज्ञान गंगा पार करून रामाला दण्डकारण्याचे तोंडाशी घेऊन जातो. परन्तु त्या अगोदर रामाला चित्रकूट पर्वत प्रदेशांत रहावे लागते. याच चित्रकूटावर बसून म्हणे तुलसीदासजींनीं आपले रामायण लिहले आहे. पण रामायणांतील हा चित्रकूट आमच्या विद्वानांना अजून कूटच आहे.

## चित्रकूट

चित्रकूट के घाटपर भई सन्तन की भीड् ।
तुलसिदास चन्दन घिसे तिलक लगाय रघुवीर ॥

परंतु रामायणकाराने वर्णन केलेले चित्रकूट योगसाधकाशिवाय कोणालाच दिसणार नाही. साधना केल्यानन्तर साधकाला एका अवस्थेंत निरनिराळी चित्ररूप दर्शनें होतात. नाना रुपें, नाना देवता आणि नाना सिद्धाकृति साधकाच्या दिव्य चक्षू समोर येतात आणि जातात. त्या चित्रांचा अर्थ साधारण साधकाला कळत नाही. ती चित्रदर्शनें साधारण साधकाला कूट म्हणजे न समजणारी असतात. असल्या वेळेस साधकाला योग्य सद्‌गुरुची आवश्यकता असते. असा सदगुरुच साधकाला त्या दर्शनांची रहस्यें म्हणजे कूट उलगडून सांगतो. तोपर्यन्त साधक असल्या अनिर्णित चित्रकूट अवस्थेंत असतो. साधकाची असली अनिर्णित अवस्था म्हणजेच रामायणांतील

चित्रकूट होय. आजचे चित्रकूट रामायणातील चित्रकूटाची उसनवारी आणि समाधान होय. गुरुशिवाय चित्रकूट घाट पार करणें कठीण आहे. एक कवि म्हणतात,

गुरूबिन कौन बताये वाट । बड़ा बिकट यमघाट ।।

## दण्डकारण्यांत प्रवेश

एका वराने भरताने अयोध्येच्या राज्यावर बसावे आणि दुसऱ्या वराने रामाने चौदा वर्षे दण्डकारण्यांत तापसीप्रमाणें वल्कले नेसून रहावे असे कैकेयीचे मागणें होते. साधा जरी विचार केला तरी ज्याला राज्याबाहेर घालवायचे त्याने वनांत जावे कि मसणांत जावे याचा विचार घालविणाऱ्याने करावयाचे काय कारण ? परन्तु कैकेयीचे नियन्त्रण मोठेंच जोरदार ! तिनें रामाने अरण्यांत जावे असे तर फर्मावलेच पण पुन्हा त्याने दण्डकारण्यातच जावे असा दण्डक घातला. आणि अवधि होता चौदा वर्षे ! रामायणांत हा चौदा वर्षाचा अवधि चौदा म्हणून लिहिला नसून नव पंचम वर्षे असा लिहिला आहे. अयोध्याकाण्डांतील, सर्ग १२ आणि श्लोक २७ वा पहा. कैकेयी रामाला चौदा वर्षे वनांत जायला सांगते ते खालील श्लोकानुसार,

नव पञ्चम वर्षाणि दण्डकारण्यमाश्रितम् ।
चिराजिन धरो धीरो रामोभवतु तापसः ।।

आशय असा कि रामाने धीर धरून आणि वल्कले नेसून एखाद्या तापसीप्रमाणें नव पञ्चम वर्षे दण्डकारण्यात रहावे. वाल्मिकिप्रमाणे वाटमार करणाऱ्या डाकूप्रमाणे राहावे कि रामाने एखाद्या तापस्याप्रमाणें राहावे असली नियंत्रणे घालणारी रामाचे अनहित करणारी कैकेयी कोण लागली ? शिवाय वनांत असतांना म्हणे रामाने शोक करूं नये तर एखाद्या धीर पुरुषाप्रमाणें तपस्याप्रमाणे रहावे हे आणखी तिचे वर सांगणे. अशा तऱ्हेने रामाला सांगणारी कैकेयी रामाच्या आध्यात्मिक जीवनाचा कैवार घेणारी असणेंच आवश्यक आहे आणि तोच अर्थ रामायणकाराला अभिप्रेत आहे. म्हणून रामाने नव पञ्चम योगाने एखाद्या तापस्याप्रमाणे धीरगंभीर वृत्तीने दण्डकारण्यांत राहावे असा जिव्हाळ्याचा आदेश आपल्या प्रिय रामाला कैकेयी देते. आणि रामही कैकेयीच्या म्हणण्याप्रमाणे अगदी तंतोतंत वागतात. धन्य राम आणि धन्य त्यांची कैवारी कैकेयी !

## नवपञ्चम योग

ज्योतिषशास्त्रांत नवपञ्चम योग फार शुभदायक मानला आहे. नवपञ्चम योगांतील ग्रह परस्परपूरक आणि शुभकल्याणकारक असतात म्हणजे रामानें वनवासांत नवपञ्चम वर्षे एखाद्या धीरोदात्त तापस्याप्रमाणें राहावे यांतून कैकेयीला रामाचे आध्यात्मिक कल्याण करण्याचा किती कळवळा होता हे दिसून येते. धनमानाची इच्छा धरणारे लोक असल्या नवपञ्चम योगातून मानदंभधनाची अपेक्षा करतील परंतु ज्याचा जीवनाचा दृष्टिकोण केवळ आध्यात्मिक आहे अशा विरक्तिवृत्तिरुप कैकेयीने तिच्या लाडक्या रामाचा आध्यात्मिक नवपञ्चम योग इच्छू नये काय? म्हणून या आध्यात्मिक नवपञ्चम योगांत म्हणजे नऊ आणि पांच मिळून चौदा वर्षे रामाने दण्डकारण्यांत एखाद्या धीरोदात्त तपस्वीप्रमाणे रहावे असे फर्मान कैकेयी काढते. मग बोला कैकेयी रामाची कनवाळू माता कि चांडाळीण सापत्न माता ?

असल्या मंगलदायक नवपञ्चम योगांत रामाचे दण्डकारण्यातील वास्तव्य यानंतर सुरूं होते हे लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. दण्डकारण्यांत धीरगंभीर तपस्व्याप्रमाणे राहणे हा रामाच्या जीवनांतील नवपञ्चम योग होय, हे रामायणकाराला कैकेयीच्या आदेशांतून सुचवायचे आहे.

## दण्डकारण्यांत प्रवेश

ज्या स्थानीं चित्तांत युद्ध म्हणजे द्वंद्व नाही अशा अयोध्येचा त्याग करून आणि संसार गंगा पार करून राम दण्डकारण्यांत प्रवेश करते झाले. रामासह पत्नि सीता आणि भ्राता लक्ष्मण सुद्धा कां गेलेत याचे कारण आपण पाहिलेच आहे. एकदां पुन्हा पहायचे म्हणजे वनांत तपस्या करण्यां-करता साधकासह साधकाची कायावृत्ति असणे आवश्यक आहे. म्हणून सीता रामासह जाण्यास आग्रह धरते. 'स्वामी मीही येणार तुमच्यासह दण्डकारण्यांत !' सीता म्हणते. 'अग, पण त्या अरण्यांत अनेक श्वापदे, कांटेगोटे पायाला लागतात, खाण्यापिण्याला नाही, घरदार नाही आणि शिवाय ज्या शहरी जीवनाला आम्ही आता सोकावलो आहोत तें शहरी जीवनही नाही. ते कीर्र जंगल, ती हिंस्त्र श्वापदें ! सीते तूं नको येऊस

माझ्यासह दण्डकारण्यांत !' राम समजावीत होते. पण सीता ऐकेना. ती म्हणाली, 'स्वामी आतापर्यंन्त पुष्कळ तुमचे ऐकले. ऐकता ऐकता ही परिस्थिति आली. राज्य गेले, सुख गले आता आला वनवास. आतां वनवासांतही तुमचेसह राहणारच !' सीतेचा निर्धार सीतेला रामासह नेण्यास कारणीभूत झाला.

राम सीता जायला लागले तो पाठीमागें लक्ष्मण धनुष्यबाण घेऊन उभाच, 'लक्ष्मणा तूं कशाला येतोस दण्डकारण्यांत?' 'रामा, जेथे राम तेथे लक्ष्मण राहीलच हे पक्के समजा. वहिणी येतात बरोबर. वनांतील अडचणी, श्वापदे, राक्षस अनेक आपत्ती आहेत. त्यांना तोंड देता देता तुम्हाला बराच त्रास होईल. मला येऊ द्या तुमचेसह. रामा मी तुमचेसह येणार !' लक्ष्मणरुप विवेकाचा दृढ निश्चय पाहून रामाला लक्ष्मणाला बरोबर घ्यावेच लागले. तुलसीदासजी वर्णन करतात.

वन चले राम रघुराई । संग लक्ष्मण सीता माई ।।

राम दण्डकारण्यांत 'जाण्यापूर्वी आपल्याला दण्डकारण्याची माहिती होणे आवश्यक आहे. कथा अशी. इक्ष्वाकु राजाचा शंभरावा पुत्र दण्डक. नावाप्रमाणेंच तो उद्दण्ड होता. त्याचा त्रास सहन न होऊन इक्ष्वाकुनें त्याला दक्षिणेकडील घोर अरण्यांत निष्काषित केले. तेथे तो वसती करू लागल्यामुळें त्या अरण्याला दण्डकारण्य असे नांव पडले. पण तेथेही गेल्यावर दण्डकाचे वागणें संभावितासारखें नव्हते. तेथे वस्तीला गेलेल्या ऋषी मुनींना त्यानें त्रास देणें सुरूं केले. त्याच्या त्रासाने बरेच ऋषीं मुनी कंटाळून दण्डकारण्य सोडून चालते झाले. यावरून दण्डकारण्यांत एकेकाळी चांगल्या लोकांची चांगलीच वस्ती होती असें दिसून येते. तरीपण दण्ड-काच्या उद्दंडपणाला न जुमानता कांही ऋषि तेथे राहायचेच तपस्या करण्याकरता !

असेच एक शुक्राचार्य ऋषि दण्डकारण्यांत राहात असत. त्यांची मुलगी अरजा फार सुरेख होती. एके दिवशी संधी साधून दण्डकानें अरजाचा विनयभंग केला. शुक्राचार्यांना हे कळले आणि त्यांनी दण्डकाला शाप दिला कि त्याचे राज्यांत इत:पर भयानक भूकंप आणि विस्फोट होऊन त्याचे राज्य विदीर्ण होईल आणि त्याचे राज्यांत राक्षस धुमाकुळ घालतील.

आणि तसेच घडले. दण्डकारण्यांतील सतत होणारे भूकंप आणि स्फोट पाहून दण्डकारण्यांतून बरेंचसे ऋषि मुनी बाहेर झाले. आता राक्षसासह वर्तमान त्या दण्डकारण्यांत दण्डक स्वैरपणे राहू लागला. पण तेवढ्याही विकराल परिस्थितींत अत्रि, अगस्तिसारखे खंबीर ऋषी स्त्रीसह वर्तमान तेथे राहातच असत. त्या दण्डकारण्याचे अगदी नाभिस्थानी विदर्भ नांवाचे एक सुसंस्कृत आणि सुसंपन्न राज्य सुखाने नांदत होते. असल्या त्या दण्डकाचा उद्दण्डपणा नाहीसा करण्याकरतांच कैकेयीने रामाला तपस्या-करण्याकरतां धीर पुरुषाप्रमाणें जाण्यास आदेश दिला.

## योगरहस्य

दण्डकाचे योग रहस्य कळल्यास त्यांतील विस्फोट आणि राक्षसांचे खरें ज्ञान आपल्याला होऊं शकेल. आपल्या शरीरांत मेरूदण्ड (spinal chord) असतो, ज्याला आपण पाठीचे मणके म्हणतो. या मेरूदण्डांतच शरीरांतील सर्व मज्जातंतूचे जाळे केन्द्रित झालेले असते. त्या मज्जातंतूंच्या पोकळींत योगाची सप्त चक्रें असतात. त्या सप्त चक्रांची योग्य साधना केल्याशिवाय साधक योग्य साधक बनून आध्यात्मांत प्रगती करुं शकत नाही. मेरुदण्डांतील सप्तचक्रांची साधना करतांना साधकाचे सर्वांगाला झटके बसत असतात. त्यामुळे बरेंचसे साधक मधेंच साधना सोडून देतात. दण्डक म्हणजे मेरुदण्ड व दण्डकारण्य म्हणजे मेरुदण्डातील तंतूजाल होय. अरजा बलात्कार म्हणजे असाधकाच्या साधनाहीन शरीरावर साधना करून आक्रमण करणें होय. न रजलेली काया म्हणजे साधना न केल्या गेलेली अरजा होय. अरजेवर बलात्कार केल्यामुळें दण्डकारण्यांत विस्फोट होतील असा अरजेचा पिता शुक्राचार्य यांनी शाप दिला होता. म्हणजे साधना केल्यामुळें साधकाला सर्वांगात जे झटके बसतात तेंच हें वर्णन होय.

साधना केल्यामुळें झटके बसणें, आपल्याच अनेक वृत्तीरूप राक्षसांनी आपल्या ऋषितुल्य सद्वृत्तींवर आक्रमण करणे इत्यादि कष्टतर अवस्थांचा अनुभव घेऊन बरेंच साधक आपल्या साधना मध्येंच सोडतात, हेंच ऋषी मुनींचे दण्डकारण्य सोडून बाहेर जाणें होय. मोठमोठे साधक त्या दण्डकारण्यांतील कठीण साधना सोडून तापसी जीवनाचा त्याग करतात त्या साधकांना न भीता

असल्या उद्दंड दण्डकारण्यांतच आपले बस्तान जमविण्याचे राम ठरवितात. रामाचे दण्डकारण्यांत जाणें असें आहे. रामायणांतील असले दण्डकारण्य दक्षिणेंतील दख्खनचे पठार किंवा तत्सम भूमी नसून साधक देहांतील मेरुदण्ड होय. राम याच दण्डकारण्यांत आपल्या मेरु साधनेकरता गेलेत.

## रामभरत भेट

आपल्या आजोळावरून परत आल्यावर भरताला आपल्या कैकेयी मातेचा प्रताप कळला. राम वनवासांत गेले आणि पिता दशरथ राम विरहामुळे मरण पावले. तो आपल्या कैकेयी मातेवर कडाडला. पण त्याचे कडाडणें व्यर्थ होते. त्याला रामायणाचा खरा अर्थ कळलाच नव्हता. तपस्या करण्याकरता नवपंचम योगावर कैकेयीनें रामाला मुद्दामच उद्दण्ड दण्डकावर नियंत्रण आणण्याकरता दण्डकारण्यांत पाठविले त्यांतील कैकेयीचा रामाबद्दलचा आध्यात्मिक कैवार भरताला कळलाच नव्हता. अहो पण रामविरहामुळें पिता दशरथ मरण पावले ना? त्याला कैकेयी काय करणार? उलट दशरथ म्हणजें साधकांतील दशेन्द्रिय भाव नष्ट झाल्याशिवाय म्हणजे मेल्याशिवाय साधक राम वनांत जाऊन सुखेनैव तपस्या कशी करणार? दण्डकारण्यांत जाण्यापूर्वी दशरथ मरण पावलाच पाहिजे. पुन: सांगायचे म्हटल्यास साधकांतील दशेन्द्रियपरायणता मेल्याशिवाय साधक राम साधना करण्यास दण्डकारण्यांत कसा जाणार? आध्यात्मिक साधना करण्याकरता म्हणजे राम बनण्याकरता साधकांतील दशेन्द्रिय भाव म्हणजे दशरथ मरणें आवश्यक आहे.

परन्तु कसेही असो आनंदात्मा रामाची भेट त्या दण्डकारण्यांत जाऊन घ्यायची असें भरताने ठरविलेच. वृत्तीरुप शत्रुंचे प्राण घेणाऱ्या शत्रूघ्नाला घेऊन वैराग्यरुप भरत मेरुदण्डांतील कठीण साधना करण्यास आवश्यक असलेले वैराग्य देण्याकरता रामभेटीकरता नन्दीग्राम गांवी दण्डकारण्यात गेला. आनन्दांतील आ वगळल्यास नन्द शब्द राहतो. याच नन्दाघरीं भगवान गोपालकृष्ण लहानाचे मोठे झाले. याच नन्दीग्रामीं भरत रामाला भेटायला जातो. अन् म्हणजे स्पन्दन करणे आणि नन्द म्हणजे सुखकारक स्पन्दन, सुखकारक जीवन!

भरताचे ससैन्य येणें पाहून लक्ष्मण बराच संतापला होता आणि आम्हाला आतां या अरण्यांतूनही हुसकावून लावण्यास हा दुष्ट भरत सैन्यासह आला आहे असें जरी म्हणाला तरी भरत त्यांच्या कल्याणाकरतांच दण्डकाण्यांत येत आहे. हे रामाला माहीत होते. रामाने लक्ष्मणाला समजाविले. आणि सांगितले कि वैराग्यवृत्तीविना राम (आत्मानन्द) कसा प्राप्त होणार आणि लक्ष्मण (विवेक) तरी कसा जगणार?

राम आणि भरत कडकडून भेटले आणि रामाचे समजावण्यावरून रामाचे राज्य वैराग्यप्रतिपालक म्हणून संभाळण्याचे भरताने कबूल केले. भरताचे सर्व आयुष्यच पूर्ण वैराग्यपूर्ण आहे. **या दृष्टीनें रामचरित्रापेक्षा लक्ष्मणचरित्र श्रेष्ठ आहे आणि विवेकरूप लक्ष्मणापेक्षा वैराग्यपूर्ण भरतचरित्र श्रेष्ठ आहे. आणि सर्वात श्रेष्ठ आहे भरतमाता कैकेयी!** कैकेयी नसती तर राम राज्यावर बसून एखाद्या साधारण माणसासारखा सुख आरामांत लोळत पडला असता आणि असाधक म्हणून केव्हांच न कळता मेला असता. मग रामायण ग्रंथ जगांत अजरामर झाला असता काय? रामायणांतील महत्वाचे पात्र कैकेयीच आहे. अशा कैकेयी ज्या देशांत अधिकाधिक उत्पन्न होतील तो देश धन्य होय. आणि ज्या कैकेयीला रामाला वनवासांत धाडण्याकरता जिने प्रवृत्त केले ती कैकेयीची दासी मन्थरा तर सर्वात श्रेष्ठ आणि जागृत आहे. आपल्या चित्तांतील सर्व भावना आणि वृत्तींचे पूर्ण मन्थन करून जी वृत्ती त्यांतील साधना सुयोग्य नवनीत साधकाला देऊन त्याचे जीवन स्निग्ध आणि पुष्ट करते त्या मन्थरेचा मोठेपणा काय वर्णावा? म्हणून रामायणाचे सर्व जीवनचक्र मन्थरा आसावर फिरते असें म्हटल्यास वावगें होणार नाही.

एवंच रामायणाचे बाबतींत सर्वसाधारण रुढ कल्पना आणि आध्यात्मिक साधनाशास्त्र आणि अनुभव यांतील कल्पनांचा उलटच प्रकार दिसतो. वरवरचा भौतिक विचार केल्यास रामायणांत मन्थरा आणि कैकेयी सर्वात वाईट आणि नीच वृत्तीच्या वाटतात पण अध्यात्म वृक्षाची रचना गीतेंत म्हटल्याप्रमाणें 'उर्ध्वमूलम् अधः शाखम्' अशी म्हणावी लागेल.

# पञ्चम अध्याय

## राक्षस संहार आणि पञ्चवटी

भरत भेट होऊन वैराग्य प्राप्त झाल्यावर राम दण्डकारण्यांत पुढें सरकते झाले. दण्डकारण्यांत भेटणारा पहिला राक्षस विराध ! त्यानें राम लक्ष्मणाला कांहीच न करता एकदम सीतेलाच घेऊन तो पळाला. म्हणजे सीतेला घेऊन पळणारा एकटा रावणच नव्हता तर त्या अगोदर विराधही घेऊन पळाला होता. साधकाची कायावृत्ती सीता मानल्यास साधकाच्या वृत्तीचे विराध राक्षस हरण करतो असें म्हणावे लागेल. रामलक्ष्मण धांवले आणि त्यांनी शूलाने विराधाचा वध केला. मरण्यापूर्वी विराधाने रामाला बरीच उपयुक्त माहिती सांगीतली. शापभ्रष्ट तुम्बरू गंधर्व म्हणजेच विराध होता. आतां तो शापांतून मुक्त होऊन स्वर्गांत जाणार होता. मरण्यापूर्वी विराधाने रामाला शरभंग ऋषीच्या आश्रमाची माहिती सांगितली. शरभङ्ग ऋषीचा आश्रम तेथून जवळच म्हणजे अर्धा कोसावर होता. शिव धनुष्यभङ्ग करणाऱ्या रामाची पहिली भेट दण्डकारण्यांतील शरभङ्ग ऋषीशी व्हायला नको काय ?

राधा म्हणजे अनुराग आणि विराध म्हणजे अनुराग नसणें किंवा सोप्या भाषेंत सांगायचे म्हणजे कळकळ नसणें. साधना करतांना साधकाचे चित्तांत आणि त्याद्वारे वृत्तीत साधनेविषयी कळकळ असणें आवश्यक आहे. साधना सुरूं केल्यावर कांही कालानंतर बहुतेक साधकाचे मनांतील कळकळ साधनासातत्य नष्ट व्हायला पाहते असा सर्व उच्च साधकाचा अनुभव आहे. असल्या वृत्तीलाच भगवान पतंजली 'स्त्यान' म्हणतात. असला स्त्यान वा विराध राक्षसी असल्याने सीतावृत्तीला विराध घेऊन पळतों असें सुंदर रुपक रामायणकार देतात. ज्यांना साधनेचा अनुभव असेल अशा साधकांना या कथेतील रहस्य कळेल.

विराध मरण पावला. ते प्रचंड धूड रामलक्ष्मणाने जवळच एक भला मोठा खड्डा खणून पुरले. रामायण महाभारतांत एक गोष्ट लक्षांत

**ठेवण्यासारखी अशी कि ज्या ज्या वेळेस जी जी व्यक्ति मरते, मग ती राक्षस असो कि मानव, देव असो कि दानव, त्या वृत्तीला साधना युद्धांत मोक्ष मिळतो. म्हणजे त्या वृत्तीचा पूर्ण नायनाट होऊन त्या अनावश्यक वृत्तीपासून साधकाची सुटका होते.**

रामलक्ष्मण सीता शरभङ्ग ऋषीचे आश्रमांत जातात आणि तेथे त्यांचे स्वागत होते. शरभङ्ग म्हणजे मेरूदण्डाची कठीण साधना, इतकी कठीण कि ज्यामुळें आपले कंबरडे मोडले असे साधकास वाटावे ! जवळच मन्दाकिनी नदीच्या काठीं **सुतीक्ष्ण ऋषीचा** आश्रम होता. सुतीक्ष्ण अगस्ति ऋषीचा भाऊ होता. साधना केल्यावर साधकाची बुद्धि तीव्र म्हणजे सुतीक्ष्ण होते. आणि असली तीव्र बुद्धि आत्मकृपेविना प्राप्त होत नाही. गीता सांगते,

तेषां सततयुक्तानां भजतां प्रीतिपूर्वकम् ।
ददामि बुद्धियोगं तं येनमामुपयान्ति ते ।।

सुतीक्ष्णाचे आश्रमांत एक दिवस थांबल्यावर राम सीतेसहवर्तमान **अगस्ति ऋषीच्या** आश्रमाकडे निघाले. सुतीक्ष्णाने रामाला अगस्ति आश्रमाची वाट सांगितली होती, आणि रावणाबद्दलची सर्व व्यवस्थित माहिति अगस्तींना माहीत होती. तीन अहोरात्र राम सीता आणि लक्ष्मण अगस्ति आश्रमांत आदर आतिथ्याचा स्वीकार करते झाले. अगस्तीने रामाला पंचवटी स्थानाची व्यवस्थित माहिती देऊन तेथें आपला आश्रम बांधायला सांगितले. अगस्ति आश्रमापासून पंचवटी स्थान केवळ पांच कोसावर होते. अगस्तिची पत्नि लोपामुद्रा ! लोपामुद्रा विदर्भ राजाची कन्या ! म्हणजे अगस्ति ऋषी विदर्भ राज्यांतच राहात असावे असे दिसते कारण आपल्या जावयाला आणि मुलीला कोणता राजा राक्षसांचे ताब्यांतील वनांत राहू देईल ? अगस्ति आश्रमापासून पंचवटी पांच कोसावर होती. आजची पञ्चवटी म्हणजे मानलेले नासिक विदर्भापासून पांच कोसावरच आहे काय ? आमच्या कथित विद्वानांनी आणि इतिहास-कारांनी आपापल्या कथित सिद्धान्त कल्पनांची आमूलाग्र पुनर्रचना करण्याची वेळ आतां आली आहे. तसें न केल्यास एका महान सत्याला ते जनतेपासून बळेंच लपवून ठेवीत आहेत असें म्हणणें भाग आहे.

## अगस्तिचे सागर प्राशन

अगस्ति ऋषी महान पराक्रमी होते. असें सांगतात कि त्यांनी एका आचमनांत सगळा समुद्र पार पिऊन टाकला. विदर्भात राहणारे हे अगस्ति समुद्र प्राशन करायला कोणत्या समुद्रावर गेले असतील? कि विदर्भातच एकें काळीं सागर होता आणि तो एका आचमनांत पिऊन टाकून अगस्तींनी विदर्भ राज्य स्थापन केले? विदर्भाचा अर्थही तसाच आहे. जेथे दर्भ सुद्धां उगवत नाही ते विदर्भ! पण आजची विदर्भाची भूमी तर अतिशय सुपीक आहे. मग हे कोडें सुटावें कसे? प्रथम अगस्तिने कोणत्या सागराचे प्राशन केले ते पाहू या. संसाराला सागराची उपमा देत असतात. 'संसार सागर मायेचा भरला पूर?' असल्या संसार सागराचे मायाजल एका घोटांत म्हणजें आचमनांत पिऊन आपल्या हिशेबांत संसार सागरच जो श्रेष्ठ साधक शिल्लक ठेवीत नाही तो अगस्ति नव्हे काय? 'अ' म्हणजे नाही 'गः' म्हणजे गमन वा संसार गति आणि 'त्य' म्हणजे ती अवस्था! ज्याने संसार गतीलाच नाहिसें केले तो अगस्त्य नव्हे काय? मग असा अगस्त्य संसारसागराला एका आचमनात पिऊन टाकणार नाही काय?

तुकाराम महाराज असल्या अगस्ति अवस्थेचे आपल्या अभंगवाणींद्वारे वर्णन करतात. 'तुका म्हणे न ये परते। तुझ्या दर्शनें मागुतें॥' सन्त मीराबाई तर त्याही पलिकडे जाऊन सांगते, 'भवसागर सब सूख गयो है। फिकर नहीं मुझे तरनन की। मोहे लागी लटक गुरु चरनन की।' अगस्ति ऋषि एकदाच झाले नाही तर संतागणिक दर काळांत झाले आहेत. त्याकडे मात्र आमच्या रामभक्तांचे मुळींच लक्ष नाही.

रावणाबद्दल विशेष माहिती रामाला अगस्तिकडूनच मिळाली, आणि रावणाशी युद्ध करण्याचा प्रसंग आलाच तर त्याचेशी लढण्याकरता अगस्तींनी रामाला शस्त्रें देऊन कांही अस्त्रेंही सांगितलीत. अगस्तीची ही शस्त्रें आणि अस्त्रें कोणती असतील बरें? हिंसाचारी कि साधना सुयोग्य अहिंसाचारी? जडाला चटावलेल्या आमच्या विद्वानांना साधनेंतील अहिंसाचारी शस्त्रें आणि अस्त्रें कशी काय आवडणार? प्रत्यक्ष शस्त्रें खणखणल्याशिवाय आणि लोकांचे मुडदे पाडल्याशिवाय कसें बरें वाटणार असाधक विद्वानांना?

# विदर्भ कन्या लोपामुद्रा

लोपामुद्रा ही विदर्भ राजाची कन्या. विदर्भ राजा क्षत्रीय तर अगस्ति ब्राह्मण. मग हा अन्तरजातीय विवाह त्या प्राचीन काळीं कसा काय झाला ? हा अनुलोम विवाह कि प्रतिलोम ? शास्त्रकारांनी आपले पांडित्य दाखवून शास्त्रवचनांचा कीस काढीत बसावे. प्रथम विदर्भ याचा अर्थ पाहू. दर्भ म्हणजे गवत. मग विदर्भ म्हणजे ज्या भूमींत गवत सुद्धां वाढत नाही अशी रुक्ष भूमी असा विदर्भ शब्दाचा अर्थ निघतो, पण विदर्भ एक अति सुपीक प्रदेश असल्यामुळें विदर्भाचा हा अर्थ येथे लागू पडत नाही. दर्भाचा आणखी एक अर्थ आहे. दर्भ म्हणजे अहंकार ! दर्भ आणि दर्प ही शब्दभावंडे आहेत. म्हणजे ज्या साधकाचे चित्त भूमींत अहंकार नाही त्याला विदर्भ म्हणता येईल. आणि हाच अर्थ रामायणकाराला अभिप्रेत आहे. ज्या साधकाचे चित्तांत अहंकार नाही तोच विदर्भ राजा आणि विदर्भ प्रदेश होय.

विदर्भ राजाची कन्या लोपामुद्रा ! ही फार सुरेख आणि साहसी होती असें सांगतात. आपण आतां लोपामुद्रेचा सरळच साधना अर्थ पाहूं. लोपा + मुद्रा म्हणजेच अगस्तिपत्नि लोपामुद्रा होय. साधना करता करता साधकाचे द्वारें आपणहून अनेक मुद्रा होत असतात. कांही योगसाधकांना असल्या अवस्थेचा अनुभव असेलच. असल्या अवस्थेंत मुद्रा आपण होऊन होत असतात. परन्तु ही अवस्था जरी उच्च असली तरी समाधि अवस्था त्याहून उच्च असल्यामुळें असल्या मुद्रांचा लोप होणें आवश्यक असते. ज्या उच्च अवस्थेंत मुद्रांचा पूर्णपणे लोप होत असतो असल्या उच्च समाधि अवस्थेला रामायणकार लोपामुद्रा म्हणतात. समाधि अवस्थेंतील साधक मुद्रा तर करीत नाहींच पण हालत सुद्धां नाही. साधकाची अशी उच्च अवस्था साधकांतील अहंकार म्हणजे ताठरपणा (दर्भ) नाहींसा झाल्याशिवाय(वि) येईल काय? म्हणून लोपामुद्रा विदर्भाची राजकन्या दाखविली आहे. चित्ताची ही उच्च अवस्था एक राज्य मानल्यास ह्या राज्याचा चालक राजा व्हायला नको काय? म्हणून विदर्भ भूमीचा राजा विदर्भ आहे त्याची पुत्री लोपामुद्रा आणि जामात संसार सागर पिणारा अगस्ति !

## पञ्चवटींत गमन

अगस्ति ऋषीकडून रावणाबद्दल सारी माहिती घेतल्यावर राम पंचवटींत राहायला आले. आपण पाहिलेच कि ही पञ्चवटी नासिक किंवा अन्यत्र नसून साधकाचे चित्तांतच आहे. मग ही पञ्चवटी म्हणजे काय? या पञ्चवटोशी आणि द्रौपदोच्या पंचपतीशी बराच संबंध आहे. वट म्हणजे प्राणछाया. पञ्च प्राणांच्या छायेंत आपले शरीर आणि जीवात्मा जगत असतो. साधकासह त्याचा विवेक असतोच म्हणून पंञ्चवटींत राम सीता आणि लक्ष्मण राहायला लागतात. पञ्चप्राणरुप कुटींत राम सीता लक्ष्मण राहतात तर पञ्चप्राणरुप पांडवांच्या आश्रयाला त्यांची द्रौपदी वृत्ति पत्नि राहते. महाभारत ग्रंथांत या द्रौपदीचा आपण विचार करू. साधनाक्षेत्रांत पञ्चप्राणांची एक कठीण साधना असते. त्याला कोणी पञ्चाग्नि साधना म्हणतात. परन्तु आजकाल चुकीच्या कल्पनेने पांच स्थानीं अग्नि पेटवून जो कडक साधना करतात ती पंचाग्नि साधना नव्हे. पञ्च प्राणांचा प्राणायाम म्हणजे पञ्चाग्नि साधना किंवा पञ्चवटींत राहणें होय. अशी ऊग्र साधना रामानें पञ्चवटींत सुरूं केली.

साधना किंवा तपस्या म्हटली कि अप्सरा तेथें साधकाचे मन वळवायला धांवून आल्याच समजा! परन्तु रामाकडे येणारी अप्सरा नसली तरी एक सुन्दर ब्राह्मणकन्यका होती. तिचे नांव शूर्पनखा. शूर्पनखा ही रावणाची बहीण. शूर्पनखा तशी विवाहित होती पण तिचा नवरा विद्युत्‌जिव्हाचा रावणानेच वध केल्यामुळें ती शूर्पनखा इकडे तिकडे न भटकता आपल्या बन्धुराजासह म्हणजे रावणासह व्यवस्थित राहात असे. हिच्या नवऱ्याचे नांव विद्युत्‌जिव्ह कां? तर हा विजेप्रमाणें अगदीं स्पष्ट म्हणजे अगदी काड् काड बोलत असे. स्पष्ट वक्ता माणूस तर कोणालाच प्रिय नसतो. आणि त्यातल्या त्यात रावणासारख्या आत्मप्रौढ साधकाला विद्युत्‌जिव्हाचे असें स्पष्ट बोलणें कसें आवडेल? म्हणून रावणाने एका फटक्यांत आपला जामात असूनही स्पष्ट वक्त्या विद्युतजिव्हाचा वध केला.

विद्युत्‌जिव्हाचा वध ही ऐतिहासिक घटना नसून साधना क्षेत्रांतील नित्य अनुभवाला येणारी सत्य स्थिति आहे. अहंकारी आणि आक्रमक

म्हणजे राक्षसी वृत्तीचे लोक (रावण) त्यांना त्यांचे दोष स्पष्टपणें सांगणाऱ्या व्यक्तिंना किंवा स्वतःतील सदसद्विवेक वृत्तीलाच नष्ट करण्याचा प्रयत्न करतात. रावणानें विद्युत्जिव्हाचा या साधना अर्थानें वध केला

## शूर्पणखावर अत्याचार

ताटका प्रकरणानन्तर महिलावर अत्याचार करण्याबाबत जो दूसरा दोष येतो तो रावणभगिनि शूर्पनखेबाबत ! शूर्पनखा रावणाची बहीण आणि विद्युत्जिव्ह याची धर्मपत्नि. शूर्पनखा आणि विद्युत्जिव्ह यांचा म्हणे प्रेमविवाह झाला होता. त्या त्रेतायुगांतील पुण्यवान समाजांत सुद्धां आजकालच्या सारखें प्रेमविवाह प्रकरणें होत होती असें या कथेवरून दिसते. आणि शूर्पनखा एका ब्राह्मणाची मुलगी, म्हणजे विश्रवा ऋषीची पुत्री ! ती म्हणे क्षत्रिय कुलांतील रामलक्ष्मणाशी प्रेमविवाह करण्याकरता आली होती. त्रेतायुगांतील ही गोष्ट जर क्षम्य आहे तर या कथित कलि-युगांत असली सर्ववर्णीय प्रेमविवाह प्रकरणें घडल्यास आमच्या ब्रह्मवृंदांनी शिव्याशाप कां द्यावेत ?

## आध्यात्मिक काव्य रुपकें

ब्राह्मण कुलातील रावण क्षत्रिय कुलांतील सीतेशी विवाह करण्यास कथित शास्त्रांचा अनुलोभ प्रकार मान्यता देऊ शकतो. ब्राह्मण कन्यका शूर्पणखा आणि देवयानी क्षत्रिय कुलांतील रामलक्ष्मण आणि ययातिशी लग्न करूं शकते, नव्हे त्याकरता तसल्या खास कथा तयार करून त्या चातुर्वर्ण्य व्यवस्थेखालीं खपविल्या जाऊं शकतात. पण वरील घटना सत्य मानल्यास आणि क्षम्य मानल्यास भारतीय जीवनांतील मध्यकालांत असें विवाह धर्म्य कां मानले गेले नाहीत हा प्रश्न अनुत्तरित राहतो. असल्या झालेल्या विवाह प्रकारांना संकरविवाह कां मानण्यांत आले ? द्रौपदी जर पांच पति करू शकते तर भारतीय स्त्रिया सरसकट पांच पति करतांना कां दिसत नाहीत ? द्रौपदीच्या कालांत जर पांच पति करण्याची पद्धत जर त्या जमातींत होती तर दौपदीचीच आई, भावजय आणि मावशी यांनी पांच पति कां केले नाहीत ? मग अशा अवस्थेत द्रौपदीच्या काळी त्यांच्या

जमातींत पांच पति करण्याची प्रथा होती असें म्हणता येईल काय ? असें अनेक प्रश्न उपस्थित होतात कि ज्यांची बौद्धिक आणि ऐतिहासिक कसोटीवर उत्तरें देता येत नाहीत.

यावरून हे स्पष्ट आहे कि ज्या काळीं रामायण महाभारत ग्रंथ लिहल्या गेले त्या कालांतील वैदिक परम्परेंतील लोकांना हे नक्की माहीत होते कि रामायण महाभारतांतील वर्णित कथा तत्कालीन इतिहास वा सत्य घटना नसून ती आध्यात्मिक रूपके होत. तसलीं रूपकें आणि त्यांतील रहस्यें तत्कालीन लोकांना माहीत असल्यामुळे रामायण महाभारत ग्रंथांतील काव्यरुपकावर तत्कालीन समाज प्रसन्न झाला. कालान्तरानें त्या कथा इतक्या लोकप्रिय झाल्या कि त्यांतील आध्यात्मिक रूपकांचे भान नष्ट होऊन नन्तरचा समाज त्या कथांत प्रत्यक्ष इतिहास मानू लागला. इतका कि रामायण महाभारतांतील व्यक्तिनामे नवजात बालकांना दिल्या जाऊं लागली आणि भूभागांना त्या प्रिय ग्रंथांतील नांवे दिल्या जाऊं लागली. कित्येक जमातींनी त्या ग्रंथातील काल्पनिक जमातनांवे आपापल्या जमातीला देण्यांत धन्यता मानली.

कित्येक विद्वान रामायण महाभारत ग्रंथ प्रत्यक्ष इतिहासच आहेत असे आग्रहानें प्रतिपादन करतांना असा युक्तिवाद करतांना दिसतात कि वरील ग्रंथ इतिहास न मानावे तर भारतात सर्वत्र रामायण महाभारतात वर्णन केलेली व्यक्तिनामें, देशनामें आणि जमातनामें कां आढळावी ? परंतु वरील युक्तिवाद फसवा आहे. वास्तविकता अशी आहे कि रामायण महाभारत ग्रंथाच्या आध्यात्मिक आणि काव्यमय मोहिनीचा तत्कालीन समाजावर इतका विलक्षण पगडा बसला कि त्यांतील व्यक्तिनामें, देशनामें आणि जमातनामें सर्वत्र जगांतच विखुरल्या गेली. म्हणूनच आपल्याला असें दिसून येते कि रामायण महाभारतातील सर्व घटना जशाच्या तशाच आपल्याही देशांत घडल्या असें सांगणारे विद्वान पाकिस्थान, अफगानिस्थान, इराण इत्यादि देशांतून समोर येत आहेत. प्रत्येक देशात ऐतिहासिक दृष्ट्या रामायण महाभारत घडणें असम्भव आहे. रामायण महाभारते ग्रंथ आध्यात्मिक रूपक काव्यें मानल्यास प्रत्येक देशांत प्रत्येक का[illegible]

महाभारत घडू शकते आणि साधनाजीवन असेपर्यन्त घडत राहील हेंच त्यांतील खरें रहस्य आहे.

एका काळी रामायण महाभारत ग्रंथ सर्व विश्वाचेच आध्यात्मिक आदर्श ग्रंथ होते, पण भारतांतील शास्त्रीपंडितांनी त्यावर केवळ भारतीय इतिहासाचाच शिक्का मारल्यामुळे जगातील अन्य देशांतून त्या ग्रंथाबद्दलचा आदर क्रमश: कमी होऊन आज रामायण महाभारतांतील आदर्श जीवनें केवळ भारतांतील भूमींत लोळत पडली आहेत. दुर्दैवाची गोष्ट अशी कि आज भारतांतूनही त्या आदर्श ग्रंथांतील आदर्श जीवन नष्ट झाल्यासारखे झाले आहे. कारण त्या ग्रंथांचा उदोउदो करणारे शास्त्रीपंडित आणि वाचीवीर विद्वान आपल्या वागणुकीनें त्या उच्च आदर्श जीवनाला हरताळ फासीत आहेत.

आपल्या जीवनाचा होम करून व्यास वाल्मिकींनी जे आदर्श ग्रंथ अखिल मानवांकरता लिहलेत त्यांना त्यांचेच पावन भूमीत रामपांडवाप्रमाणें वनवास भोगण्याचा प्रसंग यावा यापरता त्यांचे दुर्भाग्य कोणते ?

## शूर्पनखा प्रकरण

विद्युतजिव्हाचा रावणाने वध केल्यावर रावणाचा राग न मानता शूर्पनखा उलट आपल्या भावाशीं एकरूप राहते. विद्युतजिव्ह म्हणजे विजेप्रमाणे कडक भाषा वापरणारा स्पष्टवक्ता! असल्या स्पष्टवक्ता व्यक्तीला कोणीच जवळ करीत नाही. रावणासारखा अरेराव तर असल्या विद्युत्जिव्हाला अगोदर मारेल. रावणाचे सांगण्यावरुनच ती सीतेला पाहण्यास आणि जमल्यास राम किंवा लक्ष्मणाशी विवाह करण्यास आली होती. रामलक्ष्मण सीता त्यावेळेस पंचवटीत राहण्यास आले होते. ही पंचवटी म्हणजे आजचे नासिक आहे असें दाखविण्यांत येते. परंतु असल्या पंचवट्या भारतभर एवढेंच नव्हें तर अन्य देशांतही दाखविण्यांत येतात. मग खरी पंचवटी कोणती? ती पंचवटी या पंचप्राणांचे छायेखालीं वाढणारी देहलताच आहे. याच पंचवटीच्या झोंपडींत रावणभगिनी शूर्पनखा आली. ती प्रथम रामाशी लगट करूं लागली. परंतु सीतेसमक्ष

राम एका परस्त्रीशी कशी लगट करणार ? त्यांनी तिला लक्ष्मणाकडे हुसकावली. परंतु लक्ष्मण तिच्या प्रेमपाशांत गुंतीत आहे असें आढळल्यावरून ज्याची माता कौशल्या आहे अशा कुशल रामानें लक्ष्मणाला शूर्पनखेचे नाककान कापण्यास सांगीतले आणि ज्या स्त्रीशी एक घटका अगोदर तो प्रेमलाप करीत होता त्या ब्राह्मण कन्यका शूर्पनखेचे लक्ष्मणाने आपल्या भ्रात्याचे सांगण्यावरून कोणताही विचार न करतां नाककान कापले.

## नाककान कापण्याचे मूळ

उठल्यासुठल्या आपल्या विरोधकांचे नाककान कापण्याचा थिल्लरपणा रामासारखा धीरगंभीर आणि उदात्त पुरुष करतांना पाहून बरें वाटत नाही. ताटकेला मारण्यापूर्वी राम लक्ष्मणाला अशाच तऱ्हेनें तिचे नाककान कापण्याचा सल्ला देतो. कुंभकर्णाला मारल्यानन्तर रामाचे आदेशावरून वानर कुम्भकर्णाच्या मृत शरीराचे नाककान कापतांना दिसतात. रामाच्या जीवनांत नाककान कापण्याचे असे तीन प्रकार आढळून येतात. वाल्मिकीचे कालांत एखाद्या व्यक्तिला समाजांतून उठवून देण्याकरता नाककान कापण्याची पद्धत असली पाहिजे असें दिसून येते. आमच्या लहानपणीं सुद्धां नाककान कापण्याच्या वाक्प्रचाराचा बराच उपयोग होत असे. आमचे लहानपणचा काळ इंग्रजी राज्यांतील असल्यामुळे इंग्रजी राज्यांत नाककान कापण्याची शिक्षापद्धत अंमलांत नव्हती.

भारतीय जीवनांत अनिष्ठ व्यक्तीचे नाककान कापण्याच्या घटना अलिकडील इतिहासांत अवगत नसल्या तरी पोर्तुगीजांनी एका मराठी वकीलाचे कान कापून त्यावर कुत्र्याचे कान शिवल्याचा दाखला आहे. परंतु नाककान कापण्याची म्हण ज्याअर्थी भारतीय भाषांत आजही आहे त्याअर्थी भारतीय जीवनांतसुद्धा शत्रूवत मानलेल्या व्यक्तीचे नाककान कापण्याची दुष्ट परम्परा असली पाहिजे हें सिद्ध होते. वाल्मिकींनी असल्याच नाककान कापण्याच्या निंद्य प्रकाराचा रामाचे आयुष्यांत तीनदां उपयोग केला आहे. यावरून शूर्पनखा अवस्था राम अवस्थेला निंद्य वाटत असली पाहिजे हें उघड आहे.

# शूर्पणखा म्हणजे कोण ?

शूर्पनखा ही ब्राह्मणकन्यका. तिचे वडील एक तपस्वी ऋषि मानले जात होते, त्यांचे नाव विश्रवा होते. रामायण रूपकाचा खरा अर्थ लक्षांत आणल्यास हे समजेल कि आध्यात्मिक प्रयत्नाला वाल्मिकि साधनेतील ब्रह्मकर्म करणारी ब्राह्मण अवस्था मानतात. या अर्थाने विश्रवा ऋषि ब्राह्मण मानल्या गेलेत. आम्ही खूप ऐकले आहे, खूप वाचले आहे, आतां आम्हाला ऐकण्या वाचण्याचे कांहीच शिल्लक राहिले नाही, आम्ही आता ब्रह्ममय म्हणजे ब्राह्मण बनलो असल्या वृत्तीला वाल्मिकि विश्रवा म्हणतात. असल्या ब्राह्मणवृत्तीचे अपत्य म्हणजे शूर्पनखा होय. यावरून ब्रह्मकर्म करतांना सुद्धां नीच राक्षसीवृत्ति साधकांत कशा निर्माण होतात याचे स्पष्टीकरण रावण-शूर्पनखा द्वारा वाल्मिकि करूं इच्छितात; नव्हे उलट साधना सत्कर्म करतांनाच असल्या ब्रह्मकर्मांत स्वत:ला खपवून घेणाऱ्या नीच राक्षसी वृती साधकांत उत्पन्न होतात आणि असल्या चांगल्या भासणाऱ्या नीच वृत्तींचा सुद्धां साधकानें निःपात केला पाहिजे हें ऋषि वाल्मिकींना रावण शूर्पनखा ब्राह्मण अपत्यांचे कथांवरून सुचवायचे आहे.

शूर्प म्हणजे सूप. सुपाचा आकार मोठा असतो. सुपाचे कार्य पाखडणे, निवडणें आणि मोजण्याचेही असते. नखं म्हणजे नखें. सूपाच्या मोठ्या आकाराचा अर्थ ध्यानांत घेतल्यास जिची नखें मोठी आहेत अशी ती शूर्पनखा मानावी लागेल. पण रामायणांत शूर्पनखेची नखें मोठी असल्याचा दाखला नाही. उलट शूर्पनखा सुन्दर होती असा निर्देश आहे. भागवतांत मोठी नखें असलेला नारसिंह दाखविला आहे. राक्षसीवृत्तीच्या हिरण्यकशिपुची आंतडी फाडून त्यांतील कालकूट नारसिंह बाहेर काढतो असें दाखविले आहे. येथे शूर्पनखा रामलक्ष्मणाला मोहित करतांना दिसते, त्यांचे पोट फाडतांना म्हणजेच अन्तरंग बाहेर आणतांना दिसत नाही. उलट शूर्पनखेचेच नाककान कापून शूर्पनखा वृत्तीलाच विद्रूप करण्याचा राम प्रयत्न करतात. म्हणजे नरसिंहाप्रमाणे राक्षसीवृत्तीचा नायनाट करण्याचे महत्कार्य शूर्पनखेचे नसून त्याऐवजीं रामवृत्तीला मोहित करून वरून ब्रह्मकर्मरूप वाटणाऱ्या परंतु अन्तरंगांत राक्षसी वृत्तीचा परिपोष करणाऱ्या

शूर्पनखेचेच नाककान कापण्यास राम सांगतात. यावरून शूर्पनखा या नावांतून साधनेत अनिष्ट वृत्ती जी वर येऊं पाहतें (ब्रह्मकर्माचे नांवावर) तिलाच विद्रूप करण्याचा आदेश वाल्मिकि देत असले पाहिजेत.

'खं' म्हणजे आकाश. आकाश पोकळ असते. नखं म्हणजे पोकळ नसलेले ठोस, भरीव! शूर्प म्हणजे माप, मोजणें. थोडी साधना केल्यावर कांही साधक आपल्या कर्माची इतिश्री मोजून त्यांतून फलश्रुति अपेक्षित करतात. त्यामुळें साधनामार्गात प्रगति होण्याऐवजी साधकांत अधोगति आणि अहंकार उत्पन्न होऊन साधक पतित म्हणजे राक्षसी वृत्तीचा बनतो. अन्त:करणाची लय परमात्म स्वरूपांत लागण्याकरता म्हणून जप सांगितला आहे. परंतु अन्त:करणाचा लय होण्याऐवजी त्याच अन्त:करणांत उत्तम वाटणारी जपसंख्या मोजण्याची इच्छा उत्पन्न होते आणि साधक 'मी इतका जप केला' असल्या राक्षसी वृत्तीच्या मोहांत न कळत जातो. असली वृत्ति ब्रह्मकर्माची वाटली तरी ती राक्षसी असते हें वाल्मिकींना शूर्पनखा कथेद्वारें सुचवायचे आहे. खऱ्या साधकानें असल्या उत्तम वाटणाऱ्या कथित ब्रह्म-वृत्तीला विद्रूप करून परत घालविले पाहिजे. शूर्पनखा कथेचे हें रहस्य आहे.

साधनेच्या कर्ममापांत साधकाने कधी गुंतू नये. जे काय कर्म केले असेल ते ब्रह्मार्पण समजून साधकाने सदा अलिप्त आणि निरहंकारी असावे. मी अमक्या साधना केल्या, मी इतका जप केला, मी इतके ग्रंथ वाचले, मी इतक्या सिद्धि प्राप्त केल्या, मी भगवान आहे इत्यादि ब्राह्मणासारख्या वाटणाऱ्या वृत्ती राक्षसीच असतात. साधकाला मोह घालणाऱ्या असल्या सुन्दर भासणाऱ्या वृत्तींचा ज्याला राम व्हायचे आहे अशा विवेकभ्राता (लक्ष्मण) श्रेष्ठ साधकाने अपमानच केला पाहिजे. असल्या वृत्तीच्या मायेंत साधकाचा विवेक म्हणजे भ्राता लक्ष्मण सुद्धां येऊं पाहतो. हें सर्व जाणूनच रामाने लक्ष्मणाकरवीच शूर्पनखेचे नाककान कापण्यास सांगितले.

शूर्पनखा प्रकरण इतिहास मानल्यास रामजीवनावर एका सुन्दर स्त्रीवर विनाकारण अत्याचार करण्याचा दोष येतो. परन्तु राम असें कसें वागणार? त्यांतील साधनारहस्य लक्षांत आल्यास रामजीवन अधिक उजाळून येते. ज्याला राम व्हायचे असेल त्या उच्च साधकाने विवेकभ्राता

लक्ष्मणाद्वारे स्वतःतील ब्रह्माप्रमाणें वाटणाऱ्या वृत्ति रूप शूर्पनखेचे नाककान कापून तिला विद्रूप केलेच पाहिजे.

## ताटकापुत्र मारिच

शूर्पनखेचे नाककान कापून तिला हांकलल्यावर तशाच विद्रुप चेहऱ्यानें ती आपला बन्धु रावण याचेकडे गेली. आपल्या भगिनीची ती दुर्दशा पाहून रावण अधिक संतापला आणि त्याने रामपत्नि सीतेलाच हरण करण्याचा घाट घातला. त्याकरता त्यानें ताटकापुत्र मारिच याला प्रथम रामाकडे पाठविले; आणि कसेही करून रामाला पंचवटीच्या आश्रमापासून दूर नेण्याचा प्रयत्न करण्यास सांगितले. सर्व राक्षस जमातच म्हणे मायावी परन्तु मारिच अधिकच मायावी होता. शिवाय त्याची माता ताटकेचा ज्या रामानें वध केला त्या रामाची खोड मोडण्याची त्याला सुसंधि प्राप्त होणार होती. आतां कथा रंगविलीच पाहिजे. मारिच जर रावणाचे ऐकत नसेल तर त्याला रावण ठार मारणार होता. मारिचाने विचार केला कि रावणाचे हातानें मरून नरकांत जाण्यापेक्षा रामासारख्या अवतारी पुरुषाचे द्वारें मरून स्वर्गांत जाणें श्रेयस्कर ! मारिच रावण कार्य करायला तयार झाला आणि एका सुवर्णमृगाचे मायावी रूप घेऊन तो सीतेसमोर नाचू बागडू लागला.

रामाने मुद्दामच त्या सुन्दर कांचनमृगाला सीतेला दाखविले. रामाकरता राज्याचा त्याग करणारी वृत्ति सीता, रामाकरता वैभवशाली अलंकार आणि वस्त्रप्रावरणाचा त्याग करून वल्कले नेसणारी सीता, आणि रामाकरता वनवासाचे खडतर कष्ट झेलणारी सीता आज मात्र त्या जिवंत कांचनमृगाचे मायेत सांपडली. त्या मृगाला मारून त्याच्या चर्माची चोळी शिवायची होती म्हणे ! 'मज आणुनि द्या हो हरिण अयोध्यानाथा' ती रामाजवळ लडिवाळली ! एवढे संयमी राम, पण तेही वृत्तिकाया सीतेच्या लडिवाळपणांत गोंवल्या गेले. गीता स्पष्टच सांगते, 'इन्द्रियाणि प्रमाथीनि हरन्ति प्रसभं मनः' मोठमोठे प्रसभ मनाचे श्रेष्ठ साधक सुद्धां इन्द्रियांच्या चाळचाला बळी पडतात आणि अंती अधःपतनाचे मार्गाला लागतात.

रामाला माहीत होते कि तो प्रत्यक्ष हरिण नसून मायावी राक्षस आहे. आपण ज्या सीतेची परिक्षा पाहिली तीच आता आपल्याला त्या मायावी कांचनमृगाचे मागें धांवण्यास सांगेल असें रामाला वाटले नव्हते. राम सीतेला सांगीत होते कि 'अग कांचन कामिनि आणि कीर्ति मायावी असते. तिच्या फंदांत खऱ्या साधकाने पडूं नये. कांचन म्हणजेच लक्ष्मी चंचल असते आणि म्हणूनच हा मायावी मारिच तुला चंचल अशा अति चपल मृगाचे स्वरुपांत भासतो तो आभास आहे. माया आहे. मायेच्या मागें धावूं नकोस.' रामानें सीतेला परोपरीने समजाऊन सांगितले पण कायेंत वास करणारी वृत्तिरूप सीता आतां रामाचे ऐकेना. ती रामाला स्पष्ट म्हणाली, 'रामा तुमच्याकरता मी सर्वस्वाचा त्याग केला. आतां मी तुमचे ऐकणार नाही. मला तो कांचनमृग मारून द्याच!'

सर्व उपाय हारले आणि राम कांचनमृगाला मारण्यास जायला निघाले. पण रामाला अंतिम परिणामाची कल्पना होती. त्यांनी सीतेला सोडून एक क्षणसुद्धां न राहण्यास लक्ष्मणाला सांगितले आणि स्वतः जड अन्तःकरणानें कांचनमृगाचे मागें धांवले. लक्ष्मणरूप विवेक सीतेसह दक्षतेनें उभा होता. पण विवेक जागृत असतांना साधकाचे अधःपतन कसें होणार? आणि रावणाला तर सीतेचे हरण करायचेच होते. ठरल्याप्रमाणें बाण लागल्याबरोबर मारिच ओरडला. 'हा सीते हा लक्ष्मणा धांव!' लक्ष्मणाला पक्के माहित होते की कांचनमृग कितीही मायावी असला तरी तो रामा-सारख्या उत्तम साधकाला अडचणींत आणूं शकणार नाही उलट रामच त्या मायावी रुपाचा नाश करतील. पण सीतेला लक्ष्मणाचे भाषण खरें वाटेना. रामाच्या हाकेसरसी लक्ष्मण भाऊजी धांवून जात नाही असें पाहून सीतेचे स्त्री सुलभ मन उद्गारले, 'तुला प्राप्त होणार का देवरा मी। धरीसी असा कां म्हणे भाव रामीं?' मात्रा लागू पडली आणि जड अन्तःकरणाने लक्ष्मण राम गेले त्या वाटेनें चालू लागला.

परंतु लक्ष्मणाही आगामी संकटाची जाणीव होती असें दिसते. त्यानें आश्रमाचे द्वारासमोर एक विवेकवैराग्याची लक्ष्मण रेषा काढली आणि सीतेला बजावले, 'मातोश्री या रेषेचे म्हणजे वैराग्यविवेकाचे उल्लंघन करूं

नका.' त्यावर सीता अधिक संतापली, 'मला काय ते समजते. तुम्हं जा पाहूं अगोदर ! आपले कर्तव्य करण्याऐवजी गमजा करतां काय ? एवढा वैराग्यशील विवेकी लक्ष्मण पण वृत्तिकाया सीतेच्या धमकावण्याल तो बळी पडला आणि अधोवदन करून रडत रडत तो रामाजवळ गेला 'रडत रडत जाये तो मागुतीहि न पाहे ? राम विस्मयाने लक्ष्मणाकडे पाहतात. लक्ष्मणाने सर्व कथा निवेदन केली. रामाला सर्व कल्पना होती.

इकडे यति रूपानें आलेला रावण झोळी घेऊन द्वारासमोर उभा राहिला. 'माई मुठ्ठी मिले ? परन्तु लक्ष्मण रेषेला म्हणजे वैराग्यविवेक रेषेला उल्लंघून सीता भिक्षा द्यायला जाईना. यति म्हणजे संन्यासी म्हणजे धर्माच्या नावावर अधर्म आणि ढोंग करणारे बोका सन्यासी रामायण कालांतसुद्धा होते असा याचा अर्थ आहे. असल्या धार्मिक वाटणाऱ्या परन्तु पाखंडी असणाऱ्या भोंदूंना भिक्षा देऊ नका म्हणजे मदत करूं नका असा या कथेचा सरळ अर्थ आहे. परंतु विवेकवैराग्याच्या मर्याद सोडून जी वृत्ति मायेच्या मागे धांवेल तिचे अधःपतन काय वर्णावे ? 'विवेक भ्रष्टांना भवति विनिपातः शतमुखः' परंतु सीतेसमोर शतमुखा ऐवजी दशमुख रावणच होता. लक्ष्मण रेखेचे म्हणजेच वैराग्यविवेकाचे उल्लंघन केल्याबरोबर दान देणाऱ्या सीतेलाच त्याने उचलले आणि लंकेकडे गमन केले. आपल्या शिष्यिणीसह पळून जाणारे संन्यासी याच काळांत आहेत असे नाही तर त्या मानल्या गेलेल्या त्रेतायुगांत सुद्धां असले नीच सन्यासी होते असे दिसते.

आतां सीतेला रामाचे म्हणणे समजले, लक्ष्मणाचे वागणे समजले. पण वेळ निघून गेली होती. आता ती रावणाचे तावडींत सापडली होती. शेंवटी जाता जाता तिने एक शक्कल लढविली. तिने आपल्या अंगावरील अलंकार हळूहळू मार्गावर सोडले आणि त्या मार्गाने जाणाऱ्या रामाला त्या अलंकारावरून सीतेचा मागोवा काढता यावा असा तिने प्रयत्न केला. शेंवटी जे होणार तें होणारच !' 'पराधीन आहे जगतीं पुत्र मानवाचा दोष ना कुणाचा' असल्या फसव्या आणि नेभळट विचारांचा अंगीकार करून सीता रावणसह वर्तमान अलंकारांचा त्याग करीत लंकेला गमन

करती झाली. आजही समाजांत असा बराच मोठा स्वतःला बुद्धिमान समजणारा वर्ग आहे कि जो असत्कर्म करून तसल्या वाईट कर्माचे फल भोगण्याची पाळी आली कि कथित दैवावर भार टाकून आपल्या पापी मनाला समजविण्याचा प्रयत्न करतात, 'दोष ना कुणाचा !'

## बुद्धिनिष्ठ आक्षेप

बुद्धिनिष्ठ तरुण पिढी वरील प्रकरणावर आक्षेप घेऊं शकते. मारिचाने खोटीच आरोळी मारल्यावर त्याच्या होणाऱ्या परिणामाचा विचार करून स्वत: रामानेच कां नाही ओरडून लक्ष्मण सीतेला सांगितले, 'हे लक्ष्मणा, हे सीता, मी सकुशल आहे. मारिचच माझे नावांने खोटेच ओरडतो आहे. तुम्ही स्वस्थ असा.' एवढ्या करण्याने पलिकडील अति प्रसंग टळला असता. एका गावची गोष्ट. वरील आक्षेप लेखकाने सांगितला असता एक उच्च शिक्षण घेतलेलें कथित उपाध्याय आपल्या बुद्धिचे प्रदर्शन करते झाले आणि म्हणाले, 'अहो, त्या मारिच राक्षसाने मायावीपणानें हांक मारल्यामुळे ती हांक रामाला ऐकू न जाता सरळ लक्ष्मण सीतेलाच ऐकू गेली, कारण मायावी मारिचाने रामाला हिप्नोटाइज केले होते. आणि शिवाय रामाला मायाच दाखवायची होती.' उपाध्यायांचे तर्कट ऐकून भोवतालचे लोक उखडले, 'काय रामासारख्या अवतारी पुरुषाला एक लबाड राक्षस हिप्नोटाइज करूं शकतो ? काय म्हणणे आहे तुमचे शास्त्रीबुवा ? आणि स्वतःच्या पत्निला एक गुंड पळवून घेऊन जाण्याची लीला राम करीत असेल तर असला रामाचा षंढ आदर्श आम्हाला नको.'

थोडे तर्कट चालविता आल्यावर नास्तिपक्षी लोक अध्यात्म एक अफूची गोळी आहे असें प्रतिपादन करून स्वतःच्या बुद्धिहीन जीवनाला जसें धन्यकाम मानतात तद्वत् धर्म वा अध्यात्म रक्षणाच्या भ्रामक कल्पने-करता आपल्या कथित बद्धिचे असले घाणेरडे प्रदर्शन करून कथित धार्मिक लोक आपल्या आदर्शालाच उणीव आणूं पाहतात आणि आपण काय पण कोटी केली अशी अहंकाराची घमेंड मारतात. असल्या घमेंडखोर आस्तिकां-पेक्षा सरळ सरळ नास्तिक परवडलें. परन्तु असले अहंकारी आस्तिक सुद्धां दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर देऊं शकत नाही. अयोध्या सोडतांना सीतेचे

सर्व अलंकार कैकेयीने काढून घेतले असतांना आतां रावणासह जातांना सीतेने कोणते नवीन अलंकार आणलेत? रामसीता अत्रि ऋषीच्या आश्रमांत गेले होते त्यावेळीं अनुसयेने त्यांचे स्वागत केले होते. पण अनुसूया त्यांना अलंकार कोठून देणार? आणि त्या अलंकारांचे स्वागत आणि रक्षण दण्डकारण्यासारख्या राक्षसांनी युक्त अशा घोर अरण्यांत सीता कशी काय करणार?

प्रश्न अनुत्तरित राहतो आणि याचे कारण म्हणजे सीतेचे हे अलंकार प्रत्यक्षांतील नसून साधनाकालांत उत्पन्न होणाऱ्या वृत्तीरूप आहेत. असल्या अलंकारांचा रावणाच्या लंकेशी संबंध आहे. अंक, लंक, लंकार आणि अलंकार अशी ती शब्दप्रणाली आहे. अंक म्हणजे मोजणें. या अंकाला 'लं' हे मायाबीज लागून लंका शब्द तयार झाला आहे. लंका म्हणजे मायेत गुरफटणारी वृत्ति असें वाल्मिकींना सुचवायचे आहे. अशी लंका आजच्या श्रीलंकेत नव्हती आणि नाही, कि मध्य प्रदेशातील मंडल्याजवळ नाही. अशी लंका साधकाचे चित्तांत असू शकते तशी लंका कामिनि, कांचन आणि कीर्तिचे मागें लागणाऱ्यांचे चित्तांत असते मग ते नास्तिक असोत कि आस्तिक, मग्रूर असोत कि महाराज! मायानगरी लंकेला जात असतां सीतेने असल्याच साधक चित्तांतील अलंकारांचा त्याग केला होता कारण ज्या लोभास्तव तिला रावणराज्यांत राहण्याचा दुर्धर प्रसंग आला त्या लोभी अलंकाराचाच त्याग करून ती लंकेतील अशोक वनांत राहूं इच्छित होती. जेथें वृत्तींना शोक नाही तें अशोक वन!

# षष्ठम अध्याय

## कबन्ध वध : वाली वध

रावणाने सीतेचे हरण केल्यावर हताश झालेले राम आणि लक्ष्मण पुढें चालू लागले. वाटेंत त्यांना जटायू भेटला. जटायूचे पंख रावणाने कापले होते कारण त्यानें रावणाच्या सीताहरणाला विरोध केला. जटायू एक पक्षी दाखविल्यामुळें त्याचे पंख कापणें ओघानें आलेंच. जटा म्हणजे वेद आणि वेद म्हणजे ज्ञान. असल्या ज्ञानानें रावण वृत्तीला विरोध केला होता पण साधकांतील मस्तवाल वृत्तीनें म्हणजे रावणाने तो ऐकला नाही. पुढें गेल्यावर त्यांना एक शिररहित कबन्ध राक्षस भेटला. नुसते धडच होते ते. आणि आश्चर्य हें कि त्या शिररहित धडानें लक्ष्मणाला उचलून गिळणे सुरुं केले. रामाने चपलाईनें कबन्धाचा वध केला आणि लक्ष्मणाला वांचविले. कथेचा अर्थ मजेवार आहे. कबन्ध म्हणजे शिररहित शरीर. रावणवृत्तीसह सीता जाणें म्हणजे साधकाची विवेक बुद्धि नष्ट होणें होय. बुद्धि नसणें म्हणजे डोके नसणें होय. ज्या साधकाची बुद्धि नष्ट झालेली आहे तो शिररहित कबन्ध राक्षस नाही काय? आणि अशा कबन्धाने साधकांतील विवेकरुप लक्ष्मणाला गिळूं नये काय ? मग विवेक लक्ष्मणाला जीवात्मा राम नाही तर कोण वांचवील ?

रामजीवनांतील आणखी एक वादग्रस्त प्रश्न म्हणजे वाली वध होय. सुग्रीव आणि वाली हे दोघे भाऊ. वाली मोठा असल्यामुळें गादीवर बसला तर धाकटा सुग्रीव त्याचा सेवक बनला. एकदा वाली आणि सुग्रीव एका राक्षसाचा संहार करण्याकरता त्याचा पाठलाग करीत एका बिळापाशी आले. राक्षस बिळांत गेला. त्या राक्षसाचा पाठलाग करण्याचे वालीने ठरविले. आणि स्वतः त्या बिळांतून परत येईपर्यन्त सुग्रीवाने त्या बिळाच्या द्वारावर बसून रक्षण करावे असे सांगितले. एक अख्खा दिवस झाला वाली परत येईना. आठ दिवस झाले, महिना झाला, एक वर्ष व्यतीत होत आले. आता वाट ती किती काळ बघायची ? वालीची वाट बघत सुग्रीव आतां कंटाळला. मध्यंतरी एक दिवस सुग्रीवाने बिलातून रक्ताचा पाट

वाहून येतांना पाहिले. परंतु वाली परत येण्याचे चिन्ह दिसेना. शेवटी वाली मेला असेल, राक्षसाने त्याचा वध केल्यामुळेंच त्या बिलातून रक्ताचा पाट वाहत आला असा अंदाज करून सुग्रीवाने त्या बिलाच्या तोंडावर एक प्रचंड शिला लावून तो आपल्या राजधानीस परत आला. शिला लावण्याचा हेतू हा कि बाहेरून कोणी शत्रू वा हिंस्त्र श्वापद त्या बिलांत जाऊन त्यापासून वालीला उपद्रव होऊं नये.

किष्किंधेला परत आल्यावर सुग्रीवाने ती वार्ता पौरजनांना आणि वालीची पत्नी तारा हिला सांगितली. वानरांचे रितीप्रमाणें तारा सुग्रीवाची पत्नि बनली आणि सुग्रीव आतां राजा बनून किष्किंधा नगरीचे राज्य सांभाळू लागला. इतक्यांत एक अनपेक्षित गोष्ट घडली. जवळजवळ एक वर्षाचे कालावधीनन्तर वाली त्या राक्षसाचा वध करून बिळाच्या तोंडाशी येऊन पाहतो तों तोंडावर प्रचंड शिळा ठेवलेली त्याला दिसली. त्याला वाटले कि त्याच्या भावानें त्याला दगा देऊन बिळाच्या तोंडाशी शिला लावून ठेवली असावी आणि त्याला मेला असें जाहीर करून त्याची गादी बळकावून बसला असेल. आणि घटना थोड्या फार फरकानें तशाच घडल्या. वाली पराक्रमी बलवान होता. त्याने बिळाच्या मुखावरील प्रचंड शिला काढून गुहेबाहेर तो आला. परंतु त्याला बिळांत जाऊन एक वर्षाचा कालावधि झाला असेल याचे त्याला स्मरण नव्हते. त्याला वाटलें कि बिळांत जाऊन त्याला एक घटका सुद्धां झाली नसेल.

## गैरसमजाचे साम्राज्य

गैरसमजासह वालीचा क्रोध वाढत गेला. त्याने त्याच्या पश्चात गादीवर बसलेल्या सुग्रीवाला आपल्या राज्यांतून घालवून दिले आणि त्याचे पत्निशीसुद्धा लग्न करून वाली परत आपल्या गादीवर बसला. सुग्रीवाची बनलेली राणी तारा पुन्हा वालीची पत्नि बनून पूर्ववत् आपल्या प्रिय पति वालीसह राहू लागली. दोष कोणाचाच नव्हता. दोष होता कालमापनाच्या गैरसमजाचा. वालीला गुहेंत जाऊन एक वर्षावर कालावधि झाला असे जगराहाटीवरून सुग्रीव मानत होता आणि त्यादृष्टीने तो वर्षभर बिळा-बाहेर वालीची वाट बघत थांबला. पण शेवटी नाइलाजाने त्याला वालीचा

नाद सोडून आपल्या राजधानीला परतावे लागले. पण वाली बाह्य जगाचा सम्बन्ध सोडून गुहेंत घसला होता. त्याला बाह्य जगताचे कालमापन कसें कळणार ? एक घटिका सुद्धा सुग्रीव थांबला नाही आणि बराच काळ वाट पहाण्याचा बहाणा करून सुग्रीवाने वालीचे राज्य आणि पत्नि तारा दोन्ही बळकावली असा गैरसमज वालीचा झाला.

## राम सुग्रीव भेट

सुग्रीव अशा तऱ्हेनें निर्वासित जीवन जगीत पम्पा सरोवराजवळील ऋष्यमूक पर्वतावर राहात होता. त्याचे कांही मित्र त्याजबरोबर निर्वासित जीवन कंठीत होते. त्यांतील एक मित्र हनूमान होता. रावणाने सीतेला पळवून नेल्यावर तिचा शोध करीत करीत राम लक्ष्मण पम्पा सरोवराबर आले. तसे त्यांना वाटेंत भेंटलेल्या जटायूनें सांगितले होते. रामलक्ष्मणासारखे सुन्दर नर दूरून येतांना पाहून प्रथम सुग्रीवाला ते वालीचेच मित्र असें वाटून भय वाटले. परन्तु सुग्रीव मित्र हनुमान मोठा बुद्धिमान होता. त्याला तसें वाटले नाही आणि त्याने सुग्रीवाचे दौत्य स्वीकारून रामलक्ष्मणाशी स्नेह संपादण्याचा प्रयत्न केला. रामाजवळ हनुमान आला आणि अत्यंत शुद्ध संस्कृत भाषेंत त्याने रामाशी संभाषण केले. एक वानर इतक्या शुद्ध संस्कृत भाषेत बोलतो याचेच रामाला अतीशय आश्चर्य वाटले. शिवाय हनुमानाचे वाक्चातुर्य सुद्धां विलोभनीय होते. हनुमानाच्या दौत्याचा रामावर परिणाम होऊन राम सुग्रीवाकडे स्नेह संपादण्यास जाण्यास निघाले.

सुग्रीवानें सुन्दर मानवी रुप घेऊन रामाला सामोरे जाऊन आलिंगन दिले. राम सुग्रीव सख्य हनुमानामुळे झाले. सुग्रीवाने आपल्या निर्वासित जीवनाची कथा सांगून रामाला वालीचा वध करण्यास आणि सुग्रीवाला किष्किंधेच्या गादीवर बसविण्याबद्दल विनंति केली. रामाने सुग्रीवाची विनंति मान्य करून त्या मोबदल्यांत सीतेचा शोध करून देऊन रावणासह युद्ध करण्यास मदत करण्यास अभिवचन मागितले. सुग्रीवाने रामाला सहाय्य करण्याचे वचन दिले. ठरल्याप्रमाणें वालीला सुग्रीवाने युद्धास पाचारण केले. वालीला सुग्रीवाचा पराभव करतांना पाहून रामाने एका झाडाआड उभे राहून, वालीच्या छातीत बाण मारून वालीचा वध केला.

समोरासमोर युद्धाला उभे राहिल्यास वालीचा पराजय करणें रामाला सुद्धां अशक्य होते कारण वाली फार पराक्रमी होता. रावणाचा सुद्धा त्यानें पराभव केला होता. दोघा भावांच्या भांडणात रामासारख्या परक्या माणसाला पडण्याचे कारण नव्हते, आणि शूर अशा वालीला असावध ठेऊन रामासारख्या अवतार मानलेल्या परमपुरुषाने छद्मीपणाने वालीचा वध करण्याचे कारण नव्हते असा आरोप रामावर केल्या जातो. आणि तो खरा आहे. वालीच्या छातीत बाण लागल्यावर वालीच्या जवळ रामचन्द्र गेले आणि आपल्या बोटांत बाण खेळवीत ते वालीसमोर उभे राहून त्याला म्हणतात, 'हे वानरश्रेष्ठा तुझ्या छातींत झाडाआडून बाण मारणारा मी इक्ष्वाकु वंशाचा राजा रामचन्द्र आहे.' त्यावर क्रुद्ध होऊन वाली रामाला म्हणाला, 'हे भ्याडा झाडामागे उभा राहून मला बाण कां मारलास ? तूं नर जातीचा आहेस. मग समोरासमोर येऊन माझ्याशी कां लढला नाहीस ?

## रामाचे छद्मी भाषण

त्यावर राम म्हणाले, 'हे वानर श्रेष्ठा तूं वानर जातीचा आहेस आणि आम्ही नर जातीचे आहेत. नर जातीला सोडून इतर जातीची शिकार करणें आम्हा नरांचा धर्म आहे. कोणीही शिकार करतांना आखेटा-समोर उभा न राहतां झाडामागेच उभा राहतो आणि आखेटाची शिकार करतो. तूं वानर म्हणून मी तुझी झाडामागें उभें राहून शिकार केली यांत वावगे काय केले ?' रामाच्या या छद्मी उत्तरानें बिचारा वाली निरुत्तर झाला आणि झाले ते बरें झाले असें मानून आपला पुत्र अंगद याला सुग्रीवाच्या स्वाधीन करून त्या शूरानें आपला प्राण सोडला.


आपल्या छद्मी भाषणाने रामानें जरी वालीला निरुत्तर केले तरी रामाचे वरील भाषण बुद्धीला पटण्यासारखे नाही. वाली जर नर नव्हता तर केवळ नरांनीच जी त्रिकाल संध्या करायची ती वाली कसा काय नित्य करीत असे ? संध्यावन्दन आणि गायत्रीजप तर नरांतील केवळ द्विजांचे काम होते. यावरून वाली वानर नसतांना नर द्विज असला पाहिजे. शिवाय त्याच वानर जातींतील हनुमान ब्राह्मणपुत्र होता. मग वानरांची शिकार करण्याची भाषा रामासारख्या परमपुरुषानें बोलावी हें उचित नव्हे. वालीच्या

बाबतींतील रामाचे वर्तन अत्यन्त छद्‌मी आणि अधर्माचे होते हे कुणीही समंजस माणूस म्हणेल. म्हणजे रामायणाला खरा इतिहास मानल्यास रामाचे जींवनावर वाली प्रकरणांत बराच दोष येतो. मग असा छद्‌मी अधार्मिक पुरुष राम आदर्श कसा ?

वरील कथेंतील योगसाधनेंतील अतिशय गुह्य रहस्य लक्षांत न आल्यास आस्तिपक्षी आणि नास्तिपक्षी विद्वान आपापल्या कुवतीप्रमाणें त्यावर कोलांट उड्या मारून आपलें म्हणणें प्रतिपक्षावर लादण्याचा प्रयत्न करतील. पण त्यांचा तो प्रयत्न निष्फळ ठरेल. प्रथम दर्शनीच वरील कथा ऐतिहासिक दृष्टचा असम्भव वाटते. वानर योनीचे लोक त्रिकाळ संध्या कसें करणार ? मग ते वानर कसे ? त्याच वानर जातींतील हनुमानाचे शुद्ध संस्कृत भाषण ऐकून स्वत: रामच आश्चर्य करतात. याचा अर्थ असा कि वानर जातीतील लोक संस्कृत भाषा बोलत नसले पाहिजे. मग असे वानर संध्या वन्दन कसें करणार ? रामायणांतील वानरांना पुच्छ सांगितले आहे. मानवांचे जवळपास येणाऱ्या वानर योनींना सुद्धां पुच्छ नसते असें आतां सिद्ध झाले आहे. शिवाय वानरांना दातांचे सुळके असल्यामुळें ते कोणतीच भाषा बोलू शकत नाहीत. मग ते संस्कृत भाषा कसें बोलणार ? असल्या वानरांची राज्यें आणि पति-पत्नि विवाह संबंध मानवाप्रमाणें कसें काय असणार ? वानर जातीला ब्रह्मचर्याचे पालन करण्याची आवश्यकता आणि बुद्धि कोठून प्राप्त व्हावी? यादृष्टीनें हनुमान वानर असून ही ब्रह्मचारी कसा ? इत्यादि अनेक आक्षेप अनुत्तरीत राहतात.

या वानरांना पुच्छें होती असे रामायणकार लिहतात. आमचेंतील कांही विद्वान असल्या वानर जातीचा उल्लेख करून रामायणांतील वानर म्हणजे डार्विन ने म्हटल्याप्रमाणें उत्क्रान्त वादांतील एक मानवपूर्व योनी असा बुद्धिवाद करून आम्ही काय पण शोध लावला अशा स्वनामधन्यतेत वावरतांना दिसतात. परन्तु आजच्या विकसित विज्ञानांत असल्या वावदूक विद्वानांच्या कल्पनांना मुळींच थारा नाही. मानव वंश ज्या वानर योनींतून उत्क्रान्त झाला त्या वानर योनीतील अनुत्क्रांत अशा आठ लागोपाठ योनी मुळीं पुच्छरहित आहेत. आकृति क्र. १ आणि आकृति क्र. २ मधील मानवपूर्व वानर योनी पहा.


## आकृति क्र. १



आधुनिक मानव क्रो मॅगनॉन हिन्दरथल राम

## आकृति क्र. २





ऑस्ट्रेलो प्लिओ

होमो इरेक्टस ड्रायो

आधुनिक मानवाअगोदर **क्रो मॅगनॉन** नांवाचा एक मानवसदृश वंश होता? जो कांही प्रमाणांत आजही दिसतो. क्रो मॅगनॉन वंशापूर्वीचा अनुत्क्रांत मानव म्हणजे हिंदरथल होय. याला तत्पूर्वीच्या अनुत्क्रांत वानर-नर वंशापेक्षा नितंब चांगलेच उठावदार होते. असल्या हिन्दरथल वंशाचे पूर्वमानवसुद्धां आज कांही आदिवासी लोकांत सापडतात. परंतु जबडा, दांत आणि नाकाच्या रचनेमुळे असले सक्थिनि किंवा हिंदरथल मानव आधुनिक माणसासारखे उत्तम उच्चार करू शकत नाही. मग वानरवंशाच्या हनुमानाप्रमाणे सर्वांत कठीण अशी संस्कृत भाषा बोलणें तर त्यांना कठीणच. या हिन्दरथल मानवापूर्वीचा नरवानर म्हणजे **राम** (वंश) होय. या नरवानर वंशशृंखलेमधील महत्वाचा दुवा म्हणून एका भारतीय शास्त्रज्ञाने त्याला प्राप्त झालेल्या कवटीवरून शोध लावला. त्या भारतीय वैज्ञानिकाने या वानर-नर दुव्याला राम असे नांव दिले आहे आणि तें चालू आहे.

वानरांतील माणसाचे अगदी जवळ असणारा हा राम फारसा बोलू शकत नव्हता. तो त्याच्या भावनांना धरून कांही आवाज काढी, हुंकार देई किंवा चकल्ल करी. त्याचा जबडा, दांत आणि मेंदू हिंदरथल मानवा-पेक्षा अनुत्क्रान्त असल्याने तो हिंदरथल मानवाइतके सुद्धा तुटके फुटके बोलूं शकत नसे. याचे नितम्ब सुद्धा तत्पूर्वीच्या वानरजातीपेक्षां उन्नत असल्या-मुळें हा राम इतर निम्न वानर जातीपेक्षा सरळ चालूं शकत असें. परंतु आधुनिक माणसाप्रमाणे याची मान ताठ राहूं शकत नसे. राम जातीपर्यंत सर्व मानव-वानरनरांना मुळींच शेंपूट नाही. मग उत्तम संस्कृत भाषा बोलणाऱ्या हनुमन्ताला शेंपूट कसे आणि तो मानव जाती पूर्वीच्या वानर वंशाचा कसा ?

राम जातीपूर्वीची वानर-नर जात किंवा अनुत्क्रान्त वंश म्हणजे **होमो इरेक्टस** होय. हा वानर-नर कसा तरी सरळ चालत असे. पण हुंकार देणें आणि चकल्ल करणें या पलिकडे याला बोलता येत नसे. याचा मेंदू राम वंशापेक्षा निम्न प्रकारचा होता मग हनुमन्ताप्रमाणें बुद्धिमान तर तो मुळींच नव्हता. होमो इरेक्टस पूर्वीची अनुत्क्रांत वानर-नर जाति

म्हणजे ड्रायो होय. ही जात पाठीचे कुबडे काढून चालत असे. या ड्रायो जातीचे हात होमो इरेक्टस पेक्षा थोडे लांब म्हणजे गुडघ्यापर्यन्त होते. यालाही हुंकार किंवा चकल्ल करण्यापलीकडे बोलता येत नसे. याची बुद्धि आणखीच निम्न होती. होमो इरेक्टसप्रमाणें यालाही पुच्छ नव्हते.

ड्रायो वानर-नर जातीपूर्वीचा मानवाचा वानरवंशाचा दुवा म्हणजे **ऑस्ट्रेलो** वानर होय. या ऑस्ट्रेलो मधें वानरवंशाचे गुण अधिक होते. चालतांना हा पूर्ण वाकून आणि जमिनीला हात टेंकीत चालत असे. याचे हात चांगलेच लांब असून ते सहज जमिनीला लागत असत. याची भाषा आणि बुद्धि इतर वानरासारखीच असे. पूर्वीच्या वानर जातीप्रमाणें हा ऑस्ट्रेलो फारसा झाडावर राहात नसे. तो अधिकाधिक जमिनीवरच चालत असे. याला सुद्धा शेपूट नव्हते. रामायणांतील वानरांना लांब लांब शेंपट्या असून ते झाडावरच राहात असत असे म्हटले आहे. यावरून रामायणांतील वानरवंश ऑस्ट्रेलो वानरवंशापेक्षाही अधिक अनुत्क्रान्त असला पाहिजे हे उघड आहे. मग रामायण काळाचे वानर शुद्ध संस्कृत भाषा बोलणारे आणि शिवाय झाडावर राहणारे कसें ?

ऑस्ट्रेलो पूर्वीचे आणखी अनुत्क्रान्त माकड म्हणजे प्लिओ वानरवंश होय. हा प्लिओ जमिनीवर चालत असे आणि झाडावरही राहात असे. याचे हात पायापेक्षा मोठे असून याची बुद्धि इतर माकडाप्रमाणें प्रतिक्रिया स्तरावर (reflex action) असे. याला मुळीं बोलता येत नसे. पण याला सुद्धां हनुमंताप्रमाणे शेंपूट नव्हते म्हणजे शेंपूट असलेला आणि शुद्ध संस्कृत भाषा बोलणारा हनुमन्त आणि त्याची संपूर्ण वानर जात या प्लिओ पेक्षाही आणखी अनुत्क्रान्त जातींतील होती असें म्हणावे लागेल. मानवापासून वानर वंशातील प्लिओपर्यंत सर्व जातींत रामायण कालासारख्या अगदीं अलीकडील काळांत रामायणांत वर्णन केलेली निम्न वानर जात आढळून येत नाही. आमचे विद्वानांचे मतें रामायण काल फार तर सात किंवा दहा हजार वर्षापूर्वीपर्यंत मागे रेटता येईल. आणि आधुनिक मानववंशापूर्वीच्या क्रो मॅगनॉन अवस्थेतून आधुनिक मानववंशांत पदार्पण करायला मानवाला लक्षावधि वर्षे लागलीत. मग क्रो मॅगनॉन वंशापूर्वीच्या करोडो वर्षांपूर्वी

अस्तित्वांत असलेली रामायणकालीन वानर जात कल्पित रामायण कालाच्या पांचदहा हजार वर्षांतील कालांत कशी काय आढळणार ?

यावरून हें स्पष्ट आहे कि रामायणांत वर्णन केलेली वानरजात मानवा पूर्वीची लागूनच असलेली अनुक्रांत नर-जात म्हणजे वानर होत अशी जी आमच्या विद्वानांची कल्पना आहे ती चुकीची आणि अशास्त्रीय दिसते. शास्त्रीय शोधांचा अभ्यास न करतां बसल्या ठिकाणीं तर्कटें सोडण्याच्या वृत्तीचे तें द्योतक आहे. या सर्व मंथनावरून रामायणांत वर्णन केलेले वानर प्रत्यक्ष ऐतिहासिक अस्तित्वें नसून वाल्मिकींच्या योगानुभवांतील तीं कथारुपकें होत हें सिद्ध होते.

## कथेंतील योगरहस्य

रामायणांतील किष्किन्धा कान्ड आणि त्यानन्तर उद्भवलेले हनुमान प्रकरण या सर्व कथांचा योग्य पद्धतीनें अभ्यास आणि विचार करता रामायणकार एक अत्यन्त उच्च कोटीचे योगसाधक असले पाहिजेत असें दिसून येते. आजकाल योगसाधना केवल आसनापुरत्याच मर्यादित असल्यामुळें रामायणांतील किष्किंधा, वालीचा बिलप्रवेश आणि वालीवध इत्यादि कथा समजण्याची पात्रता मोठमोठ्या कथित योग्यांमध्येंही असेल कि नाही हें सांगणें कठीण आहे. वाल्मिकि रामायण व्यवस्थित समजण्या-करताही वाल्मिकि इतकीच श्रेष्ठ योगी अवस्था असणें आवश्यक आहे. यांत अहंकार नसून वस्तुस्थितीचे सत्य आणि निरहंकारी निवेदन आहे. आपण हे पाहिलेच आहे कि रामायणकाराचे खरें व्यक्तिनाम वाल्मिकि नव्हते. रामायण लिहण्याकरता लेखकामधे जी एक उच्च योग्याची योग्यता असणें आवश्यक आहे त्या उच्च योग्यतेचे योग्य विशेषण म्हणजे वाल्मिकि नाम आहे. रामायणासारखा जगत्विख्यात ग्रन्थ लिहिणाऱ्या महापुरुषाचे खरें नाम जगाला अजून माहित नाही.

रामायण सुरवात करतांना वाल्मिकींनी श्रीगणेशायनः या गणेश नमनाऐवजीं श्रीरामचन्द्राय नमः असें रामाचेच नमन केले आहे. नन्तर त्यांनी स्वतःची उच्च अवस्था वर्णन करून ते वाल्मिकी कसें आहेत याचा प्रथमच श्लोक लिहला आहे. व्यासांनी सुद्धा महाभारताचे सुरवातीला व्यासांनाच

वन्दन करवून घेतले आहे. मग त्यांचे हें करणें अहंकाराचे द्योतक आहे कि निरहंकारी सत्य स्थितीचे? निरहंकारी पुरुषच याचे रहस्य समजू शकतील 'येरां गबाळांचे हें काम नोहे.' रामायणांतील पहिलाच श्लोक पहा,

तप:स्वाध्याय निरतं तपस्वी वाग्विदांवरम् ।
नारदं परिपप्रच्छ वाल्मिकि: मुनिपुंगवम् ॥ रामायण कांड १,
सर्ग १, श्लोक १ ॥

आशय असा कि तप आणि स्वाश्याय करून तपस्वी आणि वाग्विद बनलेला महामानव स्वत:ला वाल्मिकी आणि म्हणून सर्व मुनींमधे अतिश्रेष्ठ म्हणजे मुनिपुंगव म्हणवून घेऊं शकतो. घोर तपस्या केल्यामुळें ज्याचे अंगाभोंवती वारुळें आणि उंच गवत वाढलेले आहे असा श्रेष्ठ तपस्वी आणि बुद्धिवान वाग्विद कवी म्हणजे वाल्मिकि होय असें या पहिल्याच श्लोकाद्वारें रामायणकारांना सुचवायचे आहे. मग हा अहंकार कि निरहंकारी वस्तुथिति दर्शन !

ज्ञानेश्वर माऊली सुद्धां स्वत:चे बाबतींत असेंच स्पष्ट निवेदन करतात. एका अभंगात ते स्मत:ला योगिराज म्हणवून घेतात. ते म्हणतात,

अधिक देखणें तरी निरंजन पाहणे ।
योगिराज विनवणें मना आलें वो माये ॥
देह बळी देऊनी साधिलें म्यां साधनीं ।
यानें समाधान मज जोडलें वो माये ॥

ज्ञानेश्वर माऊलीं म्हणतात असले योगिराज पद त्यांना फुकट मिळाले नाहीं तर त्याकरतां त्यांना स्वत:च्या देहाचा बळीं देऊन साधनें करावी लागली. तद्वत् कठोर तपस्या केल्यानन्तरच रामायणकार वाल्मिकि बनू शकले असा रामायणांतील पहिल्या श्लोकाचा अर्थ आहे. ज्ञानेश्वर माऊलीच्या कृपेनेंच लेखक हें रामायण रहस्य लिहूं शकला पण माऊलीची कृपा फुकट होत नसते. केवळ भाराभर पुस्तकें वाचून तशी कृपा प्राप्त व्हायची नाही. त्याकरता माऊलींनी म्हटल्याप्रमाणें 'देह बळीं देऊनी साधिले म्यां साधनीं' असें साधनातप करावें लागते.

वरील कथेंतील योगरहस्य समजण्याकरतां त्यांत उपयोग केलेल्या ाब्दांचा योगार्थ आपल्याला लक्षांत घ्यावा लागेल. रामायण आणि ाहाभारतांत उपयोगिलेले शब्द निरर्थक कथानामें नसून प्रत्येक कथेंत ांगीतलेल्या योगरहस्याची गुरुकिल्ली त्या कथेंत विचार करून योजलेल्या वशेषनामांत सांपडेल. महाराष्ट्रांतील मागील पिढींत सर्वत्र प्रख्यात ासलेले योगिराज वासुदेवानन्द सरस्वति अथवा टेंम्बे स्वामी वानरांना ववेक वृत्ति म्हणतात. ते म्हणतात, 'ततो वानरसह वृत्ति सैन्येन च ानुमता.' परंतु लेखकाचे मते वरील वृत्ति केवल साधारण नसून ायुतत्वांतून प्राप्त झालेल्या अति प्रबल अशा आहेत. म्हणूनच हनुमंताला ामायणकारांनी वायुसुत म्हटले आहे. योग्याला वायुतत्वांत प्राप्त होणाऱ्या ार्व अनुभूति यथायोग्य प्रकट करण्याकरता वालिमकींनी वानरांची नांवे ाली, सुग्रीव, हनुमंत, अंगद, जाम्बुवान, नील, सुषेण, सुहृत इत्यादि ठेवली ाहेत. आवश्यक त्या विशेषनामांतील योगरहस्य पाहू.

## वानर

वा + नर मिळून वानर शब्द झाला आहे. वा या विशेषणांतून ाश्चर्य प्रकट झाले आहे. असेंच आश्चर्य वामन शब्दांतून प्रकट झाले आहे. ाणसाचे एवढेसे मन साऱ्या विश्वाला गंवसणी घालू शकते म्हणूनच ्याबद्दल अति आश्चर्य वाटून वामनावताराने त्रिखंड पादाक्रांत करून तिसरे पाऊल स्वत:ला बली मानणाऱ्या असुर राजाचे मस्तकावर ठेवून ्याला पातालांत गाडला आहे. माणसाच्या मनांत एवढी प्रचंड शक्ति आहे. तद्वत् साधा नर पण त्याने वायुतत्वाची साधना केल्यास त्याच्यात विलक्षण शक्ति आणि वृत्ति सामर्थ्य येऊन तो योगसाधक क्षणाच्याही क्षणांत त्रिखंड ाजवू शकतो असले आश्चर्यकारक अचाट प्रयोग करणारे नर यांनाच वालिमकी वानर संबोधतात.

वायुतत्व समजण्याकरता आपल्याला प्रथम सृष्टीरचनेंतील वैदिक रहस्य समजावे लागेल. वैदिक आणि आजच्या वैज्ञानिक पद्धतीनुसार सुद्धां सृष्ट जगत पांच अवस्थाभेदाने प्रकट होत असते. मूल प्रकृतींत विकृति स्पन्दन उत्पन्न होऊन प्रथम आकाशतत्व उत्पन्न होते. काश म्हणजे आवरण

घालणें आणि आकाश म्हणजे यच्चयावत् अवस्थाजात किंवा वस्तुजाताला अन्तर्बाह्य आवरण घालणें किंवा व्यापणें. या आकाश तत्वाचे वर्णन नासदीय सूक्तांत फार उत्तम तऱ्हेने केले आहे, 'आनदिवातं स्वधया तदेकं' आशय असा कि सृष्टयारंभी एकच तत्व स्वतःत स्पन्दन करीत होते. आकाश तत्वाचा गुण नाद असून त्याचा वर्ण नीलश्याम आहे. म्हणूनच आकाशतत्वाच्या देवतांचा वर्ण नीलश्याम दाखविला असून त्यांचे नामसंकीर्तन नादरुपाने सदा चालूं असते. विष्णु, राम आणि कृष्ण या उच्च आकाशतत्वाच्या देवता मानल्या आहेत त्यामुळें विष्णु, राम आणि कृष्ण हे नीलश्याम वर्णाचे दाखविले आहेत. नीलश्याम वर्णाची व्यक्ति जन्मालाच येऊं शकत नाही. यास्तव रामायणांतील प्रभु रामचन्द्र कोणी ऐतिहासिक व्यक्ति नसून तत्वावधानानुसार आदर्श साकारीकरण आहे.

आशतत्वानंतर वायुतत्व येते. वायुतत्व म्हणजे स्पन्दन. पण हें स्पन्दन एकाच क्षणाच्याही क्षणांत सर्व विश्वाला व्यापते. आकाशतत्वस्पन्दन आपल्या स्थानींच सर्व विश्वाला व्यापून उरते (दशांगुलें उरला), तर वायुतत्व क्षणाच्याही क्षणांत सर्व विश्वांत स्पन्दनाचा फेरा मारून पुन्हा स्वस्थानीं येईल. प्रकाशाचा वेग तर क्षणाला १८६७०० मैल आहे. या वेगाने आपल्या एका ब्रह्मांडाचा फेरा मारण्याकरता आपल्याला ३५० कोटी प्रकाश वर्षे लागतील. प्रकाश वर्षे म्हणजे काय? एका सेकन्दाला १८६७०० मैल प्रकाशाचा वेग आहे. तो एक मिनिटाला १८६७०० $\times$ ६० मैल तर एका तासाला तो १८६७०० $\times$ ६० $\times$ ६० मैल राहील. अशा तऱ्हेने एका दिवसांत प्रकाशाचा वेग १८६७०० $\times$ ६० $\times$ ६० $\times$ २४ मैल राहील आणि एका वर्षात त्याचा वेग १८६७०० $\times$ ६० $\times$ ६० $\times$ २४ $\times$ ३६५$\frac{१}{४}$ इतके मैल राहील. इतक्या प्रचंड वेगाने ३५० कोटी प्रकाश वर्षे फिरत राहिल्यास आपण आपल्या एकटया ब्रह्मांडाला फेरा घालूं शकू. आणि वायुतत्वाने फेरा घालू गेल्यास आपल्याला त्याच क्षणांत ब्रह्मांडाला वळसा घालून यावे लागेल.

अबब, एवढा प्रचंड आणि अतर्क्य वेग? होय वायुतत्वाचा इतका कल्पनातीत आश्चर्यकारक वेग आहे म्हणूनच त्याला वा आयुः असें

आश्चर्यानें म्हटलें आहे. या कल्पना नसून वायुतत्वांत अवगाहन करणाऱ्या साधकाच्या प्रत्यक्ष अनुभूति आहेत. येथें कल्पनेला वाव नाही तर प्रत्यक्ष अनुभूति प्रामाण्य आहे. आकाशतत्वांत प्रवेश करण्याकरतां साधकाला प्रथम वायुतत्वाचा अनुभव घ्यावा लागतो. वायुतत्वाचे सहाय्य घेतल्याविना आकाशतत्वीय अनुभव येतच नाहीत. म्हणूनच आकाशतत्वीय साधक देवता भगवान रामचन्द्र रामायण युद्धांत वानरांचे सहाय्य घेतात. म्हणूनच वायुसुत हनुमानाचे खांद्यावर बसून रामलक्ष्मण गमन करताना दाखविले आहे. रामायणांतील वानर सेना म्हणजे वायुतत्वांतील प्रबल शक्ति आणि वृत्ति होत. आतां कथारुपानें त्या लिहल्यास त्यांना वानर समजून त्यांना पुच्छ दाखविणें आणि आकाशांत उड्डाण मारतांना दाखविणें भाग आहे.

रामायणांतील वानर सेना प्रत्यक्षांत कधींच नव्हती किंवा आजही नाही. वायुतत्वांतील प्रबल अनुभूतीचे ते रुपकात्मक साकारीकरण आहे, इतिहास तज्ज्ञांनी हें रहस्य लक्षांत घ्यावे.

## वाली

वाली विशेषनामांत दोन उपशब्द आहेत. वा + अली. वा हे आश्चर्याचे द्योतक असून अली या शब्दांतील अल् शब्द महत्वाचा आहे. अल् म्हणजे मूलस्पन्दन, मूलावस्था ! याच अल् शब्दाला ल हें उपपद लागून अल्ला: शब्द बनला आहे. इस्लामी पंथाने मूल शक्तीकरता वापरलेला शब्द अल्लाहच आहे. अल्ला: शब्द वैदिक आहे इस्लामी नाही. यास्तव त्या प्रबल आश्चर्यकारक मूलशक्तिची आठवण करून देणारी वायुतत्व अनुभूति म्हणजे वाली होय. वायू ही साधकाची प्रबल अनुभूति आहे, ते ऐतिहासिक उदाहरण नव्हे म्हणूनच वालीला रामायणकारांनी अति बलाढ्य वानर दाखविला आहे. वाली अतीशय आध्यात्मिक दाखविला आहे. तो तिन्ही सागरावर वायुवेगाने जाऊन त्रिकाल सन्ध्यावन्दन करतांना दाखविला आहे. रावणाला सुद्धा त्याचेशी भयानेच राहावे लागे. असा महान् पराक्रमी, नीतिमान, आध्यात्मिक वृत्तीचा आणि सर्व वायुतत्वीय वानरांचा राजा वाली !

तारा वालीची पत्नि दाखविली आहे. इन्द्राणी प्रमाणें तारासुद्धां जो कोणी वानरराज्याचा प्रमुख बनेल त्याची धर्मपत्नि बनत असे. तारा

ऐतिहासिक अभिव्यक्ति मानल्यास कोणत्याही पुरुषाला आपला पति मानणारी कुलटा पंचकन्येतील आदर्श स्त्रींत कशी बसूं शकेल? तारा ही ऐतिहासिक अभिव्यक्ति नसून वायुतत्वांतील अभिव्यक्तीचे प्रक्षेपण आहे हे कळल्यास तारेला पंच अभिव्यक्तीरुप पंचकन्येत मानाचे स्थान देण्यास हरकत असूं नये. तार म्हणजे अति प्रबल प्रक्षेपण किंवा विग्रह (radiation) वायुतत्वांतील अभिव्यक्ति प्रचंड सामर्थ्यवान आणि विग्रहकारक असतात म्हणूनच रामायणकार तारेला वालीची पत्नि मानतात. जो जो साधक असल्या वाली अवस्थेंत राहील तो तो वानरराज्याचा प्रमुख राहील म्हणून त्याची पत्नि तारा नको का राहायला? म्हणूनच तारा वानरप्रमुखाची आपणहून पत्नि बनत असल्याचे दाखविले आहे. या अर्थाने सुग्रीव राज्यप्रमुख झाल्यावर त्याची सुद्धां पत्नि म्हणून तारा राहिल्याचे रामायणांत दाखविले आहे. इन्द्राणी सुद्धां अशीच दाखविली आहे. जो कोणी शत यज्ञ करून इन्द्र बनेल त्या इन्द्राची पत्नि आपणहून इन्द्राणी बनते. इन्द्राणी श्रेष्ट अधिकाराचे सिंहासन आहे. भारताचा जो प्रमुख बनेल त्यालाच ती खुर्ची आपणहून मिळेल तद्वत इन्द्र वा वाली जो बनेल त्याची पत्नि आपणहून इन्द्राणि किंवा तारा बनेल.

अंगद हा वालीचा पुत्र दाखविला आहे. बापाप्रमाणें अंगद महान् पराक्रमी, सज्जन आणि बुद्धिमान दाखविला आहे. रामाचा अंगदावर फार भरवंसा असे. रावणाकडे शिष्टाई करता राम अंगदालाच पाठवितात. रावणाचा यज्ञभंग करण्याकरता राम अंगदालाच पाठवितांना दाखविले आहे. अंगद शेंवटी रावणपत्नि मंदोदरीचे वस्त्रें फेडतो आणि रावणाला यज्ञस्थान सोडण्यास भाग पाडतो. वायुतत्वातील प्रकांड प्रबल आणि आणि जीवघेऊ अनुभव घेण्याकरतां साधकाचे जडशरीर सुद्धां तितकेंच प्रबल शक्तिशाली असावे लागते. दुर्बल शरीराचा म्हणजे अंगाचा साधक वायुतत्वांतील प्रबल अनुभव घेऊंच शकत नाही. वायुतत्वाच्या साधकाचे अंग तितकेंच प्रबल बनते. वायुतत्वाच्या साधनेचे फल देणारे साधकाचे अंग असते. म्हणूनच अंगदाला वालीचा पुत्र दाखविला आहे. वायुतत्वानुरुप योग्य असे अंग + द म्हणजे देणारी प्रकृति अवस्था म्हणजेच अंगद!

## सुग्रीव

वालीचा धाकटा भाऊ सुग्रीव. दोघेही भाऊ चेहऱ्यामोहऱ्यानें अगदीं सारखेच पण सुग्रीवापेक्षा वाली अधिक बलशाली होता. याचा खरा आध्यात्मिक अर्थ असा कि वायुतत्वांतील वाली अवस्था सुग्रीव अवस्थेपेक्षा अधिक बलवान असते. ग्रीवा म्हणजे कण्ठ आणि सुग्रीव म्हणजे उत्तम कण्ठ. ज्या साधकाचा कण्ठ म्हणजे वाणी अति आकर्षक असते अशा श्रेष्ठ साधकाला रामायणकार सुग्रीव असे नामाभिधान देतात. स्वामि विवेकानन्दांचे मनांत नेहमीं द्वंद्व उभें राहायचे, रामकृष्ण परमहंस श्रेष्ठ कि वाराणसीचे पवनहारी बाबा श्रेष्ठ ? आणि त्याचे कारणही तसेंच होते. पवनहारी बाबा अन्न ग्रहण करीत नसत आणि त्यामुळें त्यांचा आवाज कोकिळेप्रमाणें रम्य होता. रामायणकारांचे नामाभिधानानुसार पवनहारी बाबा सुग्रीव होते; आणि पवनहारी कां तर ते वानराप्रमाणें अन्न भक्षण न करतां वायु म्हणजे पवनच भक्षण करीत होते. विवेकानन्दांना ज्यांचे सदैव आकर्षण असावे अशी श्रेष्ठ साधकावस्था म्हणजे सुग्रीव होय. वाली अवस्था सुग्रीव अवस्थेपेक्षांही प्रबल असते.

## किष्किंधा नगरी

वाली, सुग्रीव, तारा, अंगद आध्यात्मिक अनुभूती मानल्यास किष्किंधा नगरी सुद्धां त्याच दिव्य अनुभूतींतील एक स्थायी अवस्था आहे हें ओघानेंच आले. वायुतत्व ओलांडून आकाशतत्वांत गमन करणाऱ्या श्रेष्ठ साधकाची स्थिर अनुभूति म्हणजे किष्किंधा होय. ही किष्किंधा अवस्था समजणे अति दुर्लभ आणि दुष्प्राप्य आहे, मग तिचे वर्णन ऐकून ती लक्षांत येणें तर त्याहूनही कठीण ! लक्षावधी उच्च साधकांतून एखादा परम उच्च साधक किष्किंधा अवस्था अनुभवूं शकतो, जाणूं शकतो. वायुतत्वांतून आकाशतत्वांत गेल्यावर साधकाला असा दुर्धर आणि दिव्य अनुभव येतो कि हे सारे विश्व कशावर आधारलेले आहे ? या सर्व वस्तुजाताला आवरण कशाने केले आहे ? या विश्वाची धारणा कशामुळें होत आहे ? अशा विचित्र दिव्य अनुभूतींचे सूत्र म्हणजे किष्किन्धा होय. 'किः + किम् + धा'

हे तीन उपशब्द मिळून किष्किधा शब्द बनला आहे. या किष्किधाचे वर्णन ऋग्वेदांतील नासदीय सूक्तांत केले आहे. शब्दापलीकडील अवस्था ऋषींनी शब्दांत व्यक्त केली आहे. ते त्या मूलावस्थेचे वर्णन करतात, 'किमावरीव: कुहकस्य शर्मन् अम्भ:' म्हणजे त्या मूलावस्थेंत कशाने कशाला आवरले होते आणि कोणी कोणाला प्रेरित केले होते ?

किष्किधा नगरी ही अति उच्च साधकावस्था आहे. यापेक्षां अधिक किष्किधेबद्दल सांगता यायचे नाही. ज्ञानेश्वर माऊली म्हणतात, 'कैसे बोटाने दाखवूं तुला । घेई अनुभव गुरूच्या मुला ॥' थोडक्यांत म्हणजे निर्विकल्प समाधि हीच किष्किन्धा होय.

# सप्तम अध्याय

## वालीचा बिळ प्रवेश

भावनाप्रधान किंवा बुद्धि चातुर्याचा उपयोग न करणारे बरेच भारतीय वाली कथेंतील वालीचा बिळप्रवेश आणि त्या बिळांत वालीने वर्षभर राहणें अगदीं सम्भवनीय मानतात आणि तें सिद्ध करण्याचे भरास पडतांना वाटेल तो तर्कवाद करण्यास मागेंपुढे पहात नाहीत. आमच्या कथित इतिहासकारांबद्दल तर बोलायला नको. असले विवर वा बिळ ते किष्किंधेपासून लांबवीत पृथ्विच्या गर्भांतील भयंकर उष्णतेला न जुमानता पार करीत अगदी अमेरिकेतील कोणत्या तरी प्रदेशांत उतरतात आणि वालीचे वानरराज्य अमेरिकेंपर्यन्त पसरले होते असा शोध लावून स्वनामधन्य होत्साते एक प्रकारच्या समाधिसुखांत विलीन होतात. दुसरा कथित बुद्धिप्रामाण्यवादी पक्ष पूर्णपणें व्यावहारिकदृष्टया विचार करून असा निष्कर्ष काढतो कि संपूर्ण वालीकथा आणि त्याचे बिळांतील वर्षभराचे वास्तव्य एक विलक्षण कपोलकल्पना असून खोटी आहे. दोन्ही पक्ष आपापल्या परीने जो निष्कर्ष काढून कित्येकवेळा हमरी तुमरीवर येतात याचे प्रमुख कारण म्हणजे दोघांनाही रामायणकथांत विलक्षण पद्धतीनें गुंफलेली जटिल योगरहस्येंच माहीत नसतात. आणि याचे कारण आमच्या भावनाप्रधान आणि बुद्धिप्रामाण्यवादी लोकांतून नष्ट झालेली योगविद्या! कोणालाच गहन योगरहस्यांचा अनुभव नसण्याचे पोटी हे सारे तर्कवितर्क आणि अपसिद्धान्त निघू पाहतात आणि केवळ विवादांतच अध्यात्म आहे असें मानल्या जाते.

ज्या कोणा महाभागांना योगविज्ञानांतील गहन अवस्थांचा प्रत्यक्ष अनुभव असेल त्यांना वाली अवस्था आणि त्याची किष्किन्धा नगरी या प्रकरणांतील वाल्मिकींनी आपल्या गुह्य भाषेंत वर्णिलेल्या गुह्य प्रकरणांचा बोध झाला असेल, नसल्यास कांही कल्पना तरी येऊं शकली असेल. वालीचा बिळप्रवेश आणि त्याचे त्या बिळांत जवळजवळ वर्षभर वास्तव्य या रूपकात्मक वर्णनांत वाल्मिकींनी दीर्घकाल टिकणाऱ्या महान योग्याच्या

समाधि अवस्थेचे वर्णन केले आहे हें मोठमोठ्या पंडितशास्त्र्यांच्या सुद्धां लक्षांत येत नाही. आणि याचे मुख्य कारण म्हणजे वर स्पष्टपणें सांगितल्यानुसार आमच्या शास्त्रीपंडितांचे योगजीवन विस्मरण आणि केवळ ग्रन्थिक प्रामाण्य ! असल्या ग्रन्थप्रामाण्यवादी अनभवरहित वादविवादांत धन्यता मानणाऱ्या शास्त्रीपंडितांना रामायणकारांनी ऋषिकुलोत्पन्न ब्राह्मण रावण म्हटले आहे दशग्रंथ मुखोद्गत करणारा दशमुखी रावण, आपल्या कथित पांडित्याचा जगभर डंका गाजवून प्रतिपक्षाला आपण काय पण नामोहरण केले अशा राक्षसी अभिनिवेशांत राहणारा रावण (रवतीति रावण:), आपल्या पुस्तकी पांडित्याचे बळावर मिळविलेले धन आणि बहुमान म्हणजे माया (लं) मोजणारा (अंका) रावण, आपल्यांतील रामवृत्तीच्या सीतेचे बळेंच हरण करून त्या सीतावृत्तीला लंकेतील त्याला वाटणाऱ्या ज्या स्थानीं आतां शोक करण्याचे कारण नाही अशा अशोक वनांत ठेवणारा रावण, आपल्यांतील उच्च अशा वायुतत्वांतील अनुभवरूप वानरांना मारणारा रावण आणि या सर्वावर मात म्हणजे स्वत:तील निरपेक्ष आणि उच्च असा जो आनन्दघन राम त्याचेच जिवावर उठणारा रावण !

रामायणांतील खलनायक रावण आजही कोरडे पांडित्य दाखवून त्यांत धन्यता मानणाऱ्यांचे स्वरुपांत, शास्त्रांचा निरर्थक कीस काढून त्यावर न जाणाऱ्या अभिनिवेशी शास्त्र्यांचे स्वरुपांत आणि केवळ कथित बुद्धिवादासारख्या राक्षसी स्वरुपांत जिवंत आहे ! एवढें स्पष्ट आणि कडक लिहण्याचे कारण म्हणजे आज सर्वत्र बोकाळलेली पाखंडीवृत्ती आणि बुवाबाजी होय. नास्तिकपणामळें समाजाचे जेवढे नुकसान होत नसते तेवढे स्वत:ला आस्तिक मानणाऱ्या परन्तु अनाध्यात्मिक जीवन जगणाऱ्या पाखंड्याकडून होत असते. आध्यात्माचे वा धर्माचे रक्षण जर करायचे असेल तर असल्या पाखंड्यावरच सरळ हल्ला करणे आवश्यक आहे. तुकाराम महाराज आपल्या स्पष्ट कडक वाणींत सांगतात, 'धर्माचे कारण करणें पाखांड खंडण । नाही भाडभीड । तुका म्हणे सानथोर ॥' धर्माचे नांवावर बुवाबाजी करणाऱ्यांना, शास्त्रांचा व्यर्थ कीस काढून कालापव्यय करणाऱ्यांना, कर्णाप्रमाणें केवळ पुस्तकी पांडित्यावर सभा जिंकणाऱ्यांना, प्रवचनें देऊन अथवा कीर्तनें झोडून त्यांतून कामिनि कांचन कीर्तीच्या क्षुद्र

लाभावर लक्ष ठेवणाऱ्या वावदुकांना आतां समाजाने खडसावून बजावले पाहिजे कि आध्यात्म्यांतल्या प्रत्यक्ष अनुभूति आणि निष्काम वृत्ति असल्यासच बोला अन्यथा आपली बडबड बन्द करा !

## वालीचे बिळ

मराठींत ज्याला आपण बिळ म्हणतो. त्यालाच संस्कृतमध्यें बिलं असे म्हणतात. बिळ म्हणजे अति बारीक छिद्र. असल्या बिळांत फक्त उंदीर किंवा सांपच राहू शकतात. असल्या बिळांत वालीसारखा विशाल शरीराचा माणूस कसा काय जाणार ? आणि असल्या बिळांत वाली एक संवत्सर कसा काय राहणार याचा विचार कोणीच करीत नाही. म्हणजे वालीचे बिळ म्हणजे साधे उंदिराचे बिळ नसून अन्य कांही असले पाहिजे. आणि ते म्हणजे सुषुम्नेची पोकळी होय.

सन्ध्यावन्दन करतांना आपण नित्य म्हणतो, 'अन्तश्चरति भूतेषु गुहायां विश्वतोमुख: त्वं यज्ञं वषट् कार:त्वं विष्णु: पुरुष:पर:'. विष्णुचे परमपद प्राप्त करून देणारी आणि विश्वाचे प्रवेशद्वार असणारे हे वालीचे बिळ आहे. योगविज्ञानानुसार आपल्या शरीरांत अनेक योगनाड्या आहेत. त्यापैकी महत्वाच्या तीन आहेत. डावीकडे स्पन्दन करणारी ती ईडा, उजवीकडे स्पन्दन करणारी ती पिंगळा आणि या दोहोंच्या मध्ये स्पदनरहित शून्य अवस्थेकडे घेऊन जाणारी ती सुषुम्ना नाडी होय. या सुषुम्नेचे द्वार म्हणजे मूलाधारस्थित कुंडलिनि होय. कुंडलिनि उध्र्वगामी होऊन षट्चक्राचा भेद करून ज्यावेळेस सप्तम चक्र सहस्रारामध्ये स्थिर होते त्यावेळेस साधक विष्णु बनून परमपदाला पोंहचतो. याच विष्णुरुप परमपदाचे वर्णन वरील सन्ध्यावन्दनांतून केले आहे. रोज सन्ध्या करतांना अंगावर पाणी शिंपडून किंवा टाळी वाजवून स्वत:भोवती गिरक्या मारून हे परमपद प्राप्त होणार नाही तर प्रत्यक्ष योगाभ्यासाद्वारें प्रगती करीत करीत त्या पदाला जाण्यानेच ते प्राप्त होईल.

सहस्रारामध्यें स्वत:ला विसरणाऱ्या विष्णुरुप योग्याला समाधि अवस्थेंत कालाचे भान नसते. घटिकामागें घटिका जातात, दिवसामागें दिवस जातात आणि मासामागें मास जातात पण त्या विश्वाच्या खोल

गुहेंत गेलेला विष्णुरुप वाली योग्याला कालाचे भान नसते. तेथे काल नसतो. त्या मुचकुन्द अवस्थेंत कालयवनाचा नाश होत असतो, महाभारतांतील कालयवन आणि मुचकुन्द कथेंत हेंच वालीच्या बिळ प्रवेशाचे रहस्य अन्य भाषेंत सांगीतले आहे. वालीने ज्या प्रबल शत्रूचा पाठलाग केला त्याचे नांवसुद्धा योगीराज वाल्मिकि मोठ्या योगकौशल्याने ठेवतात मायावी दुन्दुभि! दुन्दुभि म्हणजे अनाहतनादाचा अहंकार!! — या दुन्दुभिला वाल्मिकी वानरांचा शत्रू कां समजतात? तर चिर सहज समाधि अवस्थे-समोर असली अल्पकाल टिकणारी अनाहतनादावस्था निम्नच असते. समाधि एक सहजावस्था असायला हवी, उठता, बसता, खाता, पिता, जागृती, निद्रेंत सुद्धां! म्हणूनच योगीराज कबीर म्हणतात, 'साधो सहजसमाध भली! असल्या सहजसमाधि अवस्थेंपेक्षा (एक वर्ष टिकणारी वालीची समाधि अवस्था) दुन्दुभिचा बिळप्रवेश निम्न प्रकारचाच होता. म्हणून असल्या निम्नावस्थेचा म्हणजे दुन्दुभीचा वध करून वाली नित्य असणाऱ्या आपल्या वानर राज्यांत येण्याकरतां त्या सुषुम्ना बिलातून वर्षभरानें परत येतो.

असल्या उच्च समाधि अवस्थेंत वालीला कालाचे विस्मरण होणें स्वाभाविकच होते. त्या बिलाच्या द्वारावर म्हणजे समाधि अवस्थेच्या बाहेर असणाऱ्या सुग्रीवाला लौकिक अर्थाने जाणीव होती कि वालीला बिलांत जाऊन वर्ष झाले आहे, पण कालाचे वर जाणाऱ्या योगी वाली अवस्थेला वाटले कि कोणताच काल न लोटतां सुग्रीवाने त्या बिलाचे द्वार बन्द कां करावे? माझा आवाज मृदु सुरेल आहे आणि मी पवनाहारी आहे असा अभिनिवेश धरणाऱ्या सुग्रीवाला वालीच्या बिलाचे म्हणजे समाधिमार्गाचे द्वार बन्द करणें योग्य वाटले कारण तो लौकिक जगतांत वाट पाहून पाहून आतां थकला होता. समाधि अवस्थेंत राहणाऱ्या योग्याला कालाचे भान नसते आणि त्यामुळें त्या अवस्थेचा कंटाळा येण्याकरता तो देहभानावर नसतोच. पण लौकिक व्यापारांत असणाऱ्या इतर माणसांना योग्याच्या समाधिकालांत कांही काम न करता केवळ तिष्ठत बसणें अशक्यप्राय बनते. एखाद्याची वाट पाहतांना पांच मिनिटें सुद्धां पांच युगासारखी वाटतात मग वालीचा एक वर्षांचा कालावधि सुग्रीवाला किती कंटाळवाणा वाटला असेल? त्यानें

समाधि अवस्थेचे वालीद्वार बन्द करून आपल्या वानर राज्याला परत येण्यास तो निघाला.

## वालीचे काल्पनिक मरण

इतका काळ वाली बिळांत जिवंत राहणें अशक्यच असें वाटून सुग्रीवाने बिळाला सील ठोकून (शिला लावून) किष्किन्धेला प्रयाण केले आणि वाली मेला असें समजून त्याचे और्ध्वदेहिक आटोपून वानरराज्याचा प्रमुख झाला. वानरराज्याचे रीतिनुसार वृत्तींचा विग्रह करणारी तारा आतां सुग्रीवाची धर्मपत्नि बनणारच! तारा सुग्रीवाची पत्नि बनून त्याला सर्व सुख देऊं लागली. एखादा योगी सतत समाधींत असला म्हणजे त्याचे रुधिराभिसरण, हृदय, नाडी (metabolism) बन्द असतात. परम-योग्याच्या असल्या परमअवस्थेचे साधारण साधकाला ज्ञान नसल्यामुळे तो योग्याला मेला असें समजून आपलें दैनंदिन व्यवहार सुरुं करतो. दैनिक व्यवहारांतील वृत्ति विग्रह म्हणजेच तारा परमपदाला पोंचलेल्या वालीचा त्याग करून व्यावहारिक अवस्थेंत असणाऱ्या साधकाची म्हणजे सुग्रीवाची धर्मपत्नि बनते. तारा सुग्रीव मोठ्या आनंदानें कालक्रमणा करतात. एवढ्यांत बिळाचे सील तोडून वाली वानर राज्यांत परत येतो. वाली आणि सुग्रीव आतां एकाच निम्न अवस्थेंत असल्यानें आपली विग्रहवृत्ति तारा ज्या सुग्रीवानें बळकावली तिला आपली करून सुग्रीवाला वानर राज्याबाहेर घालविणें वालीला आवश्यक होते.

एकाच वृत्तीला वा अवस्थेला दोन नांवे ठेवता येत नाही. एकाच परमपद सत्याला आम्ही व्यवहारांत जरी ब्रह्म, परमेश्वर, प्रभु आणि अल्लाह म्हणत असलो आणि केवळ नांवाचाच निरर्थक अभिनिवेश धरून एकमेकांच्या माना कापीत असलो तरी खऱ्या योगसाधकाला शब्दच्छलांत मुळींच रस वाटत नसतो. एकाच अवस्थानुभवाचे दोन नांवे तो नाकारतो. वैदिक शास्त्र स्पष्ट सांगतात, 'एकं सत् विप्रा बहुधा वदन्ति' या सत्यवचनानुसार वाली आपल्याच अवस्थेला ठेवलेल्या दुसऱ्या नांवाला म्हणजे सुग्रीवाला निष्कासित करतो. वाली सुग्रीवाच्या पत्निचे म्हणजे वृत्तीचे सुद्धां हरण करतो आणि त्याला वानर राज्याचे बाहेर घालवतो.

योगमार्गातील दुर्लभ अनुभवावर इतके सुन्दर रुपक देऊं शकणारा लेखक या जगांत दुसरा आहे काय? एक वाल्मिकीच ते करूं जाणे. म्हणूनच स्वतःला लोक काय म्हणतील याची पर्वा न करतां वाल्मिकि स्वतःच स्वतःला 'तपस्वाध्याय निरतं वाल्मिकिः मुनिपुंगवं' असे म्हणवून घेतात. योगीसन्त ज्ञानेश्वर माऊली सुद्धा स्वतःला योगिराज म्हणवून घेतात, 'योगिराज विनवणें मना आले वो माये' असें ते लिहतात.

परन्तु श्रेष्ठ पुरुषांची अवस्था मुळींच प्राप्त न करता लोकांना खोटयाच चमत्कारांवरच भुलविणारे अहंकारी पायघोळ सन्त आणि आचार्य मात्र स्वतःला भगवान म्हणवितांना पाहून त्यांची आणि त्यांच्या मूर्ख भगतगणांची कींव केल्यावांचून राहवत नाही. चन्द्रमंगळावर सूक्ष्म देहानें जाऊन येणारा आणि बसल्या स्थानीं त्रिभुवनांत कोठे काय चालले आहे हें दिव्यदृष्टीनें सांगू शकणारा आणि आधुनिक प्रचारकिमयेंत निपुण असणारा एक कथित योगी सूटबूट घालून पुढें येत आहे. असल्या पाखंडयाचे नादीं समाजानें न लागतां योगमार्गाची कांस धरून स्वतःच स्वतःचा उद्धार करावा असें सांगावेसे वाटते. 'उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत्' गीता सांगते.

## पम्पासरोवर आणि ऋष्यमूक पर्वत

अशा तऱ्हेनें निष्काषित सुग्रीवाने म्हणजे साधकाच्या साधारण अवस्थेनें पम्पा सरोवराजवळील ऋष्यमूक पर्वतावर आपलें बस्तान मांडले. रामायण महाभारतांतील उपयोजिलेल्या प्रत्येक शब्दांत योगरहस्य आहे. पम्पा शब्द दोन उपशब्दांपासून बनला आहे. एक 'पं' आणि दुसरा 'अम्ब'. पं म्हणजे पतन आणि अम्ब म्हणजे जल किंवा योगविज्ञानांतील आप तत्व (पंचतत्वापैकी खालून दुसरे. पहिले पृथिवि तत्व तर दुसरें आप तत्व). राम आकाशतत्वांतील उच्च साधकावस्था आहे. परन्तु सीतेचे हरण रावणवृत्तीद्वारें झाल्यामुळें आतां रामानें सीतावृत्ती करतां विलाप सुरु केला होता. रामासारख्या उच्च आदर्श पुरुषाने एखाद्या स्त्रीलंपट माणसाप्रमाणें झाडावेलींना कवटाळून विलाप कां करावा याचें रहस्य विद्वानांना समजत नाही. परंतु भावनाप्रधान बुद्धिहीन माणसें सांगून मोकळे

होतात, 'अहो, रामाला कसली पत्निची माया ? सीतेचा शोक करणें म्हणजे रामाची लीला होय !'

रहस्य वेगळे आहे. मोठमोठे साधकसुद्धां आपल्या वृत्तींचा त्याग करायला तयार नसतात. चांगली वृत्ती जरी मानली तरी ती शेवटीं वृत्तीच ना ? आणि परम योग्याला तर चित्तवृत्तींचाच निरोध करायचा असतो; आणि चित्ताला स्थिर करून समाधि अवस्थेंत जायचे असते. भगवान पातञ्जली पहिल्याच सूत्रांत योगरहस्य सांगतात, 'योगः चित्तवृत्ति निरोधः' चित्तवृत्ति निरोध करायच्या म्हणजे चित्तांत वृत्तीच उत्पन्न होऊं न द्यायची. मग असल्या उच्च अवस्थेंतील रामानें आपल्या आनन्दवृत्तीचे म्हणजे सीतेचे हरण रावणवृत्तीद्वारें झाल्यास 'हा सीता, हा सीता' म्हणीत विलाप कां करावा ? यावरून आपली उच्च आकाशतत्वीय भूमिका सोडून रामासारखा उच्च साधक आपल्या सीतावृत्तीचे हरण झाल्यामुळें दु:खी होऊन विलाप करतो हें योगमार्गांतील महान रहस्य वाल्मिकींना रामविलापांतून दाखवायचे आहे. राम साधक आपली उच्च आकाशतत्वीय भूमिका सोडून सीता आनन्द प्राप्त करण्याकरता खालच्या आपतत्वांत येतो. 'आप्' म्हणजे प्राप्त करणें. आपला सीतारूप वृत्तीचा आनन्द प्राप्त करण्यास रामाला आपतत्वांत येणें आवश्यक होते. वास्तविक आकाशतत्वांतील उच्च साधक रामानें खालच्या आपतत्वांत यावे हे अधःपतन आहे. पण रामानें तें होऊं दिले. मोठमोठे साधक सुद्धां वृत्तीला बळी पडतात त्यांतीलच हे वाल्मिकीय सुन्दर रुपकात्मक वर्णन आहे.

पं म्हणजे पतन आणि अम्ब म्हणजे आपतत्व दोन्ही मिळून नवीन शब्द पम्पा होतो. म्हणूनच आपतत्वासारख्या पतित निम्नस्तर तत्वावर म्हणजेच पम्पा सरोवराजवळ रामाची सुग्रीव दूत हनुमानाशी भेट झाली असे रामायणकार दाखवितात. सुग्रीवाच्या पत्निचे म्हणजे वृत्तीचे सुद्धां वालीने हरण केले होते. वृत्तीहरण वा पत्निहरणामुळें आकाशतत्वीय राम आकाशतत्वाचे वाहकतत्व वायुतत्वीय सुग्रीव समदुःखी बनले होते. 'समान शीले व्यसनेषु सख्यं' आकाशतत्वाकडे घेऊन जाणारे वाहक वायुतत्व आणि म्हणून रामायणीत रुपकाने वायुपुत्र हनुमान रामाला घेऊन गन्धमादन पर्वतावर गेला. तेथे त्याचा पूर्वाश्रमीचा स्वामि सुग्रीव वास्तव्य करीत

होता. सुग्रीवाने मानवाचे सुन्दर रुप घेऊन रामाला आलिंगन दिले आणि रामसुग्रीव मित्र बनले. म्हणजे आकाशतत्वाने आतां वायुतत्वाचा आधार घेतला आणि आकाशतत्वाच्या आधाराने आतां वायुतत्व प्रगति करूं इच्छित होते. सुग्रीवाने सीता शोध करून रामाला सेनासहाय्य देण्याचे ठरविले तर सुग्रीवाला त्याचे वायुतत्वीय राज्य मिळवून देऊन त्याच्या वृत्तीरूप पत्निला त्याला मिळवून देण्याचे अभिवचन रामाने दिले.

वरील कार्य घडविण्याकरता म्हणजे वायुतत्वांतील निम्न स्तरावरील वृत्तीरूप सुग्रीवाला वायुतत्वांतील त्यापेक्षां उच्च अशा वाली स्थानावर स्थानापन्न करण्याकरतां वालीचा वध करण्यापलीकडे रामाला गत्यन्तर नव्हते. म्हणून कथारुपाने वालीचा वध करून सुग्रीवाला त्याचे जागीं स्थानापन्न करण्याचे रामाने कबूल केले. राम सुग्रीवाची भेट ऋष्यमूक पर्वतावर झाली. सुग्रीव आणि राम भेट म्हणजे वायुतत्व आणि आकाश-तत्वाची भेट होय ?

कथाकाव्य बेमालूम करण्याकरता वालीला वानर योनीचा बनवून नर योनीच्या रामाकडून एखाद्या पारध्याप्रमाणे झाडाआडून बाण मारून वालीचा वध करविणें वाल्मिकींनी मोठ्या कुशल कथाकौशल्यानें साधले. कथेला ऐतिहासिक सत्य मानल्यास रामाने वालीला मारण्यांत अन्यायच केला असे मानावे लागेल मग कथित धार्मिक भावनांचे लोग त्या करण्याला कितीही गोंजारोत वा प्रभुलीला म्हणोत. परंतु कथेचे सत्यस्वरूप लक्षांत आल्यास रामाने एखाद्या जनावराप्रमाणें वालीचा वध करून त्याचे राज्यावर सुग्रीवाची नेमणूक करणें किती योग्य आणि आवश्यक होते हे दिसून येईल. कथा रचाव्यात व्यास वाल्मिकीनीच ! परंतु त्यांच्या कथांचे रहस्य समजणारे साधकच राहिले नाहीत त्यामुळे त्यांना किति दुःख होत असेल ? बाह्य जल्लोष करून रामायणमहाभारताला मिरविणें म्हणजे व्यास वाल्मिकींना विसरणेंच होय !

## सीताशोध

वाली मृत्यूनन्तर सुग्रीव किष्किन्धेचा राजा बनला. वानरराज्याचे रीतीप्रमाणें तारा सुग्रीवाची पत्नि झाली आणि तारेसह भोग घेत सुग्रीव

ान्द झाला. सीतेचा शोध करण्याची आपल्यावर जबाबदारी आहे हें सुग्रीव ार विसरला. शेवटी विवेकरुप लक्ष्मणाला सुग्रीवाकडे जाऊन धमकावणी ावी लागली आणि मग सुग्रीव सीतेच्या शोधाच्या कामाला लागला. याचा र्थ आतां आपण समजायला हरकत नाही. किष्किन्धा म्हणजे परम माधिअवस्था. आतां सुग्रीव किष्किन्धेचा राजा झाला होता म्हणजे ाध्यात्म दृष्टीनें सुग्रीव वाली अवस्थेंत गेला होता. वाली विश्वाचें मूल! वश्वाच्या त्या मूल अवस्थेंत गेल्यावर कोण दुनियादारी करता शिल्लक ाहिला आहे? तुकाराम महाराज वर्णन करतात,

तुका म्हणे न ये परते । तुझ्या दर्शनें मागुतें ॥

ववेकरुप लक्ष्मणाने सुग्रीवाला फटकारले नसते तर तो त्याच अवस्थेंत ाहिला असता.

सुग्रीवाने लगेच आपल्या वानरप्रमुखांना सर्व दिशांना पाठविले. ील, जाम्बुवन्त, अंगद आणि हनुमान उत्तर, पूर्व, पश्चिम आणि दक्षिण देशेला सीता शोधार्थ गेले. सर्व वानर प्रमुख आपापल्या लवाजम्यासह रत आले पण सीतेचा मुळींच शोध लागला नाही. आतां आशा केवळ हनुमन्ताचीच होती कारण तो अजून परत आला नव्हता. इकडे हनुमन्त जो गेला तो शोध करता करता एका बिलांत शिरला. ही वानर मंडळी चंडकाय असतांना बरी वारंवार बिळात शिरू शकतात! हनुमान एवढ्याशा बिळांत शिरला तों त्याला त्या बिळांत विलक्षणच दृश्य दिसले. समोर एक सुन्दर उद्यान आणि त्यांत चन्द्रसूर्याचा प्रकाश दिसला. उद्यानांत पुन्दर निर्झर आणि ठाईठाई सुगन्धित फुलें होती. काय एवढ्याशा बिळांत चन्द्रसूर्य आणि उद्यान सरोवर वगैरे? हो हो तर! हनुमन्त धीर धरून आणखी पुढें गेला आणि पाहतो तों एक तपस्विनि बसली आहे आसनावर! हनुमन्ताने तिला प्रणाम केला.

तपस्विनीनें हनुमन्ताला लगेच ओळखले आणि तो रामदूत हनुमन्त आहे हें अंतर्ज्ञानानें ओळखले. तिनेंच हनुमन्ताला सांगितले कि रावण सीतेला घेऊन गेला असून सीता सध्यां लंकेतील अशोक वनांत रामप्रभुची वाट पहात आहे. तपस्विनीनें हनुमन्ताला लंकेचा मार्ग सुद्धां सांगितला.

हनुमन्ताला तेंच हवे होते. हनुमन्त रामाचा आशिर्वाद घेऊन जो उड्डान करून गेला तो लंकेच्या मार्गावर आकाशांतून तरंगत! तेथें अवकाशांत त्याला पर्वत, नद्या, वने आणि उद्यानें दिसलीत ? काय अन्तराळांत पर्वत, वने, उद्याने आणि नद्या सरोवरें असूं उकतात? हो तर, रामायणकार वर्णन करतात ना ? मग असलेच पाहिजे तसें! इतक्यांत एक अडचण आली. आकाशांतून पोहत जाणाऱ्या हनुमन्ताला एका ठिकाणी असा अनुभव आला कि त्यांना खालच्या समुद्रावरून कोणीतरी ओढत आहे; कर्षण करीत आहे.

हनुमन्ताला मोठे आश्चर्य वाटले. खाली पाहतो तों त्याला दिसले कि एक राक्षसी त्याच्या समुद्रावर पडलेल्या छायेला कर्षण करीत आहे. छायेला कर्षण केल्यामुळें हनुमन्त सुद्धां त्या राक्षसीकडे ओढल्या जात होते. काय आश्चर्य पहा, छायेचे कर्षण झाल्यामुळें माणूसही कर्षण केल्या जातो! पण खरे होते ते. त्या कर्षणामुळे हनुमन्ताला खालीं यावे लागले. कर्षण करणारी सिंहिका राक्षसी हनुमन्ताला आपल्या मुखांत ओढून खायला पहात होती. पण हनुमन्त चतुर! त्यांनी तिच्या मुखांत प्रवेश करून अगदीं अणुप्रमाणें लघुरुप घेतले आणि तिच्या कानांतून बाहेर पडून पुन: आपल्या लंका मार्गाला लागले. अशा तऱ्हेनें हनुमन्ताने एक भयंकर विघ्न टाळून स्वामी कार्यार्थ पुढें गमन केले.

## सिंहिका राक्षसी आणि छायाकर्षण

या कथेतील रहस्य समजण्याकरता वायुतत्वांतील एका उच्च अवस्थेचा अनुभव असणे आवश्यक आहे. मागे आपण पाहिलेच आहे कि वायुतत्वांतील साधना अतिशय दुर्धर आणि दुर्गम असतात. आपल्या जडशरीरांत आणखी तीन सूक्ष्म देह असतात. लिंगशरीर, कारणशरीर आणि महाकारण शरीर ही ती तीन सूक्ष्म शरीरें होत. त्यापैकी पहिलेंच सूक्ष्मशरीर ज्यावेळेस साधकाचे ताब्यांत येऊन साधकाला त्या लिंगशरीराचे दर्शन होते त्यावेळेस ते एखाद्या छायेप्रमाणे साधकासमोर उभे राहते. त्या शरीराला छायापुरुष असे म्हणतात. मृत शरीरांतून हेंच सूक्ष्मशरीर इतर दोन अधिक सूक्ष्मशरीरासह आणि मनबुद्धि अहंकारासह बाहेर पडतें. या सूक्ष्म शरीराचे सामर्थ्य बरेंच असते. शिवाय हे सूक्ष्मशरीर त्रिमात्रात्मक

जगतापेक्षा उच्च जगतांत असल्यामुळें त्यावर त्रिमात्रात्मक जगतांतील व्यक्तींची सत्ता चालत नाही.

पण कांही साधक या छायापुरुषाला वश करून आपली कामें करून घेतात. दुसऱ्या प्रेतांना आपल्या स्वाधीन करून कांही मांत्रिक वा तांत्रिक असल्या प्रेतयोनीद्वारे बरीचशी कामें करवून घेतात; जसें मिठाई आणणें, बिभूति काढणे, घड्याळें काढून दाखविणें, इत्यादि. परंतु अशा तऱ्हेनें पिशाचांद्वारे काढलेल्या वस्तू कोठेतरी ठेवलेल्या असतात आणि तेथून त्या वस्तू काढून ती पिशाचे इच्छित स्थली नेत असतात. ही पिशाचें अदृश्य योनीतील असल्यामुळे ते ज्या वस्तूंना स्पर्श करतील त्या वस्तू सुद्धा अदृश्यमान होतात, म्हणून पिशाचे आणीत असलेल्या वस्तू इतरांच्या हातांत पडेपर्यंत कोणाला दिसत नसतात. अशा तऱ्हेनें इतरांच्या प्रेतांना म्हणजे छाया पुरुषांना किंवा सूक्ष्मयोनीला आपल्या ताब्यांत घेऊन त्याद्वारें वस्तू काढण्याचे चमत्कार करणारे बावा आणि भगवान आपल्या देशांत पुढे येत आहेत. पण या सर्व पिशाच विद्या असल्यामुळे या विद्येचा वापर करणारा साधक त्याच्या मरणानन्तर स्वत:च पिशाच बनून दीर्घकाल त्या अधम योनींत राहून अधम कार्य करीत असतो. ही अवैदिक अतएव अविद्या आहे.

यानन्तरची आणखी एक अवस्था आहे. कांही साधक छायापुरुष दर्शनापर्यन्त जाऊन आपल्याच छायापुरूषावर कर्षण प्रयोग करून त्याला आपल्याच ताब्यांत ठेवतात आणि त्या छायापुरुषाद्वारें वरील प्रकारे नीच कर्में करवून घेतात. असले साधक जरी इतरांना सांगत असले कि ते इच्छामात्रेकरून किंवा संकल्पमात्रेकरून त्या वस्तू काढीत असतात तरी आणलेल्या वस्तू ते इतरत्र ठिकाणावरून चोरून आणत असतात आणि आपल्या भगत गणांकडून वाहवा मिळवून भगवान बनत असतात. बिचाऱ्या भक्तांना त्यांच्या भगवानांचे हे आध्यात्मिक पतन माहीत नसते. ते त्यांच्या भगवानांचे नादीं लागून अज्ञान आणि विनाशाच्या खोल गर्तेत खिचपत पडतात. बिचारे भगत !

असल्या अध:पतित जीवनाचे वर्णन ऋग्वेदांत एके ठिकाणी आले आहे.

य ई चकार न सो अस्य वेद य इ ददर्श हिरुगिन्नु तस्मात् ।
स मातुर्योना परिवीतो अन्त:बहूप्रजा निर्ऋतिमा विवेश ।।
(ऋग्वेद १।१६४।३२)

आपल्याच सूक्ष्म अवस्थांना आपल्याच इच्छेने ताब्यांत ठेऊन त्या द्वारें वाईट कर्म करवून घेऊन अध:पतित जीवनमरणाचे फेऱ्यांत वारंवार पडणाऱ्या अज्ञानी जीवांबद्दल वेद कींव करतात. असल्या वाम प्रकाराचे ही वर जाणारा साधक खरा आत्मस्वरुप जाणूं शकतो. जे साधक साधने द्वारे आपल्याच छायापुरुषाला वश करून अज्ञानांत राहूं इच्छितात ते राक्षसी वृत्तीचे नव्हे काय? आणि असल्या वामसाधनेचे आकर्षण साधकाला एखाद्या बलवान सिंहाप्रमाणें ओढीत असते म्हणूनच रामायणकार या माया अवस्थेला छायाकर्षण करणारी सिंहिका राक्षसी असें नांव देतात. हनुमान रामभक्त म्हणजे आत्मानन्द प्राप्त करणारे भक्त असल्यामुळे असल्या सिंहिका राक्षसीच्या तावडींत ते सांपडले नाहीत, ते तिच्या कानाद्वारें निघून ते लंकेकडे गमन करते झाले.

छायापुरुषाचे वरील रहस्य लक्षावधींतून एखादा साधक जाणतो. हें गहन रहस्य रामायणकारांनी आपल्या ग्रंथांत रुपकाने लिहलें असल्यामुळें रामायणकाराचा योगमार्गातील अधिकार किती उच्च होता याची कल्पना तसल्या प्रकारच्या उच्च साधकांना येऊं शकते. म्हणूनच वाल्मिकींनी स्वत:ला तपस्वी आणि मुनिपुंगव म्हणवून घेतले ते उगाच नाही! असल्या उच्च साधना करणारे साधक आज फारसे राहिले नाहीत. ज्यांना त्या अवस्था नकळत प्राप्त झाल्यात ते आपल्या छायापुरुषाद्वारें चमत्कार किंवा अधम कर्म करवून घेतात आणि स्वत:ला अज्ञानानें भगवान म्हणवून घेतात. परंतु हे सर्व अज्ञान आणि आत्म्याच्या उच्च अवस्थेचे अध:पतन आहे. ज्याला म्हणून आत्मरुप अनुभवायचे असेल अशा संयमी साधकानें छायापुरुषाच्या कर्षणांत न जाता हनुमन्ताप्रमाणें मार्गस्थ झाले पाहिजे. हें चरम आणि गूढ सत्य रामायणकार वरील सिंहिका कथेद्वारें साधकांना सांगण्याचा प्रयत्न करतात. पण त्या महापुरुषाचा दिव्य संदेश जाणणारे आणि त्यानुसार वागणारे साधक रामभक्त आज किति आहेत? रामच जाणे!

सिंहिका राक्षसीच्या कानांतून हनमन्त जे बाहेर पडले ते थेट लंकेलाच गेले. लंकेत शिरल्यावर त्यांना एका बलाढ्य राक्षसीने खाण्याचा प्रयत्न केला आणि ती राक्षसी म्हणजे प्रत्यक्ष लंका नगरीच होय. लं म्हणजे मायाबीज आणि अंक म्हणजे मोजणे यावरून लंका शब्द बनला आहे हें आपण मागें पाहिलेच. म्हणजे जो मायेला मोजतो किंवा मायामापांत जो बसतो त्याची वृत्तिनगरी म्हणजे लंका होय. अशा मायावी आणि आक्रमक लंकेनें आपले पाश हनुमानासारख्या रामभक्तावर टाकल्यास नवल वाटायला नको. परन्तु हनुमानही पक्के रामभक्त होते. त्यांनी त्या मायावी लंकेच्या चित्तावरील आक्रमणाला दाद दिली नाही. उलट त्या कामिनि, कांचन आणि कीर्तीच्या अभिलाषेच्या राक्षसी राक्षसीलाच ते ठार मारतात आणि लंकेच्या घराघराचे आपल्या वायुवेगाने फिरुन अवलोकन करतात. हनुमन्ताच्या असल्या अवलोकनाचे वर्णन रामायणकार मोठ्या बहारीने करतात.

लंकेंत फिरता फिरता हनुमन्ताला एका झाडाखाली एक नर जातीची स्त्री दिसली आणि तिच्या भोंवताल पहारेकरी असलेल्या अनेक राक्षस स्त्रीया पाहिल्या. ती सुन्दर स्त्री सारखे रामाचे नांव घेत होती. बस, हनुमन्ताने अंदाज बांधला कि ती स्त्री आणखी कोणी नसून रामपत्नि सीताच असली पाहिजे. हनुमन्ताला असा अन्दाज करायचे कारण म्हणजे हनुमन्तानें सीतेला कधि पाहिलेच नव्हते. तो वानरश्रेष्ठ हनुमान जवळच्या एका झाडावर बसला होता. इतक्यांत एक हत्त्यासारखा मजबूत काळा पण रार्जांबडा माणूस सीतेजवळ येऊन तिला त्याचेशी लग्न करायला दरडावायला लागला पण सीतेनें त्याला दाद दिली नाही. हनुमन्ताला सीतेच्या चारित्र्याची महती येथे पटली. सर्व राक्षस गेल्यावर हनुमन्ताने सीतेजवळ रामाजवळ असलेल्या आंगठीचा मणि टाकला. त्या मण्याला पाहून सीता अधिक सतर्क झाली. तिने तो मणी रामाचाच आहे हें ओळखले. इतक्यांत तिच्या समोर एक वानर हात जोडून उभा राहिला. सीतेला त्याने आपली रामभक्त हनूमान म्हणून ओळख दिली आणि आता लवकरच राम लंकेवर चढाई करून सीतेला सोडवून घेऊन जातील अशी आशा आणि विश्वास त्यांनी सीतेला दाखविला.

सीतेला ज्या प्रकारे छळल्या जात होते त्याचा राग येऊन हनुमन्तानें सापडेल त्या राक्षसाला झोडपणे सुरू केले. सर्वत्र हाहा:कार माजला. सैन्य पाठविल्या गेले परन्तु हनुमानाने सर्वांचा पराभव केला. काय एकटा वानर सर्व राक्षस सेनेला भारी होता? हो तर! पराक्रमीच होता तसा तो! शेवटी रावणाला आपला पराक्रमी पुत्र मेघनाद किंवा इन्द्रजित हनूमन्ताचा पराजय करण्यास पाठवावे लागले आणि ब्रह्मास्त्राचा उपयोग करून इन्द्रजिताला हनुमन्ताला बांधणे भाग पडले. ब्रह्मास्त्रासारख्या श्रेष्ठ आणि अत्यन्त संहारक अस्त्राचा उपयोग इन्द्रजिताने हनुमन्तावर कां केला याचे रहस्य जाणण्याकरता आपल्या अस्त्रांची माहिती असणें आवश्यक आहे.

## वैदिक अस्त्रें

आज अणुस्फोटकाचा प्रयोग यशस्वी झाल्यापासून बऱ्याचशा विद्वानांचे लक्ष रामायण महाभारतांतील अस्त्रांकडे गेले असून त्या काळच्या या अस्त्रांचेद्वारे लक्षावधि माणसांचा बलि एका क्षणांत घेण्याचे सामर्थ्य होते असा विश्वास बसत चालला आहे. भेद इतकाच कि आजची अण्वास्त्रे रासायनिक प्रक्रियेने विस्फोटित होतात तर त्या प्राचीन कालांतील अस्त्रे मंत्रसामर्थ्यानें विध्वंस करीत असत असा बऱ्याच विद्वानांचा विश्वास आहे. अर्थात् या विश्वासाचा पाया प्रत्यक्ष इतिहास नसून रामायणमहाभारतांतून लिहलेल्या कथांचाच आधार आहे. रामायण महाभारतांतील कथा प्रत्यक्ष इतिहास नसून आध्यात्मिक जीवनांत येणाऱ्या अनुभवांची अनुसूची आहे हें सिद्ध झाल्यास त्या कथांतील अस्त्रें मग ऐतिहासिक घटना सत्ये न राहतां तसल्याच प्रकारची आध्यात्मिक अवस्थांची अस्त्रे राहतील हे ओघानें आलेच.

प्रथम अस्त्र या शब्दाचा अर्थ पाहू. अस् म्हणजे असणें आणि त्र म्हणजे रक्षण होणे म्हणजे ज्या अवस्थेपासून रक्षण होईल त्या अवस्थेला वा असणाऱ्या घटनेला रक्षण मिळेल असा अस्त्र शब्दाचा अर्थ आहे. म्हणजे अस्त्रापासून रक्षण होईल संहार होणार नाही हे उघड आहे. परंतु अणुस्फोटाच्या भयानक संहारामुळे आमचे डोळे दिपून जाऊन आम्हीही तसल्या

भयानक संहार करणाऱ्यांत कांही मार्ग नव्हतो असे दाखविण्याची अहमहमिका आमच्या प्राचीन परम्परेबद्दल स्वाभिमान असणाऱ्या विद्वानांत लागून त्यांनी तसलीं भयानक संहारक अस्त्रें आमच्या पुराणांतून बेमालूम शोधून काढली; आणि त्यांच्या सुदैवानें त्यांना तसला वरचा कां असेना पण आधार रामायणादि ग्रंथांत सांपडला. म्हणे आमचे परम आध्यात्मिक पूर्वज एकमेकांचा संहार लक्षावधि संख्येत करण्याकरिता असल्या अस्त्रांचा उपयोग करीत असत. असें सांगण्यात येते कि महाभारत युद्धांत आणि रामरावण युद्धांतील अनेक अक्षौहिणी सैन्य यासारख्या ब्रह्मास्त्र, अग्न्यास्त्र, पावकास्त्र, पाशुतास्त्र आदि सारख्या आजच्या अणुस्फोटकापेक्षांही भयानक संहार करणाऱ्या अस्त्रांद्वारे क्षणांत नष्ट झाले. काय पण मानवसंहार करण्यांत धन्यता वाटते आमच्या विद्वानांना आणि शास्त्रीपंडितांना !

आमच्या विद्वानांच्या हे लक्षांत येत नाही कि जपानवर अणुस्फोटक टाकल्यावर जो भयानक मानव संहार झाला त्याचा विरोध करण्याकरता जगातील सर्व राष्ट्रें समोर आली आणि आज अणुस्फोटावर जागतिक राष्ट्र परिषदेने बन्दी घातली आहे (प्रयोग स्फोटावर मात्र नाही.) त्या कथांनुसार अश्वत्थाम्याने ब्रह्मास्त्र चालवूं नये असे श्रीकृष्णाने अश्वत्थामाला सांगितले होते म्हणतात, पण शेंवटीं त्या ब्रह्मास्त्राचा परिहार करण्याकरता अर्जुनालासुद्धां पाशुपतास्त्राचा प्रयोग करावा लागला, असे कथेंत लिहले आहे. अणुस्फोटाचा प्रयोग करायचा झाल्यास स्फोटक फेंकणाऱ्यांना त्या स्थानापासून क्षणार्धांत बरेंच दूर जावे लागते अन्यथा प्रयोगकच त्या स्फोटासह जळून भस्म होईल. आज असले अणूबॉम्ब मिसाईलचे द्वारें प्रक्षेपित करता येतात त्यामुळे प्रयोगकाला त्या अस्त्रस्फोटाजवळ राहण्याची आवश्यकताच नसते आणि त्याचप्रमाणे आमच्या पुराणांतील राम रावण, कौरव पांडवांनी सुद्धां बाणरुपी मिसाइलद्वारें अस्त्रांचा मारा केला असा युक्तिवाद पुराणकथांना इतिहास मानणाऱ्या कैवाऱ्यांकडून करण्यांत येऊं शकतो. पण त्यांचा कैवार व्यर्थ आहे, कारण रामायण युद्धांत आणि महाभारत युद्धांत शत्रूसैन्य समोरासमोर आणि अगणित संख्येंत असें ते ग्रंथच सांगतात.

मानवानें मानवाचा संहार करण्याच्या पाशवी शर्यतींत आमचे पुराणमतवादी आध्यात्मिक सनातनी आणि धार्मिक माणसें पाश्चात्यांचे मागे तसूभर सुद्धा नाहीत, नव्हे त्यांत त्यांना उलट सहर्ष स्वाभिमान वाटतो असे यावरून दिसते. आमच्या पूर्वजांनी काय केले असेल तें सध्या कोणालाच फारसे माहित नाही पण असल्या ऐतिहासिक अन्वेषणांमुळे आणि आमच्या कथित अभिनिवेशामुळें आम्ही आमच्या पूर्वजांना कोणत्या पाशवी प्रकारांत बळेंच घालतो याचे आम्हाला भान राहात नाही. बिचारे पूर्वज ! काय करणार आमच्या असल्या अन्वेषणांपुढे? कोणी कुमारी अवस्थेंतच कुंतीवर मातृत्वाचा आरोप करून तिच्या चारित्र्याचे धिंडवडे काढतात, द्रौपदीचे वस्त्र सोडविण्यास लावून तिला नग्न करायचा प्रयत्न करतात, श्रीकृष्णाला १६१०८ स्त्रियांचा दादला बनवून या रेशनिंगच्या कालांत त्याचेवर इतक्या सहवस्राधि बायकांचे भरणपोषण करण्याची आपत्ती आणतात, कोणी रामाकरवीं शूद्र शंम्बुकाचा वध करवून शूद्रांवर उच्च वर्णीयांनी अत्याचार केले याला आधार देतात आणि एका ब्राह्मण पतिव्रतेवर, रावण पत्नि मन्दोदरीवर, घोर प्रसंग आणतात तिची वस्त्रें फेडून ! बिचारे वैदिक पूर्वज !

## ब्रह्मास्त्र, पाशुपतास्त्र, अग्न्यास्त्र इत्यादि

ब्रह्मास्त्राचा उल्लेख उपनिषदें करतात.

प्रणवो धनुः शरो ह्यात्मा ब्रह्मतल्लक्षमुच्चते ।
अप्रमत्तेन वेद्धव्यं शरवत् तन्मयोभवेत् ॥

ब्रह्मांत शर मारून जो स्वतः ब्रह्ममय होईल तोच खरा धनुर्धारी राम आणि तेंच शरसंधान म्हणजे ब्रह्मास्त्र होय. आपण पाहिलेंच कि अस्त्रामुळें प्रयोगकाचे रक्षण होईल, विध्वंस नाही. ब्रह्मावस्थेंत जाणाऱ्या श्रेष्ठ साधकाचे जन्ममरणाचे फेऱ्यांतून रक्षण होते; विध्वंस नाही. ब्रह्म + अस् + त्र म्हणजे ब्रह्म अवस्थेंत असल्यामुळें रक्षण होणें होय. म्हणून जो असल्या ब्रह्मावस्थेंत जाण्याकरतां आपल्या साधनारुप अस्त्राचा मारा करेल (ब्रह्मतल्लक्षम् उच्यते) त्याच्या त्या श्रेष्ठ साधनाअस्त्राला ब्रह्मास्त्र म्हटले आहे. पाशुपतास्त्राचाही असाच अर्थ अर्थ आहे. अशु म्हणजे प्राण, प

म्हणजे पतन आणि असल्या अस्त्र प्रयोगामुळे ज्याचा प्राण पतन होईल, कांसावीस होईल त्या साधना प्रयोगाला पाशुपतास्त्र म्हणतात. विशेषत: कुंडलिनि जागृति, हंसजय सारख्या खडतर साधना केल्यावर साधकाचा जीव कांसाविस होऊन त्याचा प्राण पतन होऊं पाहतो म्हणजे शरीराबाहेर निघूं पाहतो. त्या सर्व प्राणव्यवहाराच्या साधनेला रामायणकार आणि महाभारतकार पाशुपतास्त्र असें म्हणतात. तसेंच कठोर साधना केल्यावर साधकाचे सर्वांगाचा विलक्षण दाह होत असतो. बऱ्याच सन्तांनी आपल्या काव्यांतून या अग्निसारख्या असह्य दाहाचा उल्लेख केला आहे. त्या विलक्षण दाहाला रामायणकार अग्न्यास्त्र म्हणतात.

**वैदिक अस्त्रें संहारक नसून रक्षक आहेत, हा एक अति महत्वाचा भेद पाश्चात्य प्रणीत अण्वास्त्रांत आणि वैदिक अस्त्रांत आहे.** आमच्या कथित विद्वानांनी पाशवी संहारात धन्यता न मानता त्यांतून ध्वनित होणाऱ्या आध्यात्मिक अवस्थांत धन्यता मानावी असें नम्र-पणे सुचवावेसे वाटते.

आपल्या इन्द्रियांना जिंकणाऱ्या इन्द्रजिताने वायुतत्वांतील उच्च साधना करणाऱ्या हनुमन्ताला आणखी पलीकडील ब्रह्मतत्वांत जाण्याकरता ब्रह्मास्त्राचा प्रयोग केला आणि कांही काळ त्या उच्च ब्रह्मावस्थेंत राहण्या-करता हनूमन्ताने स्वत:वर त्या ब्रह्मास्त्राचा प्रयोग होऊ दिला. कथेचे रहस्य असे आहे. ब्रह्मास्त्राने बद्ध झालेल्या हनमन्ताला राक्षसांनी रावण-सभेंत आणले.

# अष्टम अध्याय

## लंकादहन आणि राम-रावण युद्ध

ब्रह्मास्त्राने बांधून आणलेल्या हनुमन्ताचा वधच करण्याचा रावणाचा विचार होता परन्तु शत्रूच्या दूताचा वध करूं नये अशी राजनीति असल्या-मुळे रावणाने हनुमन्ताचा बध करू नये असे रावणभ्राता बिभिषणाने रावणाला सुचविले. रावणाने ते मान्य केले; पण हनूमन्तासारख्या दुष्टाला दण्ड देण्याकरता रावणाने हनुमन्ताच्या शेंपटाला चिंध्या बांधून त्याचे शेंपूट पेटवून देण्यास सांगितले. रावणाला वाटले कि अशातऱ्हेने तसूतसू जळून हनूमान संपूर्ण जळून मरेल. परंतु हनूमन्ताने भलताच उपद्व्याप केला. त्याने सर्व लंकाच दहन केली आणि सांगरांत शेंपूट बुडवून विझविले आणि रामाकडे परत आला. या लंका दहनावर योगिराज वासुदेवानन्द सरस्वति भाष्य करतात,

सूक्ष्मे देहाख्य लंकांच दग्ध्वौपनिषदस्ततः ।

सूक्ष्म देहांतील इच्छेचे हनुमन्ताने उपनिषदअग्निद्वारें दहन केले.

हनुमन्ताने सीतेबद्दलची सर्व परिस्थिती रामाजवळ निवेदन केली. आणि लवकरांत लवकर लंकेवर स्वारी करून सीतेला सोडविण्याखेरीज दूसरा उपाय नाही असे सुचविले. वानर सेना गोळा करणे सुरू झाले. गिरी-कन्दरांतील, झाडाझाडावरील, देशविदेशांतील वानरांना पाचारण करण्यांत आले आणि आणि दक्षिण समुद्रावर विराट वानरसेना उड्या मारून हुप्हुप् करायला लागली. वानर सेनेचे गटवार विभाजन करण्यात येऊन लंकेवर कशी स्वारी करायची याचा आराखडा तयार करण्यात आला. परंतु सागर कसा ओलांडणार ? त्या कालांत नांवा आणि जहाजे नव्हती काय ? रावणसुद्धा नौकेवर वा जहाजावरून दण्डकारण्यांत न येता आपल्या मायावी सामर्थ्याने सागरावरून उडून येत असे असे म्हणतात. मग त्या कालांत नौकायनची कला भारतीयांना माहीत नव्हती काय ? पण तसे म्हणावे तर स्वतः रामच गंगापार नौकेवरूनच करते झाले.

मग त्या काळांत इतकी विपुल जंगलें असतांनासुद्धां लाकडांचीं जहाजे न बांधता वानर सैन्य दगडांचा तरंगता पुल बांधून त्यावरून मजेनें उड्या मारीत लंकेंत कां शिरले? आणि अन्तर तरी दोन चार हात होते काय? छे चांगले शंभर योजने! आणि इतके शंभर योजने लांब असलेला लक्ष्मण झूला, छे हनुमान झूला तयार करून वानर सैन्य लंकेंत उतरलें. काय जड पाषाण समुद्रांत तरंगू लागले? हो, तर रामनामाने काय तरणार नाही? अहो, रोजची अनन्त पापें करून सुद्धां रामनाम घेतले कि आपण नाही का भवसागर तरुन जात? पुन्हा रोजची पापें सुरूंच असतात, म्हणूनच तर प्रतिदिन मरेपर्यन्त आम्ही रामनाम जपून पापांचा नाश करून तरून जातो ना? तसेंच प्रत्येक पत्थरावर रामनाम लिहून पत्थर सागरांत टाकला कि पत्थर तरंगत असे आणि अशा तऱ्हेनें पाषाणांचा तरंगता पूल रामेश्वरम्‌पासून लंकेपर्यन्त बांधल्या गेला!

पण या पाषाण सेतू बद्दल अधिक तर्कवितर्क करण्याची आवश्यकता नाही. योगिराज वासुदेवानन्द सरस्वति या रामसेतूचे वर्णन करतात,

सेतु बध्वा सजलधौ साधनाश्यभिरुत्कटैः।

म्हणजे हा भवसागर तरून जाण्याकरता साधनारुप पाषाणांचा सेतू बांधल्या गेला. म्हणजे साधनेशिवाय भवसागर तरण्यास दूसरा उपाय नाही तर? होय. म्हणूनच वैदिक परम्परेंत साधना प्रमुख आहेत, 'ताणि धर्माणि प्रथमाणि' धर्म म्हणजे साधना!

वानरसेना लंकेंत शिरली आणि तिकडे रावणानेंही आपली राक्षस सेना जमविणें सुरूं केले. कुंभकर्ण तर सध्यां झोंपलाच होता. वेळ आल्यावर त्याला उठविता येईल असा विचार करून रावणानें भ्राता विभिषणाला युद्धांत सहाय्य करण्यास सांगितले. परंतु रामाशी युद्ध न करता सीतेला सोडून देऊन रामाशी संधि करावी असें विभीषणाने सुचविताच रावण विभीषणावर क्रुद्ध झाला आणि त्याला आपलें राज्य सोडून जाण्याचा आदेश दिला. येणाऱ्या भीषण संहाराची आणि संकटाची पूर्वकल्पना असणाऱ्या विभीषणाला ती इष्टापत्तीच वाटली. तो सरळ आकाशमार्गानें रामाकडे आला आणि रामपक्षाचा बनला. विभीषणाचे हें राष्ट्रद्रोही वर्तन पाहून

रावण डगमगला नाही. त्याने आपल्या मोठमोठ्या शूर सेनानींना आणि सैनिकांना राम सैन्यावर झोकून वानरांचा संहार करणें सुरूं केले. वानरही कांही कमी शूर आणि साहसी नव्हते. त्यांनी रामलक्ष्मण हनुमान सह-वर्तमान राक्षसांचा निःपात करणें सुरूं केले आणि रावणाला जर्जर केले.

## अहिमहि कथा आणि सापेक्षता सिद्धान्त

रामपक्ष आणि रावणपक्षांत धमासान युद्ध चालूं होते. युद्धभूमीवर लढतांनासुद्धा षडयंत्र करून शत्रूला नामोहरम करण्यांत असुर रावण तरबेज होता. रावणाने आपल्या दोन सेनापतींना षडयंत्र करून राम-लक्ष्मणाला नष्ट करण्यास सांगीतले. युद्ध झाल्यावर मध्यरात्रीस रामलक्ष्मण ध्यानस्थ बसून समाधीस्थ होत असत. दिवसभर युद्ध केल्यामुळे सर्व वानर-सेना प्रगाढ निद्रेंत असे. पण रामलक्ष्मणासभोवताल मात्र वानरांचा जागता पहारा असे. रामलक्ष्मण समाधिस्थ बसत असल्यामुळें पहाऱ्यावर असलेल्या हनुमन्ताला सुद्धां रामलक्ष्मणाच्या शिबिरांत जाण्याची आव-श्यकता नसे. त्यांच्या समाधि अवस्थेत त्यांना त्रास होऊं नये म्हणून हनूमान सुद्धां रामलक्ष्मणाचे खास शिबिरांत वारंवार जात नसे. पण अधेमधे डोकावून पहात असे.

याचाच फायदा अहिर्महिंनी घेतला. त्यांनी रावण-शिबिरापासून एक भूगर्भातील विवर खोदीत नेले ते रामलक्ष्मण बसले होते त्या छोटयाशा शिबिरापर्यन्त ! विवर खोदण्याचे कार्य भूगर्भांतून होत असल्यामुळें त्याचा आवाज वा मातीचे उपसणें बाहेर कोणालाच कळणें शक्य नव्हते. राम-लक्ष्मण समाधींत आहेत असे पाहून अहिर्महिंनी त्यांच्या आसनापर्यंत विवर खोदून त्यांना समाधि अवस्थेंतच विवरांतून रावण राज्यांत नेले. अहिमहि देवीभक्त होते. शिकार चांगली गंवसली असें समजून अहिमहींनी प्रातः-कालींच रामलक्ष्मणाला देवीला बली देण्याचे ठरविले. प्रातःकालपर्यन्त रामलक्ष्मण देहभानावर येऊं नयेत म्हणून अहीमहींनी रामलक्ष्मणाला संमोहित केले; आणि देवीच्या मंदिराच्या सभामंडपात बसवून ठेवले.

पहाटेच्या सुमारास रामभक्त हनुमान रामशिबिरांत डोकावून पहातात तो त्यांना रामलक्ष्मण जागेवर दिसेनात. हनुमान घाबरले आणि आंत

जाऊन पहातात तों रामलक्ष्मणांच्या आसनाखाली एक विवर. हनुमन्ताला घातपाताची कल्पना आली. ते लगेच त्याच विवरांतून वायुवेगाने शेवट-पर्यन्त गेले आणि पहातात तो राक्षसांच्या पहाऱ्यांत रामलक्ष्मण बेशुद्ध अवस्थेंत पडलेले. हनूमान बुद्धिमत्तां वरिष्ठं असल्यामुळे त्यांनी लगेच निर्णय घेतला. अष्टसिद्धि त्यांना प्राप्त असल्यामुळें ते अणिमासिद्धिनें लघुरुप घेऊन मंदिराच्या गाभाऱ्यांत शिरले; आणि स्वतःच्या धूम्रवर्ण शरीराला देवीचा सिन्दूरवर्ण फांसून देवीला बाजूला सारून स्वतःच देवी बनले.

पहाटे अहिमहि जागृत होऊन रामलक्ष्मणाला देवीला बलि देण्याची तयारी करूं लागले. इतक्यांत हनूमानांनी देवीच्या आवाजासारखा आवाज काढून आंतूनच अहिमहींना सांगितले, 'भक्तांनो तुमच्या पराक्रमावर मी फार संतूष्ट झाले आहे. धन्य आहांत तुम्ही. रामलक्ष्मणासारखे बलि आणल्यामुळे मी तुमचेवर फार प्रसन्न झाले आहे. माझ्या मंदिराचे द्वार न उघडतां तुम्ही मंदिराच्या कळसापाशी जे विवर आहे त्यांतून माझ्या बलिना आंत सोडा आणि मी माझ्या बलींचे कसें भक्षण करते हें पाहूं नका.' अहिमहींचा आनन्द गगनांत मावेना. एकतर रावणाचे स्वामिकार्य केल्याची धन्यता शिवाय देवाचीही असीम कृपा! धन्य होत्साने अहिमहींनी रामलक्ष्मणांना विवरांतून देवी मंदिरांत सोडले. आंत डोंकावून पहातात तो सिन्दूरवर्णी देवीमाता बलींची वाट पहात बसलेली !

विवरांतून रामलक्ष्मणांना आंत सोडण्यांत आले आणि आतां देवीमाय आपलें बलि भक्षण करून आपल्याला आकण्ठ आशिर्वाद देईल या आशेने अहिमहि देवळाबाहेर आशाळभूतपणें बसले होते. तों काय, वीज कडाडावी तशी गर्जना करीत हनुमान आपल्या खांद्यावर रामलक्ष्मणांना घेऊन मंदिराबाहेर पडले आणि अहिमहिंना पायाखालीं तुडवून मारून उड्डाण करीत रामसेनेकडे वायुमार्गानें निघून गेले. रामलक्ष्मणाचा बलि द्यायच्या ऐवजीं देवीने (हनुमन्तानें) अहिमहीचाच बलि घेतला! हनुमान खरे रामभक्त !! बोला रामभक्त हनुमान की जय !!!

## सापेक्षता सिद्धान्त (Theory of Relativity)

कथा इतकी सुन्दर साधली आहे की तींत साधनामार्गातील रहस्यासह आधुनिक सापेक्षता सिद्धान्ताची गंफण सुद्धा मोठ्या खुबीने साधली आहे. कथा योग्य तऱ्हेने समजण्याकरतां आपल्याला जगतविख्यात वैज्ञानिक आइनस्टाइनचा सापेक्षतासिद्धान्त समजून घ्यावा लागेल. सापेक्षता सिद्धान्त (theory of relativity) तर सन १९२५ ला आइनस्टाइन ने प्रस्थापित केला ! मग त्याअगोदर सहस्त्रावधि वर्षे असलेल्या वाल्मिकींना आइन-स्टाइनप्रणीत सापेक्षतासिद्धान्त कसा माहित झाला? झाला खरा! वाल्मिकींना आजच्या आइनस्टाइनचा सापेक्षतासिद्धान्त पूर्णपणे माहीत होता हें त्यांनी कथेंत योजिलेल्या शब्दांवरुनच कळते. पण त्याकरता आपल्यालाही वाल्मिकीचे हृद्गत जाणले पाहिजे आणि ते हृद्गत जाणण्याकरतां मुनिपुंगव वाल्मिकीच व्हावे लागेल.

प्रथम सापेक्षतासिद्धान्त पाहू. एखाद्या वस्तूचे अस्तित्व तिच्या आकारमानावर आणि वजनावर अवलंबून असते. आइनस्टाइनचा सिद्धान्त स्थापित होईपर्यन्त वस्तूचे आकारमान तिच्या त्रिमात्रात्मक अस्तित्वावर म्हणजे लांबी, रुंदी आणि उंचीवर अवलंबून आहे असें मानण्यांत येत होते. आइनस्टाइनने या त्रिमात्रात्मक जगतावर आणखी एक कालमात्रा आहे असे प्रस्थापित केले. त्याला तो time space continuum असे म्हणतो. या कालमात्रेच्या दृष्टीनें वस्तुचे आकारमान (volume) आणि त्याला धरून असलेले वजन (mass) याचे स्वरुप भिन्नच असते असें तो म्हणतो. साधारण अवस्थेंत वस्तूचे आकारमान आणि मह जवळपास आहे तसाच राहील पण त्या वस्तूवरील वेग जर वाढविला तर ती वस्तू आहे तशी न दिसता तिचे आकारमान वेगाच्या प्रमाणांत कमि कमि होत जाऊन तसाच परिणाम तिच्या महावर होईल. विज्ञानाने मान्य केलेला आजचा अधिकाधिक वेग म्हणजे प्रकाशवेग होय. प्रकाश दर क्षणाला १८६७०० मैल प्रवास करतो हें आपण मागें पाहिलेंच आहे. प्रकाशवेगाने गतिमान असणाऱ्या वस्तूचे आकारमान जवळजवळ शून्य राहील. आपली एवढी प्रचंड पृथ्वि पण प्रकाशवेगांत ती एखाद्या फूटबॉल सारखी दिसेल. म्हणजे प्रकाशाचे प्रमाणांत

वस्तूचे आकारमान कमि होऊन प्राप्त झालेल्या आकारमानाला धरून तिचा मह वाढतो. कालगति आणि मह याचे सख्य व्यस्त प्रमाणांत असते असे यावरून दिसते.

आजच्या विज्ञानाला माहीत नसणारा परंतु योगांत अनुभवायला येणारा एक प्रकाशवेगापेक्षाही प्रचंड वेग आहे. त्याला वायुवेग म्हणतात. प्रकाशवेगाने सारे ब्रह्मांड फिरून येण्यास ३५० कोटी प्रकाशवर्षे लागतील तर वायुवेगाने ब्रह्मांडाला त्याच क्षणांत फेरा घालता येतो. इतका प्रचंड वेग वायुतत्वाचा असतो. हनूमान वायुसुत म्हणजे वायुतत्वाँतील अनुभूति होय. रामचन्द्र तर वायुतत्वापेक्षाही पलीकडील आकाशतत्वाचे दैवत होय. म्हणजे वायुतत्व वा त्याही पलीकडील आकातत्वांत जाण्याकरता तेजस तत्वांतील कालमापन म्हणजे एका क्षणाला १८६७०० मैल वेग आणि त्याला धरून असलेले आकारमान आणि वजन म्हणजे मह यांचा नाश झाला पाहिजे. राम आणि लक्ष्मण समाधि अवस्थेंत असतांना अहि-महि ने त्यांना भुयारांतून पळवून नेऊन देवीला बलि देण्याचा घाट घातला होता. देवीतत्व तेजस तत्वातीलच एक अवस्था आहे. साधक समाधि अवस्थेंत पृथिवि (जड तत्व देहभाव) तत्व, आपतत्व (ओतप्रोतरचना electrons protons) आणि तेजस् तत्वांना उल्लंघून पलीकडील कालातींत वायुतत्वांत आणि सर्वस्थित आकाशतत्वांत जाऊं शकतो आणि त्यांचा अनुभव घेऊं शकतो; परंतु बरेच वेळा साधकाचा जडदेह आणि त्याचा जीवात्मा यांच्या संस्कारांचा मेळ न जमल्याने साधक तेजस तत्वाचे वर जाऊं शकत नाही. प्रयत्नेंकरून तो वर गेल्यास त्याच्या जडशरीराला तेजस तत्वापलीकडील भयानक आवेग सहन न होऊन साधकाचे जडशरीर देहभावावर म्हणजे शुद्धिवर (consciousness) राहू शकत नाही आणि अशा अवस्थेंत साधक जीवात्मा आपला देह सोडून जातो म्हणजे मरतो.

तेजस तत्वाचे वर जाण्याच्या साधकाच्या असल्या पराक्रमी प्रयत्नांत प्रकाशावस्था म्हणजे तेजस तत्व त्याला वर जाऊं देत नाही. म्हणजे या अवस्थेच्या साधकाचा तेजसतत्व बलि घेते. देवी तेजस तत्वाचेंच दर्शन असल्यामुळे तेजस् तत्वाचे वर आकाशतत्वांत जाणाऱ्या राम लक्ष्मणाला ती

तेजस् तत्वीय देवी बलि मागणार नाही काय ? प्रकाशवेगांतच मुळीं वस्तूचें कालमापन मह् व्यस्त बनते. कालमापनाला (time) रामायणकार अही म्हणतात (अह् म्हणजे काल) तर वजनयुक्त आकारमानाला मही (मह mass) म्हणतात. तेजस तत्वाचे वर वस्तूला म्हणजे साधकाचे शरीराला अस्तित्वच नसते, आणि म्हणून कथेनुसार अहिमहि राक्षस रामलक्ष्मणाला देवीला बळी देतात. राम आकाशतत्वाचे आणि रामभक्त हनुमान वायुतत्वाचे. आकाशतत्वांत जाण्याकरता साधकाला प्रथम वायुतत्वांतूनच वर जावे लागते. त्यामुळे वायुतत्व आकाशतत्वाचे वाहन मानले आहे. म्हणूनच वायुसुत हनुमान आकाशतत्वीय रामाचे परमभक्त आणि वाहन मानले आहे. याच वायुतत्वाचे म्हणजे हनुमानाचे खांद्यावर बसून आकाशतत्वीय राम अहिमहिच्या तांवडींतून सुटू शकतात.

तेजस तत्वाचे वर जाऊन वायुतत्वांत किंवा आकाशतत्वांत अवगाहन करण्याकरतां वायुतत्वांतील साधकाच्या तेजस् तत्वातील कालमापन म्हणज अही आणि मह म्हणजे मही यांचा नाश करावाच लागेल. म्हणून तेजस तत्वाला म्हणजे देवीला बाजूस सारून वायुतत्व हनुमान स्वतः देवी बनतात आणि आकाशतत्वाच्या साधकांना म्हणजे रामलक्ष्मणांना आपल्या खांद्यावर घेऊन आकाशांत उड्डाण करतात. पण त्या अगोदर ते तेजस तत्वाचे (देवीचे) भक्त जे अहि महि (time and mass) त्यांचा नाश करतात त्यांना पायाखालीं तुडवितात चेंगरून मारतात. अहिमहि कथेंतील हें अचाट रहस्य आहे. ते वैज्ञानिक रहस्य रामायणकारांनी आपल्या अप्रतिम कथा शैलींत लिहले आहे.

अहिमहि कथानकांतील विश्वव्यापक तत्वांचे रहस्य समजविण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. पण तें रहस्य कोणाला किति कळेल याबद्दल लेखक साशंक आहे. नुसत्या चांगल्या मेंदूने (good brain) या अतीन्द्रिय आणि अति दिव्य अवस्थांचे रहस्य कळणें कठीण आहे. त्याकरता साधनाद्वारें प्राप्त दिव्य अनुभवच हवेत. असले अचाट आणि दिव्य अनुभव असणारे परम श्रेष्ठ वायुतत्व साधक हनुमान आणि आकाशतत्व साधक रामचन्द्र या भारतांत किति असतील हें सांगणे कठीण आहे. भारताबाहेरील

जगांत तर असल्या अति दिव्य अनुभवांची वानवाच आहे. योगीराज ज्ञानेश्वर माऊलीचे कृपेनेच लेखक हें परमगुह्य रहस्य लिहूं शकला अशी त्याची मनोभावना आहे.

## कुंभकर्ण

प्रबल अहिमहींचा नाश झाल्यावर रावण अधिकच घाबरला. त्यानें आपला भ्राता कुंभकर्ण याला जागवून सभेंत बोलाविले. कुंभकर्ण म्हणे सहा महिने झोंपत असे. कथा अशी. कुंभकर्णाला सरस्वति प्रसन्न करून घ्यायची होती. त्यानें कठोर तप आरंभिले. कठोर परिश्रमाने काय साध्य होत नाही? सरस्वतीचा पिता ब्रह्मा! त्यानें ब्रह्माला प्रसन्न करण्याकरता खडतर तपस्या आरंभिली. ब्रह्मा प्रसन्न झाले आणि 'वर माग' म्हणते झाले. आपण कशाकरता तपः साधना सुरूं केली याचेच विस्मरण होऊन शेवटीं त्या गडबडींत कुंभकर्णाने ब्रह्माला 'मला निद्रा द्या? असा वर मागीतला. ब्रह्मानें तथास्तु म्हटले. नंतर स्वतःची चूक कुंभकर्णाचे ध्यानांत आली आणि त्याने पुनः तपस्या करून ब्रह्माला उपवर मागीतला त्यामुळें कुंभकर्णाची नित्याची निद्रा जाऊन सहा महिन्याच्या निद्रेचे त्याला वरदान मिळाले. बऱ्याचशा साधकांना ते काय आणि कशाकरता सगळा आटापिटा करतात याचे त्यांना मुळींच भान नसते. इतर सर्वजण कांहीतरी करतात ना, मग आपणही कांहीतरी करावे अशी त्यांची निरर्थक भावना आणि प्रयत्न असतो.

तपस्या केल्यामुळें फल पदरांत पडणारच! त्यांच्या अहेतुक आणि अज्ञानांतून उद्भवलेल्या तपस्येचे फल त्यांना अज्ञानच मिळणार. निद्रा म्हणजे अज्ञान! त्यामुळें ब्रह्माकडून वर मागतांना कुंभकर्ण सदा निद्रा मागतो. अशा अज्ञानी जीवांना सृष्टीनियंता कर्मफलाप्रमाणें निद्रादान देणार नाही काय? शिवाय बऱ्याचशा साधकांची अशी चुकीची कल्पना असते किं अनेक ग्रंथ ऐकल्याने म्हणजे कर्णद्वारा श्रवण केल्यानें त्यांना बरेंच आत्मज्ञान प्राप्त होईल. त्या कालांत छापण्याची कला नसल्यामुळें ग्रंथ कमि असत. एखाद्या प्रवचनकार ग्रंथ वाचीत असे आणि इतर आपल्या कर्णानें श्रवण करीत असत. कांही कर्णवीर तर खूप ऐकत असत, अगदी कुंभाएवढे खूप

पुष्कळ ! अशा खूप श्रवण करणाऱ्या कर्णवीरांना रामायणकार कुंभकर्ण म्हणतात. कुंभाइतके खूप कर्णाद्वारें श्रवण केले कि कुंभाइतकें खूप आत्मज्ञान झाले अशा खोटयाच अविर्भावांत बरेंच विद्वान आणि बहुश्रुत असतात. हें त्यांचे शुद्ध अज्ञान आहे. अज्ञान म्हणजेच निद्रा होय. म्हणूनच कुंभकर्ण प्रथम नित्य निद्रा मागतो आणि स्वत:ची चूक लक्षांत आल्यावर ती निद्रा कमि करण्यास सांगतो, पण त्याची अज्ञानाची निद्रा सहा महिने म्हणजे अर्धी तरी कायमच असते.

दशग्रंथ मुखपाठ केल्यानें मी दशमुखी विद्वान आहे असे मानणारा अहंकारी वृत्तीचा रावण आणि मी कुंभाइतकें खूप श्रवण करून बहुश्रुत विद्वान बनलो आहे आणि आम्हाला त्यामुळें सर्व आत्मज्ञान प्राप्त झाले असे मानणारा कुंभकर्ण एकाच वृत्तीवंशाचे म्हणजे सख्खे भाऊ नसणार काय ? परन्तु अशा अहंकारी ब्राह्मणांना आणि बहुश्रुत विद्वानांना उपनिषद स्पष्टच सांगतात,

नायमात्मा प्रवचनेन लभ: न मेधया न बहुना श्रुतेन ।
यमेवैष वृणुते तेन लभ्यः तस्यैषः आत्मा विवृणुते तनूँस्वाम् ।

वरील एका वचनाभोंवती रावण आणि त्याचा राक्षस पक्ष पिंगा घालीत असून या अज्ञानाचे अवस्थेंतून वर जाऊन खरें आत्मज्ञान प्राप्त करण्याकरता राम आणि त्याचा पक्ष यत्नशील असतो. अशा आत्मज्ञाना-करता यत्नशील असणाऱ्यांबद्दल उपनिषद म्हणतात, **प्रणवो धनु:शरो-ह्यात्मा ब्रह्मतल्लक्षम् उच्चते ।** असा धनु हातांत धरून ब्रह्मांत शर मारणारा कोवंडधारी राम होय. वरील दोन उपनिषदवचनें म्हणजे संपूर्ण रामायण होय !

कुंभकर्ण रावणसभेंत गेला. रावणानें त्याला सर्व परिस्थिती सांगितली. विभीषणाचा राष्ट्रद्रोह सुद्धां त्याला निवेदन केला. कुंभकर्ण तसा विचारी होता. त्यानेही रावणाला विभीषणासारखाच सल्ला दिला. पण रावण ऐकेना. त्याने कुंभकर्णाला सरळच बजावले, 'बन्धू तूं माझ्या अन्नावर जगला आहेस आता या प्रसंगी माझी बाजू तुला घ्यावीच लागेल.' कुंभकर्णाने भ्रातृप्रेमाकरता रावणाचे म्हणणें मान्य करून आपले पर्वतप्राय

ीर घेऊन तो रणांगणांत उतरला. अहो ज्याचे कर्णरन्ध्रच जर एखाद्या
भासारखे असतील तर त्याचा एकूण देह पर्वतासारखा नसेल काय?
रन्तु उत्क्रान्तवाद असें सूचित करतो कि आजचा मानव ताटका, पूतना
ाणि कुंभकर्णासारख्या पर्वतप्राय योनीपासून उत्क्रान्त झाला नसून त्यापेक्षां
हान आकाराच्या वानर योनीपासून उत्क्रान्त झाला आहे. आकृति क्र. १
ाणि २ पहा (पान ९६) परन्तु आमची पुराणें मात्र सांगतात कि असल्या
र्वतप्राय देहाचे त्या काळात बरेंच राक्षस होते. त्याचे रहस्य आपोआप
ळेल.

पर्वतप्राय देहाचा कुंभकर्ण रणांत उतरल्यावर वानर घाबरायला
ागले पण हनुमन्ताने त्यांना धीर देऊन युद्धाला प्रस्तुत केले. घनघोर
द्ध सुरूं झाले. कुंभकर्ण तर पायाखाली सहस्रावधि वानरांना चिरडायला
ागला आणि खायलाही लागला. शेंवटीं हनुमन्त आणि रामलक्ष्मणानें
राक्रम करून कुंभकर्णाला खाली लोळविला. मरता मरता कुंभकर्णाचे नाक
ान कापण्यास रामानें वानरांना अनुमती दिली, आणि शूर्पनखेप्रमाणे
ंभकर्णाला मरता मरता विद्रूप करण्यांत आले. कुंभकर्णरुप पर्वत कोसळल्या-
र रावणाचा धीर गेला आणि त्याने आपला पुत्र इन्द्रजित याला सहाय्यार्थ
ाचारण केले.

## कुम्भकर्ण कोण?

बुद्धि ताळ्यावर असणाऱ्या माणसाला कुंभकर्णासारखे पर्वतप्राय
ारीराचे ब्राह्मण पाहून रामायण एक कपोल कल्पित कथाभारूड आहे
सें वाटल्यावाचून राहात नाही, आणि त्यामुळें ते रामायणावरच विश्वास
वीत नाही. कांही कुंभकर्णासारखे वाचीवीर यावर अशी मल्लीनाथी
रतात कि आज जर सात सात आठ आठ फूट उंचीची माणसें क्वचित
ाहायला मिळतात तर एवढ्या प्रचंड कालाचे ओघांत पर्वतप्राय कुंभकर्ण,
ूतना आणि ताटका होणें अगदी सहज संभवनीय आहे. असल्या विक्षिप्त
ल्पनांच्या वावदूकांना वानराप्रमाणें त्या कुंभकर्णाचे पडत्या शरीराखाली
ापडून वानरासारखें चिरडून मरूं द्या. आपल्याला कुंभकर्ण कोण हें जाणणें
ावश्यक आहे. कर्ण म्हणजे कान काणि कुंभ म्हणजे कुंभासारखे मोठ्ठे!

म्हणजे ज्याचे कर्णरन्ध्र कुंभासारखें मोठे आहे तो कुंभकर्ण. जो खूप ऐकतो, अगदी कुंभ भरून, आणि जो त्या ऐकण्यांतच सर्व ज्ञान आहे असें मानतो आणि स्वतःला धन्य मानतो असल्या आत्मस्तुतिप्रिय आणि श्रवणभक्त असणाऱ्या वाचीवीराला रामायणकार कुंभकर्ण म्हणतात. शिवाय आम्ही खूप खूप कुंभाइतके ऐकले आहे अशा उन्मादाने जो प्रतिपक्षाशी वादविवाद घालायला एखाद्या राक्षसासारखा तुटून पडतो अशा प्रचंड अहंकाररुप शरीराच्या व्यक्तिला रामायणकार कुंभकर्ण असे म्हणतात.

असली आढ्यताखोर अहंकारी माणसें आता ते संसारसागर पार तरुन मुक्त झाले आहेत असें खोटेंच मानून स्वतःला धन्य मानतात म्हणूनच कुंभकर्णाचे नाभीपर्यन्त संसार सागराचे पाणी लागत असे. असली स्वनामधन्य माणसें आपल्या अज्ञानाचे घोरांत सुखेनैव घोरत पडतात हेंच कुंभकर्णाचे सहा महिनें झोपणें आहे. योगी वासुदेवानन्द सरस्वति कुंभकर्णाला तामसाहंकार म्हणतात. कुंभकर्णाचा वध म्हणजे उन्मत्त साधकांतील तामसाहंकाराचा वध होय ! उपनिषदें सांगतातच,

नायमात्मा प्रवचनेन लभ्यः । न मेधया न बहुना श्रुतेन ।।

पुष्कळ, अगदीं कुंभाइतकें पुष्कळ ऐकल्याने आत्मज्ञान प्राप्त होत नसते तर आत्मज्ञान प्राप्त होत असते साधनेने; म्हणून साधनाप्रवण साधकाने म्हणजे रामाने आपल्यांतील प्रचंड श्रवणभक्त अहंकाराला म्हणजे कुंभकर्णाला ठार मारले. रामाच्या पित्याने म्हणजे दशरथाने न कळत असल्याच श्रवणकुमाराचा वध केला होता आणि पुत्र रामाने तर त्या श्रवणकुमाराचे भयानक स्वरुप म्हणजे कुंभकर्णाचाच वध केला.

## इन्द्रजितपर्व

हा रावणाचा प्रतापी पुत्र मेघनाद आहे. त्याने इन्द्राशी युद्ध करुन इन्द्राचा पराभव केला आणि म्हणून याला इन्द्रजित म्हणायला लागले. इन्द्र म्हणजे माणसांतील भोगपरायण वृत्ति हें आम्ही मागेंच पाहिले आहे. असल्या भोगपरायण वृत्तीशी सतत झगडून जो संयमि साधक इन्द्रजित बनला तो पुन्हा राक्षस वृत्ति रावणाचा पुत्र कसा? असेंच आहे उच्च अवस्थेंत जाणाऱ्या साधकाला सुद्धां आपल्या अवस्थेचा अहंकार होऊन तो

राक्षसी वृत्तीचा बनतो हा या कथेचा सरळ अर्थ आहे. रक्ष म्हणजे रक्षण आणि राक्षस म्हणजे वृत्तींचे रक्षण करणें. जी जी वृत्ती साधकाला प्राप्त होते तिचे तो अहंकाराने रक्षण करीत जातो. शेवटी साधकाला निवृत्त व्हायचे असते त्याशिवाय समाधि अवस्था प्राप्त होत नाही. म्हणूनच योगसूत्रांतील प्रथम पादांतच पतञ्जली म्हणतात 'योगः चित्तवृत्ति निरोधः' इन्द्रिजिताने बाह्य इन्द्रियें जिंकली पण तींतून प्राप्त होणाऱ्या अहंकाराला आणि वृत्तीला तो जिंकू शकला नाही. म्हणूनच गीता दुसऱ्या अध्यायात म्हणते,

विषया विनिवर्तन्ते निराहारस्य देहिनः ।
रसवर्ज्यं रसोऽप्यस परम् दृष्ट्वा निवर्तते ॥ ५९ ॥

असा इन्द्रजित रामाविरुद्ध युद्ध करायला रणांत उतरला. प्रथम इन्द्रजितानेही बापाला आपल्या चुलत्याप्रमाणे सांगून पाहिले पण रावण कोणाचेच ऐकेना. त्याने मुलाला आज्ञा पाळायला सांगीतले आणि इन्द्रजित तसा वागला. इन्द्रजिताचे पहिले नांव मेघनाद असें होते. या मेघनाद शब्दाद्वारें वायुतत्वांतील साधकाची एक उच्च अवस्था रामायणकार सांगतात. वायुतत्वाची प्रखर साधना करीत असता एका वेळेस साधकाला मेघनादासारखा प्रचंड आवाज ऐकू येतो, अगदी अणुस्फोट होतो तसाच ! हे प्रत्यक्ष अनुभव आहेत, कल्पना नव्हत ! असल्या उच्च अवस्थाप्राप्त साधकाला रामायणकार मेघनाद म्हणतात. या मेघनादाने आपल्या इन्द्रियांवर संयम साधून इन्द्रजित बनला खरा पण त्याची भोगप्रवृत्ति आणि वृत्तिरक्षणाची इच्छा कायम असल्याने तो रावणपुत्र दाखविल्या गेला आहे. कोणत्याही स्वरुपांतील अहंकार वाईटच. यावरून साधक कितीही उच्च अवस्थेंत असला तरी आपल्या अहंकारी वृत्तीस्तव तो राक्षस होऊं शकतो असें या कथेंतुन रामायणकार सुचवितात. असल्या स्वतःतीलच इन्द्रजिताशी रामाला लढणें भाग पडतें.

इन्द्रजित युद्धांत उतरल्याबरोबर त्यानें एका फटक्यांत लक्ष्मणाला शक्ति मारून मेल्यासारखा केला. लक्ष्मण म्हणजे विवेक ! जो साधक आपल्याच विवेकाला घायाळ करेल तो रावणपक्षाचा नाही काय ? 'विवेक भ्रष्टानां भवति विनिपातः शतमुखः' राम शोक करायला लागले. पण

शोक करून काय होणार? रामभक्त हनुमन्त द्रोणाचलावर वल्ली आणायला गेले. पण त्यांना वल्ली सांपडेना. त्या वल्लीमुळें लक्ष्मण वाचू शकत होता असे वैद्यांनी सांगीतले होते. शेवटीं वल्ली शोधण्यांत व्यर्थ काल घालविण्यापेक्षा हनुमन्ताने तो द्रोणपर्वतच उचलून आणला. वैद्यांनी वल्ली ओळखून लक्ष्मणाला औषध दिले. लक्ष्मण उठून बसले. रामायणांत द्रोणपर्वत आहे तर महाभारतांत या द्रोणाकरवीं कौरवपांडवांना शस्त्र अस्त्र विद्या देवविली आहे. महाभारत युद्धांतील दुसरें सेनापती म्हणून द्रोणांना दाखविले आहे. हा द्रोण कोणता? तर हा द्रोण म्हणजे कुंडलिनि शक्ति ज्या स्थानी सूप्त पहुडली असते ते मूलाधार होय. मूलाधारस्थित कुंडलिनि जागृत केली कि विवेकवल्ली लक्ष्मण आपणहून जागृत होतो. असा द्रोणाचल हनुमन्तानें उचलून आणला होता; एवढा पराक्रमी हनुमन्त साधक होता.

## इन्द्रजित वध

एवढा पराक्रमी इन्द्रजित पण आपल्या अमोघ शक्तिचा रामलक्ष्मणावर कोणताच परिणाम होत नाही असें पाहून तो विचारांतच पडला. आतां त्यानें एक यज्ञ करायचे ठरविले. हा यज्ञ सफल झाल्यास इन्द्रजित अजिक्य झाला असता. विभीषणानें हे रहस्य रामाला सांगीतले. इन्द्रजिताचे यज्ञांत विघ्न आणून त्याचा यज्ञ यशस्वी न होऊं देण्यांतच राम होता. पण इन्द्रजित जो यज्ञ करणार त्याचे स्थान त्याने गुप्त ठेवले होते. पण विभीषण ते स्थान जाणत होता. विभीषणाने लक्ष्मणाला आपल्यासह घेतले आणि यज्ञ करतांनाच इन्द्रजिताचा वध करण्याचा कट शिजला. काय एका ब्राह्मण पुत्राच्या यज्ञांत विघ्न आणून त्याला ठार मारण्याचा कट रामासारखा देवतास्वरुप माणूस करतो? मग रामाने ताटका राज्यांत केलेल्या यज्ञाचा विमोड करणाऱ्या ताटकेला ती यज्ञाचा विध्वंस करते या तिच्या कृत्यावरून तिला राक्षसी ठरवून ठार कां मारले? आता राम तर तेंच यज्ञ विध्वंस करण्याचे राक्षसी कर्म करीत होते आणि शिवाय यज्ञकर्म करणाऱ्या इन्द्रजिताला ठार मारणार ही होते. ही कोणती नीति, हे कोणते अध्यात्म?

पण झाले खरें असे! विभीषण आणि लक्ष्मण निघाले तो थेट इन्द्रजित ज्या गुप्त स्थानीं यज्ञाला बसला होता त्या स्थानींच अवतरले. मागे इन्द्रजिताने लक्ष्मणरुप विवेकाला शक्तिसन्निद्ध केले होते आता अक्ष्मण म्हणजे साधकाचा विवेकच त्या इन्द्रजितरुप राक्षसी अहंकाराला ठार मारणार होता. इन्द्रजिताला ललकार दिली आणि त्याला युद्धाचे आव्हान दिले. इन्द्रजित शूर योद्धा होता. त्याने आव्हान स्वीकारले आणि यज्ञ सोडून तो उठला, तोंच लक्ष्मणाने शूल मारुन इन्द्रजिताचा वध केला.

विवेकशूलाने एक शर शक्तिशाली पण अहंकारी वृत्ति मरण पावली! इन्द्रजित मरण पावला.

# नवम अध्याय

## मन्दोदरी वस्त्रहरण

इन्द्रजिताचा वध झाल्यावर रावण एकाकी पडला आणि आपल्या प्रिय पुत्राचा वध करणाऱ्या रामाला नेस्तनाबूत करण्याकरतां प्रयत्न करूं लागला. परंतु त्याला हें निश्चित माहीत होते कि रामाचा वध करणे सोपे काम नाही. त्याकरता स्वतःत अमोघ शक्ति आणण्याकरता रावणानें एक अतुल यज्ञ आरंभिला. यज्ञ करीत असतांना याज्ञिकानें आपले स्थान सोडायचे नाही असा त्या यज्ञाचा दण्डक होता. स्थान सोडल्यास तो यज्ञ अयशस्वी होऊन यज्ञफलाद्वारे प्राप्त होणारी अमोघ शक्ति यज्ञकर्त्याला मिळायची नाही असें त्या यज्ञाचें रहस्य होते. म्हणजे गीतावचनानुसार पुर्णपणें स्थितप्रज्ञ झाल्याशिवाय तें यज्ञकर्म करणारा साधक सामर्थ्यशील योगी बनूं शकत नव्हता. योगीसन्त कबीर या परम अवस्थेचे आपल्या सखीभाव भाषेंत वर्णन करतात, 'शून्य महल में दियना बारिले। आसन से मत डोल रे ।। कहे कबीर आनन्द भयो है। बाजत अनहत ढोल रे ।।' रावणानें यज्ञ सुरूं केला, यज्ञ पूर्ण झाल्यास रावण अजिंक्य बनला असता. असाच एक महान यज्ञ रावणपुत्र इन्द्रजितानें सुरुं केला होता. त्याच्या यज्ञांत विघ्न आणण्याकरता रामानें लक्ष्मणाला पाठविले आणि यज्ञ करणाऱ्या ब्राह्मणपुत्र इन्द्रजिताला लक्ष्मणाने शूलाने ठार मारले. आतां प्रत्यक्ष रावणाचीच पाळी आली होती. यावेळेस रावणयज्ञांत विघ्न आणण्याचे महत्कार्य रामानें वालीपुत्र अंगदाकडे सोंपविले होते.

यज्ञांत विघ्न आणणारी व्यक्ति ब्राह्मण असो कि स्त्री परंतु त्या यज्ञनाशक व्यक्तीला आध्यात्माचे नांवावर स्वतः रामानेच ठार केले होते. ताटकावध हा त्यापैकीच एक स्त्रीवध होता. मग त्याच रामाने तसलेच यज्ञ करणाऱ्या इन्द्रजित आणि रावणाचे यज्ञकर्मांत कां विघ्न आणावे? मग आतां राक्षस राम कि इन्द्रजित, रावण? पण आमचे परम्परागत शास्त्रीपंडित या सरळ प्रश्नाचे समर्पक उत्तर न देता प्रश्नकर्त्यावरच शिव्यांची लाखोली वाहतील, नीच, पाजी, धर्मभ्रष्ठ, पाखंडी इत्यादि!

यज्ञांत विघ्न आणणारे जर अनार्य आणि राक्षस मानले तर रामाला राक्षस मानणें भाग आहे. आमच्या इतिहासकारांची तर असल्या प्रश्नाचे बाबतींत मोठी तारांबळ उडते; आणि त्यांनी कल्पनेने प्रस्थापित केलेल्या कथित शोध सिद्धांतांना धरून ठेवणे त्यांना कठीण जाते. म्हणे आर्य बाहेरून आले ते अनार्यांच्या राज्यांत जाऊन यज्ञ करीत. आपल्या भूमींत यज्ञ करणाऱ्या उपटसुंभांना कथित अनार्य विरोध करणारच. त्यांचा देशभक्तीचा विरोध राक्षसी मानून रामासारख्या आर्यांनी स्त्रीपुरुष ब्राह्मणशूद्र न पाहतां सर्रास वध करायचा! मग आतां तीच राक्षसी अनार्य गोष्ट राम करीतात. आपल्याला यश मिळावे या इच्छेने कथित आर्य वा वसिष्ठ विश्वामित्र आणि ऋषि यज्ञ करीत. त्याच यशाची इच्छा धरून इन्द्रजित रावणाने यज्ञ केलेत. ताटकादि राक्षसांनी यज्ञाला विरोध करण्याचे जे राक्षसी कृत्य केले तेंच आता स्वतः राम करीत होते; मग राम आर्य, आध्यात्मिक आणि अवतारी कसें ?

एवंच रावणाने विजयाप्रित्यर्थ यज्ञ आरंभिला. अंगदाने त्याचे यज्ञाला विरोध केला आणि अशी प्रलोभनें दाखविली कि रावणानें आपले आसन सोडून यज्ञाला व्यत्यय आणणाऱ्यावर धांवून जावे. पण रावण कच्च्या गुरुचा चेला नव्हता. अंगदाने लाख प्रयत्न केले पण रावण स्थानभ्रष्ट होईना कारण रावणावर गीताश्लोकाचा परिणाम झाला असावा, 'यग्दत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम'. मग रावण स्थानभ्रष्ट कसा होणार ? आतां काय करावे ? अंगदाने रामाचा सल्ला घेतला आणि रामकार्य सुरुं झाले. रावणपत्नि मंदोदरीला द्रौपदीप्रमाणें विटम्बना करीत यज्ञभूमीवर खेंचीत फरफटत ओढण्यांत आले. मन्दोदरी विलाप करते, 'हे पौलस्त्य वंशी पराक्रमी आर्यश्रेष्ठ रावणा माझी गति पाहून तुम्हाला क्रोध कसा येत नाही ? तुमच्या पत्निचे असे धिंडवडे निघत असतां तुम्ही स्वस्थ कां ?' परन्तु यज्ञाचे फललोभाने रावण स्थान सोडून पत्निची विटम्बना वांचवायला तयार नव्हता.

बिचारी साध्वी ! आपला त्रिखंड पराक्रमी पति आपल्या पातिव्रत्याचे रक्षण करण्यास तयार नाही असें पाहून मन्दोदरी आपल्या मृत पुत्राची

आठवण काढून विलाप करते. ‘हे इन्द्राला जिंकणाऱ्या वीरपुत्रा मेघनादा, तूं तरी स्वर्गातून धांवून ये आणि आपल्या आईच्या विटम्बनेचा सूड घे. तुझा पिता यज्ञफलाचे लोभाने षंढ बनला आहे.’ रावण तरीहि स्थान सोडीना. परंतु अंगद बुद्धिमान आर्य खरा! त्याने मन्दोदरीच्या स्तनाला हात घातला आणि तिची रत्नजडित कंचुकि त्याने फाडली. साध्वी स्तन झांकायला लागली पण रावण कांही उठेना. अंगदाने आणखी पराक्रम केला. त्याने साध्वी मंदोदरीच्या ओच्यांत हात घातला आणि—...आणि मन्दोदरीला विवस्त्र केले! द्रौपदीचे लज्जारक्षण करण्याकरता रामावतार कृष्ण धांवले पण जेथें प्रत्यक्ष राम परमेश्वरच साध्वीची विटम्बना करतात तेथें कोण धांवून येणार? ‘परमेश्वरा धांवा!’ धांवा सुरुं झाला. आतां रावणाला राहवेना. ‘ऐसी तैसी त्या यज्ञफलाची! आपल्या साध्वी पत्निचा मर्कट अनार्यांकरवीं होणारा छळ उघड्या डोळ्यांनी पहायचा काय?’ रावण यज्ञस्थान सोडून उठला. पराक्रमी रावणाशी सामना करण्याची त्या मर्कटांची काय प्राज्ञा? अंगदादि वानर पळून गेले. रावणाचा मात्र यज्ञ भंग झाला. ही कथा मात्र मूळ वाल्मिकी संस्कृत भाषेत लिहलेल्या रामायणांत नाही.

स्वामिकार्य आपल्या हातून घडले म्हणून धन्य होत्साता अंगद रामाकडे धांवतच गेला. रामालाही तेंच हवे होते. रावणाचा यज्ञ अपूर्ण राहिला. रावण स्थानभ्रष्ट झाला. आणि मंदोदरीच्या विटम्बनेचे काय? एका पतिव्रतेची विटम्बना करून रावणाचा यज्ञ बंद पाडण्याचे रामाने महत्कार्य केले. हेंच कार्य रावण पक्षाचे लोक करीत होते मग त्यांना दोष कां द्यायचा? द्रौपदीचे वस्त्रहरण केल्यामुळें आपण कौरवांवर आग पाखडतो. परन्तु रामाने अंगदाकडून तेंच नीच कार्य करविले त्याबद्दल आमचे शास्त्रीपंडित एक अवाक्षर बोलायला तयार नाहीत आणि तयार झाल्यास रामानें जे केले ते योग्यच केले असें ठांसून सांगतील. असली वृत्ती अरेरावीची अतएव अनाध्यात्मिक आणि अनार्याला शोभेल अशी मानावी लागेल म्हणजे वरील प्रसंग ऐतिहासिक मानल्यास शास्त्रीपंडितांचे आणि रामजीवनांत आदर्श इतिहास शोधणाऱ्या इतिहासकारांचे तोंड बन्द पडते. मग हा इतिहास मानायचा काय?

आदर्श मानणाऱ्या व्यक्तीला असल्या घाणेरड्या प्रकाराला इतिहास मानून रामजीवनावर कलंक लावण्याची इच्छा होणार नाही. परन्तु आध्यात्मिक रामायण पाहिल्यास रामाने जें करविले तें योग्यच होते असें म्हणावे लागेल. एवढेंच नव्हे तर राम बनण्याकरता उच्च आध्यात्मिक साधकाला मन्दोदरीचे वस्त्र फेडून तिला नग्न करणें आवश्यक आहे. या कथेंत आणि द्रौपदी वस्त्रहरण कथेंत वस्त्र म्हणजे वृत्ति किंवा संस्कार मानल्यास सर्व रहस्य उलगडेल. रावणवृत्तीचे संस्कार नाहिसे केल्याविना रामाला रावणावर मात कशी करता येईल? मन्दोदरी रावणवृत्तीची धर्मपत्नि, म्हणून रावणीवृत्तीचे संस्कार नष्ट करण्याकरतां रामवृत्तीला किंवा जीवात्म्याला मन्दोदरीचे वस्त्र फेडणे आवश्यक आहे.

वाल्मिकि नंतरच्या कोण्यातरी विद्वानाने मन्दोदरी वस्त्रहरणाची कथा मूळ वाल्मिकि रामायणांत घुसडलेली दिसते. पण रामायणाच्या मूळ आध्यात्मिक रुपकांना धरून आणि हेतूला धरून ती इतकी उत्तम वठली आहे कि तो विद्वान वाल्मिकिइतकांच अध्यात्मक्षेत्रांत प्रगत असला पाहिजे हें उघड आहे. म्हणजे एक काळ निश्चितपणें असा होता किं ज्यावेळेस रामायण हा इतिहास नसून तें आध्यात्मिक जीवनानुभवांचे एक काव्य उद्घाटन आहे हे त्या काळच्या लोकांना माहीत होते. आज मात्र त्याचे विस्मरण झाले आहे.

पराक्रमी इन्द्रजितासारखा पुत्र जिच्या उदरीं जन्माला आला ती महान सति मन्दोदरी म्हणजे मन्द उदरी कशी? कारण स्पष्ट आहे. जिच्या उदरांतून दैवी वृत्ती उत्पन्न न होता आसुरी वृत्तींची निपज होते ती कुप्रसवा मन्दोदरी नाही तर काय? असल्या कुप्रसवा कुलटेचे वस्त्र फेडणें रामाचे कर्तव्य होते. आपल्या राक्षसी दृढनिर्धाररूप यज्ञाचा त्याग करून रावण उठला आणि त्यामुळें रावण वृत्तीचा रामाला वध करता आला. रावणाच्या यज्ञत्यागाचे मूळ कारण मन्दोदरीच्या वस्त्रहरणांत आहे. पंचप्राणरुप पांडवांची धर्मपत्नि द्रौपदीचे वस्त्रहरण म्हणजे प्रत्यक्ष इतिहास नसून कुप्रवृत्तीरुप कौरवांचेद्वारे सत्प्रवृत्तीरुप पांडवांच्या वृत्तीचे हरण होय हें लक्षांत घेतल्यास कथित कौरवांवर आग पाखडण्याचे कारण राहणार नाही.

## पञ्चकन्या

अहल्या द्रौपदी सीता तारा मन्दोदरी तथा।
पञ्चकन्या स्मरेन् नित्यं महापातक नाशनम् ।।

पञ्चकन्यांचे विचित्र आणि चारित्र्यहीन जीवन ऐतिहासिक दृष्टया पाहिल्यास असल्या पञ्चकन्या आदर्श म्हणून प्रातःस्मरणीय कशा याचा उलगडा विद्वानांना सुद्धां होत नाही. वरील पञ्चकन्यांपैकी द्रौपदी सोडल्यास चारी रामायणांतीलच आहेत. तेव्हा पञ्चकन्या ऐतिहासिक व्यक्ति मानल्यास त्यांना पातकनाशिनि मानणे जिवावर येईल. यापैकी द्रौपदी, सीता, तारा आणि मन्दोदरीचा योगार्थ आम्ही पाहिला. आता अहल्येचा योगार्थ पाहू. हल म्हणजे नांगर. ज्या शरीररूप क्षेत्रांत साधनेच्या प्रखर कर्माचा नांगर म्हणजे हल चालणार नाही अशा साधनाहीन वृत्तिना वा देहाला रामायणकार अहल्या म्हणतात. शरीराला गीता क्षेत्र म्हणते, इदं शरीरं कौन्तेय क्षेत्रमित्यभिधीयते'. अर्जुना या शरीराला क्षेत्र म्हणतात. शरीराला क्षेत्र मानल्यास त्यांत नांगर वा हल चालविलाच पाहिजे अन्यथा ते क्षेत्र सुपीक कसे होणार ? साधना म्हणजे हल असून क्षेत्राची सुपीकता म्हणजे अध्यात्मप्राप्ति होय. जो साधक साधना करणार नाही त्याचे संस्कारहीन शरीराला रामायणकार अहल्या म्हणतात. असली असंस्कारित अहल्या काया युगायुगाच्या दीर्घ आणि प्रखर तपस्येमुळे पावन होऊन आनन्दघन रामपादस्पर्शाने पुनीत बनते.

साधनाहीन काया इन्द्राला म्हणजे इन्द्रियपरायण वृत्तीला आपला भोग देणारच. असली संस्कारहीन काया शीळेसमान नाहीतर काय ? म्हणूनच पतिशापानें ती युगयुग शापभ्रष्ट होऊन शीला बनते आणि त्रेतायुगाचे काळांत ती आनन्दघन रामपाद स्पर्शाने पुनीत होत्साति पुनर् पति चरणाजवळ स्वर्गात जाते. आध्यात्मांतील सूक्ष्म अनुभव पण अशा खुबीने लिहल्या गेलेत कि त्यांत नीतिचे पाठ देताना कथा सौरभ सुद्धां साधले आहे. वाल्मिकि आणि व्यासांसारखे कथाकाव्यकार तेच !

एका गीतांत अहल्या म्हणते,

रामा चरण तुझे लागले । आज मी शापमुक्त जाहले ।।

## रावणवध

मन्दोदरीची लज्जा रक्षण करण्याकरता रावण उठला खरा पण भीतभीतच, कारण त्यांत त्याचे मरण होते. यज्ञ अपूर्ण राहिल्यामुळें आतां तो रामाला मारू शकत नव्हता. आतां राम अजिक्य झाले होते. जे दैवांत होते ते घडले असें मनाला समजावून रावण युद्धाला उभा राहिला. पण तो शूर असल्याने रामाला त्याने दाद दिली नाही. रामानें त्याचे एक शिर तोडून दुसऱ्या शिरावर शरप्रहार करावा तर तितक्या वेळांत रावणाचे पहिले शिर आपोआप जुळून जावे. आतां काय करावे असा रामासमोर पेंच पडला. शेवटीं विभीषणाने रामाला रावणाच्या मृत्यूचें रहस्य सांगीतले. रावणाचे हृदयांत एक अमृत कुंभ होता तो नष्ट केल्याशिवाय रावण मरू शकत नाही असा गौप्यस्फोट विभीषणानें केला. रामानें रावणाची दशग्रंथाच्या अभिनिवेशाची दहा शिरें तोडण्याच्या भरास न पडता त्या दशग्रंथांच्या पाठान्तराचा अभिनिवेश पुरविणारे जे अहंकारी हृदय आणि त्यांतील रुधिरपोषणच बन्द करण्याचा मूल उद्योग केला. हृदयाला बाण लागला, हृदय विदिर्ण झाले आणि रावण आपल्या दशग्रंथांच्या दशमुखासह धरणीवर पडला. एक राक्षसी हौतात्म धाराशयी झाले, एक अहंकारी अभिनिवेशाद्वारें नटणारे ब्राह्मणत्व संपले !

कांही पंडितांना त्यांना दशग्रंथ मुखोद्गत आहेत आणि त्या दशग्रंथाचे आधारें ते कोणाशीही वाद घालायला तयार आहेत असा त्यांना भयंकर अहंकार असतो. दशग्रंथ मुखोद्गत असण्यांतच त्यांना ब्राह्मणत्व प्राप्त झाले आहे म्हणजे त्यांनी ब्रह्म जाणले आहे अशा भ्रमांत असले अहंकारी पंडित असतात. पण ग्रंथ मुखोद्गत असणें म्हणजे ब्रह्मज्ञान प्राप्त होणें नव्हे हे त्यांच्या अहंकारी वृत्तीमुळें त्यांना आणि इतरांनाही कळत नाही. असल्या नीच वृत्तीलाच रामायणकार राक्षस म्हणतात. ब्रह्मवृत्तीच्या खोटया बुरख्याखाली नांदणारी राक्षस वृत्ती म्हणजे ब्राह्मण कुलोत्पन्न राक्षस रावण होय. दुर्दैवाची गोष्ट अशी कि असल्या वाचीवीर वावदुकांची वक्तृत्वपूर्ण प्रवचनें ऐकून किंवा प्रतिपक्षावर आपल्या वृथा कोटीबाजपणाद्वारें छाप पाडण्याची असल्या आक्रमक तथाकथित विद्वान वा पंडितांची विजयशाली शैली पाहून साधारण जनता असल्या वृथा अभिनिवेशी पंडितांनाच ज्ञानी

म्हणतात. असली खोटी वृत्ती आणि अहंकारी अध्यात्म समाजांत वाढल्यास समाज पाखंडी बनतो हें जाणून राम, श्रीकृष्ण, आद्यशंकराचार्य आणि तुकारामासारखे समाजाची कळकळ असणारे सन्त योगी असल्या पाखंडी पंडितांवर म्हणजेच रावणावर कडाडून हल्ला चढवितात आणि असल्या रावण वृत्तीला समाजांतून मुळापासून नष्ट करण्याचा खरा आध्यात्मिक प्रयत्न करतात. तुकाराम महाराज स्पष्टच म्हणतात कि लोकांनो तुम्हाला धर्माचे रक्षण करायचे आहे काय मग एकच करा,

धर्माचे कारण । करणें पाखांड खंडण ।
नाही भाडभीड । तुका म्हणे सान थोर ॥

आज समाज असल्याच अहंकारी प्रवचनकारांच्या नादीं लागला आहे. त्यांची वक्तृत्वपूर्ण प्रवचनें ऐकून ते त्यांना ज्ञानी समजून त्यांच्या नादीं लागतात आणि खऱ्या सन्तयोग्यांना विसरतात. पांडित्याचा प्रचार करणाऱ्या राक्षसी वृत्तीच्या विद्वानांचा लोक मान करून त्यांना विपुल धन देऊन त्यांचा सन्मान करतात आणि सद्वृत्तीच्या सन्तांना पूर्णपणें विसरतात. असली अधार्मिक अनाध्यात्मिक परिस्थिति आतां बदललीच पाहिजे. रामाने हेंच महत्कार्य केले. आपल्यालाही तेंच महत्कार्य करायचे आहे. रामाचा आदर्श जर वागणुकींत आणायचा असेल तर समाजांतील असल्या अभिनिवेशी दशग्रंथी ब्राह्मणांना, अहंकारी वक्त्यांना आणि आक्रमक वावदुकांना समाजांत मुळींच स्थान मिळूं देता कामा नये. समाजाने असल्या राक्षसी वृत्तीच्या दिखावू लोकांचे नादीं लागू नये म्हणजे अनायास ते आपल्याच मरणानें मरतील. समाजाच्या आध्यात्मिक स्वस्थतेकरता असल्या आक्रमक वावदूक आणि विद्वानांना व्यासपीठावरून नामोहरम करणे अति आवश्यक होऊन बसले आहे. हेंच रामकार्य लेखक करतो आहे.

रावण असा मरतो.

## शम्बुक वध

रावणाचे पारिपत्य करून राम आपल्या राज्यावर स्थानापन्न झाले. राम राज्यांत प्रत्येक प्रजाजन आपापल्या धर्माने वागत असे सांगतात. आजचे ईसाई, मुस्लिम आणि हिन्दु धर्म तर रामायण कालांत नव्हते. मग रामकालांतील प्रजाजनांचा धर्म कोणता? वैदिक! वैदिक म्हणजे ज्ञानपूर्ण व्यवहार! प्रत्येकाचे पिंडधर्माला धरून त्याचे वागणे म्हणजे साधनाधर्म असे. त्यावेळी चातुर्वर्ण्य आजच्या स्वरुपांत नसावे असे दिसते. कसेही असो; प्रत्येक प्रजाजन आपापल्या पिंडधर्माने वागत असल्याने रामराज्यांत अधर्म नव्हता आणि अधर्माचरण नसल्यामुळे प्रजाजन सुखी आणि शंभर वर्षे जगणारे होते. प्रजाजनापैकी कोणी पाप कर्म केल्यास त्याचे दायित्व राजा या नात्याने म्हणे रामावर येत असे असें दिसते. आणि मौजेची गोष्ट ही कि रामराजा तसले दायित्व म्हणे स्वीकारीत असे. काय पण आदर्श राज्य असेल ते!

मंत्रीसहवर्तमान राम सभेंत बसले असता एक ब्राह्मण आपल्या अष्ट वर्षाच्या मृत पुत्राला घेऊन रामासमोर उपस्थित झाला आणि उद्गारला, 'रामराजा तुझ्या राज्यांत पापकर्म होत आहे. त्याचा परिणाम म्हणजे माझ्या अल्पवयी पुत्राचा मृत्यू होय. या पापाला राजा तूं उत्तरदायी आहेस. तूं पापाचे मूळ शोधून काढून पापी पुरुषाला दण्ड कर आणि माझ्या पुत्राला जिवंत कर' काय रामासारखा वंदनीय आदर्श राजा पापाचा धनी? हो हो, रामराजाच पापाचा धनी! त्या काळांत सुप्रीम कोर्ट नसल्यामुळें ब्राह्मणाचा आरोप रामाने मान्य केला. ब्राह्मण खोटे बोलेल काय? राम राजा तसाच उठला आणि शोध करूं लागला. गुरु वसिष्ठांनी त्याचे कारण रामाला सांगितले.

शोध करता करता रामाला असें आढळून आले कि दण्डकारण्यांत एक शम्बुक नांवाचा शूद्र खाली डोके आणि वर पाय करून तपस्या करतो आहे. शिव शिव काय अधर्म हा! एका शूद्राने उच्च वर्णीयांची सेवा न करता उच्च वर्णीयांप्रमाणे तपस्या करायची काय? वसिष्ठ गुरुंच्या आज्ञेने रामाने आपलें खड्ग काढून त्या अधम शूद्राचा कण्ठ कापून वध केला.

पापमूळ नष्ट झाले आणि काय आश्चर्य तो ब्राह्मणपुत्र जिवंत झाला! ज्या आर्यभूमींत प्रत्येकाला त्याचे त्याचे इच्छेप्रमाणें साधना वा पूजा करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे असा जो आम्ही डांगोरा पिटतो त्या उदार-मतवादी भारतांत रामराजा सारख्या विश्ववंद्य अवतारी पुरुषाने एका शूद्राचे शिर धडावेगळे करावे? आणि बिचाऱ्या शूद्राने कोणता अन्याय केला, कोणता अधर्म केला? तर उच्चवर्णीयांप्रमाणें तपस्या केली! आणि ती तपस्या कशी तर खाली डोके आणि वर पाय करून! अशी विपरीत तपस्या अयोग्य म्हणावी तर आज भारतांतील अनेक योगासन केन्द्रातून खाली शिर आणि वर पाय करण्याचे कार्यक्रम वा तपस्या रोजच चालते. मग असल्या शिर्षासनाला वा विपरीत करणीला अधर्म मानून त्या साधकाचे शिर रामानें धडावेगळे कां करुं नये? रामानें असला आततायीपणा कां करावा? रामायण इतिहास मानल्यास रामाचे वरील कृत्याचे समर्थन करता येत नाही.

कांही नवबौद्ध तर असें मानतात कि शम्बुक शूद्र होता. त्याचा सम्बन्ध भगवान बुद्धाशी येऊन त्याने बौद्ध साधना सुरूं केल्यात. त्याचा क्रोध येऊन रामाने शम्बुकाचा वध केला. उच्चवर्णीयांचा नीचवर्णीयांवरील हा अत्याचार आहे. असल्या अत्याचारांनी तुमचा हिन्दुधर्म बरबटला आहे. नष्ट करा असला नीच हिन्दुधर्म......... इत्यादि! नवबौद्ध वा हिन्दुधर्माला अजून चिकटून असणाऱ्या आमच्या शूद्रवर्णीय बांधवांना आम्ही कोणत्या तोंडाने उत्तर देणार? काय रामाचे असले करणें योग्य होते? कदापि नाही. मग राम आदर्श कसा? राम तर नीच, अधर्मी! असल्या शिव्याशापावर आमचे कथित सनातनी किंवा इतिहासप्रेमी विद्वान मूक गिळून चूप बसतील. त्या काळच्या रीतीनुसार राम योग्य वागला असें निरर्थक वेळकाढू उत्तर देऊन असले लोक चूप बसतील आणि आग्रह धरल्यास वाद करणार नाहीत.

पण थांबा, रामाने शम्बुकाचा वध केला तें योग्यच झाले. नव्हे आजही कोणी शूद्र तपस्या करून विपरीत करणी म्हणजे शीर्षासन करीत असेल तर तो ब्राह्मण जरी मानल्या गेला असला तरी त्याला शूद्र समजून

त्याचे मस्तक धडावेगळे करावे. काय म्हणता? शीर्षासन करुं नये? तो शूद्र तपस्येप्रमाणें आहे? होय शूद्र तपस्या! त्याचे नांवच मुळीं विपरीत करणी आहे. अहो पण शीर्षासन केल्याने बुद्धि तल्लख बनते, साधक दीर्घायु बनतो इत्यादि त्याचे लाभ आहेत आणि तुम्ही हें काय तर्कट सांगता? पण रामाचे सांगण्यावरून सत्यस्थिति अशी आहे कि ज्याला म्हणून ब्राह्मण म्हणजे ब्रह्म जाणण्याची इच्छा असेल त्या सत्पुरुषाने शीर्षासन कदापि करु नये. तसे केल्यानें तो शूद्र शम्बुक बनेल आणि त्यांचेतील ब्रह्मकुमार अल्पायु मरेल! हें सर्व समजण्याकरता आम्हाला प्रथम वैदिक चातुर्वर्ण्य नीट समजून घ्यावे लागेल आणि शम्बुक या रामायणीन नामाभिधानाचा यौगिक अर्थ समजवून घ्यावा लागेल.

## वैदिक चातुर्वर्ण्य

वैदिक चातुर्वर्ण्याचे एकच सूत्र आहे 'जन्मना जायते शूद्रः संस्कारांत द्विज उच्यते.' म्हणजे जन्मतः सारेच शूद्र असतात, संस्कारांनी साधक ब्राह्मण बनूं शकतो. जन्मजात ब्राह्मण्याची मक्तेदारी वैदिक परम्परेला अमान्य आहे मग कोणाला त्याबद्दल कांहीही वाटो. या अर्थाने प्रत्येक व्यक्ति सत्कर्मांने आणि सुसंस्काराने ब्राह्मण बनू शकतो मग तो तुकारामासारखा लिंगायत वाणी असो, गोरा कुम्भारासारखा अस्पृश्य असो कि कबीरासारखा मुसलमान असो. वैदिक परम्परेचे ध्येय सर्व विश्वालाच ब्राह्मण करण्याचे आहे, मग त्याची जात, धर्म वा राष्ट्रीय विचार कोणतेही असोत! वैदिक वर्णाचा सम्बन्ध वृत्तीशी आहे न कि जन्मजात समाजरचनेशी! या दृष्टीने चातुर्वर्ण्याचा वैदिक अर्थ शब्दागणिक पाहू,

### ब्राह्मण

'ब्रह्म जानाति ब्राह्मणः' जो प्रत्यक्ष ब्रह्मस्वरुपाला जाणेल तोच खरा ब्राह्मण. उच्चावस्था ब्रह्म जाणण्याकरता साधकाच्या वृत्तीच ब्रह्ममय असणे आवश्यक आहे. ब्रह्मवृत्तीला मारक असे कार्य वा वृत्ती साधकाचे चित्तांत उत्पन्न झाल्यास तसल्या वृत्तींचा नाश करणें साधकरूप रामाला आवश्यक असते. साधकाचे सोळासहस्रधारी नवखिडक्यांच्या डोलाचे शरीर म्हणजेच रामराज्य होय. आणि त्या राज्याचा राजा राम होय. आपल्या शरीरांत

क्षूद्र शूद्र वृत्ती वा कर्म होत असल्यास त्यांचा परिपोष केल्याने साधकांतील ब्रह्मवृत्ती अल्पायु होऊन मरणार कीं नाही? मग असल्या शूद्रवृत्तीचा रामराजानें वध करून स्वत:तील अल्पायु ब्राह्मणपुत्राला पुनर्जिवंत करुं नये काय? रामाने असल्या शूद्र शम्बुकाचा वध करून ब्रह्मपुत्राला जिवंत आणि दीर्घायु केले. याशिवाय या कथेंत अन्य आशय नाही.

समाधि प्राप्त झाल्याशिवाय ब्रह्मवृत्ति उत्पन्न होत नसतात. समाधि लावणारा योगी जे आसन लावतो त्यांत पाय खाली म्हणजे मांडी घातलेले आणि शिर वर असते. असल्या आसनाने मूलाधारस्थ कुंडलिनि शक्ति सुषुम्नेद्वारें उर्ध्वगामी बनून सहस्त्रदलकमलांत स्थिर होते आणि योग्याला समाधि लागते. समाधि अवस्थेंतच ब्रह्म समजत असल्यामुळे त्या अवस्थेंत असणाऱ्या योग्याला ब्राह्मण म्हणतात. असल्या साधकाला उर्ध्वरेता शिव सुद्धां म्हणतात. रेत म्हणजे कुंडलिनि शक्ति खालून वर मस्तकांत जावी लागते. असल्या कृत्यापेक्षां विपरीत करणी म्हणजे खालीं शिर आणि वर पाय केल्यास शक्ति उर्ध्वगामी न बनता अधोगामी बनेल आणि असला साधक मेंदूने तल्लख वाटला तरी अब्राह्मणवृत्तीचा केवळ भौतिक लाभावर लक्ष ठेवणारा शूद्र बनेल हें एक कटु सत्य आहे. त्यामुळें ज्यांना समाधि अवस्था प्राप्त करून ब्राह्मण बनायचे असेल त्यांनी शीर्षासन वा विपरीत करणी कदापि करूं नये असा रामायणांतील शम्बुकाख्यानाचा गर्भित अर्थ आहे.

## क्षत्रिय

ब्राह्मण शब्दाचा अर्थ कळल्यावर इतर वर्णांचा अर्थ कळणें कठीण जाणार नाही. क्षेत्र म्हणजे शरीर हें आपण पाहिलेच. साधकाच्या शरीराला धरून ज्या कोणत्या वृत्ती असतील त्यांचे सातत्यानें रक्षण करणारा तो क्षत्रीय वा क्षत्रप होय. या अर्थानें राम आणि कृष्ण क्षत्रिय मानले आहेत. वास्तविक न रावण ब्राह्मण होता न राम क्षत्रिय. हा सर्व वृत्तींचा खेळ आहे. क्षत्रिय वृत्तीचे रक्षण न करता इहजन्मांतच जो परम्पुरुष ब्राह्मण बनेल त्याला रामायणकार आणि महाभारतकार विश्वामित्र म्हणतात. विश्वाचे मित्रत्व स्वीकारील तो क्षत्रिय कसा? आतां तो ब्राह्मणच झाला! आपल्यांतील उच्च वृत्तींचाही त्याग करावा लागतो ब्राह्मण व्हायला!

वृत्तिशून्य अवस्था म्हणजेच ब्राह्मणत्व होय. वृत्तीरुप सीतेचे रावणाने हरण केल्यावर राम रडायला लागले हेंच रामाचें क्षत्रियत्व होय. त्या वृत्तीला ब्राह्मण रावणाकडून परत आपल्यांत आणण्याचा रामाचा निर्धार कितीही कर्तव्य सुन्दर वाटला तरी तो त्याच्या क्षत्रिय वृत्तीचेंच वर्धन करणारा आहे. आणि रावण? रावण सीतेचा त्याग करतो, मन्दोदरीचा त्याग करतो, राज्याचा त्याग करतो आणि शेंवटी स्वतःच्या अस्तित्वाचाही त्याग करून रामरुप बनतो; असल्या त्याग परम्परेंतच रावणाचे ब्राह्मणत्व अधिक खुलून दिसते. राम-रावण युद्ध ब्रह्मवृत्ती आणि क्षत्रिय वृत्तीचा साधक जीवनांतील इतिहास आहे. तो इतिहास अमर आहे, सनातन आहे आणि मानवजात असेपर्यन्त राहील.

## वर्ण व्यवस्था : राम रावण आदर्श

रामायणामध्यें म्हणूनच रामाला मर्यादापुरुषोत्तम दाखविले आहे. राम सर्व पुरुषांत उत्तम पुरुष खरा पण त्याच्या उत्तम साधकावस्थेला मर्यादा दाखविली आहे. आपल्या सात्विक वृत्तीरुप सीतेचा तो त्याग करूं इच्छित नाही. सीतावृत्तीचे ब्रह्मरूप रावणाने हरण केल्यास त्या उच्च ब्रह्मरूप अवस्थेंत न रमता राम आपल्या त्यापेक्षां निम्न सात्विक वृत्तींतच रमायला पाहतो; नव्हे त्या उच्च ब्रह्मवृत्तींतून सात्विक सीतावृत्तीला सोडविण्याकरता अहोरात्र विलाप करतो, धडपडतो, युद्ध करतो. रामवृत्ती या दृष्टीने मर्यादित म्हणजे वृत्तीरक्षणाचे अवस्थेंतील क्षत्रिय वर्ण होय. म्हणून रामायणकारांनी रामाला क्षत्रिय तर रावणाला ब्राह्मण दाखविले आहे. वृत्तींचे रक्षण करणारा जो असेल तो क्षत्रीय होय.

यादृष्टीनें शेवटी सर्वस्वाचा त्याग करीत खरा ब्रह्मज्ञानी होणारा रावणच रामापेक्षा श्रेष्ठ आहे. खरे रामायण रहस्य यांत आहे. रावणाला आदर्श मानणाऱ्यांनी या अति उच्च दृष्टीने

रावणाचा आदर्श अवश्य मानावा. याच अर्थानें रावण शेवटी ब्राह्मण वर्णाचा होता.

या अर्थानें रामायण झाले आहे आणि मानवजात असेपर्यंत राहील. रामजीवन विश्वाच्या अन्तापर्यन्त राहणार मानवांना उच्च आदर्श देत!

## वैश्य

विश म्हणजे प्रजा. कोणती प्रजा तर साधकांतील वृत्तीरुप प्रजा. असल्या वृत्तींची जो साधक जोपासना करेल त्याला वैश्य म्हणतात. वैश्य क्षत्रियाप्रमाणें भांडणार नाही पण कोणी कितीही उपदेश केला तरी तो आपली जन्मजात वृत्ति कधीच सोडणार नाही, उलट गुपचूप त्याची जोपासना करेल. कांही लोकांना कितीही ठेंचा बसल्या वा कितीही उत्तम उपदेश केला तरी त्यांचे वागणें वा वृत्ती त्यांना योग्यच वाटतात आणि ते तसल्या वृत्तींची आंतून जोपासनाच करतात. असल्या बदलूं न इच्छिणाऱ्या कृपणाला वैदिक परम्परेंत वैश्य म्हणतात. लौकिक अर्थानें वैश्य धनवान वा दाते वाटत असले तरी वृत्ती त्यागाचे रुपाने ते कृपणच असतात. त्याशिवाय धनाचा लोभ त्यांना कसा राहील? तुकाराम जन्मानें वैश्य पण स्वत:तील कामिनि कांचन आणि कीर्ति याशिवाय सर्व वृत्तींचा त्याग केल्यामुळें ते वैश्यत्वाचा त्याग करून याचि देहीं याचि डोळां ब्राह्मण बनून मुक्त झाले, वैकुण्ठाला गेले! 'विगत: कुण्ठ: अस्य वैकुण्ठ:' जेथें वृत्तींची गतीच शान्त होते तें वैकुण्ठ!!

## शूद्र

जन्मत: सारेच शूद्र आहेत. म्हणजे शूद्रत्वाचा सम्बंध वृत्तिपेक्षाही शरीराशी अधिक येतो असें दिसते. थोडया साधनेंत ज्याच्या शरीर आणि वृत्तींचा उद्रेक होतो असल्या थोडक्यांत अंगाला अधिक येणाऱ्या घायकुत्या आगावू साधकाला शूद्र म्हणतात. भजन कीर्तन करतांना लोकांना दाखविण्याकरतां नाचणारे, रडणारे, हांसणारे अविर्भावी दिखावू माणसें शूद्र म्हणावी लागतील. उलट सर्व प्राप्त करून पचवून टाकणारा आणि बाहेर अंतरींतील कळांचा थांगपत्ता न लागूं देणारा तो ब्राह्मण, तोच समुद्र पिणारा अगस्ति

होय. ज्याचे उदर समान आहे तो समउदरः समुद्रः! थिल्लर पाणि म्हणजे शद्र तर समुद्राप्रमाणें धीर गंभीर, न आटणारा तो ब्राह्मण!! परिस्थितिनुसार थिल्लरांतील पाणी म्हणजे वृत्तीच आटतील पण सागर सदा भरलेला!!!

शम्बुक असा शूद्र होता.

## शम्बुक

शम म्हणजे संयम वा शान्त आणि उक म्हणजे दिखाऊपणा किंवा थिल्लरपणा करणारा! साधनेतील अन्यान्य अनुभव जो पचवूं शकत नाही आणि थोडें प्राप्त झालें तरी जो इतरांना दाखविण्याकरता बाहेर ओकतो असल्या थिल्लर साधकाला शम्बुक म्हणतात. मराठींतील ओकणें शब्द याच उक शब्दपासून तयार झाला आहे. वरून शान्ततेचा आणि अध्यात्माचा आव आणणारा आणि आंतून थिल्लर वृत्तींचा उद्रेक करणारा शूद्र साधक म्हणजे शम्बुक होय. असले शम्बुक आज सर्वत्र दिसून येत आहेत. असल्या नीच आणि दिखावू वृत्तीचा त्याग न केल्यास साधकांतील ब्रह्मवृत्ति अल्पायु बनतील म्हणून साधक रामाने स्वतःतील शम्बुक वृत्तीचा गळा कापून नाश केला; यांत अन्य इतिहास नाही. दिखाऊपणाचा स्वैर उद्रेक वा ओकारी म्हणजे शम्बुक होय असल्या शम्बुकाचा साधक रामानें वध केलाच पाहिजे.

# दशम अध्याय

## रजक कथा एवं सीता त्याग

राज्यांतील प्रजा सुखी असली म्हणजे राजा सुद्धां सुखी असतो. प्रजेचे रंजन करणारा तो राजा, 'रंजयति इति राजा.' परन्तु ज्याचे राज्यांतील प्रजाजनांत राजाचे चारित्र्याबद्दल संशय असेल असा राजा सिंहासनावर अधिक काल कसा टिकणार? एवढा लोकप्रिय सद्वर्तनी राजा राम पण म्हणे त्याचेही आदर्श राज्यात जवळ जवळ दहापांच घरामागें एक गुप्तचर असत. काय, आदर्श राज्यांत दर पाचदहा घरागणिक एक गुप्तचर? रामराज्याइतके आदर्श जीवन तर साऱ्या पृथिवितलावर नव्हते आणि म्हणे नंतर सुद्धां झाले नाही. म्हणूनच तर आम्ही रामराज्याचे आजही गोबवे गातो. त्याच रामराज्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून चन्द्रगुप्त मौर्याचे राज्यांत प्रजाजन घराचे दाराला कुलुप सुद्धां लावीत नसत असे मॅगस्थनीज सांगतो. मग रामराज्यासारख्या आदर्श राज्यांत पाचदहा घरागणिक एक गुप्तचर कां असावा? कां रामचरित्राबद्दल प्रजाजनांना संशय होता काय? होय असे दिसते खरे.

एके रात्री एक रजक म्हणजे परीट आपल्या बायकोला बोलत होता, 'मी काही राजा राम लागलो नाही तुझे अपराध पोटीं घालायला. रावणाचे घरी बारा वर्षे राहिलेली सीता रामाने जशीच्या तशीच घरांत घातली. मी जर असतो तर सीतेचा त्याग केला असता,' नवरा आपल्या बायकोला केव्हाही कसेही बोलेल, त्यांत विशेष ऐकण्यासारखे गुप्तचराला काय वाटले? आणि नवराबायकोचे साधे बोलणें सुद्धा ऐकायला इतके प्रचंड गुप्तचर रामराज्यांत असले पाहिजे. आणि त्या परीटाचे साधे बोलणे काय मनावर घ्यायचे? 'कोणी निन्दा कोणी वन्दा। माझा स्वहिताचा धंदा॥' तुकाराम महाराजासारखा सन्त सांगतोच. प्रजेबद्दल एवढा संशय धरण्याचे रामाला काय कारण? काय स्वत:चे चारित्र्याबद्दलच रामाचे मनांत संशय होता? कांही म्हणा पण राजाज्ञेप्रमाणें गुप्तचराने एका परीटाचे म्हणणे रामाचे कानावर घातले.

रामराज्यांत एका सामान्य परीटाच्या म्हणण्याला सुद्धां अतीशय महत्व होते. गुरु वसिष्ठांना सभेंत पाचारण झाले आणि स्वतःची पत्नि अरुन्धति आपल्या चारित्र्याबद्दल दुरून संशयाने लुकलुकत पाहत असतांना सुद्धां वसिष्ठानें निर्मल चारित्र्याचा आव आणून रामाला आज्ञा केली, 'रामा, तुझ्या प्रजाजनांत सीतेच्या चारित्र्याबद्दल संशय आहे अतएव राजा तूं सीतेचा त्याग कर ! खरें खोटे आणि योग्य अयोग्य याचा विचार न करतां रामाने गुर्वाज्ञा मानली आणि सीतेला वनांत सोडण्यास विवेकभ्राता लक्ष्मणास सांगितले. लक्ष्मणाला सुद्धां रामाचे करणे मुळींच पसंत नव्हते पण रामासमोर बोलण्याची कोणाची प्राज्ञा? म्हणजे काय, एका मूर्ख रजकाचे म्हणण्यावरून रामाने कांही एक मागचा पुढचा विचार न करता आपली पट्टराणी निर्मल चारित्र्य सीतेचा त्याग करावा आणि ज्या लक्ष्मणाने उभें आयुष्य रामाकरता वनांत सुद्धा वेंचले त्याच्या म्हणण्याला रामाजवळ स्थान असूं नये? सर्व प्रजाजन हळहळले पण रामाचा निर्धार (विक्षिप्तपणा) ढळे ना. सीतात्याग करायचे ठरले म्हणजे ठरले; आणि तेही सीतेला न कळविता !

हा कोणता न्याय कि ज्याने गुन्हा केला असें वाटते त्याचे म्हणणे सुद्धां न ऐकून घेता त्याचेवर आपल्याच मताने आरोप ठेऊन त्याला न कळविताच त्याला शिक्षा द्यायची? काय रामराज्यांत असाच न्याय होता? होय. सीता ही रामाची पत्नि असल्यामुळे तिचे चारित्र्य स्वतःला आणि सर्व प्रजाजनांना माहीत असतांना, जिने सर्वासमक्ष अग्निदिव्य करून प्रत्यक्ष अग्निनारायणाने जिची ग्वाही दिली, त्या विमलचरित सीतेचा त्याग एका सामान्य रजकाच्या मूर्ख उद्गारावरून रामाने करावा? होय, आमच्या बायकोला कसेही वागविण्याचा आमचा अधिकार आहे. अहो, स्त्रीयांचे समान अधिकार, 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः' या शास्त्र वचनाचा कांही विचार तर करायला हवा ना? आणखी, आणखी सीतेला दिवस आहेत, रामापासूनच बरं! रामासारख्या आदर्श पतीने बिचाऱ्या सीतेबद्दल विचार करायला नको काय?

'हम कुछ नहीं जानते. हम करे सो कायदा.' सीतेचा त्याग करायचाच! लक्ष्मणा रथ तयार कर आणि सीतेला कांही न सांगता

वनांत सोड. बोलू नकोस!' बिचारा लक्ष्मण, बिचारी सीता! रथ तयार झाला. रथाचे सारथ्य स्वत: लक्ष्मण करणार. लक्ष्मणाने सीतेला रथावर आरूढ होण्यास सांगीतले. 'बंधुजाया रथावर आरूढ व्हा.' 'अहो पण कोठे जायचे आणि कां? मला आतां दिवस आहेत बरं!' सीता उद्गारली. लक्ष्मण बोलेना. रथावर बसण्याचीच आज्ञा!! बिचारी पट्टराणी सीता!!! रथ सुरू झाला. कोठे चाललो आहोत हें न कळल्यामुळें सीता उद्गारते. 'भाऊजी, आपण काय आमच्या माहेरी चाललो आहोत? माझे पति राजा राम मोठे कनवाळू बरं कां भाऊजी! मला दिवस आहेत असं लक्षांत घेऊन तिकडनं मला माहेरी पाठवणं होत आहे!! देवा, जन्मोजन्मी असा कनवाळू नवरा मिळूं दे!!!'

रथ वेगाने चालला पण माहेरच्या वाटेने नाही, अन्य वनाच्या! ते पाहून सीता उद्गारते, 'अहो माझ्या लक्ष्मणा दीरा ही नव्हे माहेरची वाट।।' पण लक्ष्मण बोलेना. निबिड अरण्य, कीर्र झाडी, श्वापदांचे आवाज, रखरखलेले उन आणि ठायी ठायीं कांटे धोंडे. रथ एकदम थांबला. सीतेला रथावरून खाली उतरण्याची आज्ञा झाली. 'अहो पण भाऊजी!' एक मंजुळ पण निराधार आवाज उद्गारला. सीतेला कीर्र वनांत एकटेंच सोडून रथ चालू झाला. रथाचा गडगडाट आणि घोड्यांच्या टापांचा आवाज हळू हळू मन्द होत होता आणि रानांतील शान्ततेचा भंग करणारा कीर्र नाद आणि श्वापदांचे जीवघेऊं ओरडणें भयाणता उत्पन्न करीत होते.

'पतिदेव मी काय अपराध केला आपला? लग्न झाल्यावर थोडे दिवस बरे गेले न गेले तों राज्यावर बसण्याचा वाद निर्माण झाला. आपण राज्यत्याग केलात त्याबद्दल मला कांहीही वाटले नाही. पतीच्या इच्छेप्रमाणें वागणारी मी. पतिदेव आपण वनांत जायला निघालात मीही आपल्यासह सहर्ष वनांत निघाले. मी सुकुमार राजकुमारी, पण वनांतील सर्व कष्ट आपल्याकरता झेललेत. नव्हे आपल्या अमृत सहवासांत ते मला स्वर्गापेक्षाही सुखद वाटले. कांचन मृगाचा मी विनाकारण हट्ट धरला. आपण मला परोपरीने सांगीतले पण मी ऐकले नाही. आणि दुर्दैवाची परम्परा सुरू झाली. आपण माझ्याकरता किती शोक केला? आपण वानरसेना जमविली, आणि

माझ्याकरता अपरिमित कष्ट झेललेत आणि मला रावणाच्यातावडीतून सोडविले. काय ते भयानक युद्ध? रामरावणयोर्युद्धं रामरावणयोरपि! आपल्याला मी इतका त्रास दिला म्हणूनच की काय नाथा तुम्ही माझ्यावर कोपला आहांत ? पण नाथा मी तुमचीच ना ? माझ्या अजाणपणाला काय इतकी जबर शिक्षा द्यायची. मी या घोर अरण्यांत कोठे जाणार, कोठे राहणार? नाथा, रघुनाथा, दयामय विश्वनाथा!' हुंदके आणि आर्त रडणें !! निबिड कीर्र अरण्यांतील भयानक जीणे !!!

सीता त्याग, एका निष्पाप अबलेचा त्याग, एका असहाय गर्भवती मातेचा त्याग आणि तोही न्यायदेवता रामाकडून! रामाच्या असल्या विक्षिप्त वागण्यामुळें सारी स्त्रीजात रामाला आजही शिव्याशाप देते. सीतात्यागाची कथा ऐकून विचारी हृदयें विदीर्ण होतात आणि रामानें अन्याय केला असे उस्फूर्त उद्गार त्यांचे मुखावाटे बाहेर पडतात. परंतु आमचे शास्त्रीपंडित आणि कथित आदर्श जीवनवादी लोक मोठ्या अविर्भावानें म्हणतात, 'रामाने केले ते योग्यच केले. आदर्श जीवनांत असा त्याग करावाच लागतो. कर्तव्य कठोर असते त्यांत भावनेला स्थान नाही' वगैरे. पण असल्या वावदुकांवर तशा तऱ्हेने पत्निचा त्याग करण्याची पाळी आल्यास ते तेवढ्याच बेजबाबदार पद्धतीनें सांगून मोकळे होतील कि तसले आदर्श जीवन रामाकरताच आहे, त्यांचेकरता नाही. आजपर्यन्त रामायणाची आणि स्त्रीजीवनाची अशी क्रूर थट्टा असल्या धर्ममार्तंडांनी आणि आदर्श जीवनाच्या पक्षपाती लोकानी चालविली आहे. आता हे चालणार नाही. आता असला क्रूर इतिहास बदला, नाहीतर रामासारखा आदर्श पुरुष असली नीच कृत्यें करणार नाही असे मनोमय पटल्यास रामायणातील वरील विवाद्य प्रकरणाचा खरा अर्थ सांगा.

रामायणातील सीतात्याग प्रकरणातील आदर्श जीवन आणि रहस्य सांगण्याकरता रामासारखेच आदर्श जीवन जगावे लागेल, अगदी राज्य त्यागापासून सीतात्यागापर्यन्त! कीर्तने प्रवचने झोडून आणि कामिनी कांचन कीर्तिवर लक्ष ठेऊन रामायणांतील वरील विवाद्य प्रसंगाचा अर्थ सांगता यायचा नाही. रहस्य पाहूं या!

## कथा रहस्य

रजकाचे काम वस्त्र धुण्याचे असते आणि वस्त्र याचा अर्थ आम्ही पाहिलाच आहे कि वृत्ति ! कौरवांनी पांडवपत्नि द्रौपदीचे आणि अंगदाने रावणपत्नि मन्दोदरीचे वस्त्रहरण केले म्हणजे पांडवी वृत्ती आणि रावणी वृत्तीचे हरण करण्याचा प्रयत्न केला हें आम्ही पाहिले. रामराज्यांतील असलीच वृत्तीरुप वस्त्रें धुणारा हा रजक होता. रामाचे राज्य म्हणजे कोणता भूभाग नसून हे मानवी शरीर म्हणजे गीतेंत वर्णन केलेले क्षेत्र होय आणि त्या क्षेत्राचे रक्षण करणारा जीवात्मा राजा क्षत्रिय राम होय. असल्या प्राकृतिक राज्याचा राजा राम होता आणि आजही आहे. असल्या दिव्य राज्यांतील प्रजाजन म्हणजे साधकाच्या वृत्ती असून त्या वृत्तीरूप वस्त्रांना स्वच्छ करण्याचे कार्य हा रजक करीत होता. रजक म्हणजे विवेक. या रजकरुप विवेकाने सीतेबद्दल साधकाचे कायेबद्दल शंका घेतली आणि त्या दिव्य राज्याच्या रामराजाने ती शंका आपल्या शरीरांतील सतर्करुप गुप्तचराचे द्वारें ऐकली आणि असल्या मलीन वृत्तीच्या सीता कायेचा त्याग करून तिला वनांत तपस्येंकरता पाठविण्याचे वैराग्यपूर्ण कार्य विवेकभ्राता लक्ष्मणाकडेच सोपविल्या गेले.

असल्या दिव्य राज्यांत प्रजाजनागणिक गुप्तचर असतात आणि साधकांतील वृत्तींचे निरक्षण गुप्तपणे करतात, दिवसा रात्रीं खातांना पितांना आणि जागृति स्वप्नसुषुप्तींत सुद्धां ! विवेकरुप रजकाचे घरावर तर असल्या दिव्य गुप्तचरांचा सदा पहारा असतो. असल्या वृत्तीवस्त्रांना धुणाऱ्या रजकाचे म्हणणे रामाचा गुप्तचर रामाला नाही तर कोणाला सांगणार ? एकदां आपल्या सीताकायासह-वर्तमान जीवात्मा रामप्रभु चौदा वर्षे या ना त्या रुपानें वनांत तपस्या करण्यास राहिले. त्या काळांत तपस्या करण्याकरता साधक वनांत जात असत, म्हणून सीतेसहवर्तमान जीवात्मा साधक राम साधना करण्यास म्हणजे तपस्या करण्यास चौदा वर्षे राहिले. तेथेंही कायावृत्ती सीतेचे कांचनमृगरूप धनाकडे लक्ष गेले आणि रावणवृत्ती द्वारें सीतेचेच धनराज्य लंकेंत हरण झाले. सीतेची ती वृत्ती अजून पूर्णपणे नष्ट झालेली दिसत नव्हती. आता ती राज्यावरच बसली होती.

भोगवृत्ती साधकाचे अध्यात्मच नष्ट करूं पाहतात. म्हणूनच रामाची खरी कनवाळू माता कैकेयी हिने रामसीतेची भोगवृत्ति म्हणजे भरजरी कपडे काढायला लावून वनांत तपस्येकरतां योग्य अशी वल्कलें घालण्यास सांगीतले. कैकेयीने रामसीतेची भरजरी वस्त्रे काढवून वल्कलें नेसण्यास सांगीतल्याबद्दल आम्ही कैकेयीवर अतीशय चिडतो आणि तिला कुलटा म्हणतो. परंतु कैकेयीच रामाची खरी हितकर्ती होती. तपस्या वृत्तीला योग्य अशी वस्त्रें म्हणजे वृत्ती तिने रामसीतेला दिलीत. कैकेयी नसती तर राम उत्पन्न झालेच नसते. रामाची खरी हितकर्ती आणि उपदेशक गुरू कैकेयीच. कै काया म्हणजे कैकेयी. ज्या साधकांतील काया म्हणजे देहवृत्ती नष्ट झाली आहे असाच श्रेष्ठ साधक तपस्या करुं शकतो. 'देहभाव हारपला । तुज पाहतां विठ्ठला ।।' तुकाराम महाराज म्हणतात. कैकेयीची उपदेशक गुरु मंथराच! मंथरेचा दिव्य उपदेश कैकेयीने ऐकला नसता तर राम जीवात्मा तपस्या करण्यास वनांत जाते ना!! चित्तांतील सर्व वृत्तींचे मंथन करून योग्य तें नवनीत साधकाला देणारी ती मंथरा होय. मंथरा म्हणजे रामायणाचे नवनीत देणारी मंथनी!

## ध्यान समाधि

सीतावृत्ती नेहमी सुखाला लालचावते हें रामानें पाहिले होते. त्यामुळें विवेकवैराग्य लक्ष्मणाने कायावृत्ती सीतेला पुन: एकवार तपस्या करण्यासाठीं वनांत पाठविले. यावेळेस राम सीतेसह जाण्यास तयार नव्हते. कां याचे कारण समजण्यास समाधि अवस्थेचा ज्या श्रेष्ठ योग्यांना अनुभव आहे त्यांनाच त्यांतील रहस्य समजेल. अन्य लोकांना केवळ वर्णनावरच समाधानच मानणें भाग आहे. ध्यानामधे साधकाचे चित्त एकविषयक बनते. या वेळेस साधकाचा देहभाव अति क्षीण झालेला असतो आणि चित्त विषयाशी एकाग्र असते. ध्यान तपस्या पुरेशी झाल्यास साधक सविकल्प समाधींत जातो. सविकल्प समाधींत साधकाच्या चित्तवृत्ति समान होऊन साधकाचे चित्तांत बीजरुपाने जे विकल्प वा वृत्तिज्ञान असते त्याचे प्रत्यक्ष ज्ञान सबीज वा सविकल्प समाधींत साधकाला नित्य होत असते. सबीज वा सविकल्प समाधि सर्व ज्ञानाचे माहेरघर आहे. येथें वृत्ति असते पण

ज्ञानरुपानें ! दण्डकारण्यांतील चौदा वर्षाची रामसीतेची तपस्या असल्या सबीज, सविकल्प वा सवितर्क समाधींत व्यतीत होते आणि जीवनाचे पूर्ण ज्ञान प्राप्त करून आपल्या क्षेत्ररुप राज्याचा राजा बनण्यास राम अयोध्येला परत येतात. साधकाचे चित्तांत ज्यावेळेस वृत्तिद्वंद्व नसते असल्या स्थिर चित्तवृत्तिच्या अवस्थेला वाल्मिकी अयोध्या म्हणतात. जेथे वृत्तींचे युद्ध नाही ती अयोध्या !

## निर्विकल्प समाधि

अयोध्येंत परत आल्यावर कायावृत्ती सीतेच्या वृत्ति बऱ्याच शान्त आणि सम होऊन समाधियोग्य झाल्या असल्या तरी त्यापलीकडील एक महत्वाची पायरी रामजीवनांत राहिली होती; आणि ती म्हणजे निर्विकल्प समाधि होय. सविकल्प समाधींत जीवात्मा दशा शिल्लक असते. जीवात्मा म्हणजे राम; म्हणून मागील खेपेस सीतेसह राम सदैव होते. आता निर्विकल्प अवस्थेंत जाण्याकरता साधकाची जीवात्मा अवस्थाच नष्ट होऊन त्याने आत्मरुप बनायला हवे; म्हणून यावेळेस वनांत तपस्या करण्याकरतां सीतेला राम एकटेच पाठवतात. जीवात्मवृत्तीरहित साधकाची श्रेष्ठ अवस्था म्हणजे यावेळचे सीतेचे एकटेंच वनांत जाणे होय.

जेवढें सांगणे शक्य आहे तेवढें सांगण्याचा प्रयत्न केला आहे. वाचकांनी असल्या अध्यात्म रामायणाचा प्रत्यक्ष अनुभव घ्यावा हे योग्य !

## अश्वमेध यज्ञ

सीतेचा त्याग केला खरा पण रामाच्या मनाला शान्ति नाही. एकसारखे तळमळताहेत राम सीतेविना !

'पाहिला कां कुणी दीप ज्योतिविना । काय राहू शके राम सीतेविना ।।'

सारखा सीतेचा ध्यास. कदाचित रामाचे मन रामाला खात असेल. कुडीशिवाय काय प्राण राहू शकतात ? किति काळ समाधि अवस्थेंत तरी राहायचे ? देहभानावर आल्याविना व्यवहार कसा चालणार ? गुरु वसिष्ठांनी मनःशान्तिकरता रामाला अश्वमेध यज्ञ करायला सांगितले. अश्वमेध म्हणजे अश्वाचा यज्ञांत प्राण घेणें. अश्वमेध यज्ञांकरता देशोदेशींचे

राजे ऋषि मुनी आले. मोठा सोहळा झाला. पूजेकरता पत्नि हवी होती म्हणून सीतेची सुवर्ण मूर्ति तयार करण्यांत आली. वास्तविक त्या काळच्या रीतीप्रमाणे रामाला दुसरी राणी करता आली असती पण राम एकपत्नि होते. यज्ञ सम्पन्न झाला. एवढा महत्वाचा धार्मिक सोहळा पण रामाने सीतेला बोलाविले नाही, हा काय मनाचा हेकडपणा !

मध्यंतरीच्या काळांत सीतेला वाल्मिकींनी आपल्या आश्रमांत नेले. सीता यथाकाल प्रसूत होऊन तिला मुलगा झाला त्याचे नांव लव. लव म्हणजे क्षण.

ज्या साधकाचे चित्त एका क्षणांत (लव) समाधि अवस्थेत जाऊं शकते अशा रामपुत्र श्रेष्ठ साधकाला वाल्मिकी लव संबोधतात. अशी चिर समाधि लागल्यास त्या साधकाला देहभान नसते आणि त्याचे आसना सभोंवताल गवत म्हणजे कुश (दर्भ) वाढतात. मग असली कुशावस्था रामाचा दुसरा पुत्र नव्हे काय आणि सीतावृत्तीनें त्या दोघांचा सांभाळ करू नये काय ? रामायणांतील लवकुश असले रामपुत्र आहेत.

एकदा लवाला घेऊन सीता नदीवर गेली. वाल्मिकींना वाटले कि लवाला वानरींनी नेले. त्यांनी घाबरून जाऊन कुश म्हणजे दर्भापासून एक नवीन लवासारखा बालक उत्पन्न केला. त्याचे नांव कुश. थोडचा वेळाने सीता लवाला घेऊन घरीं आली आणि पाहते तों पाळण्यांत दुसरा लवासारखा पुत्र ! दोघांचाही प्रतिपाळ सीतेने केला. दोघे पुत्र मोठे झाले. वाल्मिकींनी त्यांना वेद धनुर्वेद राजनीति इत्यादींत निपुण केले. इतक्यांत वाल्मिकींना कळले कि राजा राम अश्वमेघ यज्ञ करतो आहे. वाल्मिकींनी रामायण लिहले होते ते रामासमवेत सर्व सभेला ऐकवावे म्हणून वाल्मिकींनी लवकुशाला राजसभेंत रामायण गायन करण्यास पाठविले.

## कुशलव रामायण गाती

रामसभेंत दोन सुकुमार बालक वीणा घेऊन उभे झाले आणि राम राजाला विनंती करते कि राजा आम्हाला सभेला रामायण ऐकवायचे आहे. आम्ही वाल्मिकींच्या आश्रमांतले आहोत, तेव्हा आम्हाला अनुमति द्यावी. रामाने सर्व ओळखले पण अजून रामायण पूर्ण व्हायचे होते. 'गा

बाळांनो.' तें अपूर्ण रामायण ऐकण्यांत रामाच्या मनाचा भार कमी होणार होता. कुशलव गायला लागले. माडगूळकर सुन्दर वर्णन करतात–

कुशलव रामायण गाती । स्वयें श्री रामप्रभु ऐकती ।।
कुमार दोघे एक वयाचे । सजीव पुतळें रघुरायाचे ।
पुत्र सांगती चरित्र पित्याचे । ज्योतिने तेजाची आरती ।।
राजस मुद्रा वेश मुनींचे । गंधर्वच हे तपोवनीचे ।
वाल्मिकींच्या भाव मनीचें । संगती वीणा झंकारती ।।

बालकांचे रामायण ऐकून सभा मुग्ध झाली. वीणेच्या झंकारासह आणि बालकांच्या शब्दालापासह सभेच्या नेत्रांतून अश्रु घळघळूं लागले. प्रजाजनांना आपल्या प्रिय राणीची, सीतामाईची आठवण आली. आता सभेच्यानें राहवेना. ओघळते अश्रु बोलायला लागले ? 'रामा बोलवा हो सीतामाईला !' परंतु विरहाग्नीने रामाचे अश्रु केव्हांच आटले होते. रामाचे नेत्र कोरडे आणि शून्य दृष्टी ! सभा विसर्जित झाली. बालकांना रामानें निरोप दिला आणि सांगितले, 'बाळांनो वाल्मिकी ऋषिंना आमचा प्रणाम सांगा आणि सांगा कि अजून रामायण पूर्ण व्हायचे आहे.' बालकें आश्रमाला परतली आणि वाल्मिकींना रामराजाचा निरोप सांगती झाली. 'हो बाळांनो अजून रामायण पूर्ण व्हायचे आहे' वाल्मिकी उद्‌गारले.

## अश्वाला धरले

लवकुश बालकें खेळत होती. इतक्यांत छम्‌छम् आवाज करीत एक सुन्दर शुभ्र अश्व त्यांनी नाचत येतांना पाहिला. शूराचीच संतति ती ! धरले अश्वाला त्यांनी आणि आणले आई समोर. 'आई आई आम्ही हा घोडा आणला धरून ? 'तो अश्वमेधाचा घोडा, त्याला धरल्यास त्याचे रक्षण करणाऱ्या सहस्त्रावधी सैनिकांशी युद्ध करावे लागते बाळांनो. सोडा त्याला हें भलतेंच अचाट कर्म करूं नका.' सीता उद्‌गारली. 'आम्ही यद्ध करुं पण अश्वाला सोडणार नाही.' सीतेने वाल्मिकींना कांगाळी सांगीतली. वाल्मिकींना लवकुश आणि रामांत युद्ध हवेच होते, कारण स्वपुत्र लवकुशाद्वारे रामाचा पराजय झाल्याविना रामायण पूर्ण होणार नव्हते.

## राम कुशलव युद्ध

मागें रामसभेंत कुशलवाच्या मधूर आवाजासह वीणा झंकारल्या होत्या. आतां त्यांच्या कठोर वाणीसह धनुष्यांच्या प्रत्यंचा टणत्कार करीत होत्या. बालकासमोर वज्रदेही हनुमान पांगुळला. अतिरथी तर पार धुवून निघाले. रामाचे शर चालेनात, अस्त्र आठवेनात. हाहाक्कार माजला. आता राम ब्रह्मास्त्राचा प्रयोग करणार इतक्यांत वाल्मिकीसंहवर्तमान सीता युद्धभूमीवर धांवून आली. 'बाळांनो थांबा युद्ध करूं नका. आणि शत्रूपक्षाचे हे महापुरुषा आपणसुद्धां थांबा' सीता उद्गारली. परपुरुषाचे मुख कसे पाहणार कुलस्त्री. पायाकडे पाहते तों ते पाय? ते पाय तर स्वामींचे! परस्त्रीच्या मुखाचे अवलोकन न करण्याचा एकपत्निव्रती रामाचा प्रण परंतु वाणी तर प्रिय सीतेची वाटते! 'सीते सीते!', 'प्राणनाथ'!!

## अश्वमेध यज्ञ

पूर्वीच्या काळीं राजे लोक चक्रवर्ती होण्याकरता म्हणे अश्वमेघ यज्ञ करीत असत. अश्वमेधाची मूळ कल्पना काय आहे हें आपणांस पहायचे आहे. परंतु मध्यंतरीच्या काळांत अशी पद्धत पडली होती कि ज्याला कोणाला चक्रवर्ति व्हायचे असेल त्या राजाने एक सर्वांगशुभ्र परंतु माथ्यावर मध्यें सुवर्णाचा अबलक असलेला अश्व पूजा करून मोकळा सोडायचा. तो अश्व जिकडे ज्या राज्याच्या भूमींत जाईल त्या राज्यांत त्याचे मागोमाग स्वतः सैन्यासह जायचे. आपल्या भूमींतून त्या घोड्याला असा अनिर्बंध न जाऊ देणाऱ्या म्हणजे त्या घोड्याला धरणाऱ्या राजाशी त्या अश्वाच्या मालक राजाने युद्ध करायचे आणि त्याला युद्धांत हरवून त्याला स्वतःचे मांडलिक बनवायचे. अशा तऱ्हेने तो अश्व जिकडे भ्रमण करेल तिकडे त्याचे रक्षण करीत या चक्रवर्ती पदेच्छु राजाने जायचे आणि आपले स्वामित्व दुसऱ्या राजांवर लादून चक्रवर्तित्व मिळवायचे. शेवटीं तो अश्व आपल्या राजधानीला परतला कि त्याची समारंभाने पूजा अर्चा करायची आणि यज्ञ करून त्याचे मानगूट कापून त्याचा यज्ञांत बलि द्यायचा आणि त्याचे मांस खाऊन ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्रांनी आपल्या तृप्त पोटावर हात फिरवित स्वर्गांत गेल्याच्या समाधानाने झोपायचे!

काय ज्या अश्वाच्या रक्षणाकरता तो चक्रवर्ती इतरांशी आपल्या प्राणाची पर्वा न करता युद्ध करीत असे त्या बिचाऱ्या अश्वाचीच मान यज्ञात कापायची? म्हणजे आपले पूर्वज (ब्राह्मणसुद्धां) घोड्याचे मांस खात असत काय? हो कथेवरून तर असे दिसते आणि एवढेंच नव्हे तर ज्या कोणाचे कपाळशूल उठत असेल, ज्या कोणाला मन:शांति मिळत नसेल त्यांनीसुद्धां अश्वमेघ यज्ञ करावा असे म्हणे शास्त्र सांगते. काय आपलें मन अशान्त असेल तर एका घोड्याला मारून मन:शांति निश्चित मिळूं शकते. पण त्या घोड्याच्या मृत्यूचा आणि आपल्या मन:शांतीचा काय संबंध? आणि एका बिच्याऱ्या अश्वाला त्याचा कोणताच अपराध नसतांना मारून आपल्या सारख्या सुसंस्कृत माणसाला काय मन:शान्ति मिळेल?

'असले अनार्य विचार करूं नका. तुमचे असले विचार वैदिक परम्परेला सोडून आहेत. आणि सुसंस्कृतपणाबद्दल काय बोललात? रामापेक्षा आणि धर्मराजापेक्षां तुम्ही स्वत:ला अधिक सुसंस्कृत समजता काय? अहो सीतेला वनवासांत पाठविल्यामुळें रामाचे मनाची शान्ति ढळली. रामाचे अशान्त चित्त पाहून शान्तीचा साक्षात पुतळा असणाऱ्या वसिष्ठांनी मन:शान्तिकरता अश्वमेघ यज्ञ करायला सांगितले आणि आणि रामानें त्यांचे म्हणणे ऐकून अश्वमेघ यज्ञ केला हे आपण पाहिलेच आहे. एवढेंच नव्हे तर रामाचे पावलावर पाऊल टाकून धर्माचा पुतळा असणाऱ्या धर्मराजाने-सुद्धां मन:शान्तिकरता अश्वमेघ यज्ञ केला. म्हणजे ज्या बिचाऱ्या निरपराध अश्वाची कारण नसतांना मान कापण्यांत आली तो अश्व आणि अश्वमेघ यज्ञ करणाऱ्याच्या मन:शान्तित कांही अन्योन्य संबंध telepathy आहे काय? ते आम्हाला माहित नाही. शास्त्र असें सांगतात आणि आम्ही तसें शास्त्र-वचनाला धरून वागणार! अहो राम आणि धर्मराज काय मूर्ख होतें? ते कसें शास्त्रवचनाला धरून वागले? तुमचे मनांत असले भलतेच विचार कां येतात? पाखंडी, धर्मलंड, कम्यूनिस्ट आहांत तुम्ही समजले!'

## अश्वमेध यज्ञ : गोमेध : अजामेध

ज्या वैदिक परम्परेचे आम्ही इतके गोडवे गातो त्या उच्च आदर्श संस्कृतींत बिचाऱ्या गरीब जनावरांचे बळी घेऊन स्वत:ला मन:शान्ति मिळूं

शकते असे पाशवी आणि मूर्ख लोक असणें सुतराम शक्य नाही ! त्या बिचाऱ्या अश्वाची मान कापून काय रामासारख्या उच्चमानवाला मनःशान्ति मिळणार होती ? असल्या अश्वमेधाचा आणि रामाच्या मनःशान्तिचा काय संबंध ? सीता नसल्यामुळें रामाला मनःशान्ति न हती मग काय त्या अश्वाला मारून रामाला सोता मिळाली असती ? सर्व कौरव नष्ट झाल्यावर धर्मराजाच्या मनाला शान्ति नव्हती. काय बिचाऱ्या अश्वाला मारून म्हणजे अश्वमेध करून धर्मराजाशी कौरवांची भेट होऊन धर्मराजाला मनःशान्ति मिळाली असती ? असल्याच चुकीच्या कल्पनांमुळे रामायण महाभारताचे चुकीचे अर्थ लावून नन्तरच्या कालांत अश्वमेघ यज्ञ, अजामेध, नव्हे गोमेध यज्ञ आणि नरमेध यज्ञ सुद्धां सुरुं झाले असावेत असें मानण्यास बराच वाव आहे. चुकीच्या अर्थामुळें उच्च वैदिक संस्कृतीचे काय हे अधःपतन ?

वैदिक परम्परेचा खरा अभिमानी वैदिक जीवनाचे असले धिंडवडे निघूं देणार नाही. त्यामुळें वैदिक वचनांचा चुकीचा अर्थ लावून त्याप्रमाणें निंद्य वर्तन करणाऱ्या लोकांच्या वागण्याविरुद्ध आवाज उठविणारा पहिला वैदिक महामानव म्हणजे सिद्धार्थ गौतम बुद्ध होय. आपल्या जीवनाचा अर्थ ज्याने सिद्ध केला तो सिद्धार्थ, आपल्या इन्द्रियांची आध्यात्मिक पातळी ज्यानें उच्च ठेवली तो गौतम आणि वेदवचनांचा ज्याने आपल्या सात्विक बुद्धीला धरून सुयोग्य अर्थ लावला तो बुद्ध होय ! **राम आणि कृष्णाप्रमाणें बुद्ध जीवन एक आदर्श जीवन आहे, ऐतिहासिक सत्य नव्हे!** एकदां एका पशूबली यज्ञांत बऱ्याच मेंढ्या नेंल्या जात होत्या. त्यांतील एक लंगडे कोंकरूं पाहून बुद्धाचे मन कळवळले आणि त्या लंगड्या कोंकराला पोटाशी धरुन बुद्ध यज्ञस्थानाकडे चालत गेले. त्या लंगड्या कोंकराऐवजीं स्वतःला बलि देण्याची विनंती बुद्धानें त्या यज्ञकर्त्यांना केली. पण तो अजामेध यज्ञ होता, नरमेध यज्ञ नव्हे ! त्यामुळें याज्ञिक बुद्धाला बळी कसें देणार ?

यज्ञकर्त्यांना बुद्धाने प्रश्न केला कि अजा म्हणजे बकऱ्यांना बलि देण्याचे वचन वेदांत कोठे आहे तें मला दाखवा. यज्ञकर्त्यांनी बुद्धाचे

तोंडावर एक वेद ऋचा फेकली आणि तींत अजामेध यज्ञ करण्यासंबंधी वचन आहे कि नाही हे पाहण्यास बुद्धास सांगीतले. वेद ऋचा अशी,

अजामेकां लोहित शुक्ल कृष्णां ब्रह्मी: प्रजाः प्रसवित्रीं स्वरुपा: ।
अजोह्येको जुषमाणो: अनुशेते जहात्येनां भुक्तभोगामजोन्यः ।।

वेदऋचा पाहिल्यावर बुद्धाचे तोंड बन्द पडले कारण त्या वेदवचनाचा वरवरचा अर्थ असाच आहे कि अजा म्हणजे बकऱ्यांना परमेश्वरप्राप्तीकरता मारा म्हणून. बिचारे बुद्ध चूप बसले. पण आपण चूप बसणार नाही. आपण पाहुंच त्या वेदवचनाचा खरा अर्थ. वरील वेदऋचेचा अर्थ असा आहे कि या लोहितशुक्लकृष्ण क्षितिजाखाली एक अजा म्हणजे बकरा मारण्याकरता बांधून ठेवला असून त्याला खाण्याकरता एक लांडगा त्याचे भोंवती सारखा फिरत आहे. समाजधारणेकरता ब्रह्मा त्या अजाला मारतात.

वरील वचनांचा खरा अर्थ असा आहे. अजा म्हणजे जन्म न घेणारी उच्च ब्रह्मावस्था. निर्भेळ ब्रह्मावस्था असेपर्यंत सृष्टीपसारा उत्पन्न होणार नाही आणि मानवी समाज सुद्धा ! त्यामुळे असल्या उच्च ब्रह्मावस्थेला मारून सृष्टिनियंता आपल्या अजावस्थेतून सम अशी समाज अवस्था उत्पन्न करतात. सम अज: अस्य समाज: परन्तु या वेदवचनाचा खरा आध्यात्मिक अर्थ विसरून जाऊन नंतरच्या शास्त्रिपंडितांनी अजा चा अर्थ ब्रह्मावस्था न घेता अजा म्हणजे बकरा असा घेऊन बकरे कापून अजामेध यज्ञाचे नांवाखाली मांस भक्षण सुरू केले. तद्वत गोमेध आणि अश्वमेधाचे आहे. गोमेध आणि अश्वमेधाचे चुकीचे अर्थ लावून बाहेरील देशांत तर सोडाच पण खुद्द भारतात सुद्धां गाईंना आणि घोड्यांना मारून त्यांचे मांस खाण्याचे प्रकार सुरू झाले असावेत असे मानण्यास भरपूर जागा आहे.

एक वचन पहा,

अग्निहोत्रं गवालम्बं सन्यासं पलपैतृकम ।
देवराच्च सुतोत्पत्तिः कलौ पञ्च विवर्जयेत् ।।

आशय असा कि कलियुगांत पांच गोष्टी वर्ज मानल्या आहेत अग्निहोत्र, गवालम्भ म्हणजे गोमेध (गाईला यज्ञांत कापणे), सन्यास, श्राद्धांत मांसपिंड देणें (पलपैतृक) आणि दीरापासून संतति करवून घेणे. यातून

असे ध्वनित होते कि भारतांत सुद्धां वेदांचा चुकीचा अर्थ लावून गोमेध यज्ञ चालू होता असे दिसते. वेदवचनाचा असला चुकीचा अर्थ लावल्यामुळेच भारताबाहेरच्या देशांत आणि अवैदिक धर्मपंथांत आजही गोमेध म्हणजे गाईंना मारून त्यांचे मांस खाण्याची रूढी पडली असावी. यावरून विचार केल्यास असें दिसते कि एकेकाळी सर्व जगच वेदांना मानणारे म्हणजे वैदिक होते अन्यथा काही समजुतीत इतके विलक्षण साम्य सर्व सांप्रदायांत दिसले नसते. अजाबली प्रकरणात असेंच साम्य आहे.

## अश्वमेध रहस्य

ऋग्वेदांतील कांही अश्वमेधाची वचनें पाहून आणि त्यांचा चुकीचा अर्थ लावल्यामुळे ह्या काळीं कदाचित् अश्वमेध यज्ञ झाले असतील. मध्य-पूर्वेतील मुसलमान राष्ट्रांत आजही श्राद्धप्रसंगी घोड्यांना मारून त्यांचे मांस खाण्यांत येत असते. ही अश्वमेधाचीच चुकीची कल्पना आहे. ऋग्वेदांतील अश्वमेधाची एक ऋचा पहा– **यमश्विना** ददथुः श्वेतमश्वमघास्वाय शश्वदित्स्वति । तद्वा दात्रं महि कीर्तेन्यं भूत्पैद्वो **वाजी** सदमिद्धव्यो अर्थः ।। ऋग्वेद अ. १८।१२१।६।।. घोड्याचा शब्द जर अश्व मानला तर ह्याच घोड्याकरिरता पुन: वाजी शब्द वरील ऋचेंत कां योजला असावा ? याचा अर्थ स्पष्ट आहे कि 'यमश्विना' आणि 'श्वेतमश्व' यांतील अश्व शब्दाचा अर्थ भिन्न असला पाहिजे. श्वेत अश्व म्हणजे प्राणायाम आणि केवळ कुम्भक होय. श्वेत अश्वाचा चुकीचा अर्थ लावून अश्वमेधाकरता श्वेत म्हणजे पांढरा घोडा वापरावा आणि त्याचा वध करावा असे नन्तरच्या शास्त्रकारांनी समाजाला चुकीचे सांगीतले. पण रामायणकारांनी मात्र वेदाचा आध्यात्मिक अर्थच ध्यानांत ठेवून रामाच्या अश्वमेध यज्ञाचे आपल्या कथापद्धतीने वर्णन केले आहे.

कथांच्या बाह्यांगावर न जाता अश्वमेधाचा खरा अर्थ पाहूं. अश्वमेध म्हणजे अश्वाला मारणें वा नष्ट करणें. अश्व या शब्दांत दोन शब्द आहेत एक अ आणि दूसरा श्व. अ म्हणजे नाही आणि श्व म्हणजे श्वासोच्छ्वास

करणे. म्हणजे ज्या प्रक्रियेंत श्वासोच्छ्वास पूर्ण बन्द असतो त्याला अश्वमेध असे म्हणतात. उच्च योगसाधनेंत एक हंसजय नांवाची साधना आहे. या साधनेंत योगी श्वासोच्छ्वासाविना बराच काळ राहूं शकतो. पण नवीन साधकाची काया या उच्च श्वासोच्छ्वासरहित अवस्थेत अधिक काळ राहूं शकत नाही. श्वास घेण्याकरता तो तडफडतो. तेव्हां आपल्या कायेला श्वास घेण्याचे प्रक्रिया अवस्थेंत आणल्याशिवाय असा साधक आपला श्वास सुरळीतपणे चालूं करु शकत नाही. शरीराला परत प्राणगतींत आणल्याविना साधकासा श्वासोच्छ्वास करता येत नाही. असल्या श्वासोच्छ्वासरहित अवस्थेला म्हणजे अश्वाला नष्ट केल्याविना म्हणजे मारल्याविना साधकाचा जीव शान्त होत नाही. आपल्या श्वासरहित अवस्थेला मारून परत प्राणक्रिया चालू करण्याचे महान कठीण योगसाधनेला रामायणकार आणि महाभारतकार अश्वमेध यज्ञ म्हणतात. या अति उच्च योगसाधना असल्यामुळे साधारण लोकांना यातील रहस्य कळणें कठीण आहे. असल्या उच्च अवस्थेंत जाऊं शकणाऱ्या महान योग्यालाच या अश्वमेधांतील योगरहस्य कळूं शकेल. इतरांनी असल्या श्रेष्ठ योग्यांचे म्हणण्यावर विश्वास ठेवल्याशिवाय गत्यंतर नाही.

श्वासोच्छ्वासरहित अवस्थेला योगशास्त्रांत केवल कुंभक अवस्था म्हणतात. या केवल कुंभक अवस्थेवर आद्यशंकराचार्यांनी उत्तम स्तोत्र केले आहे. या अवस्थेंत असणारा नवशिक्या आणि देहभावाचे स्मरण असणारा योगी श्वासाशिवाय तडफडतो आणि त्यामुळें त्याच्या चित्ताला विलक्षण त्रास होतो. सीतेला रामाने वनांत घालवून दिले म्हणजे रामजीवात्म्याचा कार्याभाव थोडा काळ नष्ट झाला होता. पण या अवस्थेंत रामासारखा नवसाधक अधिक काळ राहूं शकत नसल्यामुळें रामाचे चित्ताला फार अशान्तता प्राप्त झाली. हेंच सीतात्यागामुळें झालेले रामाचें अशान्त चित्त होय. तसले अशान्त चित्त नाहिसे करण्याकरतां रामाला केवल कुंभक अवस्था नष्ट केल्याशिवाय म्हणजेच अश्वमेध केल्याविना गत्यंतर नव्हते. हाच रामाचा अश्वमेध यज्ञ होय आणि हाच महाभारतांतील धर्मराजाचा अश्वमेध यज्ञ होय.

असल्या अश्वमेध यज्ञाचे रहस्य ज्या महाभागांना कळूं शकेल ते खरें बुद्धवान म्हणजे बुद्ध होत, ज्यांना असल्या अश्वमेधाचा प्रत्यक्ष अनुभव येईल ते गौतम बुद्ध होत. आणि ज्यांना असल्या अश्वमेधाची आवश्यकताच राहणार नाही आणि जे त्या केवळ कुंभक अवस्थेंत तासन् तास राहूं शकतात अशांनी आपल्या जीवनाचा अर्थ सिद्ध केल्यामुळें ते सिद्धार्थ गौतम बुद्ध होत. कथित नवबौद्धांनी या सिद्धार्थ गौतम बुद्धाचा अर्थ समजून वागल्यास ते सिद्धार्थ गौतम बुद्धाचे खरे अनुयायी होत असें म्हणावे लागेल अन्यथा केवळ राजकारणी पंथाभिमान म्हणून त्यांच्या बौद्धपणाला दुसरा अर्थ राहणार नाही. खरा वैदिक सिद्धार्थ गौतम बुद्धच असतो मग आजचे नवबौद्ध स्वतःला कितीही अवैदिक मानोत.

जगांतील सर्व पंथ साम्प्रदाय मूळ वैदिक परम्परेचीच कृत या विकृत अपत्यें होत.

## लवकुश कोण ?

कुशलव कोण हा प्रश्न राहून जातो. लव म्हणजे क्षण आणि कुश म्हणज दर्भ वा गवत हे आम्ही मागें पाहिलेच आहे. आता रामाचे निर्वाण होणार होते. निर्वाण म्हणजे ब्रह्मपद. ज्या अवस्थेंत सुखदुःख, लाभालाभ, जयाजय किंवा कोणतीच वृत्ति वा अवस्था राहात नाही त्याला निर्वाण वा समाधि म्हणतात. एकदां त्या ब्रह्मपदाला पोंचलेल्या साधकाला म्हणजे परम पुरुषाला एका क्षणांत समाधि लागते आणि ती इतकी दीर्घकाल राहते कि त्याला कालाचे सुद्धा भान राहात नाही. त्यामुळे अशा साधकाचे अंगाभोवती गवत वा वारूळे वाढलीत तरी त्याला त्याचे भान राहत नाही. तुकाराम महाराज या अवस्थेचे वर्णन करतात, 'लागली ब्रह्मानंदी टाळी । मग देहाते कोण सांभाळी ?' आणि ही अवस्था साधकाला एका क्षणांत येते. असल्या क्षणांत समाधि लागण्याची आणि ती चिरकाल टिकण्याची महान समाधि अवस्था ज्याला परमेश्वरस्वरुप राम व्हायचे आहे त्याचे पोटी जन्माला येणार नाही काय ? म्हणून रामाचा औरस पुत्र लव तर तपस्येमुळे वाढलेला दुसरा पुत्र कुश दाखविला आहे. हेच पुत्र रामाच्या कुंभक अश्वाला धरतात म्हणज साधक रामाला ब्रह्मसमाधिकडे खेंचून घेऊन जातात.

## सीता आणि राम निर्वाण

**सीता समाप्ति :** आतां काया रूप सीतेच्याने ते सर्व सहन करवेना अतिशय दु:ख आणि अतिशय सुख! भावनांचा परस्परविरोधी कल्लोळ कसा संभाळणार? 'पृथिवि माते' पितापुत्र युद्ध! प्रिय पतीचे समरांगणांत दर्शन!! आई माझ्याने हे आतां नाही सहन करवत!!! माते मला पोटांत घे, माते मला पोटांत घे!!!!' धरणी दुभंगली आणि सीता पृथिवि मातेच्या उदरांत गडप झाली. राम सीतेला धरण्यांस धांवले. पण आता तेथे शिल्लक होती माती. रामाच्या हातांत सीतेच्या पदराऐवजी माती आली आणि सुचवूं लागली कि रामा तुलाही आता लवकरच मातींत मिळावे लागणार आहे. सन्त कबीर या प्रसंगाचे आपल्या सुंदर शैलींत वर्णन करतात.

करले सिंगार चतुर अलबेली । साजन के घर जाना होगा ।।धृ.।।
न्हाले धोले सीस गुंथाले । फिर वहां से नहीं आना होगा ।।
मिट्टि ओढावन मिट्टि बिछावन । मिट्टि का सिरहाना होगा ।।
कहे कबीर सुनो भई साधो । मिट्टि में मिल जाना होगा ।।

## रामाचे निर्वाण

काया पृथिवि तत्वांत विलीन झाली आतां जीवात्मा कशाचे आधारावर कार्यक्षम राहणार! जीवात्मासुद्धा आता आत्मरूपांत स्थित झाला होता. असल्या आत्मरुपाला पुनर्जन्माची आवश्यकताच काय? कवि आनन्दघन म्हणतात, 'अब हम अमर भये न मरेंगे । क्या कारण मिथ्यांत तजो यह क्योंकर देह धरेंगे ।। अब हम अमर भये न मरेंगे ।।' ज्या शून्य अवस्थेतून राम जीवन व्यक्त झालें होते, सरले होते, त्या सरयूंत रामाने स्वत:च्या व्यक्त अवस्थेचे विसर्जन केले. गीता अरुग्या सरयूतील विसर्जनाचे वर्णन करते, 'यद्गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम ?'

कथा इतकी रसाळ, अवीट आणि भावनोत्कट आहे कि त्यांतील योगरहस्य सांगण्याची इच्छाच होत नाही. (**विशाल आकाराचा बृहत रामायण**

ग्रंथ लेखक लिहणारच आहे त्याची वाचकांनी वाट पहावी.)
रामाप्रमाणे आपल्यालाही एक दिवस त्याच अव्यक्तरुप सरयूंत विर्सजित व्हायचे आहे, पण स्वतःला पूर्णपणें जाणून! त्या अन्तरात्म्यातील सच्चिदानन्द रामाला जाणणे केवळ भारतवासियांचेच नव्हे तर विश्वांतील सर्व मानवांचे कर्तव्य आहे. तो अव्यक्तरुप सच्चिदानंद राम समजला कि मानवी जीवनाची इतिकर्तव्यता आटोपली. रामायण अमर इतिहास आंहे, दिव्य आध्यात्मिक इतिहास! आपल्या डोळ्यावरील अज्ञान अहंकाराचे पटल बाजूला सारून आपण आपल्यांतील राम पाहू या! कबीर म्हणतात,

घुंघट का पट खोल रे तो को राम मिलेंगे ।।धृ.।।

# वैदिक विश्व

जीवनाची रचना शास्त्रीय आधारावर करून त्याद्वारें मानव जीवन ज्ञानमय करण्याच्या प्रयत्नाला वैदिक जीवन किंवा वैदिकता म्हणतात. विद् अर्थात् जाणणें, ज्ञान प्राप्त करणें, आणि वैदिक म्हणजे ज्ञान प्राप्त करून त्या अनुसार जीवन यापन करणें होय. केवल पुस्तकें वाचून किंवा प्रवचनें ऐकून ज्ञान प्राप्त होणार नाही तर त्याकरता आवश्यक अशा आध्यात्मिक साधना करून एवं तदनुसार आचरण करूनच ज्ञान प्राप्त होईल. भौतिक ज्ञानाला विज्ञान म्हणतात, जे आजच्या वैज्ञानिक युगाचा आधार आहे. मानवी जीवनाचा रथ ज्ञान आणि विज्ञानाच्या चक्रावर चालत असतो.

सर्व धर्म साम्प्रदायांचा इतिहास पाहिल्यास असें आढळून येईल कि मानव जीवनांतील ज्ञान आणि विज्ञान यांतील संतुलन कायम ठेवण्याकरतांच नवीन पंथांचा उदय झाला आहे. जुन्या साम्प्रदायांत असलेले अथवा घुसलेले अनावश्यक आणि अशास्त्रीय संस्कार आणि समाजरूढी दूर करण्याकरता वेळोवेळी नव सांप्रदाय उत्पन्न झाले आहेत असें दिसून येईल. परन्तु कालान्तरानें नवीन धर्मसाम्प्रदायसुद्धा जुन्या धर्मसाम्प्रदायांच्या वळणावर जाऊन तेही अशास्त्रीय एवं बुद्धिहीन श्रद्धांच्या आहारीं गेले असें दिसून येईल. जुन्या धर्मसाम्प्रदायांविरुद्ध नवीन धर्मपंथ नसून जुन्यांत घुसलेल्या अशास्त्रीय एवं असामाजिक आचारविचारांविरुद्ध नवे पंथ उभारल्या गेले. प्रत्येक नव साम्प्रदायाचा इतिहास हेंच सांगतो. नव धर्मपंथांनी मानवी जीवनाकरता नवीन असे कांहीच आणले नाही, परन्तु प्राचीन सत्य आणि शास्त्रीय परम्परांना त्या कालचा समाज जो विसरत चालला होता त्या सत्यशास्त्रीय परम्परांना पुनर् जागृत करण्याकरता नव साम्प्रदायाचा उदय होता.

यावरून हे स्पष्ट आहे कि एका प्राचीन सत्यशास्त्रीय धर्मपरम्परेचा आदर्श प्रत्येक नवधर्मप्रवर्तकाचे समोर होता, आणि हा प्राचीन आदर्श म्हणजे वैदिक परम्परा होय. असा एक काल होता कि ज्यावेळेस सर्व

विश्वच वैदिक आचार विचाराने ओतप्रोत होते. वैदिक म्हणजे ज्ञानमय हें आम्ही पाहिलेच आहे. वैदिक जीवनाचा पाया योगशास्त्र आहे. वैदिक योगशास्त्राचा प्रचार आणि प्रसार आज सर्व जगभर होत आहे हें सर्वांना माहीत आहे. भौतिक आणि निरस जीवनाला कंटाळून देशविदेशांतील युवक युवती प्राचीन वैदिक जीवनाची अभिलाषा धरून भारताकडे आकृष्ट होत आहेत ही गोष्ट शास्त्रीय जीवनाचे दृष्टीनें एक शुभ लक्षण आहे.

## विश्वांतील वैदिकता

सारे विश्व एके काळीं कसें वैदिक परम्पराभिमानी होते आणि आजसुद्धां त्यांत वदिक जीवनातील परम्परा अन्य प्रकाराने कशा दिसून येतात हे पाहणे ज्ञानप्रद आणि मनोरंजक होईल. **रशियाचे** भाषा कोविद श्री लेव सिलेन्को भारतात आले होते. इतिहास आणि भाषाशास्त्राच्या त्यांच्या गाढ व्यासंगाचा निष्कर्ष असा होता कि ख्रिश्चन साम्प्रदायाअगोदर त्यांच्या देशांत संपूर्ण वैदिक जीवन आचार विचार आणि परम्परांचे पालन होत असे. **रशियन आणि पूर्व युरोपांतील सर्व भाषांत शेकडा पन्नास संस्कृतोत्पन्न शब्द आढळतात. कांही शब्द तर अगदी संस्कृतच आहेत.** एवढें बोलून ते स्वस्थ बसले नाहीत तर त्यांनी वैदिक जीवनाच्या प्रचाराकरता देशविदेशांत कित्येक शाखा निर्माण केल्या आहेत.

**अफगाणिस्थान, पाकिस्थान** आणि **इराण** चे विद्वान असे म्हणतात कि रामायण घटना त्यांचे देशांत घडल्या असून रामायण उल्लेखित अयोध्या शरयू एवं देशनामें त्यांचे प्रदेशांत सांपडतात. एक मुस्लिम देश असूनसुद्धां **हिन्देशिया** स्वतःला **'रामायणदेश'** म्हणविण्यात धन्यता मानतो. **श्रीलंका, मलय, सिंगापुर, ब्रह्मदेश, श्याम** इत्यादि दक्षिणपूर्व देशांच्या अशाच निष्ठा आहेत. कांही दिवसापूर्वी **इराक** नांवाच्या मुस्लिम देशांत उत्खनन केल्यामुळें उत्खननांत स्वस्तिक चिह्नांकित दगड आणि भारतीय पद्धतीची साडी नेसलेली एका इराकी स्त्रिचा पुतळा सांपडला. उत्खननांतील या वस्तु ख्रिस्तपूर्व तीन ते चार सहस्त्र वर्षापूर्वीच्या असाव्यात असा उत्खनन शास्त्रांचा अंदाज आहे. स्वस्तिक आणि साडी भारतीय

आध्यात्मिक एवं भौतिक जीवनाची चिह्नें मावल्यास इराक देशांतील लोकजीवन आजपासून पांचसहा सहस्त्र वर्षापूर्वी सुद्धां पूर्ण वैदिक होते असें आढळून येईल.

**रशिया** देशाचे खरे नांव **ऋष्या** आहे. ऋष्येय या संस्कृत शब्दाचे अपत्य म्हणजे ऋष्या देशनाम आहे. रशियन लोक स्वतःच्या नांवानन्तर 'आव्ह' या शुद्ध संस्कृत विशेषणाचा उपयोग करतात जसे मोलोतोव्ह, ऋुश्चोव्ह इत्यादि. अर्थव्यवस्थेमुळे रशियात साम्यवाद आहे एरव्ही भाषा आणि संस्कारपरम्परेनें ऋष्येय देश वैदिकच आहे. ऋष्येय देशखालीं **मंगोलिया** नांवाचा देश आहे. संस्कृत मंगलालय शब्दापासून मंगोलिया देशनाम रूढ झाले आहे. मंगोलियन भाषेंत कितितरी संस्कृत शब्द आढळतात आणि मंगलालयांत असे कित्येक प्राचीन संस्कृत ग्रंथ सांपडले आहेत कि ज्यांचा मागमूस भारतांत सुद्धां लागला नाही. यावरून मंगलालयाच्या प्राचीन वैदिकतेची कल्पना येईल. पुर्वेस **कोरिया** आणि **जपान** देश आहेत. हे बुद्ध देश असल्यानें वैदिक परम्परेचेच आहेत. संस्कृत नाम कुर्यातवरून कोरिया शब्द बनला आहे. जपानचे खरे नांव निप्पान आहे. पानीय शब्दाचा अपभ्रंश निप्पान आहे. कोरियन आणि जपानी भाषेंत सुद्धा बरेंच संस्कृतोत्पन्न शब्द आढळतात. त्यांची ही अवस्था त्यांचे वैदिक मूळ दाखवते. **चीन** देशानामाला अगोदर 'प्रा' विशेषण लावल्यास प्राचीन नावांचा एक शुद्ध संस्कृत शब्द साकारतो. चीनचे प्राचीनत्व वैदिक नाही काय ?

**दक्षिण-पूर्वेतील सर्व देश** आज सुद्धा वैदिक परम्परेला धरूनच चालले आहेत. त्यांच्या भाषेंत सहस्त्रावधि संस्कृत शब्द सांपडतात आणि त्यांचे आचार विचार वैदिकतेला धरून आहेत. त्यांची देशनामें संस्कृत आहेत. जसे मलय, सिंगापूर, ग्वालालाम्बपूर, वियतनाम, वाली इत्यादि। हिन्देशिया स्वतःला रामायण देश म्हणण्यांत धन्यता मानतो. वाली, सुमात्रा, यव इत्यादि बेटांचा समूह म्हणजे हिन्देशिया देश होय. त्याखालील दक्षिणेचा देश म्हणजे आस्त्रेलिया होय. असुरालय शब्दाचा अपभ्रंश म्हणजे, आस्ट्रेलिया नाम होय. आस्ट्रेलियांतील आदिवासी मावरी जन

आजही वसंत ऋतूत स्वस्तिक काढून त्याची पूजा करतात. स्वस्तिक पूजन तर वैदिक परम्परेचेच द्योतक आहे.

कालपर्यन्त **आफ्रिका** देश जंगली मानल्या जात होता. उत्तर आफ्रिकेतील कांही देशनाम संस्कृतोत्पन्न आहेत जसें, इजिप्त (अगुप्त), सहारा (आश्रय), न्यूबा (नव–प्राचीन मध्य इजिप्त), त्रिपोली इत्यादि. अडीच सहस्त्र वर्षापूर्वी आजचा सहारा म्हणजे लक्षावधि मानव आणि पशुपक्षांचा आश्रय होता कारण त्यावेळेस तेथें निबिड अरण्य होते असे पुराव्यानिशी सिद्ध झाले आहे. परन्तु कालाच्या ओघांत आज ते एक विस्तीर्ण वाळवंट झाले आहे.

**अरबस्थान** देश इस्लाम पंथाचे केन्द्रस्थान मानल्या गेला आहे. हा देश तत्पूर्वी वैदिक परम्परेचाच होता. संकृत शब्द 'स्लाम' म्हणजे शांतता या शब्दाला 'अ' हे श्रेष्ठ या अर्थाचे विशेषण लागून अस्लाम शब्द बनला अ चा अशुद्ध उच्चाराने इ बनून इस्लाम शब्द बनला जो आज एक धर्मपंथवाचक शब्द बनला आहे. अरबस्थान देशनाम सुद्धां प्राचीन वदिक ऋभुस्थान या शब्दाचा सोपा पर्यायवाचक शब्द आहे. ऋभुस्थान या देशनामाला त्या कालांत विशेष अर्थाने प्रचारांत असलेले अ विशेषण लागून अरिभुस्थान शब्द बनला आणि आज तो अरबस्थान बनला. आहे. ऋग्वेदांत एके स्थानी ऋभु ऋषींच्या पराक्रमाचे वर्णन आले आहे. एका स्थानी अश्वमेध यज्ञ होता पण यज्ञांत ज्या प्रकारचा अश्व हवा होता तसा तो मिळेना. परंतु स्वस्थ बसणारे ऋभु नव्हते. त्यांनी तसा योग्य अश्व स्वतःच्या इच्छाबलाने तयार केला. ऋग्वेदांत वर्णन आहे. 'तेन हरि मनसा निरतक्षत.' असल्या पराक्रमी वैदिक ऋभु ऋषींचे स्थान कोणते ? तर, ऋभुस्थात, अरिभुस्थान आणि आज अरबस्थान! वैदिक परम्परा निराकार उपासक आहे आणि इस्लाम परम्परा सुद्धां!

**ईराक, असिरिया, इज्राइल, इरान आणि बलुचिस्थान** हे सर्व देश क्रमशः आर्यक, असुरीय, असुरालय, आर्यन आणि श्लेच्छस्था या संस्कृत शब्दापांपासून बनले आहेत. तद्वत फाल्गुनस्थानाला अ विशेषण लागून अफाल्गुनस्थान, त्यापासून अफागनस्थान आणि अफगानस्थान

देशनान आले आहे. श्रीकृष्ण सखा अर्जुनाचे एक नाम फाल्गुन आहे. श्रीकृष्णाचे भक्त समजूनच आजचे अफगाण स्वतःच्या नांवानंतर 'कान्ह' हे विशेषण लावतात. कान्हपासून खान शब्द बनला. अफगाणी विशेषनामें असतात अफजलखान, फिरोजखान, चंगीजखान इत्यादि. हिन्देशियांतील लोक स्वतःच्या नामाअगोदर सु हें विशेषण लावतात जसें, सुकार्णो (सुकर्ण), सुबान्द्रियो (सुवानरीय), सुहार्तो (सुहृत) इत्यादि. ग्रीस आणि लगतच्या देशांतील प्राचीन लोक स्वतःच्या नांवानंतर इन्द्र उपाधि लावत असत जसें, अलेक्जान्द्र (अलक्षेन्द्र), मीनान्द्र (मीनेन्द्र) आणि साक्रेतिस (शतक्रतुस) इत्यादि. पाकिस्थान जरी भारतापासून वेगळा झाला तरी त्याचे पाकिस्थान नाम त्याने संस्कृत पक्वस्थान या नामापासूनच घेतले आहे.

युरोपांतील अधिकांश देशांची नामें शद्ध संस्कृतोत्पन्न आहेत. युरोपमधील अधिकांश देशांचे नामानंतर लॅन्द ही उपाधि आहे. दल या संस्कृत शब्दाचे उलटीकरण म्हणजे लॅन्द शब्द होय. असें संस्कृत शब्द उलट करण्याची प्रथा तिकडील देशांत बरींच होती असे दिसते. जसें संस्कृत मधें बोलणे याला ब्रूहि शब्द आहे या ब्रूहिला उलट करून इजराइलची (असुरालय) भाषा हिब्रू बनली; आणि भारतांतील प्राचीन शेषरामाचा प्राचीन इजिप्तमधील रामेसस बनला. अग्निन दल शब्दापासून इग्लन्द शब्द बनला. रोमन कालांत इग्लन्दमधें अग्निपूजा प्रचलित होती त्यावरून अग्निदल (इग्लन्द) नाम पडले असावे. आर्यदल शब्दापासून आयरलन्द बनला. आयरलन्दमधील लोक स्वतःला सेरोस्तात आयर म्हणतात. सारस्वत आर्य या शब्दाचा तिकडील उच्चार म्हणजे सेरोस्तात आयर् शब्द होय. जर्मनीचे खरें नांव दयुईश लॅन्द आहे; द्विशः दलाचे हें सोपे उच्चारण होय. आणि वस्तुतः दयानूब नदीच्या (दानव) नदीच्या दोन तीरावर म्हणजे दलावर जर्मन देश वसला आहे. आजचे जर्मन वैदिक परम्परेचे पूर्ण अभिमानी आहेत. फिनलन्द (पिंगदल), पोलन्द (पुलन्द), हालन्द (अबल), स्लाबिया आदि देशनाम संस्कृतोत्पन्न आहेत. फ्रेंचाची दशम परिमाणें तर संस्कृतोत्पन्नच आहेत.

लॅटिन देशापासून तो बलूचस्थानापर्यन्त सर्व देश प्राचीन द्रविदांच्या वसाहती होत्या हे आता सिद्ध झाले आहे. या देशांतील बोलभाषेंत अधिकांश द्रविद आणि संस्कृत शब्द आढळतात. लातिन शब्दच मुळी तामिली लात (होऊन गेलेली) आणि तेनेगी म्हणजे भाषा या दोन शब्दापासून झाला आहे. लात तगेगी म्हणजे लातिन होय. जे लोक अति शीघ्र (द्रु) पूर्ण बनतात, ज्ञानी बनतात (विद्) त्यांनाच द्रुविद (द्राविड) म्हणतात. हेच वैदिक संस्कृतीचे जगांतील खरें प्रचारक होय म्हणून ते खरे आर्य आहेत. त्यांचेत आर्य उपाधि बरीच सांपडते जसें अय्यर, नय्यर, मुदलअय्यर (मुदलियार) इत्यादि. तामिल शुद्ध संस्कृत शब्द आहे तन (शरीर) + इल (जीवात्मा) मिळून तामिल शब्द बनला आहे याच तमिली लोकांनी म्हणजे द्रुविदांनी जगाला वैदिक संस्कृतीचा वारसा देऊन आर्य केले आहे. 'कृण्वन्तो विश्वमार्यम्' हा द्रुविदांचाच पराक्रम होय.

अमेरिका भूखंड एक नवीन आणि जगापासून वेगळा भूखंड मानल्या गेल्या होता. पण आतां सिद्ध झाले आहे कि उत्तर अमेरिका खंडातील मूल रहिवाशी मंगोलियन वंशाचे असून दक्षिण अमेरिकेतील द्रुविद वंशाचे आहेत. उत्तर टोंकाला आशिया आणि अमेरिका खंड एका लहानशा सामुद्रधुनीने वेगळे झाले आहेत. मंगोलियातील (मध्यआशिया) प्राचीन लोक साधारणतः १९००० वर्षापूर्वी वरील बेहरिन (बहिन) ची सामुद्रधुनी ओलांडून उत्तर अमेरिकेतील अलक्षित प्रदेशांत म्हणजे अलास्कांत उतरले आणि तेथून ते सर्वदूर उत्तर अमेरिकेत पसरले असा ऐतिहासिक सिद्धान्त आहे. अमेरिकेतील रेड इंडियनांचे हेंच मंगलालयी वंशज होत. आणि दक्षिण अमेरिकेतील लोक? ते तर द्रुविद वंशाचे आहेत! मग ते दक्षिण अमेरिकेत कोठून आणि कसें आलेत? दक्षिण भारतांतून, नांवांनी; आणि सहस्त्रावधि मैलांचा प्रशांत महासागर ओलांडून! एवढे पराक्रमी वैदिक प्राचीन द्रुविद आर्य होते अन् आजही आहेत पण आज त्यांचे त्यांनाच विस्मरण झाले आहे ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

दक्षिण अमेरिकेतील प्राचीन इंका राज्य अय्यर बंधुंजी नव वसाहत होती. त्यालागूनच व्रजल देश होता, ज्याला आज ब्राजिल देश म्हणतात.

अंक शब्दाचा अपभ्रंश म्हणजें इंका शब्द होय. अंक म्हणजे मोजणें, द्रविदांचे वैदिक पराक्रमामुळे सर्व जग एकेकाळीं आर्य होते. इराणमधील आणि आयरलन्दमधील लोक आजही स्वतःला आर्य म्हणवितात. अ चा ह बनून जर्मनींत आर्यचा हर्र् बनला तर इंग्लन्द मध्ये सर् बनला.

जगाच्या प्राचीन आर्यत्वाला म्हणजें वैदिकतेला पुनर् स्मरणाचा उजाळा देऊन त्यांना वैदिक करायचे आहे. वैदिक संस्कृतीचा पाया योगविज्ञान असल्यामुळें सर्वत्र पसरलेल्या योग विज्ञानाद्वारेच विश्वाला वैदिक करायचे आहे. त्याकरतां योगसाधना आवश्यक आहेत. 'ताणि धर्माणि प्रथमाणि' सुयोग्य साधनांद्वारे सुयोग्य संस्कार होऊन प्रत्येक मानव ब्राह्मण बनूं शकेल. 'ब्रह्मजानाति ब्राह्मण:' जो ब्रह्म जाणेल तोच ब्राह्मण. **म्हणून सर्वांना ब्राह्मण बनविणे वैदिक संस्कृतीचे ध्येय आहे.** जन्मतः कोणीच ब्राह्मण नसतो. जन्मतः सारेच शूद्र आहेत. ते उत्तम संस्कारांनी ब्राह्मण बनू शकतात. शास्त्र सांगते, 'जन्मना जायते शूद्र: संस्कारात द्विज उच्यते' म्हणून उत्तम संस्काराद्वारे ब्राह्मण बनण्याचा प्रत्येकाचा अधिकार आहे मग तो शूद्र असो, चांडाल असो, निग्रो असो, ख्रिश्चन असो कि मुसलमान असो.

वैदिक विश्व हेच जगाला ब्राह्मण बनविण्याचे महान कार्य करीत आहे. स्थानी स्थानी योगसाधना वर्ग आणि अन्यान्य विषयांवर प्रवचनें देऊन लेख पुस्तके लिहून हें कार्य योगीं मनोहरजी करीत आहेत. कार्य सर्वांचेच आहे. सर्वांनी प्रथम स्वतः साधनाद्वारे ब्राह्मण बनून नन्तर सर्व विश्वालाच ब्राह्मण बनविणाऱ्या या महान कार्याला सहाय्य करावे हे निवेदन.

योगसाधनावर्गात साधारणतः चार गोष्टींचा समावेश असतो. १) ओमकार षट्चक्र भेदन २) योग निद्रा ३) आसनें आणि उच्च योगसाधना आणि ४) वैदिक जीवनावरील संबंधित विषयावर प्रवचने.

संपर्क स्थान :

**श्री. दत्ता महाकुलकर**

हेडगेवार भवनाजवळ, महाल,

नागपूर-४४०००२. (भारत)

वैदिक विश्व परिवार

# वैदिक विश्व प्रकाशन

योगी मनोहर कृत

(अ) प्रकाशित पुस्तकें—

१. World Ideal Bhagwan Gopal Krishna — मूल्य रु. ३
२. विश्व आदर्श योगेश्वर गोपाल कृष्ण (हिन्दी) मूल्य रु. ७
३. मृत्यूके बाद : जन्मके पूर्व (महाभारत रहस्य) (हिन्दी) मूल्य रु. ५
४. वैदिक विश्व (प्रचार पुस्तिका) (हिन्दी)
५. साधना एवम् साधक (हिन्दी) मूल्य रु. ५
६. रामायण रहस्य (मराठी) मूल्य रु. ५

(आ) आगामी प्रकाशन—

७. रामायण रहस्य (हिन्दी) मूल्य रु. ५
८. वैदिक सणांतील योगरहस्य (मराठी) मूल्य रु. ५
९. पञ्चकन्या (मराठी)
१०. पञ्चकन्या (हिन्दी)
११. संगीत ते समाधि (मराठी)
१२. संगीत से समाधि (हिन्दी)
१३. बृहत रामायण (हिन्दी)
१४. बृहत महाभारत (हिन्दी)
१५. उपनिषद रहस्य (हिन्दी)
१६. भगवद्गीता रहस्य (हिन्दी)

पत्ता :

योगी मनोहर

तुळसीबाग मार्ग, नागपूर–२